# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

## दिनांक १३-०८-९३ ते ३०-११-९३

## रजिष्टर क्र. १

## दिनांक :१३.०५.९३

**प्रस्ताव क्र.१ :**

सहाय्यक संचालक, नगर रचना म.न.पा. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराचे जुन्या हद्दीची विकास योजना शासनाने आदेश क्रमांक टी.पी.एस./३०७३/४९५८/डब्ल्यु-२/दिनांक ०६.०१.१९७५ मंजूर केली. सदरील मंजूर विकास योजनेला दहा वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ प्रमाणे विकास योजनेचा दहा वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर विकास पुर्ण झाल्यानंतर विकास योजनेच्या प्रस्तावाने बाधित होणाऱ्या मिळकतधारकांना स्थानिक स्वराज्य संस्थेस किंवा भूसंपादन करु शकणाऱ्या संस्थेस विकास योजनेने बाधित जमिनी बाबत खरेदी सुचना देता येते. सदरची खरेदी सुचना प्राप्त झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यांचे कायदेशिर बंधन आहे. अन्यथा सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर सदरचा विकास योजना प्रस्ताव खरेदी सुचना दिलेल्या मिळकती पुरता आपोआप रद्द होतो या संबंधित जमीन मालकांस विकास परवानगी मागण्याचा हक्क पोचतो.

मंजूर विकास योजना औरंगाबाद (जुनी हद्द) १९७५ मधील आरक्षण क्रमांक २७९, शॉपिंग सेंटर या आरक्षणात सरस्वती भुवन शिक्षण संस्था औरंगाबाद यांच्या मालकीच्या मिळकती नगर भुमापन क्रमांक ५१२१ क्षेत्र ९२८.७० चौ.मी.व नगर भूमापन क्रमांक ४८२१ क्षेत्र ४०६६.३० चौ.मी.बाधित होतात. या मिळकती बाबत सचिव सरस्वती भूवन शिक्षण संस्था यांनी दिनांक २०.०३.९३ रोजी खरेदी सुचना दिलेली आहे. ती दिनांक २२.०३.९३ रोजी महानगरपालिकेकडे प्राप्त झाली आहे. कायद्यातील तरतूदीनुसार ही सुचना प्राप्त झाल्यापासून सहा महिन्याच्या आत भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. करिता वरील नगर भूमापन क्रमांकाचे रितसर भूसंपादन करण्याचा प्रस्तावास मान्यता व्हावी.

**ठराव :**

नगर भूमापन क्रमांक ५१२१ क्षेत्र ९२८.०० चौ.मी.व नगर भुमापन क्रमांक ४८२१ क्षेत्र ४०६६.३० चौ.मी.या मिळकतीचे मंजूर विकास योजना १९९५ मधील आरक्षण क्रमांक २७९ शॉपिंग सेंटर या आरक्षणासाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्यासाठी मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.२ :**

सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर के की, मंजूर रेखांकन आदेश क्र.एमसी/जीएडी/कॉन-१/२१२४/७४, दिनांक ०९.०४.७४ या विद्या निकेतन कॉलनी बायजीपुरा सर्व्हे क्र.१४/भाग नगर भूमापन क्र.१२३६९ मंजूर रेखांकनातील प्लॉट क्रमांक २ मधील १.५ मी x २२.०० मी क्षेत्राची जागा जलनिःसारण वाहिनी टाकण्यासाठी आवश्यक आहे. असा प्रस्ताव कार्यकारी अभियंता जलनिःसारण यांचेकडून प्राप्त झाला. सदरची जागा खाजगी मालकीची असल्याने या जागेचे रितसर

तातडीने भूसंपादन करणे आवश्यक आहे. सबब सदरील जागेचे भूसंपादन अधिनियम १८९८ चे तरतूदीनुसार व कलम १७ अन्वये तातडीचे रितसर भूसंपादन करण्यास मान्यता व्हावी.

**ठराव :**

मंजूर रेखांकन आदेश क्र.एमसी/जीएडी/कॉन-१/२१२४/७४, दि.०९.०४.७४ विद्या निकेतन को.हौसिंग सोसायटी या मंजूर रेखांकनातील प्लॉट क्र.२ नगर भुमापन क्रमांक १२३६९/भाग मधील १.५ मी.X२२.०० मी.क्षेत्राच्या जागेचे संपादन भुसंपादन अधिनियम १८९४ चे तरतूदीनुसार करावे व कलम १७ लावून भूसंपादन तातडीने करण्यास मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## <u>दिनांक : १४.०५.९३</u>

**प्रस्ताव क्र.३ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, मा.उपसंचालक नगर रचना यांचे दालनात बैठक झाली. उपसंचालक नगररचना हे जुन्या मंजूर विकास योजनेची फेर तपासणी करीत आहे. चर्चेत परिस्थितीनुरुप उद्भवलेल्या स्थितीचा विचार करता मंजूर विकास योजनेत खालील किरकोळ स्वरुपाचे फेरबदल महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ अन्वये करणे आवश्यक आहे. तसा प्रस्ताव करावा असे ठरले.

१) मकई गेट ते मकबरा १०० फुट रुंद विकास योजना रस्ता :-
(पहा नकाशा क्रमांक-१ )

सदरील १०० फुट (३० मीटर) रुंद विकास योजना रस्त्याचे खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करतांना १०० फुट रुंद ऐवजी ८० फुट रुंद करण्यांत आले. रस्त्यांची रुंदी १०० फुट कायम ठेवून मकई गेट जवळील वाहतुक बेटा जवळची सोबत जोडलेल्या नकाशानुसार पुन्हा करुन फेर बदलाचा प्रस्ताव शासनास पाठविणे आवश्यक आहे.

२) ५० फुट रुंद विकास योजना रस्ता (रंगारगल्ली)
(पहा नकाशा क्र.२)

५० फुट रुंद विकास योजना रस्ता गुलमंडी ते सिटी चौक (रंगारगल्ली) या रस्त्याचे रितसर विशेष भूसंपादन कार्यालयामार्फत १९८३ साली भूसंपादनाची कार्यवाही सुरु झाली व निवाडा जाहिर झाल्यावर न्यायालयाची स्थगिती आदेश असल्यामुळे जागेचा ताबा मिळाला नाही. न्यायालयीन प्रकरणात वाढीची मुख्य मागणी आहे की, पश्चिम बाजूस केवळ ३ फुट ते ५ फुट बाधित आहेत ही बाब अन्यायकारक आहे व सदरील रस्ता एकमार्गी असल्याने ५० फुट ऐवजी ४० फुट रुंद करावा तथापि पुर्वी घेतलेल्या निर्णयानुसार ४५ फुट सोबत जोडलेल्या नकाशा प्रमाणे आखणीत बदल करुन प्रस्तावास शासनास मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक आहे.

३) ३० फुट रुंद विकास योजना रस्ता (कोहिनूर कॉलनी ते मकई गेट)

(पहा नकाशा क्रमांक-२)

३० फुट रस्ता विकास योजनेच्या आखणी प्रमाणे प्रत्यक्षात जागेवर तयार न होता अंदाजे १० फुट ते १२ फुटाच्या फरकाने जागेवर तयार आहे. तेव्हा विकास योजना रस्त्याची आवश्यकता नसल्याने तो रद्द करणे.

४) विकास योजनेतील औद्योगिक उपयोगी क्षेत्र निवासी क्षेत्रात समाविष्ट करणे
(पहा नकाशा क्र.४)

मोंढा व सिल्क मिल कॉलनी मंजूर विकास योजनेमध्ये औद्योगिक उपयोगी म्हणून दर्शविलेल्या क्षेत्रात सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे अनधिकृत निवास उपयोगी विकास झाल्यामुळे या ठिकाणी उर्वरित भागात काही निवासी बांधकामास परवानगी दिली असल्याने औद्योगिक क्षेत्र रद्द करुन निवासी क्षेत्रात समाविष्ट करणे योग्य होईल. कारण आता चिकलठाणा व वाळुज येथे मोठे औद्योगिक क्षेत्र विकसीत झाले असल्याने औद्योगिक क्षेत्र विकसित झाले असल्याने औद्योगिक क्षेत्राची गरज नसल्याने फेर बदलास शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे योग्य होईल.

वरील प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयास मंजूरी मिळावी.

**ठराव :**

औरंगाबाद शहराच्या जुन्या विकास योजनेत खालील किरकोळ फेरबदल करणे सद्यस्थितीचा व झालेल्या विकासाचा विचार करता आवश्यक झालेले आहे सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ खाली किरकोळ फेरबदल जो सोबतचे नकाशात हिरव्या रंगनि दाखविलेला आहे. करावयास मान्यता देण्यांत येत आहे.

१. मकईगेट मकबरा १०० फुट रुंद विकास योजना रस्ता (पहा नकाशा क्र.१ आखणीत बदल.
२. ५० फुट रुंद विकास योजना रस्ता (रंगारगल्ली) ४५ फुट रुंद करणे (पहा नकाशा क्र.२)
३. ३० फुट रुंद विकास योजना रस्ता (कोहीनूर कॉलनी ते मकई गेट) रद्द करणे.
४. दिल्ली गेट जवळील वाहतूक बेट व विकास योजना रस्ता (पहा नकाशा क्र.४)
५. औद्योगिक क्षेत्र मोंढा व सिल्क मिल कॉलनी येथील निवासी करणे.
(नकाशा क्रमांक ५ व ६)

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## <u>दिनांक : १४.०५.९३</u>

**प्रस्ताव क्र.४ :**

महानगरपालिका औरंगाबादच्या मालकीची खालील वाहने जुनी झाल्यामुळे तसेच अशा जुन्या वाहनावर व यंत्र सामुग्रीक सततचा होणारा जास्तीचा खर्च आर्थिकदृष्ट्या व परवडणारा असल्यामुळे त्यांना निकामी करण्यांत आले.

१. एम.सी.ओ.-२०३८ पुर्ग्युसन ट्रक्टर सन १९६६ चे मॉडेल व २ व्हील ट्रॉली एम.एच.ली.७०५८ १९७४ चे मॉडेल.
२. एम.एच.झेड-१८६० इंटरनॅशनल टॅक्टर १९७४ चे मॉडेल व एम.टी.बी.-४३४७ २ व्हील ट्रॉली १९८१ चे मॉडेल.
३. ८ ते १० टनी लॉयन कंपनीचा डिझेल रोड रोलर सन १९७६ चे मॉडेल क्र.डी.आर.आर.११८

वरील तीन वाहनांचे यंत्रसामुग्रीची सद्य:परिस्थितीचा तांत्रिकदृष्ट्या अभ्यास करुन घसारा किंमत काढण्यांत आली. या तिन्ही वाहनांकरिता सिलबंद निविदाद्वारे जाहिर लिलाव नोटीस देवून निविदा बोलावण्यांत आल्या. एकूण २० निविदा पत्रकांची विक्री झाली व त्यापैकी सहा निविदा पत्रके वसुल झाली. जाहिर लिलावात खालीलप्रमाणे दर आलेले आहेत.

१. एम.सी.ए.-२०३८ अ टॅक्टर व एम.डब्ल्यु.बी.-७०५८ २ चाकी ट्रॉली
   अ) श्री.जगन्नाथ तायडे, औरंगाबाद - ५७,५५१/-
   ब) श्री.प्रितमसिंग गिल, औरंगाबाद - ८०,५००/-
२. एम.एच.झेड-१८६० व एम.टी.बी.-४.४७ ट्रॉली
   अ) रकाना अमिनोद्दीन, औरंगाबाद
३. रोड रोलर डी.आर.आर.-११८
   अ) खाजा अमिनोद्दीन, औरंगाबाद - १,००,०००/-
   ब) प्रदिपकुमार परमार, औरंगाबाद - ९५,०००/-
   क) सय्यद सलाउद्दीन, औरंगाबाद - १,०५,०००/-

अशा प्रकारे अनुक्रमांक १ करिता श्री.प्रितमसिंग गिल, औरंगाबाद यांचे दर जास्ती दराचे असून त्यांनी भरलेली रक्कम किंमत रुपये ८०,५००/- आहे ही आलेली किंमत काढलेल्या घसारा किंमत रु.५५,०००/- पेक्षा जास्तीची आहे.

अनुक्रमांक २ करिता श्री.खाजा अमिनोद्दीन, औरंगाबाद यांचे एकच दरपत्रक आलेले असून त्यांनी भरलेले दर रक्कम रुपये ३६,७८६/- आहे. आपण काढलेली घसारा किंमत ४०,०००/- आहे. परंतू या वाहनाची स्थिती पहाता फारच खराब असल्यामुळे जरी किंमत थोडी कमी असली तरी ती योग्य आहे.

अनुक्रमांक ३ करिता श्री.सलाउद्दीन, औरंगाबाद यांचे दर जास्ती दराचे असून त्यांनी भरलेली किंमत रुपये १,०५,०००/- आहे व ही आलेली किंमत काढलेल्या घसारा किंमत रुपये १,००,०००/- पेक्षा जास्तीची आहे.

वर दर्शविल्याप्रमाणे निविदाद्वारे जाहिर लिलावात आलेल्या किंमतीत दर मंजूर करण्यास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेची जुनी झालेली वाहने २ ट्रॅक्टर ट्रॉलीसह व १ रोड रोलर ज्यांच्या विक्रीसाठी जाहिर लिलाव नोटीस देवून टेंडर पध्दतीद्वारे निविदा मागविण्यांत आल्या व त्यामध्ये खालीलप्रमाणे दर आलेले आहेत.

१. एम.सी.ए.-२०३८ ट्रॅक्टर व एम.डब्ल्यु.बी.-७०५८ ट्रॉली च्या लिलावाद्वारे विक्रीसाठी श्री.प्रितमसिंग गिल, औरंगाबाद यांच्या आलेल्या जास्तीच्या म्हणजे रुपये ८०,५००/- च्या किंमतीस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

२. एम.एच.झेड-१८६० ट्रॅक्टर व एम.टी.बी.-४३४७ ट्रॉली च्या लिलावाद्वारे विक्रीसाठी श्री.खाजा अभिनोद्दीन, औरंगाबाद यांचे आलेले दर रुपये ३६,७८६/- च्या किंमतीस वाहनाची तांत्रिक स्थिती पहाता जरी घसारा किंमतीपेक्षा थोडी कमी अंदाजे ८% कमी आली असली तरी हया किंमतीत वाहन करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

३. ८ ते १० टनी लॉयन कंपनीचे डिझेल रोड रोलर डी.आर.आर.-११८च्या लिलावाद्वारे विक्रीसाठी श्री.सय्यद सलाउद्दीन, औरंगाबाद यांचे झालेले जास्तीचे दर म्हणजेच रुपये १,०५,०००/- च्या किंमतीस विक्रीसाठी प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

नियमाप्रमाणे सर्व निविदाधारकांकडून लिलावात आलेली १००% रक्कम भरुन घेऊन वाहनांची/यंत्र सामुग्रीची डिलेव्हरी देण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. आर.टी.ओ.च्या नियमाप्रमाणे वरील वाहने हस्तांतरीत करुन देण्यांस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## <u>दिनांक : १५.०५.१९९३</u>

**प्रस्ताव क्र.५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, विधी सल्लागार या पदाची पुर्वीची वेतनश्रेणी रु.६०० ते ९५० व सुधारित २००० ते ३२०० अशी होती. चौथे वेतन आयोगानुसार व शासनाच्या निर्णयानुसार विधी सल्लागार या पदाची वेतनश्रेणी रु.६८० ते १२५० व सुधारित २२०० ते ३७०० ही वेतनश्रेणी लागू केली आहे.

तरी विधी सल्लागार या पदास चौथे वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणी रु.२२०० ते ३७०० ही वेतनश्रेणी दिनांक ०१.०१.१९८६ पासून लागू करुन वेतननिश्चिती करण्यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

उपरोक्त प्रस्तावानुसार विधी सल्लागार या पदास शासनाचे निर्णयानुसार व चौथे वेतन आयोगानुसार दि.०१.०१.१९८६ पासुन सुधारित वेतनश्रेणी रु.२२०० ते ३७०० ही वेतनश्रेणी देण्यांस मंजूरी देण्यांत येते. त्यानुसार वेतन निश्चिती करण्यांत यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**विषय क्र.६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, औरंगपुरा येथील संत एकनाथ मार्केट (सुपर मार्केट) येथील टेरेसचे वॉटर प्रुफींगचे काम करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,६१,५७१.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. तसेच सदर काम पावसाळ्यापुर्वी करणे असल्याने मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलम (६७) (क) प्रमाणे सदर काम श्री.रोख मसूद, गुत्तेदार यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याची मंजूरी मिळावी.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

अतिरिक्त शहर अभियंता यांच्या अभिप्रायानुसार, औरंगपुरा येथील संत एकनाथ मार्केट (सुपर मार्केट) येथील टेरेसचे वॉटर प्रुफींग करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये १,६१,५७१.०० च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच सदर काम पावसाळ्यापुर्वी करुन घेणे जरुरीचे असल्याने मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (क) प्रमाणे सदर काम श्री.शेख मसूद गुत्तेदार यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मंजूरी देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>सचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>प्रशासक<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

## <u>दिनांक : २१.०५.१९९३</u>

**विषय क्र.७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, संत एकनाथ रंग मंदिर येथील छताचे पत्रे बदलणे आणि वॉटर प्रुफिंगचे काम करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.५९,८१०.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. तसेच सदर काम पावसाळ्यापुर्वी करणे जरुरी असल्याने मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (क) नुसार सदर काम श्री.शेख मसूद गुत्तेदार यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याची मंजूरी मिळावी.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

अतिरिक्त शहर अभियंता यांच्या अभिप्रायानुसार संत एकनाथ रंग मंदिर येथील छताचे पत्रे बदलली आणि वॉटर प्रुफींगचे काम करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५१,८१०.०० च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच सदर काम पावसाळ्यापुर्वी करणे जरुरी असल्याने मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (क) नुसार सदर काम श्री.शेख मसूद, गुत्तेदार यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मंजूरी देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वेगवेगळ्या आकाराच्या एकूण ११२ टायर, ट्युब फ्लॅप खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये ५ लाख ५ हजाराचे अंदाजपत्रक मंजूर करण्यांत आले होते व या खरेदी करिता निविदापत्रक मागविण्यांत आले होते. परंतू हया खरेदीसाठी बजेटमध्ये तरतूद कमी पडल्यामुळे तसेच केंद्र शासनाने त्याच काळातच टायरवर ड्युटीज वाढविल्यामुळे सन १९९३ या आर्थिक वर्षात टायर्स खरेदी करावेत असे ठरले होते.

त्याचप्रमाणे खरेदीसाठी वर्तमानपत्राद्वारे निविदा सुचना मागविण्यांत आल्या असता एकूण सहा निविदापत्रकाची विक्री झाली व निविदा उघडण्याच्या तारखेला एकूण तीन निविदापत्रके वसुल झाली.

खालीलप्रमाणे ज्या त्या अधिकृत विक्रेतेचे दर सिएट कंपनीच्या टायर ट्युबसाठी कमी दराचे आले आहे.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | टायर साईट टायर क्रमांक | संख्या | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | चुन्नीलाल आसाराम कंपनी, औरंगाबाद. | १.५.९०X१५ ६ पी आर नायलॉन टायर/ट्युब | १२ नग | १९३५ | २३,२२०/- |
| | | २.६.००X१६ ८ पी आर टायर/ट्युब | ४० नग | २३८१ | ९५,२४०/- |
| | | ३.७.५०X१६ १२ पी आर. टायर/ट्युब | २० नग<br>७२ नग | ५०२० | १,००,४००/- |
| २. | मे.दिपक ॲटोमोबाईल, औरंगाबाद. | ९.००X२० नायलॉन १४ पी.आर.,टायर, ट्युब, फ्लॅप | १६ नग | ८०७० | १,२९,१२०/- |
| ३. | मे.बग्गा टायर्स, औरंगाबाद. | ९.००X५० नायलॉन १४ पी.आर.,टायर, ट्युब फ्लॅप | २४ नग | ८३०० | १,९९,२००/- |
| | | **एकूण** | **११२ नग** | **--** | **५,४७,१८०/-** |

अ) वरीलप्रमाणे एकूण ७२ टायर ट्युबसाठी म्हणजेच अ.क्र.१,२,३ साठी मे.चुन्नीलाल आसाराम ॲण्ड कंपनी, औरंगाबाद यांचे दर कमी दराचे असून रु.२,१८,८६०/- चे आहे.

ब) वरीलप्रमाणे एकूण १६ टायर ट्युब फ्लॅप अ.क्र.४ साठी मे.दिपक ॲटोमोबाईल्स, औरंगाबाद यांचे दर कमी दराचे असून रु.१,२९,१२०/-

क) वरीलप्रमाणे एकूण २४ टायर ट्युब फ्लॅप अ.क्र.५ साठी मे.बग्गा टायर्स, औरंगाबाद यांचे दर कमी दराचे असून रु.१,९९,२००/- आहे.

बऱ्याच सिटर वाहने, वॉटर टँकर्स, स्वच्छतेचे वाहनाचे टायर्स फारच खराब झाल्यामुळे ते त्वरीत बदलणे तांत्रिकदृष्टीने जरुरीचे आहे. तसेच काही टायरचा साठा भांडारात ठेवणे जरुरीचे आहे. तसेच प्रोफार्म इन्व्हाईसवर बिलाची अदाई करुन लगेच टायर, ट्युब, फ्लॅप खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळावी.

टायर ट्युब कोणत्याही कंपनी उधार देत नसल्यामुळे अशाप्रमाणे वर अ,ब,क, मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण रु.५,४७,१८०/- चे टायर/ट्युब/फ्लॅप खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सीएट कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून ज्यांचे आलेले दर कमी दर कमी दराचे आहेत. त्यांच्याकडून खालीलप्रमाणे टायर/ट्युब/फ्लॅप खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | एकूण टायर | एकूण किंमत |
|---|---|---|---|
| १ | मे.चुन्नीलाल आसाराम ॲण्ड कंपनी | ७२ नग | रु.२,१८,८६०/- |
| २ | मे.दिपक ॲटोमोबाईल्स, औरंगाबाद | १६ नग | रु.१,२९,१२०/- |
| ३ | मे.बग्गा टायर्स, औरंगाबाद | २४ नग | रु.१,९९,२००/- |
| | | **११२ नग** | **रु.५,४७,१८०/-** |

अशा प्रकारे वर दर्शविल्याप्रमाणे एकूण ११२ टायर/ट्युबच्या खरेदीसाठी येणाऱ्या रु.५,४७,१८०/- खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

हि खरेदी रिपेअर्स व खरेदीसाठी ठेवलेल्या सन १९९३/९४ च्या विविध बजेट हेड तरतूदीतून करण्यास शासकीय मान्यता देण्यांत येते.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक : २१.०५.९३

**प्रस्ताव क्र.९ :**

एम.एच.झेड-१६४५ जीप जे.१९७३ चे मॉडेल असून अतिशय जुनी झालेली आहे. सध्या ही जीप शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद हयांच्या वापरात आहे.

तसेच एम.एक्स.व्ही.-४४४१ ही जीप देखील जुनी झाली असून जी १९८४ चे मॉडेल आहे व सध्या विभागीय अधिकारी झोन क्र.५ ह्यांच्या वापरत आहे.

वरील दोन्ही जीप जुन्या झाल्यामुळे व त्यावर रिपेअरिंगचा खर्च जास्त होत असल्यामुळे हयापुढे त्या वापरणे जे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. म्हणून हया दोन्ही जीप निकाली काढून जाहिर लिलावाद्वारे त्यांची हार्राशी करण्याची आहे.

वरील दोन जीप हरास करण्यापुर्वी त्या जागी घसारा निधीतून दोन नवीन जीप खरेदी करावयाच्या आहेत. सन १९९३/९४ या आर्थिक वर्षात रु.१५ लाख घसारा निधीची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे.

महिंद्रा कंपनीच्या बंद फायबर बॉडीच्या दोन जीप खरेदी करण्यासाठी अंदाजे रु.४ लाख ५० हजार खर्च अपेक्षित आहे. तरी वरीलप्रमाणे दोन जीप खरेदीसाठी लागणाऱ्या खर्च रु.४ लाख ५० हजारास प्रशासकीय मान्यता मिळण्यास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका, औरंगाबाद मालकीच्या दोन जीप १) एम.एच.झेड-१६४५, २) एम.एक्स.व्ही.-४४४१ हया निकाली काढून हरास व जाहिर लिलावाद्वारे हराशी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

तसेच हया दोन जीपच्या जागी दोन नवीन बंद फायबर बॉडीच्या महिंद्रा जीप सन १९९३/९४ या आर्थिक वर्षात ठेवण्यांत आलेल्या १५ लाख रुपयेच्या घसारा निधीतून खरेदी करण्यांस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

तसेच रुपये ४ लाख ५० हजार रुपयाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. महिंद्रा कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून डी.जी.एस.ॲण्ड डी वा सरकारी दराने दरपत्रक मागवून पुढील वैधानिक कार्यवाही करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.,

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## <u>दिनांक : २६.०५.१९९३</u>

**प्रस्ताव क्र.१० :**

शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक एस.आर.व्ही.-१०७५/१०, दिनांक १९.०९.७५ अन्वये ८०% पदे अस्थायीचे स्थायी पदात रुपांतर करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षकांच्या ६६२ पदे मान्य आहेत. त्यातील १७१ शिक्षक जि.प.कडे कायम झालेले आहेत. नियमानुसार ८०% प्रमाणे ५३० शिक्षक कायम होणे आवश्यक उर्वरित २५९ प्राथमिक शिक्षकाची पदे स्थायी पदात सेवा जेष्ठतेनुसार रुपांतरीत करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार ३५९ प्राथमिक शिक्षकाची पदे अस्थायीचे स्थायी पदात रुपांतरीत (सेवा जेष्ठतेनुसार) करण्याची मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत व जुनी प्रशासकीय इमारत यामधील कॅलीनच्या तसेच गेस्ट हाऊसमध्ये सजावटीसाठी एकूण ३० नग पेंटींग बोर्ड खरेदी करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक

बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रुपये ८१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास मान्यता मिळावी. तसेच सदर पेंटींग मे.अजयवाला ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांच्याकडून रक्कम रुपये २७००/- प्रति पेंटींग बोर्ड या दराने खरेदी करण्यासाठी मान्यता मिळावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

अतिरिक्त शहर अभियंता यांच्या प्रस्तावानुसार महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत व जुनी प्रशासकीय इमारत यामधील कॅबीनच्या तसेच गेस्ट हाऊसमध्ये सजावटीसाठी एकूण ३० नग पेटींग बोर्ड खरेदी करण्यास तसेच रक्कम रुपये ८१,०००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते.

तसेच सदर ३० पेटींग बोर्ड मे.अजयवाला ट्रेडींग कंपनी यांच्याकडून रक्कम रुपये २७००/- प्रति नग या दराने खरेदी करण्यासाठी मान्यता दिली जाते.

ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासन निर्णय क्रमांक एएमसी/१६/१३५०/सी.आर-१०१/९२/नवी-२४ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१० मे १९९३ अन्वये महानगरपालिकेच्या अस्थापनेवर कामगार अधिकारी पद निर्माण करण्यास मंजूरी देण्यांत आलेली आहे. तसेच उपरोक्त पद महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील योग्य त्या व्यक्तीची त्या पदास आवश्यक ती प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता असल्यास आवश्यक तर वयाची अट शिथील करुन इतरांबरोबर विचार करण्यांत यावा, म्हणून शासनाने निर्देशित केलेले आहे. तसेच औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.७/६, दि.२४.०६.९२ नुसार "कामगार अधिकारी" या पदाची शैक्षणिक पात्रता एम.एस.डब्ल्यु. कामगार कल्याण व कर्मचारी प्रबंध व कामगार कायद्याची पदविका आणि विधी पदवीधारकास प्राधान्य अशी ठेवण्यांत आलेली आहे.

**ठराव :**

वरील प्रस्तावात नमूद केल्यानुसार प्रस्तावात दर्शविलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार सदरील पद मनपा कर्मचाऱ्यांना प्राधान्य देवून भरण्यांस मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## <u>दिनांक : ०५.०६.१९९३</u>

**प्रस्ताव क्र.१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लोखंडी सळ्या (स्टार स्टील) खरेदी बाबत दरपत्रक सूचना व मनपा/शअ/भांडार/१५६/९३, दि.१७.०४.९३ द्वारे दरपत्रक मागविले

असता दि.२६.०४.९३ रोजी तीन दरपत्रके वसूल झाली असून तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळ, औरंगाबाद यांचे दरपत्रक असून खालील प्रमाणे दर व अटी दिल्या आहेत.

१. ६ मी.मी. प्रति टन रु. १३,२५०.००
२. ८ मी.मी. प्रति टन रु. १३,२५०.००
३. १० मी.मी. प्रति टन रु. १२,९७५.००
४. १२ मी.मी. प्रति टन रु. १२,९५०.००
५. १६ मी.मी. प्रति टन रु. १२,९५०.००
६. २० मी.मी. प्रति टन रु. १३,१५०.००

१. सदरील दरात सर्व कर समाविष्ट आहे.
२. वरील दराची मुदत ३० तीस दिवस राहील.
३. मालाचा पुरवठा झाल्यावर १००% रक्कम त्वरीत देण्यांत यावे.
४. आदेश मिळाल्यापासून ३० दिवसात मालाचा पुरवठा करण्यांत येईल.
५. इसाऱ्याची रक्कम व अनामत रक्कम भरण्याबाबत आम्हास सुट असून सोबत शासनाचे परिपत्रक जोडले आहे.
६. बँकेचे हमी पत्र सोबत जोडले आहे.

वरील दर कमी करणे बाबत संबंधितास वाटाघाटी कार्यालयाचे पत्र क्र.मनपा/शअ/९३/१९०, दि.१४.०५.९३ द्वारे बोलावले असता दि.१५.०५.९३ मा.आयुक्त साहेब यांच्या दालनात खालीलप्रमाणे लोखंडी सळ्या (स्टारवरील) खरेदी करण्यांबाबत दर ठरविण्यांत आले असून एकूण ५० पन्नास टन पिळदार लोखंडी खरेदी करावे असे ठरविले आहे.

| | | **मंजूर दर** | **खरेदी** | **एकूण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १. | ८ मी.मी. | १३,०००.०० | १० मे.टन | १,३०,०००.०० |
| २. | १० मी.मी. | १२,७००.०० | १० मे.टन | १,२७,०००.०० |
| ३. | १२ मी.मी. | १२,७००.०० | १० मे.टन | १,२७,०००.०० |
| ४. | १६ मी.मी. | १२,७००.०० | १० मे.टन | १,२७,०००.०० |
| ५. | २० मी.मी. | १२,८००.०० | १० मे.टन | १,२८,०००.०० |
| | | | **५० मे.टन** | |

**ठराव :**

तरी महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडून दिनांक १५.०५.९३ या मंजूर दराप्रमाणे एकूण ५० मे.टन विविध प्रकारचे लोखंडी सळ्या (टॉर स्टील) खरेदी करण्याची व त्यांची रक्कम रु.६,३९,०००.०० सहा लाख एकोंणचाळीस हजार महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळ, औरंगाबाद यांना अदा करण्यांची प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.१४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासन निर्णय क्रमांक एएमसी/१३९२/५३०/सी.आर.-१९९२/नवि-२४, दिनांक २०.०२.९३ नुसार औरंगाबाद

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उप आयुक्तांचे एक पद निर्माण करण्याबाबत मंजूरी देण्यांत आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २३ मे १९७४ व दिनांक १९ डिसेंबर १९७९ नुसार २ पदे अस्तित्वात असल्यास १ पद मागासवर्गीयामधून राखीव ठेवण्यांत यावे. म्हणुन आदेश आहेत. तसेच शासनाचे पत्र क्र.ए.एम.सी.-१३९२/५३०/सी.आर.-१९/९२/नवि-२४, दिनांक १६ फेब्रुवारी, १९९३ नुसार मार्गदर्शन केले आहे की, उक्त निर्देशित शासन निर्णयानुसार सदरील पद भरतांना मागासवर्गीयासाठीच्या आरक्षणाची बाब विचारत घेण्यांत यावी. त्यानुसार सदरील पद महानगरपालिकेतील मागासवर्गीय वर्ग-२ (सिव्हील) अधिकाऱ्यांमधुन पदोन्नती द्वारे भरण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

उपरोक्त प्रस्तावानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर निर्माण करण्यांत आलेले पद प्रस्तावात नमूद करण्यांत आलेल्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीयाला आरक्षण ठेऊन महानगरपालिकेतील वर्ग-२ (सिव्हील) मधील मागासवर्गीय अधिकाऱ्यांमधुन भरण्यास मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.१५ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अनुसार निवड समितीचे गठण करुन निवड समितीने श्री.जी.एम.अंभोरे सचिव, महानगरपालिका, औरंगाबाद यांची "उपआयुक्त" या पदावर पदोन्नती करण्यांत यावी म्हणून शिफारस केलेली आहे. त्यानुसार श्री.जी.एम.अंभोरे यांना "उपआयुक्त" पदावर तात्पुरत्या स्वरुपाची १ वर्षाकरिता पदोन्नती शासनाची मान्यता मिळेल या आशेवर देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

उपरोक्त प्रस्तावानुसार श्री.जी.एम.अंभोरे यांना उपआयुक्त पदावर शासनाची मान्यता मिळेल या आशेवर १ वर्षाकरिता तात्पुरत्या स्वरुपाची पदोन्नती देण्यांस मान्यता देण्यांत येते. त्यानुसार पदोन्नती आदेश काढावेत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.१६ :**

मौजे बनेवाडी येथे न.भु.क्र.१९०४० च्या जागेत महानगरपालिकेने सन १९८३-८४ मध्ये सार्वजनिक संडास बांधलेले असून आजही वरील मिळकतीमध्ये संडासचे बांधकाम अस्तित्वात आहे. सार्वजनिक संडासने १९३.०० चौ.मी.जागा व्यापलेली आहे. जमिन मालक व त्यांचे हित संबंधितांनी त्याचे जागेत सार्वजनिक संडास बांधल्यामुळे महानगरपालिके

विरुध्द न्यायालयात दावा दाखल करुन मनाई हुकूम मिळविला होता. सदर वाढ मिटविणे व सार्वजनिक संडासाची हितसंबंधास वाटाघाटीसाठी दि.१०.०५.९३ ला बोलाविण्यांत येऊन सार्वजनिक संडासाने व्यापले जागेचे भूसंपादन करुन घेण्यासाठी तडजोड करण्यांत आली व मोबदल्याची रक्कम रुपये ४५,०००/- (रुपये पंचेचाळीस हजार) घेण्यास अर्जदाराने तयारी दर्शवून कोर्टाचा स्टे काढून घेण्याची तयारी असल्याचे सांगितले या मिळकतीचे मुळ मालक मयत झाले असून त्यांचे न.भु.क्र.१९०४० चे वारसदार खालीलप्रमाणे आहे.
१) श्री.मनोहर कचरु मुंढे (पाटील), २) वैजिनाथ कचरु मुळे (पाटील), ३) श्री.रमेश कचरु मुंढे (पाटील), ४) श्री.अशोक रघुनाथ पाटील असून त्यांनी सर्व अधिकार पत्र (जी.पी.ए.) म्हणून मनोहर कचरु मुंढे (पाटील) यांना दिले आहे.

हित संबंधतीने दिनांक १०.०५.९३ च्या चर्चेत ठरल्याप्रमाणे दिवानी दावा क्र.४१८/१९९१ वैजिनाथ विरुध्द मनपा हा दावा बिनशर्त मागे घेतला आहे.

तरी महानगरपालिकेने न.भु.क्र.१९०४० पैकी क्षेत्र १९३ चौ.मी.वर बांधलेले सार्वजनिक मोबदल्याची रक्कम रु.४५,०००/- हित संबंधितांना आवश्यक तो दस्तऐवजी करुन घेतल्यानंतर अदा करण्यास प्रस्ताव सादर.

**ठराव :**

न्यायालयाचा मनाई हुकूम दिवानी दावा क्र.४१८/१९९१ वैजनाथ विरुध्द म.न.पा.हितसंबंधीताने मागे (with drawal) घेतल्याने आणि महानगरपालिकेने सदर न.भु.क्र.१९०४० वर सन १९८३-८४ मध्ये सार्वजनिक संडास बांधलेले असल्याने मिळकत धारकास तडजोडीला बोलावून मोबदल्याची रक्कम रुपये ४५,०००/- (रुपये पंच्चेचाळीस हजार) देण्यांचे मान्य केले असल्याने वरील रक्कम १९३ चौ.मी. जागा रितसर ताब्यात घेवून हितसंबंधितांना मावेजा म्हणून देण्यांस मान्यता देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## <u>दिनांक : ११.०६.९३</u>

**प्रस्ताव क्र.१७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्रीमती कांचन सप्रे, क्रिडाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी क्रिडाधिकारी पदावर दिनांक २६.०६.९३ पासून एक वर्षासाठी धारणाधिकार मिळावा म्हणून विनंती केलेली आहे. यापुर्वी त्यांना २ वर्षाचा याच पदावर धारणाधिकारी दिलेला आहे. त्यामुळे अंतिमभुदत वाढ म्हणून त्यांना १ वर्षाचा धारणाधिकार मंजूर करण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

उपरोक्त प्रस्तावानुसार श्रीमती कांचन सप्रे, क्रिडाधिकारी यांना दि.२६.०६.९३ पासून १ वर्षासाठी क्रिडाधिकारी पदावर धारणाधिकार मंजूर करण्यांत येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरात विविध ठिकाणी ३८ इंधन विहीरी खोदावयाच्या आहेत. त्यासाठी रक्कम रुपये ९,८९,०००/- एवढ्या अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरचा खर्च हा महराष्ट्र शासनातर्फे उन्हाळ्यांत नागरी क्षेत्रास पाणी पुरवठा योजने अंतर्गत रु.१०,००,०००/- ची जी तरतूद केलेली आहे. त्यामधून करण्यांत येणार आहे. करिता अंदाजपत्रक रक्कम रु.९,८९,०००/- यास प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

वरील प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात विविध ठिकाणी इंधन विहीरी खोदण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रु.९,८९,०००/- यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१९ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, पुस्तक पेढी योजने खाली इयत्ता १ ली, २ री, ५ वी च्या विद्यार्थ्यांना नवीन क्रमिक पुस्तकांचे संच उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडून अनुदान मंजूर केले जाते. शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्रक क्र.प्राशिरा-३९९३/९३-९४,पु.पे.यो.मागणी (न.प.) १९३ (६) दिनांक २२.०४.९३ प्रमाणे शासनाकडून औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण विभागाकरिता पुस्तक पेढी योजने अंतर्गत सन १९९३-९४ करिता एकूण १,४७,०००/- एक लाख सत्तेचाळीस हजार रुपये अनुदान तरतूद उपलब्ध करुन दिली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण घटक योजना तरतूद | - | १६,०००/- |
| २. | विशेष घटक योजना तरतूद | - | १,३१,०००/- |
| | **एकूण** | **-** | **१,४७,०००/-** |

तसेच उपलब्ध तरतूदीच्या मर्यादित पाठ्यपुस्तकांचे संच नेहमीच्या पध्दतीनुसार पाठ्यपुस्तक मंडळाकडून रोख स्वरुपात खरेदी करावयाचे आहेत. झालेल्या खरेदीच्या प्रस्तावात जो खर्च होईल तो नंतर अनुदान रुपाने (५०%) आपणांस देण्यांत येईल.

करिता पुस्तक पेढी साठी पुस्तक खरेदी करिता रुपये १,४७,०००/- एक लाख सत्तेचाळीस हजार रुपये मंजूरीस्तव सादर.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक : १४.०६.९३

**प्रस्ताव क्र.२० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९३-९४ या वर्षात जलशुध्दीकरणासाठी १०० मे.टन तुरटी मे.धरमजी मोरारजी कं.लि.कडून खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,००,०००/- एवढ्याचे तयार करण्यांत आले आहे.

तरी रक्कम रु.३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

सन १९९३-९४ या वर्षात जलशुध्दीकरणासाठी १०० मे.टन धरमजी मोरारजी केमीकल्स कंपनी ने उत्पादित केलेली तुरटी साठीचे अंदाजपत्रक रक्कम रु.३,००,०००/- यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.२१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९३-९४ या वर्षात जलशुध्दीकरणांच्या कामासाठी आवश्यक असलेली १०० मे.टन ब्लीचिंग पावडर खरेदी करीता रक्कम रु.६,३४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर साहित्य (ब्लिचींग पावडर) मे.त्रिवेदी ॲण्ड कंपनी, १२८४, सुलतानसिंग बिल्डींग अश्मिरी गेट, दिल्ली यांचे मार्फत मागील वर्षाचे रेट व कॉंट्रक्टवर आश्यकतेनुसार वेळोवेळी बदलणाऱ्या दराप्रमाणे खरेदी करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९३-९४ वर्षात जलशुध्दीकरणाच्या कामासाठी आवश्यक असलेले १०० मे.टन ब्लिचींग पावडर खरेदीसाठी रक्कम रुपये ६,३४,०००/- च्या अंदाजपत्रकास आणि सदर साहित्य मे.त्रिवेदी ॲण्ड कंपनी, दिल्ली यांचे मार्फत मागील वर्षाचे रेट कॉंट्रक्टवर आश्यकतेनुसार वेळोवेळी बदलणाऱ्या दराप्रमाणे खरेदी करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक : १५.०६.९३

**प्रस्ताव क्र.२२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा विभागासाठी सी.आय.स्पेशल्स, खरेदी करण्यासाठीच्या रक्कम रु.४,९०,५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीचा ठराव क्रमांक १९/१६ दिनांक २३.०६.९२ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा क्रमांक मनपा/पापु-१/भांडार/३२३/९३, दि.२२.०२.९३ नुसार (दुसऱ्या वेळेस) जाहिर निविदा मागविण्यांत आल्या निविदा सूचना ही दैनिक मराठवाडा, सकाळ, औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत आली असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (४) चार निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण (३) तीन सिलबंद निविदा प्राप्त त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.व्यंकटेश मेटल वर्क्स | - | १९.५० प्रति किलो |
| २. | मे.बालाजी इंडस्ट्रीज | - | १८.९५ प्रति किलो |

३. मे.महाराष्ट्र लघु निविदा महामंडळ, औरंगाबाद. - १९.२५ प्रति किलो

वरील प्रमाणेच्या तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दर हा मे.बालाजी इंडस्ट्रीज यांचा आहे. म्हणजे १८.९५ प्रति किलो असा दर दिलेला आहे. मे.बालाजी इंडस्ट्रीज यांनी दिलेला दर या कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्र.५७६/९३, दि.२३.०३.९३ नुसार दराबाबत वाटाघाटीचे पत्र देण्यांत आले होते. त्याप्रमाणे मे.बालाजी इंडस्ट्रीज यांनी दिलेला दर या कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्र.५७६/९३, दि.२३.०३.९३ नुसार दराबाबत वाटाघाटीचे पत्र देण्यांत आले होते. त्याप्रमाणे मे.बालाजी इंडस्ट्रीज यांचे सोबत मा.प्रशासक यांच्या दालनात दिनांक २५.०५.९३ रोजी वाटाघाटी झाली असता दर रु.१८.९५ प्रति किलो या दरास प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे व तसेच मे.बालाजी इंडस्ट्रीज यांनी मान्य केलेला आहे.

करिता मे.बालाजी इंडस्ट्रीज यांचे तर्फे रुपये १८.७५ प्रति किलो या दराने सी.आय.स्पेशल खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.बालाजी इंडस्ट्रीज यांचे तर्फे वाटाघाटीनुसार रु.१८.७५ प्रति किलो या दराने सी.आय.स्पेशल्स खरेदी करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>सचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>प्रशासक<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.२३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, अस्थापना-१ विभागाचा वाढता कामाचा व्याप लक्षात घेता, त्या विभागामध्ये जबाबदारीच्या दृष्टीकोनातूर व प्रशासकीय कारणास्तव "वरीष्ठ लिपीक" पदाऐवजी "अस्थापना अधिक्षक" हे पद कार्यालयाने अधिक्षक संवर्गातील वेतनश्रेणी रु.१६४० ते २९०० मधील वेतनश्रेणी मध्ये अस्थापना-१ विभागामध्ये देण्यांत यावे. या करिता अतिरिक्त पद निर्माण करण्याची आवश्यकता नाही. सध्या मनपामध्ये भांडार अधिक्षक, सहाय्यक जकात अधिक्षक, कार्यालयीन अधिक्षक, लेखपाल, जेष्ठ लेखा परिक्षक ही पदे १६४० ते २९०० या वेतनश्रेणीमध्ये कार्यरत आहेत. या पदामधूनच "अस्थापना अधिक्षक" पदनामाचे पद अस्थापना-१ विभागामध्ये त्या विभागाचा कामाचा व्याप जबाबदारीच्या दृष्टीकोनातून देण्यांस प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

उपरोक्त प्रस्तावानुसार अस्थापना-१ विभागामध्ये "अस्थापना अधिक्षक" पदनामाचे पद आहे. त्याच १६४० ते २९०० वेतनश्रेणीतील पदामधून अस्थापना-१ विभागांत देण्यांस मान्यता देण्यांत येते. वरील लिपिकाऐवजी "अस्थापना अधिक्षक" हे १६४० ते २९०० वेतन श्रेणीतील पद अस्थापना-१ विभागाकरिता राहील. प्रस्तावास मान्यता देण्यांत येते. त्यानुसार वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>सचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>प्रशासक<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक : १७.०६.९३

**प्रस्ताव क्र.२४ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका ठराव क्र.८२५, दि.२७.१२.१९८५ अन्वये एकूण चार ज्युनिअर सुरक्षा रक्षकांची पदे वेतनश्रेणी रु.२००-२८० (सुधारित ७५०-९५०) मध्ये निर्माण करण्यांत आली होती. इतर कार्यरत असलेले सुरक्षा हयांची व वरील चार सुरक्षा रक्षकांची कर्तव्य समान असून इतर सुरक्षा रक्षकांना रु.८२५-१२०० ही वेतनश्रेणी देण्यांत येते. तेव्हा सदर चार सुरक्षा रक्षकांना रु.८२५-१२०० ही वेतनश्रेणी दि.०१.०८.१९९२ पासून लागू करणेस्तव सादर.

**ठराव :**

लेखाधिकारी हयांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार सदर चार सुरक्षा रक्षकांची वेतनश्रेणी रु.८२५-१२०० ही दि.०१.०८.१९९२ पासून लागू करण्याची मंजूरी दिली जाते. परंतू त्यांनी केलेली दि.०१.०१.१९८६ पासूनची मागणी मान्य करता येत नाही. तरी सदर ठरावास प्रशासकीय मान्येता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.२५ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ (१) अन्वये महानगरपालिकेतील तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या गणवेषा बाबतचे विनियमांचा मसूदा सोबत जोडलेला आहे. तरी सदर विनियमांचा मसदा मंजूरीस्तव सादर.

### विनिमय तक्ता क्र.३
## प्रपत्र "अ" तृतीय श्रेणी कर्मचारी

### पुरविण्यांत येणारे गणवेश

| अ .क्र | विभागाचे नांव | पदनाम | गणेवश (अ) | गणवेशा सोबतचे साहित्य (ब) | पावसाळी रलावबे व इतर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | आरोग्य विभाग | १) जेष्ठ अन्न निरिक्षक | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट दरवर्षी | पी कॅप बॅचसह ए.एम.सी.शोल्डर बॅच लाईन यार्ड स्टार्च, नेमप्लेट, बेल्ट बॅच सह रेड शुज, पायमोजे खाकी दरवर्षी | १) रेनकोट (दर तीन वर्षांनी) २) वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| | | २) अन्न निरिक्षक | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट दरवर्षी | पी कॅप बॅचसह ए.एम.सी.शोल्डर बॅच लाईन यार्ड स्टार्च, नेमप्लेट, बेल्ट बॅच सह | १) रेनकोट (दर तीन वर्षांनी) २) वुलन कोट दर तीन वर्षांनी | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रेड शुज, पायमोजे खाकी दरवर्षी | | |
| | | ३) मलेरिया निरिक्षक | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट दरवर्षी | पी कॅप बॅचसह ए.एम.सी.शोल्डर बॅच लाईन यार्ड स्टार्च, नेमप्लेट, बेल्ट बॅच सह रेड शुज, पायमोजे खाकी दरवर्षी | १) रेनकोट (दर तीन वर्षांनी) २) वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| २. | प्रशासकीय विभाग | १) इमारत निरिक्षक | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट दरवर्षी | पी कॅप बॅचसह ए.एम.सी.शोल्डर बॅच लाईन यार्ड स्टार्च, नेमप्लेट, बेल्ट बॅच सह रेड शुज, पायमोजे खाकी दरवर्षी | १) रेनकोट (दर तीन वर्षांनी) २) वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| ३. | जकात विभाग | १) जकात निरिक्षक | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट दरवर्षी | पी कॅप बॅचसह ए.एम.सी.शोल्डर बॅच लाईन यार्ड स्टार्च, नेमप्लेट, बेल्ट बॅच सह रेड शुज, पायमोजे खाकी दरवर्षी | १) रेनकोट (दर तीन वर्षांनी) २) वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| ४. | सुरक्षा विभाग | १) सुरक्षा अधिकारी | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट दरवर्षी (फकत स्टार-६) | पी कॅप बॅचसह ए.एम.सी.शोल्डर बॅच लाईन यार्ड स्टार्च, नेमप्लेट, बेल्ट बॅच सह रेड शुज, पायमोजे खाकी दरवर्षी | १) रेनकोट (दर तीन वर्षांनी) २) वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| ५. | सुरक्षा विभाग | २) जमादार | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट दरवर्षी (फकत स्टार-६) | स्टार चार शॉट लाठी, व्हिसल | वुलनकोट, दर तीन वर्षानी | |
| | | ३) सुरक्षा रक्षक | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट दरवर्षी (फकत स्टार-६) | बॅरेट कॅप, पीक कॅप ऐवजी स्टार नाही शॉट लाठी व व्हिसल | वुलन कोट दर ३ वर्षानी | |
| ६. | साफसफाई खाते | १) जेष्ठ स्वच्छता निरिक्षक | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट दरवर्षी (फकत स्टार-६) | बॅरेट कॅप, पीक कॅप ऐवजी स्टार नाही शॉट लाठी व व्हिसल | वुलन कोट दर ३ वर्षानी | |
| | | २) स्वच्छता निरिक्षक | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट | बॅरेट कॅप, पीक कॅप ऐवजी स्टार नाही शॉट लाठी व व्हिसल | वुलन कोट दर ३ वर्षानी | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दरवर्षी (फकत स्टार-६) | | | |
| ७. | कर वसुली विभाग (विभागीय कार्यालय) | १) करनिरिक्षक | २ शर्ट, २ पॅन्ट, खाकी टेरीकॉट दरवर्षी (फकत स्टार-६) | बॅरेट कॅप, पीक कॅप ऐवजी स्टार नाही शॉट लाठी व व्हिसल | वुलन कोट दर ३ वर्षानी | |
| ८. | यांत्रिकी विभाग | १) जेष्ठ वाहन चालक व सर्व वाहन चालक | दोन पॅन्ट, दोन शर्ट, खाकी कापड टेरीकॉट | शोल्डर बॅच दोन, नेमप्लेट एक, शुज रेड एक, पायमोजे २, दोन क्र. | रेनकोट वुलन स्वेटर | |
| | | २) मा.महापौर, उपमहापौर, मा.आयुक्त, सचिव, शहर अभियंता, अति.श.अभियंता, नगर रचना-१, पदाधिकारी यांचे कारचे चालक | दोन पांढरे शर्ट दोन पांढऱ्या पॅन्ट | शोल्डर बॅच एक नेमप्लेट एक शुज रेड एक, पायमोजे दोन, बॅरेट कॅप, एक (पांढरी) पांढरे हातमोजे | रेन कोट व छत्री वुलन स्वेटर | |
| ९. | आरोग्य विभाग | १) वरील क्षेत्र कार्यकर्ता (एस.व्ही.एम.पी. डब्ल्यु.) एस.एफ.डब्ल्यु. | दोन पॅन्ट व शर्ट पांढरा टेरीकॉट | शोल्डर बॅच नेमप्लेट शुज कॅन्व्हस, पायमोजे पांढरे दोन | रेनकोट | |
| | | २) सार्वजनिक आरोग्य परिचारिका, (पी.एच.एन.) | दोन साडी व दोन ब्लाऊज, पांढरे, स्काफ्स दोन व निळे बेल्ट | नेमप्लेट एक चेस्ट बॅच दोन स्काफ दोन निळे बेल्ट दोन कॅन्व्हस शुज एक सॉक्स दोन | छत्री फोल्डींग | |
| | | ३) पारिचारिका/प्रसविका, वर्स/ए.एन.एम. | दोन साडी पांढरे दोन ब्लाऊज पीस पांढरे | चेस बॅज कॅन्व्हस शुज एका सॉक्स एक नेमप्लेट एक | छत्री फोल्डींग | |
| | | ४) क.मिश्रक (कंपांडर) | दोन शर्ट पॅन्ट पांढरे कापड | नेमप्लेट एक, शोल्डर बॅच एक कॅन्व्हस शुज एक सॉक्स एक पांढरी टोपी एक | साधी छत्री | |

**विनिमय तक्ता क्र.३**

**प्रपत्र "ब"**

## सर्व पुरुष कर्मचारी चतुर्थश्रेणी

**<u>पुरविण्यांत येणारे गणवेश</u>**

| अ .क्र | विभागाचे नांव | पदनाम | गणवेश (अ) | गणवेशा सोबतचे साहित्य (ब) | पावसाळी रलावबे व इतर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | १) फोरमन (कार्यदेशक) | दोन शर्ट दोन पॅन्ट निळा रंग टेरीकॉट | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट, कॅन्व्हस शुज | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षानी | |
| | | २) हेड मेकनिक | दोन शर्ट दोन पॅन्ट निळा रंग टेरीकॉट | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट, कॅन्व्हस शुज | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षानी | |
| | | ३) मेकिनिका | दोन शर्ट दोन पॅन्ट निळा रंग टेरीकॉट | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट, कॅन्व्हस शुज | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षानी | |
| | | ४) हेड पंप ऑपरेटर | दोन शर्ट दोन पॅन्ट निळा रंग टेरीकॉट | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट, कॅन्व्हस शुज | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षानी | |
| | | ५) पंप ऑपरेटर | दोन शर्ट दोन पॅन्ट निळा रंग टेरीकॉट | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट, कॅन्व्हस शुज | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षानी | |
| | | ६) ॲटो इलेक्ट्रीशियन | दोन शर्ट दोन पॅन्ट निळा रंग टेरीकॉट | शोल्डर बॅच पायमोजे खाकी नेमप्लेट, कॅन्व्हस शुज | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षानी | |
| | | विद्युत लाईनमन | दोन शर्ट पॅन्ट खाकी टेरीकॉट | शोल्डर बॅच कॅन्व्हस शुज सॉक्स नेमप्लेट | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षानी | |
| | | पा.पु.लाईनमन | दोन शर्ट दोन पॅन्ट | शोल्डर बॅच गम बुट नेम प्लेट | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| | | फिटर | दोन शर्ट दोन पॅन्ट | शोल्डर बॅच गम बुट नेम प्लेट | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| | | क्लिनर | दोन शर्ट पॅन्ट निळा रंग टेरीकॉट | नेम प्लेट शोल्डर बॅच | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षांनी | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ज्यु.ऑपरेटर | दोन शर्ट पँट निळा टेरीकॉट | नेम प्लेट शोल्डर बॅच | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| | | ऑईलमन | दोन शर्ट पँट निळा टेरीकॉट | नेम प्लेट शोल्डर बॅच | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| | | हेडमाळी | दोन शर्ट पॅन्ट खाकी | नेमप्लेट, शोल्डर बॅच, वॅटटे कॅप | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| | | १) माळी (पुरुष) | दोन शर्ट पॅन्ट खाकी | नेमप्लेट, शोल्डर बॅच, | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| | | २) सर्व शिपाई | दोन शर्ट दोन पँट (पांढरे) | शोल्डर बॅच, टोपी पांढरी, नेमप्लेट | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| | | प्रशासकीय कार्यालयातील शिपाई | दोन शर्ट दोन पँट (पांढरे) | शोल्डर बॅच टोपी पांढरी, नेमप्लेट, शुज | रेनकोट व वुलन कोट दर तीन वर्षांनी | |
| | | सर्व जवान | दोन शर्ट पँट खाकी | नेम प्लेट, टोपी खाकी चप्पल (कोल्हापुरी) शोल्डर बॅच | छत्री, रेनकोट | |
| | | नाका जवान | दोन शर्ट पँट खाकी | नेम प्लेट, टोपी खाकी चप्पल (कोल्हापुरी) शोल्डर बॅच | छत्री, रेनकोट | |
| | | नाका हमाल | दोन शर्ट पँट खाकी | नेम प्लेट, टोपी खाकी चप्पल (कोल्हापुरी) शोल्डर बॅच | रेनकोट दर तीन वर्षांनी | |
| | | वाचमन/गार्ड | दोन शर्ट पँट खाकी | नेमप्लेट, गमबुट, लाठी, शिट्टी, शोल्डर बॅच | रेनकोट दर तीन वर्षांनी | |
| | | पुरुष मजूर | दोन शर्ट पॅन्ट खाकी | नेमप्लेट, शोल्डर बॅच, चप्पल | रेनकोट दर तीन वर्षांनी | |
| | | मलेरिया मजूर | दोन शर्ट पॅन्ट खाकी | नेमप्लेट, शोल्डर बॅच, चप्पल | रेनकोट दर तीन वर्षांनी | |
| | | सेवक (शिक्षण विभाग) | दोन शर्ट पॅन्ट पांढरा | नेमप्लेट, शोल्डर बॅच, टोपी पांढरी | रेनकोट दर तीन वर्षांनी | |

**विनिमय तक्ता क्र.३**

## प्रपत्र "क"

## स्त्री कर्मचारी चतुर्थश्रेणी

**<u>पुरविण्यांत येणारे गणवेश</u>**

| अ .क्र | विभागाचे नांव | पदनाम | गणेवश (अ) | गणवेशा सोबतचे साहित्य (ब) | पावसाळी रलावबे व इतर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ५. | उद्यान | माळीन | दोन साड्या | नेमप्लेट, चेस, बॅच | एक वुलन | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विभाग | | दोन ब्लाऊज पीस स्काय ब्लु कलर | चप्पल जोड | स्वेटर, व एक वुल चादर, छत्री दर तीन वर्षांनी | |
| ६. | साफसफाई खाते | मजूरीन | दोन साड्या दोन ब्लाऊज पीस स्काय ब्लु कलर | नेमप्लेट, चेस, बॅच चप्पल जोड | एक वुलन स्वेटर, व एक वुल चादर, छत्री दर तीन वर्षांनी | |
| | | स्त्री स्वीपर | दोन शर्ट सलवार कापड ओढणी २.५ मीटर | नेमप्लेट, चेस, बॅच चप्पल जोड | एक वुलन स्वेटर, व एक वुल चादर, छत्री दर तीन वर्षांनी | |
| | | दाया | दोन पांढऱ्या पॉलीस्टर साड्या व ब्लाऊज | नेमप्लेट, चेस, बॅच चप्पल जोड | एक वुलन स्वेटर, व एक वुल चादर, छत्री दर तीन वर्षांनी | |
| ७. | सेविका | सेविका (शिक्षण/इतर विभाग) | दोन पांढऱ्या पॉलीस्टर साड्या व ब्लाऊज | नेमप्लेट, चेस, बॅच चप्पल जोड | एक वुलन स्वेटर, व एक वुल चादर, छत्री दर तीन वर्षांनी | |

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ (१) अन्व्ये महानगरपालिकेतील तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या गणवेशा बाबतचे विनियमांचा मसूदा सोबत जोडलेला असून सदर विनिमयास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. प्रशासकीय व वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-२२.०६.१९९३

**प्रस्ताव क्र.२६ :**

कार्यकारी अभियंता पा.पु. व जलनि:सारण महापालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासकीय विशेष विकास निधी सन १९९०-९१ च्या अनुदानात रु.१००.०० लाखाची नाला ट्रेनिंगसाठी तरतूद होती. यामध्ये रु.२२.०० लाखाची बचत झालेली आहे. या बचतीमधून नाला जंक्शन समर्थनगर, औरंगपुरा भाजी मंडई समोरील (नारळीबाग) व काचीवाडा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी मा.आयुक्त यांनी मंजूरी दिल्यानुसार वरील कामासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९२-९३ च्या

दरपत्रकानुसार रु.२१,५४,६३४.०० चे अंदाजपत्रक बनावण्यात आले ज्यास मा.आयुक्त यांनी दि.०८.०४.९३ रोजी मान्यता दिली आहे.

त्यानुसार रु.२०,५१,५५०.०० च्या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना १/९३-९४ ही प्रसिध्दीस देण्यासाठी जनसंपर्क अधिकारी यांचेकडे पत्र क्र.मनपा/विका/११९/९३, दि.१२.०४.९३ नुसार पाठविण्यांत आली असता दै.लोकमत व दै.इंडियन एक्सप्रेस मध्ये प्रसिध्दीस देण्यांत आली.

त्याप्रमाणे निविदा विक्रीची अंतिम तारिख २३.०४.९३ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत ७ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीची नियोजित तारिख २९.०४.९३ रोजी तीन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या असल्याचे दि.२९.०४.९३ रोजी निविदापेटी उघडली असता दिसून आली प्राप्त ३ मोहरबंद निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उदय इंजिनियरिंग कंपनी | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% जास्त |
| २. | श्री.एस.एम.मंडोरे | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.१२% जास्त |
| ३. | कुलवंतसिंग दिवाणसिंग | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.४४% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.एस.एम.मंडोरे यांची अंदाजपत्रकापेक्षा ८.१२% जास्त दराची होती. मात्र वरील दराबाबत ठेकेदाराशी वाटाघाटी करण्यांत आली असता त्यांनी भरलेल्या दरात १% कमी करुन उपरोक्त काम ७.१२% अधिकने करण्यांचे मान्य केले आहे. ज्यास मा.आयुक्त यांनी दि.२९.०४.९३ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार नाला जंक्शन समर्थनगर, औरंगपुरा भाजी मंडई समोर (नारळीबाग) व काचीवाडा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी श्री.एस.एम.मंडोरे यांची मा.आयुक्तांशी केलेल्या दर वाटाघाटीप्रमाणे मान्य करण्यांत आलेली अंदाजपत्रकापेक्षा ७.१२% अधिक दराची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाला जंक्शन समर्थनगर, औरंगपुरा भाजी मंडई समोर (नारळीबाग) व काचीवाडा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी श्री.एस.एम.मंडोरे यांची दर वाटाघाटी प्रमाणे मान्य करण्यांत आलेली अंदाजपत्रकापेक्षा ७.१२% अधिक दराची निविदा स्विकारण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.२७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र.१ मधील जलनिःसारण कामाची दुरुस्ती व देखभाल करण्याकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाचे १९९२/९३ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.४,००,०००/- चे तयार करण्यांत आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.१ मधील जलनिःसारण कामाची दुरुस्ती व देखभाल करिता रक्कम रु.४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.२८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र.३ (स्लम) मधील जलनिःसारण कामाची दुरुस्ती व देखभाल करण्याकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाचे १९९२-९३ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.३,००,०००/- चे तयार करण्यांत आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.३ (स्लम) मधील जलनिःसारण कामाची दुरुस्ती व देखभाल करिता रु.३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.२९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र.३ मधील जलनिःसारण कामाची दुरुस्ती व देखभाल करण्याकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाचे १९९२-९३ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ६,००,०००/- चे तयार करण्यांत आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.३ जलनिःसारण कामाची दुरुस्ती व देखभाल करिता रु.६,००,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.३० :**

कार्यकारी अभियंता (जलनिःसारण व पाणी पुरवठा विभाग) औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र.६ मधील विविध ठिकाणच्या ड्रेनेज लाईनच्या दुरुस्ती व देखभालसाठी तयार केलेल्या अंदाजपत्रक रक्कम रु.४,६०,०००/- (अक्षरी रुपये चार लाख साठ हजार केवळ) चे तयार करण्यांत असून त्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. आता सदर अंदाजपत्रकानुसार खर्चाच्या मंजूरीस्तव विचारार्थ प्रस्ताव सादर.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अंदाजपत्रकानुसार रक्कम रु.४,६०,०००/- (अक्षरी चार लाख साठ हजार केवळ) खर्चास प्रशासकीय मान्यता दिली जाते. पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक : २५.०६.१९९३

**प्रस्ताव क्र.३१ :**

कार्यकारी अभियंता (जलनिःसारण व पाणी पुरवठा विभाग) औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, आहे की, झोन क्र.४ मधील विविध ठिकाणच्या जलनिःसारण वाहिन्यांच्या दुरुस्ती व देखभालसाठी तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रु.४,९५,०००/- (अक्षरी चार लाख पंचावन्नव हजार केवळ) तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. आता सदर अंदाजपत्रकानुसार खर्चाच्या मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अंदाजपत्रकानुसार झोन क्र. (४) मधील विविध ठिकाणच्या जलनिःसारण वाहिनीच्या देखभाल व दुरुस्ती साठी रक्कम रु.४,९५,०००/- (अक्षरी रुपये चार लाख पंचान्नव हजार केवळ) खर्चास प्रशासकीय मान्यता दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.३२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एस.एफ.आर.सी.ढापा पुरवठा करणे करिता कार्यालयीन आदेश क्र.मनपा/युजीडी/६४१/९२/९३, दि.२३.०४.९२ अन्वये दैनिक लोकमत व टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात जाहिरात देवून "डी" नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी तीन निविदा प्राप्त झाल्या या निविदा उपलब्ध गुत्तेदारा समोर उघडल्या असता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच प्रती नग रु.६११ या दराची मे.भारत मेंटल प्रोसेस इंडस्ट्रीज कोपरगांव यांची निविदा आहे. परंतू मे.भारत मेंटल प्रोसेस इंडस्ट्रिज कोपरगांव, यांना दाखल केलेला

एस.एफ.आर.सी.मेनहोल ढापा कव्हरचा नमुना योग्य प्रमाणात नाही या शिवाय कंपनीस याबाबतचा फारसा अनुभव दिसत नाही. त्यामुळे मे.भारत मेंटल प्रोसेस यांच्या निविदेचा विचार करता येत नाही. दुसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे निविदा मे.के.के.मेनहोल यांची असून एस.एफ.आर.सी.मेनहोल कव्हर करिता संबंधितांचे दर रु.६१७ प्रति नग आहे. परंतू के.के.मेनहोल यांना आय.एस.आय.मार्क मिळालेला नाही व मे.प्रतिभा इंडिस्ट्रीज मुंबई यांची निविदा प्रति नग रु.६८२ या दराची असून एस.एफ.आर.सी.मेनहोल ढापा उत्पानदास आय.एस.आय.मार्क मिळालेला आहे. त्यानुसार मे.प्रतिभा इंडस्ट्रीज मुंबई यांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलाविण्यांत आले असता मे.प्रतिभा इंडस्ट्रीज मुंबई यांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलाविण्यांत आले असता मे.प्रतिभा इंडिस्ट्रीज मुंबई यांनी आय.एस.आय.मार्क असलेल्या एस.एफ.आर.सी.मेनहोल ढापा रु.६८२ ऐवजी ६४५ प्रति नग या दराने पुरवठा करण्याबाबत दि.०८.०६.९३ च्या पत्रकान्वये लेखी संमत्ती दिली आहे. त्यानुसार मे.प्रतिभा इंडस्ट्रीज, मुंबई यांचे कडून प्रति नग रु.६४५ (वाटाघाटीनुसार) या दराने आय.एस.आय.मार्कचे एस.एफ.आर.सी.मेनहोल ढापा खरेदी करण्याच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ये.प्रतिभा इंडस्ट्रीज मुंबई यांचेकडून प्रति नग रु.६४५ (वाटाघाटीनुसार) या दराने आय.एस.आय.मार्कचे एस.एफ.आर.सी.मेनहोल ढापा खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.३३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला किलेआर्क (व्ही.आय.पी.रोड) येथे ३०० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ८५,९००/- चे तयार केले असून त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक १५.०६.९३ रोजी मंजूरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.किलेआर्क व्ही.आय.पी. रोड येथे ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## <u>दिनांक :-२९.०६.१९९३</u>

**प्रस्ताव क्र.३४**

पशुधन विकास अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका प्राणी संग्रहालयास सन १९९३-९४ या एका वित्तीय वर्षाकरिता बीफ निविदा मागविण्यांत आल्या. प्राप्त झालेल्या निविदा धारकांचे नाव १ त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | हड्डीसहीत | विनाहड्डी |
|---|---|---|---|
| १. | शेख गुलाल सावेर शेख अ.रहीम | १०.५० | १२.५० |
| २. | शेख सलीम शेख हसु | १२.०० | १४.०० |
| ३. | मुसा म.करीम | १०.२५ | १२.७५ |
| ४. | शेख अकबर शेख अ.रहीम | १०.०० | १२.५० |
| ५. | शेख छोटे शेख चाँद | १०.५० | १२.५० |
| ६. | शेख खलील शेख चाँद | १०.३५ | १३.०० |
| ७. | शेख मुनवर शेख ईसा | १०.४५ | १४.५० |
| ८. | फिरोज खॉन रहेमान खॉन | ०८.०० | १०.०० |
| ९. | अ.रहीम शेख छोटे | ०९.०० | ११.५० |
| १०. | शेख जाफर शेख कासीम | ०७.७५ | १०.५० |
| ११. | खाजा मिया अ.करिम | ११.४५ | १४.०० |
| १२. | शेख समद शेख सत्तार | १०.५५ | १२.९० |

वरील दर्शविल्यापैकी एकूण (१२) निविदा धारकांची खरेदी समिती कडून सद्याचे बाजार भाव व गुणवत्तेचा विचार करुन श्री.शेख सलीम हसु यांचा ड्डी सह १२.०० व विनाहड्डी १४.०० प्रति किलो खरेदी समितीच्या शिफारशी अन्वये सन १९९३-९४ या एका वित्तीय वर्षाकरिता (दि.०१.०७.९३ ते ३१.०३.९४) मंजूरी देण्यांबदल प्रस्ताव सादर.

**ठराव :**

वरील दर्शविल्याप्रमाणे सन १९९३-९४ साला करिता बिफ पुरवठा करिता श्री.शेख सलीम शेख हसु यांनी दिलेले दर रु.१२.०० हड्डीसह व १४.०० विनाहड्डी मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.३५ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५८ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेने रुगणवाहिका व शव वाहिका व त्यावर लावण्यांत येणारी फिस बाबतचे प्रारुप उपविधीचा मसूदा सोबत जोडलेला आहे. सदरील प्रारुप उपविधीचा मलूदा प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**
**रुग्ण वाहिका व शववाहिका बाबत उपविधी**

१) संक्षिप्त नाव प्रारंभ :
या उपविधींना औरंगाबाद महानगरपालिकेचे "रुग्णवाहिका व शववाहिका" यांचा उपयोग व त्यावर लावण्यांत येणारी फिस" बाबतचे उपविधी १९९३ असे संबोधण्यांत

येईल. सदरील उपविधीची अंमलबजावणी ही उपविधी शासकीय राजपत्रात अंतिमत: प्रसिध्द होण्यांच्या पासून करण्यांत येईल.

२) व्याख्या :
या उपविधी मध्ये अन्यथा तरतूद केली नसते तर
(अ) अधिनियम :- अधिनियम म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम वेळोवेळी करण्यांत आलेल्या दुरुत्यासह
(ब) कलक :- याचा अर्थ अधिनियमाचे कलम होत.
(क) आयुक्त :- म्हणजेच कलम ३६ अन्वये नेमलेला शहराचा नगरपालिका आयुक्त व त्यामध्ये कलम ३९ अन्वये नेमलेला हंगामी आयुक्तांचा समावेश होतील..
(ड) या नियमात वापरण्यांत आलेले परंतू व्याख्या न केलेले शब्द व शब्द प्रयोग यांना अधिनियमात त्यांना जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ अभिप्रेत असेल.

३) रुग्णवाहिका व तीची जागा :-
औरंगाबाद महानगरपालिकेची रुग्णवाहिका ही महानगरपालिकेच्या मुख्य प्रांगणात/अग्निशमन कार्यालयात अथवा आयुक्तांनी निर्दिष्ट केलेल्या जागेवर ठेवण्यांत येईल.

४) सक्षम अधिकारी :-
सदरील रुग्णवाहिका ही महानगरपालिकेच्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे अधिपत्याखाली असेल अथवा आयुक्त जो अधिकारी नियुक्त करतील त्यांच्या अधिपत्याखाली ती ठेवण्यांत येईल.

५) रुग्ण वाहिके वरील फिस :
सदरील रुग्णवाहिकेचा उपयोग जर महानगरपालिका हद्दीत होणार असेल तर या उपविधी अन्वये कोणतीही फिस आकारण्यांत येणार नाही. परंतू एखाद्या व्यक्तीस रुग्णवाहिकेच्या उपभागोबाबत स्वइच्छने काही रक्कम द्यावयाची झाल्यास तो त्याला देता येईल व अशी रक्कम महानगरपालिका कार्यालयात जमा करण्यांत येईल व त्याची रितसर पावती देण्यांत येईल

६) रुग्णवाहिकेचा वापर :-
(अ) रुग्णवाहिकेच्या महानगरपालिका हद्दीतील वापरा बद्दल कोणत्याही फिस आकारण्यांत येणार नाही.
(ब) कोणत्याही सांसर्गिक अथवा अन्य रोगाने पिडीत अथवा अपघातग्रस्त रुग्णांस दवाखान्यात हलावण्यास्तव रुग्णवाहिकेचा उपयोग करण्यांत येईल.
(क) गरीब/रस्त्यावर वास्तव करुन असणाऱ्या रुग्णांनाही सदरील रुग्णवाहिकेचा उपभाग घेता येईल.
(ड) रुग्णवाहिकेमध्ये रुग्णासोबत, रुग्णाच्या जवळच्या व्यक्तीपैंकी दोन जणांना बसण्याची परवानगी देण्यांत येईल.
(ई) रुग्ण वाहिकेचा उपयोग फक्त रुग्णाच्या राहत्या घरापासून ते दवाखाना पर्यंत तसेच दवाखान्यापासून घरापर्यंत घेता येईल या व्यतिरिक्त अन्य कारणास्तव सदरील रुग्णवाहिकेचा उपयोग घेता येणार नाही.

७) महानगरपालिकेची रुग्णवाहिका ही २४ तास नागरिकांचे उपभोगासाठी उपलब्ध असेल.

८) जर रुग्णवाहिकेस एकाच वेळी एकापेक्षा अधिक व्यक्तींची मागणी असेल तर खालील बाबी तपासून रुग्णवाहिका प्रथमता उपलब्ध करुन देण्यांत येईल.

(अ) एखाद्या व्यक्ती अपघाताने जबर जखमी असेल/सांसर्गिक अथवा अन्य रोगाने गंभीररित्या आजारी असेल व त्यास तातडीच्या वैद्यकीय सेवेची आवश्यकता असेल त्यास रुग्णवाहिका प्रथमत: उपलब्ध करुन देण्यांत येईल.

९) महानगरपालिका हद्दीबाहेर रुग्णवाहिकेचा उपभोग :-
सदरील रुग्णवाहिका ही महानगरपालिकेच्या हद्दी बाहेर ज्याचे जाऊन-येऊन अंतर ५०० कि.मी.पेक्षा अधिक नाही. अशा ठिकाणापर्यंत रुग्णास नेण्यास आणण्यास वापरता येईल. तथापि या वापरासाठी मा.आयुक्तांची लेखी परवानगी प्रथम घेण्यांत यावी. तसेच अशा वापरासाठी महानगरपालिका संबंधिताकडून प्रथम ५०० रु.अनामत रक्कम घेईल. व प्रति कि.मी.ला ४ या दराने भाडे आकारतील. हॉल्टींग चार्जेस प्रति रु.२५/- प्रति तासाला आकारण्यांत येतील.
(ब) रुग्णवाहिकेचा भाडे महानगरपालिका हद्दी बाहेर वापरतांना ती ज्या ठिकाणाहून सुटेल त्या ठिकाणापासून ते ती परत त्याचा ठिकाणी येईल? या ठिकाणा पर्यंतच्या अंतराची आकारणी करण्यांत येईल.
रस्त्यावरील अपघात अथवा इतर तांत्रिक अडचणीस्तव लागणार विलंब विचारात घेतला जाणार नाही.

१०) सदरील रुग्णवाहिकेचा उपयोग जर महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या/अधिकाऱ्यांच्या नातेवाईकस्तव अथवा त्याच्य स्वत:साठी महानगरपालिका हद्दी बाहेर घ्यावयाचा असेल तर महानगरपालिका त्यासाठी फक्त १०० रु. अनामत रक्कम होईल मात्र भाडे आकारणी वरील प्रमाणेच राहील.

११) सदरील रुग्ण वाहिकेचे नोंदणी पुस्तक (ठराविक नमुन्यात) आयुक्त ठरवून देतील त्या ठिकाणी ठेवण्यांत येईल व त्या मध्ये आवश्यक त्या नोंदी म्हणजेच रुग्णाचे नांव, पुर्णपत्ता, जाण्याची व येण्याची वेळी, दवाखान्याचे नाव इ.सदरील रुग्णवाहिके वरुन चालक होईल तसेच रुग्णवाईक ही सुव्यवस्थित व योग्य स्थितीत ठेवण्याची जबाबदारी ही चालकावर राहील.

१२) रुग्णवाहिकेच्या भाड्याबाबत वसुल झालेली रक्कम आवश्यक त्या नोंदीसह वाहन चालक २४ तासांचे आत महानगरपालिका कार्यालयात जमा करेल.

१३) सदरील रुग्णवाहिकेवर एक वाहन चालक व एक स्वच्छक यांची नियुक्ती करण्यांत येईल व ते महानगरपालिका हद्दीतील उपभागोस्तव कोणतीही फिस घेणार नाही.

१४) सदरील रुग्णवाहिके मध्ये "प्रथमोपचार पेटी" ठेवण्यांत येईल व ती सुसज्ज ठेवण्याची जबाबदारी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेवर राहील.

१५) सदरील रुग्णवाहिके बाबत कोणतीही तक्रार अथवा वाद निर्माण झाल्या त्या बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील तसेच कोणास सदरील रुग्णवाहिके बाबत तक्रार अथवा सुचना करावयाची असल्यास ती लेखी स्वरुपात, रुग्णवाहिकेच्या जवळ ठेवण्यांत आलेल्या पेटी मध्ये टाकावी. अशा प्रकारे प्राप्त तक्रारी संबंधित अधिकारी योग्य प्रकारे हाताळतील सदरील उपविधी हे योग्य त्या फेरफारासह महानगरपालिकेच्या शव वाहिनीस देखील लागू राहतील.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५८ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेने रुग्णवाहिका व शववाहिका आणि त्यावर लावण्यांत येणारी फिस बाबतचे प्रारुप उपविधींचा मलूदा सोबत जोडलेला असून सदर प्रारुप उपविधीस प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते देण्यांत येते. प्रशासकीय व वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.३६ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९,४५५ व ४५७ (२) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेने महापौर, उपमहापौर, स्थायी समिती, सभापती व इतर पदाधिकाऱ्यांना द्यावयाच्या वाहना बाबतचे प्रारुप नियमांचा मसुदा सोबत जोडलेला आहे. सदरील प्रारुप नियमांचा समुदा प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**
**महानगरपालिका वाहन (मोटार) वापरा बाबतचे नियम**

१) या नियमांस औरंगाबाद महानगरपालिका वाहन (मोटार) वापरा बाबतचे नियम १९९३ असे म्हणावे.

२) हे नियम मुख्य सभेच्या मान्यतेच्या दिनांकापासून अस्तित्वात येतील.

३) मा.महापौर, मा.अध्यक्ष, स्थायी समिती, इतर समित्या किंवा कार्यालयासाठी जी वाहने नियुक्त आहेत त्यांना हे नियम लागू असतील.

४) नियम ३ प्रमाणे नियुक्त केलेली सर्व वाहने मा.नगरसचिव यांच्या कार्यालयीन नियंत्रणाखाली राहतील. या नियमांच्या संदर्भात मा.नगरसचिव त्या सर्व वाहनांचे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील व अशा सर्व वाहनांच्य दैनंदिन व्यवस्थेची व या नियमांच्या योग्य कार्यवाहीचे दायित्व त्यांच्यावर राहील.

५) नियंत्रण अधिकारी त्यांच्याकडील प्रत्येक वाहनांसाठी परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविलेल्या नमुन्यात नोंद पुस्तक (लॉग बुक) ठेवतील. तसेच प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्रपणे नोंद पुस्तके रजिस्टर्स ठेवतील.

अ) वाहनासाठी केलेल्या दुरुस्त्या व वापरलेले सुटे भाग व यासाठी केलेला वाय दर्शविणारे नोंदणी पुस्तक

ब) इंधन (पेट्रोल) व तेल (ऑईल) यासाठी केलेला दैनंदिन व्यय दर्शविणारे नोंदणी पुस्तक.

क) वाहना बरोबर असलेली उपकरणे इतर सुटे भाग दाखविणारे नोंदणी पुस्तक.

६) इंधन (पेट्रोल) व तेल (ऑईल) यासाठी केलेल्या व्ययांच्य प्रत्येक देयपत्रा सोबत नियंत्रक अधिकारी यांनी खालील प्रमाणे दाखले ठेवणे आवश्यक आहे.

अ) वाहनांचे नोंदणीपुस्तक (लॉगबुक) ठेवलेले आहे व त्यातील नोंदणी अजतागायत तपासल्या जातील.

ब) देयपत्रामध्ये असलेल्या इंधनाची (पेट्रोलची) नोंद वरील नियम-५

ब) प्रमाणे ठेवलेल्या नोंदणी पुस्तकात घेतलेली आहे.

क) कार्यालयीन असलेल्या कारणासाठी वाहन वापरात आणले असेल तर वापरा बाबतची रक्कम नियमाप्रमाणे संबंधितांकडून वसुल केली आहे.

(७) नियंत्रण अधिकारी मा.नगर सचिव यांनी प्रत्येक महिन्याच्या दिनांक १० पर्यंत प्रत्येक वाहनाबरोबर असलेल्या उपकरांची, साधनांची व सुट्या भागांची नोंदी नुसार पाहणी करुन तसा दाखला नोंदणी पुस्तकात ठेवला पाहिजे व काही कमी जास्त आढळून आल्यास त्या संबंधिची चौकशी ताबडतोब सुरु केली पाहिजे. तसेच ही वाहने महानगरपालिकेच्य यांत्रिक स्थापत्य खात्याकडून प्रत्येक सहा महिन्यांनी तपासून

घेवून ती वापरण्यासाठी योग्य असल्याबद्दलचे दाखले घेऊन पत्र संग्रही ठेवले पाहिजे.

८) नियंत्रण अधिकारी यांनी प्रत्येक सहा महिन्यांनी म्हणजे ऑक्टोंबर व एप्रिल या महिन्यांच्या १५ दिनांकापुर्वी या वाहनांवर एप्रिल ते सप्टेंबर व ऑक्टोंबर ते मार्च अखेर झालेल्या व्ययांचे सहामाही तक्ते स्थायी समिती पुढे माहितीसाठी ठेवले पाहिजे.

९) वरील तक्ता बरोबरच प्रत्येक वाहनांचे कार्यालयीन नसलेल्या कारणांसाठी झालेल्या वापरा बद्दल केलेल्या किंवा करावयाच्या वसुलीचे निवेदन नियंत्रक अधिकारी यांनी ठेवले पाहिजे.

१०) या वाहनांचा वापर महानगरपालिकेच्या निरनिराळ्या समित्यांसाठी व आवश्यकतेप्रमाणे नगरसचिव कार्यालयाकडील केवळ कार्यालयीन कामासाठीच करावयाचा आहे.

**टिप :-**

या वाहनांचा खालील कारणांसाठी केलेला वापर कार्यालयीन स्वरुपाचा समजला जाईल.

अ) महानगरपालिकेच्या समित्या व त्याज बरोबर असणारे अधिकारी यांनी जागा पाहणे, महानगरपालिकेच्या पकल्पांना भेटी देणे.

ब) महानगरपालिकेच्या निमंत्रीतांना आश्यकतेप्रमाणे महानगरपालिकेच्या कार्यालयात आणण्यासाठी व त्यांना परत नेऊन सोडण्यासाठी

क) मा.नगरसचिव किंवा कार्यालयाकडील सेवकांना नियंत्रक अधिकारी यांच्या अनुज्ञेने केवळ कार्यालयीन कामावर जाण्यासाठी मात्र सेवकांच्या घरुन कार्यालयास येणे किंवा हाती परत जाणे याचा यात समावेश नाही.

११) या वाहनांचा उपयोग हा कार्यालयीन कारणांसाठी केला होता किंवा कसे या संबंधी शंका निर्माण झाल्यास नियंत्रक अधिकारी यांनी ही बाब स्थायी समितीपुढे देऊन निर्णय घ्यावा. स्थायी समितीचा निर्णय त्या बाबतीत अखेरचा समजण्यात येईल.

१२) कोणत्याही वाहनांचा वापर महानगरपालिकेच्या सिमे बाहेर करण्यांत येवू नये. तथापि सिमे बाहेर वापर करणे आवश्य झाल्यास मा.आयुक्त यांच्या लेखी आदेशानुसार केवळ कार्यालयीन कारणासाठी करण्यांत यावा. मात्र अशा प्रकारे सिमे बाहेर नेलेण्या वाहनांचा वापर होताच नियंत्रक अधिकारी यांनी शक्यतो त्यानंतर होणाऱ्या स्थायी समितीच्या सभेत सदर गोष्ट निदर्शनास आणावी.

१३) कार्यालयीन नसलेल्या कारणास्तव वापरण्यांत आलेल्या वाहनासाठी महानगरपालिका कार्यालय ते कार्यालयात परत येईपर्यंत दर किलो मिटरला रु.४/- प्रमाणे आकारणी करण्यांत यावी.

१४) सवडीवर असणाऱ्या सदस्य अगर नगरसेवकांना या वाहनाचा वापर करता येणार नाही.

१५) नोंद पुस्तकातील सर्व नोंदी शाईने करण्यांत याव्यात.

१६) प्रत्येक वाहनांचा नोंद पुस्तकेतील नोंदी नियंत्रक अधिकारी यांनी यासाठी ठरवून दिलेल्या सेवकांच्या हस्ताक्षरात असल्या पाहिजे. नोंद पुस्तकामध्ये प्रवास कोणत्या कार्यालयीन कारणासाठी होता. हे दर्शविणारा पुरेसा व स्पष्ट खुलासा पाहिजे. प्रवास सुरु होण्यापुर्वी व प्रवास संपताच वाहनचालकाने दैनंदिनी ठेवून संबंधी सेवकांकडून नोंद पुस्तकातील नोंदी करुन घेतल्या पाहिजेत.

१७) प्रत्येक महिन्याच्या अखेरीस प्रत्येक वाहनाच्या नोंद पुस्तकात परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविलेल्या नमुन्यात लिहून कार्यालयीन कारणासाठी व कार्यालयीन नसलेल्या कारणासाठी वाहनांचा त्या त्या महिन्यात किती प्रवास झाला याचा गोषवारा दर्शविणारा तक्ता प्रत्येक दोन महिन्यांनी स्थायी समिती पुढे माहितीसाठी ठेवण्यांत यावा.

१८) वाहनांची नियतकालीन अगर इतर सर्व दुरुस्ती अगर काम महानगरपालिकेच्या यांत्रिकी खात्याकडून करुन घ्यावे. मात्र उप अभियंता यांत्रिकी यांनी जी दुरुस्ती अगर काम महानगरपालिकेच्या यांत्रिकी खात्याकडून होऊ शकत नाही. असा दाखला दिल्यास तेवढीची दुरुस्ती अगर काम बाहेरुन करुन घ्यावे.

१९) सदर वाहन महानगरपालिकेचे असल्याबद्दल मजकूर सदर वाहनावर दर्शनी अगर सुलभतेने दिसेल अशा ठिकाणी असावा.

२०) स्थायी समितीस एखाद्या वाहनास या नियमांतून किंवा त्यापैकी काही नियमातून वेळोवेळी ठराव करुन अपवाद म्हणून वगळता येईल.

२१) मा.महापौर यांच्या वापरासाठी दिलेल्या गाडीने खालील नियम लागू असणार नाहीत. (नियम क्र.६,९,१० ते १४ व १६)

## <u>इंधन (पेट्रोल) हिशोब</u>

| दिनांक | मापन पत्रावरील आकडा | इंधन पेट्रोल लिटर्स | तेल आईल | अधिकाऱ्यांची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

औरंगाबाद महानगरपालिका स्टॅम्प

वाहन क्रमांक ............................................ कार नोंदणी पुस्तक

| अ.क्र. | वाहनचालकांचे नांव | दिनांक | कार्यालय सोडल्याची वेळ | प्रवास पाल्याची वेळ | कोठून | कोठे | आपण प्रवास चालु | वरील आकाडा प्रवास संपल्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

| किती कि.प्रवास झाला | प्रवास कोणत्या कामांकरिता | प्रवास करणाऱ्या समितीचे नांव | प्रवास करणाऱ्या अधिकारी अथवा सदस्यांची नांवे | नगरसचिव अथवा त्यांनी अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | |

**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद**
**परिशिष्ट- "ब"**
**महानगरपालिका नोंद पुस्तकाचा (लॉग बुकचा) गोषवारा (नियम क्र.५)**
**माहे ................................ १९९ करिता**

| अ. क्र. | किती कि.मी. प्रवास झाला | | एकूण | कार्यालयीन नसलेल्या कारणासाठी केल्या प्रवासाची वसुली | | वसुलीची रक्कम कोषागारात भरल्याचा तपशिल | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कार्यालयीन कारणासाठी | कार्यालयीन नसलेल्या कारणासाठी | | येणे रक्कम | वसुल रक्कम व वसुलीचा दि. | चलन रु. व दिनांक | रक्कम रुपये |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

| किती लिटर इंधन वापरले | किलो मिटर्स मापन | | प्रत्येक लिटर्स इंधनमागे सर्वसाधारण किती कि.मी.चाल केली | शेरा |
|---|---|---|---|---|
| | पहिला दिनांक | शेवटचा दिनांक | | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | |

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९, ४५५ व ४५७ (२) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेने महापौर, उपमहापौर स्थायी समिती सभापती व इतर पदाधिकाऱ्यांना द्यावयाचे वाहन बाबतच्या प्रारुप नियमांचा मसुदा सोबत जोडलेला असून सदर प्रारुप नियमांस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>सचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>प्रशासक<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

## <u>दिनांक :-०५.०७.१९९३</u>

**प्रस्ताव क्र.३७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा विभागासाठी "इझी लिंक मेकॅनिक" खरेदी करण्यासाठीच्या रक्कम रु.४,८८७,२२१/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीचा ठराव क्र.५४०/२ दिनांक ३१.०३.९३ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा क्रमांक पापु-१/भांडार/६२७/९३, दि.०२.०४.९३ नुसार जाहिर निविदा मागविण्यांत आल्या निविदा सुचना १) दैनिक देवगिरी तरुण भारत, २) दैनिक लोकधर्म हया वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यांत आली. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम

तारखेपर्यंत दोन निविदा विक्री झाल्या. व सिलबंद निविदा स्विकृतीच्या नियोजित तारखेस दोन निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त निविदा हया दिनांक २७.०४.९३ रोजी उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे.ओरियंट रबर प्रॉडक्टस | - | २.०२९६१% जास्त |
| २) | मे.मा.मनशा इंजिनियरिंग वर्क्स हावरा | - | २.२७०६९% जास्त |

वरील तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा ही मे.ओरियन्ट रबर प्रॉडक्टस, नागपूर यांची आहे. म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०२९% जास्त दराची आहे.

तरी मे.ओरिएन्ट रबर प्रॉडक्टर्स, नागपूर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०२९% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इझीलिंक मॅकानिक जॉइन्टस खरेदीसाठी मे.ओरियॅन्ट प्रॉडक्टस नागपूर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०२९% जास्त दराची निविदा स्विकारण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>सचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>प्रशासक<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

## <u>दिनांक :-०८.०७.१९९३</u>

**प्रस्ताव क्र.३८ :**

पुर्वीच्या जुन्या हद्दीचे मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र.९ "दुकान केंद्र" हे नगर परिषदेसाठी (म्हणजे आता महानगरपालिकेसाठी) ठेवण्यांत आलेले आहे. तथापि यातील जागेवर पुर्वी नगर परिषदेने दुकाने व हॉटेल साठी अभिन्यास मंजूर केलेला आहे व त्यानुसार काही बांधकामे झालेली आहेत. त्यामुळे महानगरपालिकेस त्या प्रस्तावाची अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही. आरक्षण ज्या कामासाठी ठेवण्यांत आलेले आहे. त्याच कारणासाठी अभिन्यास मंजूर केलेला आहे. व त्याच कारणासाठी ते खाजगी इसमाकडून विकसीत होत आहे. त्यामुळे ते महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये रद्द करावे म्हणून शासनास प्रस्ताव पाठविण्यांस मान्यता मिळावी.

**ठराव :**

औरंगाबाद शहराच्या जुन्या हद्दीसाठी मंजूर असलेल्या विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ९८ "दुकान केंद्र" या आरक्षणातील जमिन महानगरपालिकेस अंमलबजावणी साठी होणे शक्य नसलेले ती महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये रद्द करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>सचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>प्रशासक<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.३९ :**

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ४६५ (१) (सी) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी सेवेच्या सर्वसाधारण शर्ती, शिस्त व वागणूक व अपिल बाबत विनिमय तयार केलेले असून सोबत प्रारुप विनियमांचा मसूदा जोडलेला आहे. तरी प्रारुप नियम मंजूरीस्तव सादर.

The Municipal Corporation of the City of Aurangabad Regulation regarding Municipal Services (General Conditions of Service) Regulation under section. 465 (1) (2) of Bombay Provincial Municipal Corporation Act, 1949.

1) <u>Short Title And Commencement :</u>

i) These regulations shall be called Municipal Services (General Conditions of Services) Regulations 1993 or the Municipal Corporation of the City of Aurangabad.

ii) These Regulation shall come into force prom the date of the approval to the regulations in accorded by the Corporation under section 465 (3) (a) of Bombay Provincial Municipal Corporation Act, 1949.

2) <u>Extent of Application :</u>

i) Except where it is otherwise exposed or implied and subject to the provisions of cause (2) of this regulation, these regulations shall apply to all Municipal Servants. Who hold alien on such a post had their lien not been suspended under the Municipal Services Regulations.

ii) Unless in case it is distinctly provided for by or under the regulations, these regulations do not apply to....

a) Municipal Servants on dailywages, Badali and temporary
b) Municipal officers and servants whose time is not exclusively devoted to the duties of their office.
c) Govt. officers and servants or deputation in Municipal Corporation.
d) Municipal Officers and servants employed on honorarium basis.

3) <u>Definition :</u>

i) In these regulations unless there by anything repugnant in the subject context.

a) Act Means the Bombay Provincial Municipal Corporation Act, 1949 amended from time to time.
b) Appointing Authority with reference to any employees means the authority having the power to appoint such employees under the Act.
c) Employee includes all officer and servants of the corporation to whom these regulations apply.
d) Corporations means Municipal Corporation of the city of Aurangabad.
e) Service means continuous service under the Municipal Corporation of the city of Aurangabad includes periods spent on duty as well as on leave and service on foreign service conditions but does not include extraordinary leave.
f) Competent Authority Means :

i) Standing Committee in the case of officers a pointed under section 45 of the Bombay Provincial Municipal Corporation Act, 1949 and

also in the case of other officers the power of appointing whom vests in the corporations.

ii) In case of other Municipal Servants and Officers the Municipal Commissioner.

2) Words and expressions used in these regulations but not defined shall have the same meanings as are assigned to them in the Act.

4) Departmental Rules and Orders :

All departmental rules and orders in respect of the subjects death with in these regulation which have been approved or may hereafter be approved by the corporation so far as they do not conflict with any provision or these regulation shall be deemed to apply to the Municipal Servants to whom they relate.

5) CONDUCT OR PERFORMING SERVICE IN MUNICIPAL SERVICE AND PROCEDURAL REQUIREMENTS TO EXERCISE CONTROL OVER MISCONDUCT AND IRRESPONSIBLE BEHAVIORS OF THE MUNICIPAL SERVANT :

As regards the conduct for performing Municipal Service by Municipal Servants and Procedural requirements to exercise control over the Municipal Servants the Maharashtra Civil Service General Conditions of services Rules, 1981 the Maharashtra Civil Services (Discipline and appeal) Rules 1979 and Maharashtra Civil Service (Conduct) Rules 1979 which are made applicable to the Municipal Officers and Servants and procedure which is made applicable to Municipal Officers and Servants as amended form time to time by Government of Maharashtra and shall be followed mutant is by the Municipal Corporation of the city of Aurangabad the competent Authority shall take action accordingly subject to the following changes.

| | For the words | : | Substitute the words |
|---|---|---|---|
| 1) | Governments Servant | : | Municipal Servants |
| 2) | Nead of Office for Non-gazetted Govt. Servant | : | Head of the respective depth in the case of class-III and class-IV employees. |
| 3) | Govt. or Prescribed Authority | : | Competent Authority |
| 4) | Govt. of Maharashtra | : | Municipal Corporation of the city of Aurangabad. |
| 5) | Administrative Branch of deptt. Office | : | Head of the Department or Head of the Branch |

6) INTERPRETATION :

If any question arise relations to the interpretation of these regulations, it shall be referred to the commissioner, whose it shall decision there on shall be final.

7) DELEGATION OF POWERS :

The Corporation may, by general or special order direct that any power exercisable loy it or any head of the and Department or Office Under the regulations (Except the powers under regulations 6 and tish regulations)

shall subject to such conditions if any as may be specified in the order, be exercisable also by such officers or authority as may be specified in the order.

8) REPEAL AND SALVING :

On the commencement of these regulations, every rules by laws or regulations in force immediately before such commencement shall in so far as it provides for any of the matters contained in these regulations cease to operate.

Provided that and order made or action taken under the rules, by laws so repeated shall be deemed to have been made or taken under the corresponding provisions of these regulations.

**ठराव :**

वरील प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०९.०७.९३

**प्रस्ताव क्र.४० :**

उप आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यावरुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४६५ (१) अन्वये महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुट्ट्यांचा व कार्यालयीन वेळेनंतर अतिरिक्त केल्या बाबत द्यावयाच्या मोबदल्या बाबतचे विनियम तयार केले असून, सदरील विनियमांचा प्रारुप मसूदा सोबत जोडल्या प्रमाणे मंजूरीस्तव सादर.

### औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

सार्वजनिक सुट्ट्या व कार्यालयीन वेळेनंतर अतिरिक्त काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या मोबदल्या बाबतचे विनियम

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४६५ (१) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुट्टीच्या व कार्यालयीन वेळे नंतर अतिरिक्त काम केल्या बाबत द्यावयाचा मोबदल्या बाबतचे विनियम खालील प्रमाणे आहेत.

१) संक्षिप्त नाव व प्रारंभ :-

या विनियमांना, औरंगाबाद महानगरपालिकेचे "अतिरिक्त कामा बाबत व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामा बाबत द्यावयाच्या मोबदल्या बाबतचे विनिमय" असे संबोधण्यांत येईल.

२) व्याख्या :

या विनियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रत नसेल तर,

अ) अधिनियम :- म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे वेळोवेळी दुरुस्त केलेले अधिनियम.

ब) कलम :- म्हणजे अधिनियमाचे कलम.

क) अतिरिक्त काम :- म्हणजे कार्यालयाच्या निर्देशित केलेल्या वेळे आधी व वेळे नंतर किमान एक तासा पेक्षा अधिक वेळ केलेले काम. या मध्ये रविवार व इतर सार्वजनिक सुट्टयांचा समावेश असेल.

ड) कार्यालयीन वेळ :- म्हणजे औरंगाबाद महानगरपालिकेने वेळोवेळी ठरविलेले कार्यालयीन कामाचे तास.

इ) सार्वजनिक सुट्टी :- म्हणजे महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेल्या सार्वजनिक सुट्ट्या.

३) सदरील विनिमय खालील संवर्गातील महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना लागू होणार नाहीत.

अ) ज्या अधिकाऱ्यांचे मुळ वेतन २२००/- पेक्षा जास्त आहे असे अधिकारी व कर्मचारी

ब) दैनिक वेतनावरील कर्मचारी

क) महानगरपालिका आस्थापनेवर कायम स्वरुपी नसणारे कर्मचारी.

इ) ठराविक वेतन निश्चिती वरील कर्मचारी.

४) <u>पात्रता :-</u>

अ) औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जे कर्मचारी स्थायी स्वरुपात नियुक्त असतील व ज्यांचे मुळ वेतन रु.२२००/- पेक्षा कमी असेल असे कर्मचारी अतिरिक्त कामाच्या मोबदल्यास पात्र असतील तथापि जे अधिकारी व कर्मचारी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकी तसेच राष्ट्रीय जणगणना च्या कामासाठी अतिरिक्त कामाच्या मोबदल्यास पात्र असतील त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मुळ वेतनाची अट राहणार नाही.

ब) अतिरिक्त कामाचे दर

| अ.क्र. | मुळ वेतन | | एका तासाच्या पुढील प्रत्येक तासाला |
|---|---|---|---|
| १. | रु.१२००/- पर्यंत | - | रु.४.०० |
| २. | रु.१२०१/- ते १४००/- | - | रु.५.०० |
| ३. | रु.१४०१/- ते १६४०/- | - | रु.६.०० |
| ४. | रु.१६४०/- ते २२००/- | - | रु.७.०० |

क) अतिरिक्त कामाच्या मोबदल्या व्यतिरिक्त पात्र कर्मचाऱ्यास इतर कोणताही भत्ता देय असणार नाही. (जसे, वाहनभत्ता, बदली सुट्टी) परंतू कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळे नंतर जादा काम केल्यास पहिला तास विना मोबदला काम घेता येईल. आणि पहिल्या १ तासा नंतरच्या जादा कामास विनियम क्र.४ नुसार मोबदला मिळेल. त्यातून लंच टाईम व टी टाईम वजा केला जाणार नाही तथापि जर कर्मचाऱ्यास कार्यालयीन वेळे नंतर धरुन कार्यालयात बोलावल्यास पहिला एक तास धरुन पूर्ण कालावधीचा मोबदला दिला जाईल.

ड) शाखा प्रमुख/विभागीय अधिकारी/जकात अधिक्षक/हे अतिरिक्त कामाचे स्वरुप व त्याची आवश्यकता नमूद करुनच त्यांचे अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांस अतिरिक्त कामासाठी बोलावू शकतील व शक्य झाल्यास जादा कामाच्या मोबदल्यात संबंधितास

रोटेशन प्रमाणे सुटी ठरवून देतील यासाठी उपआयुक्त यांची पुर्व परवानगी घेणे शाखा प्रमुखावर बंधनकारक असेल.

इ) अतिरिक्त कामाचा मोबदला हा प्रत्येक महिन्यात संबंधित कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या मासिक पगाराच्या २५ टक्के पेक्षा अधिक असणार नाही. परंतू मा.महापौर, उपमहापौर, सभापती, स्थायी समिती, आयुक्त, उपआयुक्त, शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता खालील वाहन चालकास ५० टक्के (मासिक पगाराच्या) पर्यंत रक्कम देय असेल. तथापि विशिष्ट अपवादात्मक परिस्थितीत अत्यावश्यक सेवेतील वाहन चालकास शाखा प्रमुखाची शिफारस व मा.आयुक्त/प्रशासक यांची मंजूरी नुसार अधिक रक्कम अतिरिक्त कामाचे मोबदलण्यांत देय असेल.

५) ज्या कर्मचाऱ्यांनी अतिरिक्त काम केले असेल त्यांना सोबत जोडलेल्या "नमुना-अ" (जोडपत्र) चे नमुन्यात अर्ज करावा लागेल.

६) प्रमाणपत्र :-

ज्या कर्मचाऱ्यांने अतिरिक्त काम केलेले असेल त्याला सोबत जोडलेल्या नमुन्यातील (नमुना-ब) प्रमाणपत्र शाखा प्रमुखाचे शिफारशी नुसार बिला सोबत सादर करावे लागेल.

७) नोंद वही :-

अ) जादा कामाचे रजिस्टर प्रत्येक शाखा प्रमुखांनी नमुना -क प्रमाणे ठेवले पाहिजे आणि सदरील नोंदवहीमध्ये अतिरिक्त कामाची कारणे नमूद करुन तपासली पाहिजेत.

ब) सदरील रजिस्टर हे शाखा प्रमुखांनी लेखा परिक्षणासाठी अथवा इतर कामासाठी उपलब्ध करुन दिले पाहिजे. तथापि सतत १० (दहा) दिवस एकाच कर्मचाऱ्यांस अतिरिक्त कामासाठी बोलवले असल्यास शाखा प्रमुखांनी आवश्यक ती खुलासा मा.आयुक्त/प्रशासकाकडे सादर करावा. सदरील उपवाद हा वाहन चालकास लागू होणार नाहीत.

८) सार्वजनिक सुट्टीचा मोबदला :-

औरंगाबाद महानगरपालिकेतील विशेषतः साफ सफाई, स्वच्छता, पाणी पुरवठा, अग्निशमन, जलनिःसारण इ.अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांला विशिष्ट परिस्थितीत मा.आयुक्त/प्रशासक, विभाग प्रमुखाने सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामासाठी बोलावलेल्या कर्मचाऱ्यांच्या अतिरिक्त कामाचा मोबदला म्हणून पर्यायी सुट्टी दिले जाईल. अथवा ते शक्य नसल्यास लंच टाईम व टी टाईमचा वेळ कापून कामाचा मोबदला दिला जाईल.

९) महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या सार्वजनिक सुट्ट्यांचा मोबदला देय राहील. तथापि अशी सार्वजनिक सुट्टी रविवार अथवा दुसऱ्या व चौथ्या शनिवारी येत असले तर त्या दिवसाचा मोबदला मिळणार नाही. सदरील बाब ही विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी जाहिर केलेल्या सुट्यांनाही लागू राहील.

१०) सार्वजनिक सुट्ट्यांचा मोबदल्याचे दर :-

अ) शासनाने जाहिर केलेल्या सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी वर नमूद केलेल्या अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना/मजूरांना विभाग प्रमुखांनी लेखी आदेश काढून कामावर बोलवावे.

ब) विभाग प्रमुखांनी सार्वजनिक सुट्ट्यांचे वेगळे रजिस्टर ठेवले पाहिजे व त्या मध्ये सदर सुट्टीच्या दिवशी कामावर हजर असलेल्या कर्मचाऱ्यांची नोंद घेतली पाहिजे.

क) सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामा बाबत/कर्मचारी/मजूरास जर बदली सुट्टी पाहिजे असल्यास तो त्यास पात्र राहील. परंतू त्यास सदर सुट्टीचा मोबदला मिळणार नाही.

ड) जर कर्मचाऱ्यांस सार्वजनिक सुट्टीचा मोबदला पाहिजे असल्यास त्याने लेखी अर्ज व संबंधित शाखा प्रमुखांनी तो कामावर हजर असल्या बाबतचे प्रमाणपत्र सादर केल्यास तो एक दिवसाच्या पुर्ण पगारास पात्र असेल.

इ) उपरोक्त अतिरिक्त कामाचा मोबदला व सुट्टीचा मोबदला हा प्रत्येक महिन्याच्या दहा ते पंधरा तारखेच्या आत संबंधितास दिला गेला पाहिजे.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांचे कलम ४६५ (१) अन्वये महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुट्टीचा व कार्यालयीन वेळेनंतर अतिरिक्त काम केल्या बाबत द्यावयाच्या मोबदल्याचे विनियमास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.४१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, नवीन व जुन्या प्रशासकीय इमारतीमध्ये दुरध्वनी यंत्रणा बसविण्याच्या कामाकरिता महाराष्ट्र इलेक्ट्रानिक्स कॉर्पोरेशन लि. (मेल्ट्रॉन) यांच्याकडून दरपत्रके मागविले असता एकूण ९६ पाईन्टस करिता एकूण रक्कम रुपये ५,८७,१२५/- चे दरपत्रक दिले आहे. त्यास मान्यता मिळावी. तसेच सदर काम मे.महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन लि.(मेट्रॉन) यांच्या कडून दरपत्रकाच्या दराने करुन घेण्यास मान्यता देण्यांत यावी.प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार नवीन व जुन्या प्रशासकीय इमारतीमध्ये दुरध्वनी यंत्रणा बसविण्याच्या कामाकरिता मे.महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन लि.(मेल्ट्रॉन) यांच्याकडून आलेल्या रक्कम रुपये ५,८७,१२५ च्या दरपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच सदर काम मे.महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन लि.(मेल्ट्रॉन) यांच्याकडून त्यांनी दर पत्रकामध्ये दिलेल्या दराने करुन घेण्यास मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.४२ :**

मालमत्ता अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्री.पृथ्वीराज भुजंगराव पवार यांनी दि.३१.१२.९२ रोजी अर्ज देऊन विनंती केली आहे की, सिध्दार्थ गार्डन समोर पार्कीगची जी जागा आहे त्याचे दक्षिणेस नाल्या लगत पडित जागा पडलेली आहे. त्यातील

५०'x६०' आकाराची जागा त्यांना त्याचे समाजसेवा कार्यालय व लॉजींग बोर्डींग चे व्यवसायासाठी भाडे पट्ट्याने देण्यांत यावी.

सदर प्रकरणांत नगररचना विभागाचा अभिप्राय घेण्यांत असून अर्जदार यांना सदरील ठिकाणची जागा भाडे पट्ट्याने देणे बाबत प्रशासकीय मान्यता दि.२७.०४.९३ रोजी झालेली आहे.

तसेच सदर प्रकरणांत सहाय्यक संचालक, नगररचना यांनी जागेच्या मुल्यांकन दराच्या १५% दराने जागेचा भाडे आकारणी दर मुल्यांकित केला होता मात्र अर्जदार यांना जागाचे फायदा २/३ वर्षानंतर मिळणार असल्या कारणाने जागेच्या मुल्यांकन दराचे १५% ऐवजी १२% दराने जागेचा भाडे आकारणी दर ठेवण्या बाबत मान्यता झालेली आहे. त्याप्रमाणे सदरहू जागा अर्जदार यांना रु.१७१/- प्रति चौ.मी.प्रति वर्ष दराने भाडे पट्टयाने द्यावयाची आहे.

तेव्हा ३००० चौ.फु.म्हणजे २७८.८१ चौ.मी.जागा रु.१७१/- प्रति वर्ष दराने अर्जदार यांना ३० वर्ष मुदतीसाठी भाडे पट्ट्याने देणे बाबत विचार होणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

मालमत्ता अधिकारी यांनी दिलेला प्रस्तावास खालील अटीवर मंजूरी देण्यांत येते.

१. सदर जागा ३० वर्षासाठी दिली. मुदतीवर रु.१७१/- प्रति चौ.मी.प्रति वर्ष या दराने भाडे पट्ट्याने देण्यांत येते.
२. प्रत्येक वर्षाचे आगाऊ भाडे वर्षाचे सुरुवातीचे महिन्यांत कार्यालयात जमा करावा लागेल.
३. प्रत्येक पाच वर्षांनी या जागेचे भाडे सुधारित दराने आकारले जाईल.
४. भाडे पट्टा मसुदा कार्यालयाच्या विधी सल्लागार यांचे कडून तपासून घेतला जावा. भाडे पट्टा अर्जदाराने यांनी स्वखर्चाने करुन घ्यावा.
५. निव्वळ खुली जागा भाड्याने दिली जात आहे. तीचा विकास अर्जदार यांनी स्वखर्चाने करुन घ्यावा.
६. नियमाप्रमाणे बांधकाम परवानगी घेऊन अर्जदार यांनी बांधकाम करावे. बांधकाम परवानगी साठी आवश्यक ते शुल्क नियमाप्रमाणे अर्जदार यांना भरणा करावे लागेल. या जागेस किंवा त्यावर उभारलेले बांधकामास नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर आकारला जाईल. तो अर्जदार यांना महानगरलिकेकडे भरणा करावा लागेल.
७. वरील अटीसह वरील जागा ३० वर्षासाठी दीर्घ मुदतीच्या भाडे तत्वावर देण्यांस प्रशासकीय मंजूरी दिली जाते. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.४३ :**

दिनांक १९.०३.९३ च्या स्थायी समिती सभेत विषय क्र.५४९/११ अन्वये झालेल्या ठरावानुसार मुंबई येथून प्रकाशित होणाऱ्या दैनिक सामना या वर्तमानपत्राच्या विभागीय कार्यालयासाठी औरंगपुरा येथील सुपर मार्केटच्या मधील गाळा क्र.१ प्रबोधन प्रकाशन या नावाने भाडेने देण्यास सर्वानुमते मंजूरी झालेली आहे. नाथ मार्केट मधील पाहिल्या मजल्यावरील गाळा क्र.१ भाड्याने देणे बाबत पुणे महानगरपालिकेने तयार केलेला भाडेपट्टा

व औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयाच्या खालील अटीस अधीन राहून उपरोक्त दुकान दरमहा भाडे रु.९८७१/- व अनामत रक्कम रु.३,२५,९९५/- घेऊन (५) वर्षासाठी भाड्याने देणे योग्य.

१. पुणे महानगरपालिकेने दिलेल्या भाडेपट्ट्याच्या अटी योग्य त्या बदलासह लागू करण्यांत याव्यात.
२. औरंगाबाद महानगरपालिकेने नाथ सुपर मार्केट मधील दुकाने भाड्याने देणे बाबत ज्या काही अटी व शर्ती लागू केलेल्या आहेत. त्याच अटी व शर्ती उपरोक्त दुकानासह लागू राहतील.
३. विशेष अट अशी राहील की, प्रबोधन प्रकाशन मुंबई ही विश्वस्त संस्था असून तिच्या विभागीय कार्यालयासाठी उपरोक्त दुकान आवश्यक असल्याने सदरील जागेचा उपभोग सामाजिक, धार्मिक व राजकीय कारणासाठी करता येणार नाही. तथापि असे निदर्शनास आल्यास की, सदरील जागेचा उपभोग सामाजिक,राजकीय व धार्मिक कारणासाठी करता येणार नाही, तथापि असे निदर्शनास आल्यास की, सदरील जागेचा उपभोग सामाजिक राजकीय व धार्मिक कारणासाठी होत आहे. अशा वेळी सदरील जागा रिकामी करुन घेण्याचा अधिकारी मा.आयुक्त/प्रशासकांना राहील.
४. सदरील भाडेपट्ट्यास लागणारा स्टॅम्प पेपर व इतर खर्च विश्वस्त संस्थेने करावा.

उपरोक्त दर्शविण्यांत आलेल्या अटीस अधिन राहून सुपर नाथ मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र.१ प्रबोधन प्रकाशन या विश्वस्त संस्थेस भाड्याने देण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

दिनांक १९.०३.९३ रोजी स्थायी समितीच्या बैठकी मध्ये विषय क्र.५४९/११ अन्वये मंजूर करण्यांत आलेल्या प्रबोधन प्रकाशनच्या मुंबई येथून प्रसिध्द होणाऱ्या सामना या दैनिकाच्या विभागीय कार्यालयास सुपर मार्केट च्या पहिल्या मजल्या वरील गाळा क्र.१ प्रस्तावात दर्शविण्यांत आलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून भाडे पट्ट्याने देण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## <u>दिनांक :-१३.०७.९३</u>

**प्रस्ताव क्र.४४ :**

उपआयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५७ (३) (अ) व ४६५ (१) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्ती व पदोन्नती बाबत आवश्यक गुणवत्ता व शैक्षणिक पात्रता दर्शविणाऱ्या प्रारुप विनियमाचा मसुदा महापालिका अधिकारी व कर्मचारी यांचेकडून हरकती व सूचना मागवून व त्यानुसार आवश्यक त्या दुरुस्त्या करुन सोबत जोडल्याप्रमाणे नियम/विनियमाचा अंतिम मसूदा तयार करण्यांत आलेला आहे. सदरील अंतिम मसूदा शासनाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक

असल्यामुळे तो शासनाकडे पाठविण्यांच्या मंजूरीस्तव व शासनाची अंतिम मंजूरी प्राप्त होईपर्यंत सदरील अंतिम मसूदा नियम मनपाचे नियम नसल्यामुळे मार्गदर्शन पर वापरण्यांस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५७ (३) (अ) व ४६५ (१) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती व पदोन्नती बाबत आवश्यक असलेली गुणवत्ता व शैक्षणिक पात्रता दर्शविणाऱ्या सोबत जोडण्यांत आलेल्या नियमांच्या/विनियमच्या अंतिम मसुद्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. तसेच सदरील मसुदा नियम शासनाकडे अंतिम मंजूरीस्तव प्राप्त होईपर्यंत मार्गदर्शनपर वापरण्यांस मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## महानगरपालिका अधिकारी कर्मचारी सेवाभरती नियम

## - प्रारुप मसुदा -

औरंगाबाद महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४ व ४५७ चे पोटकलम (३) पोट विभाग (अ) अन्वये महानगरपालिकेस ज्या जागांवर नेमणूक करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत त्या जागांची वेतनश्रेणी आणि पात्रता ठरविण्यांबाबतचे प्रारुप नियम :-

१) **संक्षिप्त नांव व प्रारंभ :**

हया नियमांना महानगरपालिकेस ज्या जागांवर नेमणूका करावयाचे अधिकार प्राप्त झाले आहेत त्या जागांची वेतनश्रेणी व पात्रता बाबतचे "औरंगाबाद महानगरपालिकेचे नियम" असे संबोधण्यांत येईल व ते शासनाच्या राजपत्रात अंतिमतः प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून अंमलात येतील.

२) **व्याख्या :**

विषयांस किंवा संदर्भात काहीही प्रतिकुल नसल्यास,

अ) 'अधिनियम' म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९

ब) 'कलम' म्हणजे अधिनियमाचे कलम

क) 'निवडश्रेणी' म्हणजे हया नियमांतील विशिष्ट पदांना निवडश्रेणी म्हणून विशेषरित्या मंजूर केलेले वेतन.

ड) हयामध्ये वापरण्यांत आलेले शब्द व शब्द समूह यांची व्याख्या दिली नसेल तर अधिनियमातील व्याख्येमध्ये जो अर्थ असेल तोच अर्थ त्या शब्दांचा किंवा शब्द समुहाचा समजावा.

३) **पात्रता व वेतनश्रेणी :**

महानगरपालिकेस ज्या जागांवर नेमणूका करण्याचे अधिकार प्राप्त होतात अशा जागांची आवश्यकता ती पात्रता व वेतनश्रेणी आणि भत्ते खालीलप्रमाणे राहतील. उपआयुक्त, शहर अभियंता, आरोग्य अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, सहाय्यक आयुक्त आणि महानगरपालिका सचिव हया जागांवर नमूद केलेली पात्रता क्रमशः नसेल तर महापालिका अशा व्यक्तीस नियुक्त करणार नाही.

अ) उपआयुक्त :

१) वेतनश्रेणी रुपये - २२००-४०००

**टिप्पणी :**

पोट विभाग २ (क) प्रमाणे नेमलेल्या उमेदवारांची वेतनश्रेणी प्रतिनियुक्तीचे शर्ती व अटी प्रमाणे राहील.

२) पात्रता :-

अ) सध्या असलेल्या पैकी उमेदवाराचे नामनिर्देशनाने की,

१) जे महानगरपालिकेच्या सेवेत नसतील तर ३५ वर्षाहून अधिक वयाचे नाहीत.

२) कला, विज्ञान, वाणिज्य किंवा विधी शाखेचे स्नातक आहेत.

३) किंवा आणि ज्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेत किंवा शासकीय खात्यामध्ये अधिकारी म्हणून किंवा दहा वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव आहे. अथवा

ब) सध्या महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना बढती देऊ की,

१) जे कला, विज्ञान, वाणिज्य किंवा विधी शाखेचे स्नातक

२) ज्यांना अधिकारी म्हणून ७ वर्षाचा अनुभव असेल आणि ज्या व्यक्तींनी स्थानिक स्वराज्य संस्थेची पदविका धारण केलेली असेल किंवा ज्यांनी भारतीय लोक प्रशासन सेवा हया संस्थेचे प्रशिक्षण घेतलेले आहे. अशांना प्राधान्य दिले जाईल अथवा

क) शासनाच्या महसुल विभागातील उप जिल्हाधिकारी पदाचे संवर्गातील अनुभवी अधिकाऱ्यांस प्रतिनियुक्तीवर घेऊन.

(ब) महापालिका सहाय्यक आयुक्त :

१) वेतनश्रेणी रु.२०००-३५०० अधिक नियमानुसार इतर भत्ते.
टिप - पोटकलम पोट विभाग २ (क) अन्वये प्रतिनियुक्तीवर नेमलेल्या उमेदवाराचे पगार व भत्ते प्रतिनियुक्तीच्या शर्ती व अटीप्रमाणे राहतील.

२) पात्रता- उमेदवाराची नेमणूक खालील प्रमाणे केली जाईल.

अ) सध्या असलेल्या उमेदवारांपैकी नामनिर्देशनाने की जे,

१) सध्या महापालिकेच्या सेवेत नसतील तर २५ वर्षाहून अधिक वयाचे नाहीत.

२) कला, वाणिज्य, विज्ञान अथवा विधी शाखेचे पदवी धारण करतात.

३) शासकीय खात्यात अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेत अधिकारी म्हणून किमान दहा वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव असणारा.

४) एल.जी.एस व अन्य खात्याच्या परिक्षा पास करणे गरजेचे.

ब) सध्या असलेल्या महापालिका सेवेतील उमेदवारांस बढती देऊन जे,

१) कला, वाणिज्य, शास्त्र अथवा कायदा शाखेतील पदवीधारक

२) जे अधिकाऱ्यांच्या जागेवर सलग सात वर्षाहून कमी नाही अतकी वर्षे काम करतात.

३) जे स्थानिक स्वराज्य संस्थेची पदवी धारण करतात अथवा ज्यांना भारतीय लोकसेवा प्रशासनात प्रशिक्षण घेतले आहे अशा व्यक्तींना प्राधान्य दिले जाईल. अथवा

४) शासनाच्या महसुल विभागच्या तहसिलदार किंवा तत्सम योग्य अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती.

क) आरोग्य वैद्यकीय अधिकारी :

१) वेतनश्रेणी : रु.३०००-४५००.

टिप - पोटकलम २ (क) अन्वये नेमलेल्या उमेदवारांची वेतनश्रेणी प्रतिनियुक्तीच्या शर्ती व अटी प्रमाणे राहील.

पात्रता - नेमणूक खालील प्रमाणे केली जाईल.

अ) सध्या असलेल्या उमेदवारांपैकी नामनिर्देशनाने की जे,

१) महानगरपालिकेच्या सेवेत नसतील तर ३५ वर्षाहून अधिक वयाचे नाहीत.

२) एम.बी.बी.एस.पदवी आणि डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ धारण करणारा परंतू डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ धारण करणारा मिळत नसेल तर एम.बी.बी.एस.पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांपैकी योग्य त्या उमेदवारास सदरचा डिप्लोमा नेमणूक तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत पूर्ण केला पाहिजे या अटीवर त्याची नेमणूक करता येईल, असे करण्यास तो असमर्थ ठरल्यास तो नोकरीवरुन काढून टाकण्यांस पात्र राहील.

३) ज्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेत अथवा सरकारी इस्पितळ किंवा नावाजलेल्या इस्पितळामध्ये किमान पाच वर्षाचा वैद्यकीय अधिकारी म्हणून कामाचा अनुभव आहे.

अ) सध्या महापालिकेत असल्यास उमेदवारांना बढती देऊन की जे, एम.बी.बी.एस.ची पदवी धारण करतात.

ब) जे डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ या परिक्षेचा डिप्लोमा बढतीच्या तारखेपासून तीन वर्षाच्या आंत पूर्ण करतील.

क) जे वैद्यकीय अधिकारी म्हणून सलग पाच वर्षाहून कमी नाहीत इतकी वर्षे काम करतात किंवा

ड) शासनाकडून आरोग्य सेवेतील पात्र उमेदवार प्रतिनियुक्तीवर

**ड) शहर अभियंता**

वेतनश्रेणी ३०००-४५००

टिप :- पोट कलम (२) (क) अन्वये केलेल्या उमेदवारांची वेतनश्रेणी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार राहील.

पात्रता - नेमणूक खालील प्रमाणे केली जाईल.

अ) सध्या असलेल्या उमेदवारांपैकी, की नामनिर्देशनाने, की जे -

१. मनपाच्या सेवेत नसतील तर ३५ वर्षाहून अधिक वयाचे नाहीत.

२. उमेदवार हा स्थापत्य शास्त्रातील (बी.ई.सिव्हील) पदवीधारक.

३. सरकारी अथवा स्वराज्य संस्थेत अथवा नावाजलेल्या स्थापत्य संस्थेत किमान उप अभियंताच्या दर्जाच्या जागेवर सात वर्षाचा अनुभव आवश्यक.

ब) सध्या मनपा सेवेत असलेल्या उमेदवारांना बढती देवून की जे-

१. स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी आणि उप अभियंता म्हणून किमान सात वर्षाचा अनुभव.

२. मान्यता प्राप्त संस्थेमधून उप अभियंताची व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण किंवा शासकीय सेवेतील योग्य अशा अभियंत्याची प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती.

**इ) नगर सचिव :**

(१) वेतनश्रेणी : रु.२०००-३५००

टिप - पोटकलम २ (क) अन्वये नेमलेल्या उमेदवारांची वेतनश्रेणी त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीप्रमाणे राहील.

२) पात्रता- नेमणूक खालील प्रमाणे केली जाईल.

सध्या असलेल्या पैकी उमेदवाराच्या नामनिर्देशनाने की जे,

१) सध्या महापालिकेच्या सेवेत नसतील तर ३० वर्षाहून अधिक वयाचे नाहीत.

२) कला, वाणिज्य अथवा विज्ञान या शाखेतील पदवी धारक.

३) विधी शाखेतील पदवीधारक.

४) ज्यास स्थानिक स्वराज्य संस्था निमशासकीय अथवा शासकीय खात्यामधील जबाबदारीच्या जागेचा कमीत कमी दहा वर्षाचा अनुभव असावा. अथवा

ब) सध्या महापालिकेत नौकरीत असलेल्या उमेदवारास बढती देऊन की जे,

१) कला, विज्ञान, वाणिज्य अथवा विधी शाखेची मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण करतात.

२) अधिक्षक दर्जाच्या हुद्दयाच्या जागेवर किंवा तत्सम संवर्ग नौकरीचा १० वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव.

३) शासकीय सेवेतील योग्य तो अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेऊन.

**फ) महापालिका मुख्य लेखा परिक्षक :**

अ) वेतनश्रेणी : रु.३००० - ४५००

टिप - पोट कलम पोट विभाग २ (क) अन्वये नेमलेल्या पदाची वेतनश्रेणी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीप्रमाणेच राहील.

ब) पात्रता - नेमणूक खालील प्रमाणे केली जाईल.

सध्या असलेल्या उमेदवारांपैकी नामनिर्देशनाने की जे,

१) सध्या महापालिकेच्या सेवेत नसतील तर ३५ वर्षाहून अधिक वयाचे नाहीत.

२) कला, विज्ञान अथवा विज्ञान या शाखेची पदवी धारण करणारे अर्थशास्त्र अथवा गणित शास्त्र विषय घेऊन पास झालेले कला पदवीधर आणि शास्त्र पदवीधर गणित विषय घेऊन पास झालेले फक्त या पदासाठी पात्र असतील. अकौटन्सी व ऑडींटींग हे मुख्य विषय घेऊन पास झालेल्या वाणिज्य पदवीधारकांना प्राधान्य दिले जाईल. विधी शाखेची पदवी ही जादा पात्रता समजली जाईल.

३) ज्यांना कोणत्याही सरकारी अथवा स्थानिक स्वराज्य संस्था अथवा खाजगी नावाजलेल्या फर्ममध्ये जबाबदारीच्या जागेवर लेखाधिकारी म्हणून काम केल्याचा सात वर्षाचा अनुभव असेल किंवा

सध्या महापालिका सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना बढती देऊन की जे,

१) गणित, विज्ञान अथवा अर्थशास्त्रासह कला अथवा गणित शास्त्रासह शास्त्र अथवा वाणिज्य पदवीधारक आहेत.

२) असे लेखाधिकारी म्हणून सात वर्षाहून कमी अनुभव नसलेल्या व ज्यांना लेखा व अंकेक्षणाचा अनुभव आहे असे,

३) शासनाकडील योग्य तो अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेऊन,

४) नियम क्र.३ मध्ये काहीही सांगितले तरी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती या पैकी आवश्यक अनुभव उच्च मुलभूत शैक्षणिक पात्रता असणारे पुरेसे उमेदवार त्यांच्या करिता राखून ठेवलेल्या जागा भरण्यासाठी उपलब्ध होण्याची शक्यता नाही असे निवडीच्या वेळी कोणतेही घटकेस नेमणूक करणाऱ्या अखत्यारीचे मत असेल तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या बाबतचे अनुभव, उच्च मुलभूत शैक्षणिक पात्रता नेमणूक करणाऱ्या अखत्यारीचे अच्छेनुसार शिथील करण्यांत येतील, तसेच महापालिका सेवेतील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नोकरीचा कालावधी व अनुभव सहा महिन्यासाठी शिथिल करण्यांत येईल.

स्वाक्षरीत/-
आयुक्त
महानगरपालिका, औरंगाबाद.

## औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

औरंगाबाद महानगरपालिका आवश्यक वाटल्यावरुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५७ (३) (अ) मध्ये नमूद केलेल्या पदांव्यतिरिक्त महानगरपालिका सेवेतील अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती, प्रतिनियुक्ती, पदोन्नती बाबतच आवश्यक असलेली गुणवत्ता, शैक्षणिक पात्रता बाबतचे कलम ४६५ (१) (अ) अन्वये तयार केलेले विनियम.

**(१) लघु संज्ञा व अंमलबजावणी :-**

या नियमांना औरंगाबाद महानगरपालिकेतील पदावर नियुक्त करण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता विदित करणारे नियम असे संबोधण्यांत येईल व त्यांची अंमलबजावणी शासकीय राजपत्रात अंतिमदृष्ट्या प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून करण्यांत येईल.

**(२) व्याख्या :-**

प्रस्तुत विषयास अगर संदर्भिस प्रतिकुल नसेल तर -

(अ) 'अधिनियम' म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९.

(ब) 'कलम' म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे वेळोवेळी दुरुस्त केलेले नियम.

(क) 'नियम' म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५७ (३) व ४६५ (१) अन्वये बनविलेले नियम.

(ड) 'संवर्ग' म्हणजे एक स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेली एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या भागातील पदसंख्या.

(इ) 'परिशिष्ट' म्हणजे या नियमास जोडलेली 'परिशिष्ट-अ'

(ई) 'निवडश्रेणी' म्हणजे 'परिशिष्ट-अ' मध्ये नमूद केलेल्या पदांना निवडश्रेणी म्हणून विशेषरित्या मंजूर केलेले वेतन.

**(३) शैक्षणिक पात्रता व वेतनश्रेणी व वयोमर्यादा :-**

महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त करावयास व पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, अनुभव, वेतनश्रेणी ही या नियमास जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल, तथापि मागासवर्गीय उमेदवार/कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा व अनुभवाबाबतच्या अटी शासनाच्या नियमानुसार शिथिल केल्या जातील.

**(४) पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीचे गुणोत्तराचे प्रमाण :-**

परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या पदांची नियुक्ती नामनिर्देशनाने व पदोन्नतीने नमूद केलेल्या गुणोत्तराचे प्रमाणात करण्यांत येईल व पदोन्नतीने नियुक्ती करता असतांना ज्येष्ठता गुणोत्तर हे तत्व विचारात घेतले जाईल.

**(५) औरंगाबाद महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून,** महापालिकेत काम करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना भविष्यांत पदोन्नतीची शक्यता कमी असते. दैनंदिन कामाची आवड व काम करण्यामध्ये कर्मचाऱ्यांना उत्साह निर्माण व्हावा म्हणून परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या सर्व पदांना, या पदावर

जो कर्मचारी/अधिकारी नियुक्त झालेला असेल अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेला असेल अशा सर्व कर्मचाऱ्यांना खालील अटींचा अधिन निवडश्रेणी व समयश्रेणी लागू करण्यांत येईल.

**निवडश्रेणी :-**

(अ) महानगरपालिकेत एखादा कर्मचारी ज्या पदावर/संवर्गात सतत ७ वर्षापासून काम करत असेल अशा कर्मचाऱ्यांस तो ज्या पदावर नियुक्त झाला व ७ वर्ष त्याच पदावर किंवा संवर्गात तो काम करत असेल व त्याचे काम समाधानकारक असेल अशा कर्मचाऱ्यांना तो सध्या ज्या वेतनश्रेणीत काम करत असेल त्या नंतरची जी काही वेतनश्रेणी असेल त्या वेतनश्रेणीस तो पात्र राहील.

(ब) तसेच ज्या पदांना भविष्यांत कोणतीही पदोन्नती नाही किंवा पदोन्नतीचे पदही महानगरपालिकेत अस्तित्वात नाही अशा पदांना अशा पदावरील कर्मचाऱ्यांला तो सध्या ज्या वेतनश्रेणीत काम करत असेल त्याला ७ वर्षानंतर त्या नंतरच्या शासकीय वेतनश्रेणीतील जो संवर्ग असेल त्या वेतनश्रेणीत तो पात्र राहील.

परंतू कनिष्ट अभियंता या पदावर सरळ नेमणूकीने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांस ५ वर्षानंतर शासकीय नियमानुसार शाखा अभियंत्यास लागू असणारी वेतनश्रेणी लागू करण्यांत येते, याच पध्दतीने महानगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता/रचना सहाय्यक/सहा.नगररचनाकार या पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील ही निवडश्रेणी ५ वर्षानंतर लागू करण्यांत येईल.

**समयश्रेणी :-**

(अ) महानगरपालिकेतील एखादा कर्मचारी ज्या पदावर/संवर्गात सतत १५ वर्षापासून काम करत असेल अशा कर्मचाऱ्यांस तो ज्या पदावर नियुक्त झाला व सतत १५ वर्षे त्याच पदावर किंवा संवर्गात तो काम करत असेल व त्याचे काम समाधानकारक असेल अशा कर्मचाऱ्यांस तो सध्या ज्या वेतनश्रेणीत/निवडश्रेणीत काम करत असेल त्याला त्या नंतरची जी काही शासकीय संवर्गामध्ये वेतनश्रेणी असेल त्या वेतनश्रेणीस तो १५ वर्षानंतर पात्र राहील.

(६) **खातेनिहाय परिक्षा/प्रशिक्षण :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हिराखान फॅक्ट्री ते पॉलिटेक्नीक या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी फेरनिविदा मागविल्या असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १२ निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक १८.०५.९३ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.विश्वनाथ इलेक्ट्रीक कंपनी | - | ८.१ टक्के जास्त |
| २. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | १० टक्के जास्त |
| ३. | मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन | - | ८.१५ टक्के जास्त |
| ४. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | ८.५१ टक्के जास्त |
| ५. | मे.सत्यम वायर्स | - | ८.१ टक्के जास्त |

उपरोक्त निविदा पत्रकापैकी मे.सत्यम वायर्स व मे.विश्वनाथ इलेक्ट्रीक कंपनी यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.१० टक्के जास्त आहे.

परंतू सदर दर जास्त वाटत असल्याने प्रथम क्रमांकाचे कमी दर (First lowest) असलेल्या मे.सत्यम वायर्स आणि मे.विश्वनाथ इलेक्ट्रीक कंपनी तसेच दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर (Second lowest) असलेल्या मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदरील काम मे.सत्यम वायर्स यांनी ८.१० टक्के जास्त ऐवजी ४.२५ टक्के जास्त या दराने करण्यास तयारी दर्शविली आहे. तसेच मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांनी सदर काम ८.१५ टक्के दराऐवजी ४.१५ टक्के जास्त या दराने करण्याची संमती दर्शविली आहे.

मे.सत्यम वायर्स यांच्या ४.२५ टक्के जास्त या दरापेक्षा मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांनी दिलेले दर कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१५ टक्के जास्त आहे.

तरी वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदर काम मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांच्या कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१५ टक्के जास्त या दराने करुन घेण्यांस मान्यता मिळावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार हिराखान फॅक्टरी ते पॉलीटेक्नीक या रस्त्याचे विद्युतकरण करण्याचे कामाकरिता आलेल्या निविदापत्रकापैकी व वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदर काम मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांनी दिलेल्या दराप्रमाणे म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१५ टक्के जास्त या दराने करुन घेण्यास मान्यता देण्यांत येते.ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२०.०७.९३

**प्रस्ताव क्र.५० :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हॉटेल पंचवटी ते हॉटेल सिंडीकेंट बॅंक या रस्त्याचे विद्युतीकरणाच्या कामाकरिता फेर निविदा मागविल्या असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पाच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके दि.१८.०५.९३ रोजी उघडण्यांत आली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | ५.५ टक्के जास्त |
| २. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | ९.१ टक्के जास्त |
| ३. | मे.सत्यम वायर्स | - | ४.९ टक्के जास्त |
| ४. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | १० टक्के जास्त |
| ५. | मे.दिपक इलेक्ट्रीकल्स | - | १०.२ टक्के जास्त |

उपरोक्त प्राप्त निविदापत्रकापैकी मे.सत्यम वायर्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९० टक्के जास्त आहेत.

परंतू सदर दर जास्त वाटत असल्याने मा.प्रशासकाचे आदेशानुसार मे.सत्यम वायर्स यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.सत्यम वायर्स यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९० टक्के जास्त ऐवजी ४.२५ टक्के जास्त दराने करण्याची संमती दर्शविली आहे.

तरी सदर काम जे सत्यम वायर्स यांच्याकडून वाटाघाटी अंती ठरलेल्या दराप्रमाणे म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.२५% जास्त या दराने करुन घेण्यास मान्यता मिळावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार हॉटेल पंचवटी ते हॉटेल सिडींकेट बॅंक या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याचे कामासाठी झालेल्या निविदापत्रका पैकी व वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदर काम मे सत्यम वायर्स यांच्या कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.२५ टक्के जास्त या दराने करुन घेण्यास मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.५१ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरातील विविध चौकात २ सेट, ३ सेट व ४ सेट फिटींग बसविण्याच्या कामाकरिता फेरनिविदा मागविल्या असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १२ निविदापत्रके विकल्या गेली. १ निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ४ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक १८.०५.९३ रोजी उघडण्यांत आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.सत्यम वायर्स | - | ८.१ टक्के जास्त |
| २. | मे.डॅनिश सेल्स कार्पोरेशन | - | ८.१५ टक्के जास्त |
| ३. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | ८.९० टक्के जास्त |
| ४. | मे.अदित्य इलेक्ट्रीकल्स | - | १० टक्के जास्त |

उपरोक्त प्राप्त निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.१ टक्के जास्त दराचे मे.सत्यम वायर्स यांचे निविदापत्रक आहे.

परंतू, सदर दर जास्त वाटत असल्याने मा.प्रशासक यांनी दिलेल्या आदेशानुसार प्रथम क्रमांकाचे कमी दर (First lowest) असलेल्या मे.सत्यम वायर्स यांना व दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर कामाच्या दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.सत्यम वायर्स यांनी सदर काम ८.१० टक्के जास्त ऐवजी ४.२५ टक्के जास्त या दराने करण्याची तयारी दर्शविली आहे. तसेच मे.डॅनिश सेल्स कार्पोरेशन यांनी सदर काम ८.१५ टक्के जास्त ऐवजी ४.१५ टक्के जास्त या दराने करण्याची तयारी दर्शविली आहे.

मे.सत्यम वायर्स यांच्या ४.२५ टक्के जास्त या दरापेक्षा मे.डॅनिश सेल्स कार्पोरेशन यांनी दिलेले दर कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१५ टक्के जास्त आहेत.

तरी वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदर काम मे.डॅनिश सेल्स कार्पोरेशन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१५ टक्के जास्त या दराने करुन घेण्यास मान्यता मिळावी.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार शहरातील विविध चौकात २ सेट, ३ सेट व ४ सेट फिटींग लावण्याचा कामाकरिता प्राप्त निविदापत्रकापैकी व वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदर काम मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१५ टक्के जास्त दराने करुन घेण्यास मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.५२ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हनुमान टेकडी ते औरंगाबाद लेणी या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता फेर निविदा मागविल्या असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १२ निविदापत्रके प्राप्त झाली व

निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक १८.०५.९३ रोजी उघडण्यांत आल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | ८.२१ टक्के जास्त |
| २. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | ८.१५ टक्के जास्त |
| ३. | मे.सत्यम वायर्स | - | ८.१० टक्के जास्त |
| ४. | मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन | - | ८.१५ टक्के जास्त |
| ५. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | १० टक्के जास्त |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.१० टक्के जास्त दराचे मे.सत्यम वायर्स यांचे निविदापत्रके आहे.

परंतू सदरील दर जास्त वाटत असल्याने मा.प्रशासक यांच्या आदेशानुसार प्रथम क्रमांकाचे कमी दर (First lowest) असलेले मे.सत्यम वायर्स व दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर असलेले (Second Lowest) मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांना सदर दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.सत्यम वायर्स यांनी सदर काम ८.१ टक्के जास्त ऐवजी ४.२५ टक्के जास्त या दराने करण्याची संमती दर्शविली आहे. तसेच मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांनी सदर काम ८.१५ टक्के जास्त ऐवजी ४.१५ टक्के जास्त या दराने करण्याची तयारी दर्शविली आहे.

मे.सत्यम वायर्स यांच्या ४.२५ टक्के जास्त या दरापेक्षा मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांनी दिलेले दर कमी म्हणजे ४.१५ टक्के जास्त आहे.

तरी वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदर काम मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१५ टक्के जास्त या दराने करुन घेण्यास मान्यता मिळाली.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार हनुमान टेकडी ते औरंगाबाद लेणी या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याचे काम आलेल्या निविदापत्रकापैकी १ वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.डॅनिश सेल्स कॉर्पोरेशन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१५ टक्के जास्त या दराने करुन घेण्यास मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>सचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>प्रशासक<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.५३ :-**

औरंगाबाद शहर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता चेलीपुरा ते रोषणगेट हया प्रस्तावाने भु.क्र.१००९० बाधित असून त्यात बांधीव क्षेत्र ६४.३० चौ.मी. व खुले क्षेत्र ०७.०० चौ.मी. आहे. संबंधित मिळकत धारक श्री.अफजल हुसैन हुसैनी यांना खाजगी वाटाघाटी करणेसाठी बोलावून बाधित क्षेत्र व खुले क्षेत्र याचा एकूण मोबदला रक्कम रुपये १,२३,७३२/- करण्यांत आला असून बांधकाम साहित्य मिळकत धारकास देण्याचे ठरले त्यापोटी ८,७३२/- कमी करुन मोबदल्याची रक्कम रुपये १,१५,०००/- देणेस्तव व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

वरीलप्रमाणे न.भु.क्र.१००९० चे मिळकत धारक श्री.अफजल हुसैनी यांना त्याचे बाधित मिळकतीचे मोबदल्याची रक्कम रुपये १,१५,०००/- देणेस मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.५४ :-**

केंद्र शासनाच्या भंगीमुक्ती योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाने ठरविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत एकूण ११०० नवीन शौचालयाचे बांधकाम करण्याबाबतचा ठराव सर्वसाधारण सभा दि.२०.०१.९३ च्या विषय क्र.१००/१४ नुसार महानगरपालिकेने केला आहे. सदरील ठरावानुसार एकूण ११०० नवीन संडास बांधण्याचा प्रकल्प अहवाल (Project report) महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या पत्र क्र.मनपापुजनिःमं/एलसीएस/न.बां./सीआर-२/९३ दि.१५.०६.९३ या पत्रान्वये महापालिकेस कळविण्यांत आले आहे की, सदरील प्रस्तावास हुडकोने मंजूरी दिलेली आहे.

सदरील पत्रानुसार महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाकडे हुडकोकडून कर्ज घेण्यासाठी ठराव घेणे आवश्यक आहे.

शासनाच्या धोरणानुसार एक संडासासाठी रु.२०००/- एवढे मंजूर करण्यांत आलेले आहेत. सदर योजना अल्प उत्पन्न गट (एलआय-९ मधील नागरिकांसाठी आहे व सदरील गटासाठी हुडको ६०% कर्ज देणारे आहे. तरी ११०० संडासासाठी ६०% कर्ज रु.२०००/- प्रमाणे रक्कम रुपये १३.२० लाख रुपये हुडको कडून घेण्याची मंजूरी देण्यांत यावी.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

कमी खर्चाच्या योजने अंतर्गत नवीन शौच कुपाचे बांधकामा बाबत हुडको कडून ११०० संडास बांधण्यासाठी ६०% कर्ज रु.१३.२० लाख घेण्याची मंजूरी देण्यांत येते. व सदरील कर्जासाठी महानगरपालिकातर्फे कार्यकारी अभियंता श्री.व्ही.एस.राजभोज यांना करारनामा व या योजनेशी संबंधित इतर कागद पत्रांवर स्वाक्षरी करण्याचा अधिकार देण्यांत येतो.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.५५ :-**

केंद्र शासनाच्या भंगीमुक्ती योजने अंतर्गत अल्प उत्पन्न गटातील लाभार्थीसाठी बांधण्यांत येणाऱ्या शौच कुपांसाठी महानगरपालिकेची आजची आार्थिक स्थिती लक्षात घेता लाभधारकांकडून १५% वर्गणी ऐवजी २५% वर्गणी घेणे योग्य राहील. शासनाच्या धोरणानुसार एका शौच कुंपासाठी रु.२०००/- मंजूर केलेले असून २५% रकमेनुसार रक्कम रु.५००/- घेता येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अल्प उत्पन्न गटातील लाभार्थीसाठी बांधण्यांत येणाऱ्या कमी खर्चाच्या स्वच्छता योजने अंतर्गत लाभधारकांकडून सुरवातीला रक्कम रु.५००/- घ्यावेत व नंतरच काम सुरु करावेतसेच एका संडासासाठी होणाऱ्या एकूण खर्चापैकी सुरवातीला भरलेले रु.५००/- वगळून लाभ धारकांकडून अर्थसहाय्य वगळता कर्जाची पूर्ण रक्कम पुढील पाच वर्षामध्ये मालमत्ता करा सोबत सम प्रमाणात वसुल करावी. त्यानुसार कार्यवाही करावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.५६ :-**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, जन्म, मृत्यू कायदा १९६५ हा महानगरपालिका प्रशासनासाठी भारत सरकारने लागू केलेला आहे. त्या कलमानुसारच नोंदणी योग्य प्रकारे व्हावी म्हणून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३६६, ३६८ अन्वये मृत्यूची नोंद घेतली जाते. तद्अनुषंगाने कलम ३६९ अनुसार महानगरपालिका हद्दीत होणाऱ्या मृत्यूची नोंद अधिक गतिशील अद्यावत व कार्यक्षम होणाच्या दृष्टीने मृत्यूबाबत ची माहिती संपूर्णतः नोंद करुन अत्यंविधी करणेसाठी अत्यविधी परवाना (स्मशान परवाना) कार्यान्वित करण्यांत यावा. यासाठी परवाना परवाना शुल्क रु.५/- आकारण्यास मंजूरी द्यावी ही सेवा मनपातील मुख्य कार्यालयात २४ घंटे कार्यरत राहील. अशा प्रकारचा अत्यंविधी परवाना (स्मशान परवाना) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मंजूर तारखेनंतर कार्यान्वित करणेस मंजूरी द्यावी हा परवाना मिळणेसाठी निम्ननिर्दिष्टीत अटी व शर्तीची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१. जन्म-मृत्यू नोंदणी कायद्यानुसार मृत्यू वार्ता नमुना-१-९ मध्ये संबंधित वार्ताधारकाने भरुन द्यावा लागेल.
२. मृत्यू प्रमाणपत्र मृत्यूचे कारणासह वैद्यकीय अधिकारी अथवा खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्याने प्रमाणित करुनच दिलेले असले पाहिजे.
   याशिवाय संबंधित मा.नगरसेवकांचे पत्रक व पोलिस सेवा महानगरपालिका प्रशासनाकडील पत्रकही ग्राह्य धरले जाईल.
३. प्राप्त झालेला स्मशान परवाना स्मशानातील रखवालदारास देवून अत्यंविधी पंजीकरण करणे जरुरीचे राहील.
४. अंत्यविधी परवान्या शिवाय अंत्यविधी करता येणार नाही.
५. परवान्याचा नमुना या सोबत मंजूरीसाठी सादर करण्यांत येत आहे.

**ठराव :-**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी मृत्यू बाबतची नोंद अधिक गतिशील व अद्यावत करण्यासाठी अत्यंविधी परवाना कार्यान्वित करण्यासाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे १ ते ५ अटींना व प्रस्तावाला प्रशासकीय मंजूरी दिली जाते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.५७ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.१२ मोहल्ला नेहरु नगर येथे १५० मी.मी.ची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ६,८०,५५०/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.२९३/३, दिनांक १७.०४.९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेश नुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.२२/१६२९/९२, दि.२१.१२.९२ ला दैनिक लोकविजय, रहेबर व स्वरगंगा या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण नऊ निविदा विकण्यांत आलेल्या होत्या त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.शांती कन्स्ट्रक्शन | - | १५% जास्त |
| २. | श्री.कैसर खान | - | १८% जास्त |
| ३. | श्री.एल.एम.पडघन | - | २०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराचे मे.शांती कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रक आहे. परंतू मा.आयुक्त यांना सदर दर योग्य वाटत नसल्यामुळे संबंधित गुत्तेदार यांना कामाच्या दर वाटाघाटी करिता पत्र देवून बोलवण्यांत आले. दि.२३.०३.९३ ला मा.आयुक्त यांच्या समक्ष कामाची दर वाटाघाटी झाली. अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% जास्तीच्या दरात मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

करिता मे.शांती कन्स्ट्रक्शन यांची १३% जास्तीचा दर आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.५८ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला जुनाबाजार येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ५५,२००/- चे तयार केले असून त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक २१.०६.९३ रोजी मंजूरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.जुनाबाजार येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेन लाईन टाकणे या कामासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.५९ :-**

प्रकल्प अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, महानगरपालिका, औरंगाबादच्या सर्वसाधारण सभेत (दि.२०.०१.९३) असा निर्णय देण्यांत आलेला होता की, सर्व प्रभागांना व्हिडीओ फिल्म मध्ये समाविष्ट करुन घेण्यांत येई पर्यंत व्हिडीओ शुटींगला स्थगित देण्यांत येते. सदर निर्णय अंमलात आणणे. अवघड बाब आहे. कारण ६० प्रभागांना १ तासाच्या

कालावधीच्या व्हीडीओ फिल्ममध्ये समावेश होणे दुरापास्त बाब आहे. म्हणून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वरील निर्णयात बदल करुन जी शुटींग आजपर्यंत झाली आहे. त्या माहिती आधारे व्हिडीओ फिल्म पूर्ण करण्यांत यावी. शुटींग झालेल्या कॅसेट उपआयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली विधी सल्लागार व प्रकल्प अधिकारी यांनी अंतिम रित्या (फायनल) कराव्यात त्यासाठी ३० जून १९९३ पर्यंत मुदतवाढ देण्यांत यावी. आवश्यकता भासल्यास उपआयुक्त व प्रकल्प अधिकारी विधी सल्लागार यांना मुंबई येथे जाऊन सध्या स्थितीतील कॅसेटस पाहून आवश्यकता दुरुस्त कराव्यात.प्रस्ताव मान्यतास्तव सादर.

**ठराव :-**

प्रकल्प अधिकारी यांनी संलग्न प्रस्तावात प्रस्तावित केल्याप्रमाणे दि.२० जानेवारी ९३ च्या सर्वसाधारण सभेतील व्हिडीओ शुटींगच्या च्या बाबत च्या निर्णयात खालील प्रमाणे बदलास व बाबींना मंजूरी देण्यांत येते.

१. साठ वार्डसचा व्हिडीओ फिल्म मध्ये समावेश करणे आवश्यक असल्याने पुर्वीचा निर्णय रद्द करण्यांत येतो.
२. उप-आयुक्तांच्या मार्गदर्शनाखालील विधी सल्लागार व प्रकल्प अधिकारी यांनी व्हिडीओ फिल्मसना अंतिम रुप द्यावे इतर अटी करारानुसार असतील.
३. उपलब्ध शुटींगच्या आधारे व्हिजन व गाफर्स मुंबईने व्हिडीओ फिल्मस महानगरपालिका औरंगाबादेत ३० जून, १९९३ पर्यंत सादर कराव्यात.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.६० :-**

मे.सहाय्यक आयुक्त-२ म.न.पा.यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेस लागणारे स्वच्छता साहित्य, किटकनाशके व फिनेल तसेच स्टेशनरी साहित्य मा.आयुक्त यांची मान्यता दि.२३.०४.९३ अनुसार सन १९९२-९३ मध्ये स्थायी समिती ठराव क्र.२६०/६५, दि.२९.०८.९२ स्टेशनरी साहित्य, ठराव क्र.३८९/२७, दि.०९.११.९२ स्वच्छता साहित्य, तसेच सन १९९१-९२ या वर्षात मंजूर निविदाधारकांकडून किटकनाशके खरेदी करणे बाबत मान्यता दिलेली आहे. तसेच सदरील सर्व निविदाधारकांनी तसे खरेदी पत्र देवून वरील साहित्य मंजूर दरात पुरवठा करणेची संमती दिली आहे.

करिता दिवसेंदिवस वाढणाऱ्या किंमती लक्षात घेवून मनपाच्या आर्थिक बचतीचा विचार करुन व पुरविण्यांत येणाऱ्या साहित्यांची चांगली प्रत देण्याची पुरवठाधारकांनी कबूल केल्याने सदरील प्रस्तावास मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-**

मा.प्रशासकांनी मान्यता दिल्याप्रमाणे स्टेशनरी साहित्य, स्वच्छता साहित्य, किटकनाशके व फिनेल ३० साहित्य गत वर्षाच्या (१९९२-९३) च्या मान्य दरावर चांगल्या प्रतीच्या वस्तुच्या पुरवठा हमीवर सन १९९३-९४ या वर्षात खरेदी करण्यांची मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२१.०७.९३

**प्रस्ताव क्र.६१ :-**

दिनांक १३.०५.९३ रोजी प्रस्ताव क्र.२ नुसार मंजूर रेखांकन आदेश क्र.एमसी/जीएडी/कॉन/१/२१२४/७४, दि.०९.०४.७४ या विद्या निकेतन कॉलनी, बायजीपुरा सर्व्हेला १४/भाग नगर भूमापन क्रमांक -क्र.१२३६९/भाग व मंजूर रेखांकनातील भूखंड क्रमांक २ पैकी १.५X२२.०० मीटर क्षेत्राची जागा जलनि:सारण वाहिनी टाकण्यांस आवश्यक असा ठराव मंजूर झालेला आहे. या ठरावात भूखंड क्रमांक २ ला न.भु.क्र.१२३६९/भाग असे नमूद केलेले आहे. वास्तविक पाहता भूखंड क्र.२ ला नं.भु.क्र.१२४८६/भाग असा आहे. त्यामुळे खालील प्रमाणे सुधारित प्रस्ताव सादर करण्यांत येते.

या मंजूर रेखांकनातील प्लॉट क्र.२, न.भु.क्र.१२४८६/९९/१४ मधील १.५X२२.०० मीटर क्षेत्राची जागा जलनि:सारण वाहिनी तातडीने भूसंपादन करणे आवश्यक आहे. सबब सदरील जागाचे संपादन भूसंपादन अधिनियम १८९४ चे तरतूदीनुसार व कलम १७ अन्वये तातडीने रितसर भूसंपादन करण्यांस मान्यता व्हावी. करिता सुधारित प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :-**

दिनांक १३.०५.९३ रोजी ठराव क्रमांक २ नुसार मंजूर रेखांकन आदेश क्र.एम.सी/जी.एडी./कॉन-१/२१२४/७४, दिनांक ०९.०४.७४ या विद्या निकेतन कॉलनी सर्व्हे क्र.१४/भाग नगर भूमापन क्र.१२३६९/भाग ऐवजी १२४८६/भाग अशी नोंद घेण्यास मंजूरी देण्यांत येते.

तसेच या मंजूर रेखांकनातील भुखंड क्र.२ न.भु.क्र.१२४८६/९९/१४ मधून १.५ मी x २२.०० मी. क्षेत्राची जागा भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १७ अन्वये तातडीने रितसर भूसंपादन करण्यास सुधारित प्रस्तावास मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.६२ :-**

सर्व्हे क्र.५२/भाग गारखेडा या महानगरपालिकेच्या जमिनीपैकी पत्रकारांना निवाससाठी त्यांच्या गृहनिर्माण संस्थेस देण्यांत येणारे जमिनीचे मुल्यांकन सहाय्यक संचालक, नगररचना (शाखा) औरंगाबाद यांनी केले असून त्यांनी बॉम्बे सिव्हील सर्व्हीसेस रुल्स ३६० (बी) च्या अनुषंगाने मुल्यांकन शुल्क रुपये २७७८/- खालील लेखा शिर्षकाखाली जमा करण्यास विनंती केली आहे.

लेखाशिर्ष :- ०२१७ नगर विकास
(नगर विकास बी.सी.एस.आर.-३६०) ब नुसार

वरीलप्रमाणे मुल्यांकन शुल्क रुपये २७७८/- शासन कोषागारात जमा करण्यांस मान्यता व्हावीत.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व्हे क्र.५३/भाग गारखेडा मधून पत्रकार गृह निर्माण संस्थेस महानगरपालिकेच्या मालकीची देण्यांत येणारी जमिनीचे मुल्यांकन सहाय्यक संचालक, नगर रचना (शाखा) औरंगाबाद यांनी केल्यावरुन बॉम्बे सिव्हील सर्व्हीसेस मूल्य

३६० (बी) च्या अनुषंगाने मूल्यांकन शुल्क रुपये २७७४/- शासन कोषागारात जमा करण्यास मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-२२.०७.९३

**प्रस्ताव क्र.६३ :-**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिःसारण महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विभाग क्र.२ मधील जलनिःसारण वाहिनीची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणेसाठी, नेहमी दरसुची व / किंवा अ-१ करणे ऐवजी एक वर्षासाठी एकच अंदाजपत्रक तयार केले आहे.

अंदाजपत्रक सन १९९२-९३ च्या दरसुची नुसार तयार केले आहे. त्याची किंमत रु.५,४५,०००/- इतकी आहे. सदरचा खर्च १९९३-९४ च्या देखभाल व दुरुस्ती अंतर्गत असलेल्या रु.३० लाखाच्या तरतूदीतून भागवायचा आहे. सदर अंदाजपत्रकास मा.प्रशासक महोदयांनी दि.११.०६.९३ अन्वये मंजूरी दिली आहे.

तरी सदरचे अंदाजपत्रकास मंजूरी देण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील विभाग क्र.२ मधील जलनिःसारण वाहिनीची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी सन १९९२-९३ चे दरसुची नुसार तयार केलेले अंदाजपत्रक रु.५,४५,०००/- ला प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. सदरील खर्च सन १९९३-९४ च्या देखभाल व दुरुस्ती अंतर्गत असलेल्या रु.३० लाखांच्या तरतूदीतून मागविण्यांत येईल.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-२३.०७.९३

**प्रस्ताव क्र.६४ :-**

शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजने अंतर्गत ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी अनपचौरिक शिक्षणाचे २० वर्ग २० झोपडपट्ट्या तून सुरु करण्यांत यावेत. यापैकी एका झोपडपट्टीतून प्रायोगिक तत्वावर प्रशिक्षण देण्यासाठी संजय गांधी युवक कल्याण सांस्कृतिक १ क्रिडा मंडळ रोषनगेट औरंगाबाद यांना देण्यांत यावे. बाकी १९ झोपडपट्ट्यातून १९ केंद्र चालविण्यासाठी सार्थक महिला मंडळ, परभणी यांना देण्यांत यावे. शासकीय नियमानुसार प्रति केंद्र प्रथम वर्षी सुरु ५५०२/- फक्त व दुसऱ्या वर्षी प्रति केंद्र रु.४८०६/- फक्त खर्च संस्थाना देय राहील. प्रति केंद्र किमान २० ते २५ विद्यार्थ्यांची एक बॅच राहील. सार्थक महिला मंडळ, परभणी यांचे मागणी नुसार प्रथम वर्षाचा एकूण खर्च रुपये १०४५३८/- आगाऊ देण्यांत यावी व द्वितीय वर्षाचा खर्च रुपये ९१३१४/- दुसरे वर्ष संपल्यावर देय राहील. संबंधित संस्था व महानगरपालिका यांच्यांत करार करण्यांत यावा.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एका झोपडपट्टीतील एक केंद्र प्रायोगिक तत्वावर संजय गांधी युवक कल्याण सांस्कृतिक व क्रिडा मंडळ रोषनगेट, औरंगाबाद या संस्थेचे काम समाधानकारक दिसून आल्यास प्रथमवर्षी त्यांना रुपये ५५०२/- व दुसऱ्या वर्षी रुपये ४८०६/- खर्च देण्यास मान्यता देण्यांत येते. सार्थक महिला मंडळ, परभणी या संस्थेस अनौपचारिक शिक्षणाचे वर्ग चालविण्यासाठी १९ केंद्र देण्यांत येत आहेत. त्यांना प्रथम वर्षाचा एकूण खर्च रुपये १०४५३८/- आगाऊ देण्यांस व दुसऱ्या वर्षाचा खर्च रुपये ९१३१४/- वर्ष संपल्यावर देण्यास या ठरावाद्वारे मान्यता देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.६५ :-**

कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, ठराव क्र.९९/१३, दि.२०.०२.९३ अनुसार महापालिकेकडून शहरात पुरविण्यांत येणाऱ्या पाण्याचे प्रचलित दर वाढविणे बाबत प्रस्ताव मान्य करण्यांत आला होता. त्यानंतर ठरावात अंतर्भूत दरात करण्यांत आलेली वाढ नागरिकांना समजावी हया हेतूने प्रचलित दर ठरावात निश्चित केलेले दर एकत्रितपणे स्थानिक वृत्तपत्रात व शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यांत आले व नागरिकांकडून आक्षेप/सूचना मागविण्यांत आले नारिकांकडून आलेले आक्षेप/सूचना विचारात घेवून व तसेच प्रमुख नागरिकांशी चर्चा केल्यानंतर आणि दर वाढ का करण्यांत आली हे त्यांना समजावून सांगितल्यानंतर दरवाढीचा प्रस्ताव ठरावा करिता पुन्हा विचार करण्यांत आला व आता सर्व बाजूंचा विचार केल्यानंतर प्रचलित पाण्याचे दर खालीलप्रमाणे असावेत असे ठरविण्यांत आले आहे.

## प्रस्तावित वाढीव दराचा मसूदा

| नळ कनेक्शनचा प्रकार | अस्तित्वात असलेले दर रुपये | प्रस्तावित वाढीव दर रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

**अ) घरगुती उपयोगासाठी :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५ एम.एम.डाय (१/२") मिटर सहीत | - | ४००.०० प्रतिवर्षे | - | ५००.०० प्रतिवर्षे |
| २. | १५ एम.एम.डाय (१/२") मिटर सहीत- | - | १.१५ पैसे प्रति १००० लिटरला | - | २.५० पैसे |
| ३. | २० एम.एम.डाय. (३/४") मिटर सहीत | - | ७३०.०० प्रति वर्षे | - | १,०००.०० प्रतिवर्षे |
| ४. | २० एम.एम.डाय. (३/४") मीटर सहीत | - | १.१५ पैसे प्रति १००० लिटर ला | - | २.५० पैसे प्रति १००० लिटरला |
| ५. | २५ एम.एम.डाय.-(१") मिटर सहीत | - | १.१६०.०० प्रति वर्षे | - | २.५०० प्रति वर्षे |
| ६. | २५ एम.एम.डाय.-(१") मिटर सहीत | - | १.१५ पैसे प्रति १००० लिटरला | - | २.५० पैसे प्रति १००० लिटरला |

**ब) उद्योग धंद्याकरिता :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५ एम.एम.डाय (१/२") | - | १,४५०.०० प्रतिवर्षे | - | ३,०००,०० प्रतिवर्षे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मिटर सहीत | | | | |
| २. | १५ एम.एम.डाय (१/२") मिटर सहीत | - | ४.०० पै (प्रति १००० लिटरला) | - | ८.०० प्रति १००० लिटरला |
| ३. | २० एम.एम.डाय (३/४") मिटर सहीत | - | २,६५० प्रति वर्षे | - | ४,०००.०० प्रति वर्षे |
| ४. | २० एम.एम.डाय (३/४") मिटर सहीत | - | प्रति ४.००, १००० लिटरला | - | ८.०० प्रति १००० लिटरला |
| ५. | २५ एम.एम.डाय (१") मिटर सहीत | - | ४,२००,०० प्रति वर्षे | - | १०,०००.०० प्रति वर्षे |
| ६. | २५ एम.एम.डाय (१") मिटर सहीत व त्यावरील व्यासाचे नळ कनेक्शन | - | ४.०० प्रति १००० लिटरला | - | ८.०० प्रति १००० लिटरला |

**क) बांधकामासाठी तात्पुरते नळ कनेक्शन मिटर सहीत :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५ एम.एम.डाय (१/२") | - | २००.०० दरमहा | - | ३००.०० दरमहा |
| २. | २० एम.एम.डाय (३/४") | - | ३५०.०० दरमहा | - | ६००.०० दरमहा |
| ३. | २५ एम.एम.डाय (१") | - | ५५०.०० दरमहा | - | १,००.०० दरमहा |
| | मिटरसहीत | - | ४.५० प्रति १००० लिटरला | - | ८.०० प्रति १००० लिटरला |

**ठराव :-**

प्रस्ताव दर्शविलेल्या प्रमाणे पाणी पट्टीचे वाढीव दर खालील प्रमाणे आहेत.

| नळ कनेक्शनचा प्रकार | प्रस्तावित वाढीव दर रुपये |
|---|---|
| १ | ३ |

**अ) घरगुती उपयोगासाठी :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | १५ एम.एम.डाय. (१/२") मिटरसहीत | - | ५००.०० प्रति वर्षे |
| २. | १५ एम.एम.डाय (१/२") मिटर सहीत | - | २.५० पैसे प्रति १००० लिटरला |
| ३. | २० एम.एम.डाय. (३/४") मिटर सहीत | - | १,०००.०० प्रतिवर्षे |
| ४. | २० एम.एम.डाय. (३/४") मीटर सहीत | - | २.५० पैसे प्रति १००० लिटरला |
| ५. | २५ एम.एम.डाय.-(१") मिटर सहीत | - | २.५०० प्रति वर्षे |
| ६. | २५ एम.एम.डाय.-(१") मिटर सहीत | - | २.५० पैसे प्रति १००० लिटरला |

**ब) उद्योग धंद्याकरिता :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | १५ एम.एम.डाय (१/२") मिटर सहीत | - | ३,०००,०० प्रतिवर्षे |
| २. | १५ एम.एम.डाय (१/२") मिटर सहीत | - | ८.०० प्रति १००० लिटरला |
| ३. | २० एम.एम.डाय (३/४") मिटर सहीत | - | ४,०००.०० प्रति वर्षे |
| ४. | २० एम.एम.डाय (३/४") मिटर सहीत | - | ८.०० प्रति १००० लिटरला |
| ५. | २५ एम.एम.डाय (१") मिटर सहीत | - | १०,०००.०० प्रति वर्षे |
| ६. | २५ एम.एम.डाय (१") मिटर सहीत व त्यावरील व्यासाचे नळ कनेक्शन | - | ८.०० प्रति १००० लिटरला |

**क) बांधकामासाठी तात्पुरते नळ कनेक्शन मिटर सहीत**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | १५ एम.एम.डाय (१/२") | - | ३००.०० दरमहा |
| २. | २० एम.एम.डाय (३/४") | - | ६००.०० दरमहा |
| ३. | २५ एम.एम.डाय (१") | - | १,००.०० दरमहा |

**ड) बांधकामासाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मिटरसहीत | - | ८.०० प्रति १००० लिटरला |

वरील प्रमाणे प्रस्तावित पाणी पट्टीचे दराच्या ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. प्रस्तावित दर दिनांक १ ऑक्टोंबर, १९९३ पासून अंमलात येतील.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-२७.०७.९३

**प्रस्ताव क्र.६६ :-**

मा.शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, ग्रंथाच्या व नियतकालीकाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे महानगरपालिका वाचनालय, खडकेश्वर, व निजामोद्दीन दर्गा या वाचनालयातील सभासदांना व नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना सभासदत्वासाठी अनामत रु.१००/- मासिक वर्गणी रु.५/- प्रवेश शुल्क रु.५/- विलंबशुल्क २५ पैसे (दररोज) अशी वाढ करणे आवश्यक आहे.

सदरील वाचनालयातील विद्यमान सभासदांना मुदत देऊन उर्वरित अनामत रक्कम जमा करण्यांत येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावित दर्शविल्याप्रमाणे नवीन सभासदांसाठी रु.१००/- अनामत मासिक वर्गणी रु.५/- प्रवेश शुल्क रु.५/- विलंब शुल्क २५ पैसे (दररोज) अशी वाढ करण्यंत यावी. विद्यमान सभासदांना मुदत देऊन उर्वरित अनामत रक्कम जमा करण्यांत यावी. नसता सदरील सभासदाचे सदस्यत्व रद्द करण्यांत यावे.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.६७ :-**

मे.सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, भांडार विभागाने सन १९९३-९४ या सादर केला की, भांडार विभागाने सन १९९३-९४ या वर्षासाठी मनपा कर्मचाऱ्यांना देण्यांत येणाऱ्या गणवेशासोबतचे निविदा मागविली सदरील निविदा व निविदाधारकांनी दिलेले नमुने खरेदी समिती समोर ठेवण्यांत आले. खरेदी समितीने नमुने तपासून तुलनात्मक दृष्ट्या कमी दर असलेल्या निविदाधारकांची निविदा मंजूर केली. खाली निविदाधारकासमोर मान्य आयटम क्रमांक दर्शविलेले आहे.

१. मे.विजय जनरल स्टोअर्स - १,२,३,४,५,६,७,८,९,१०,१२,१३,१४.

२. मे.न्यु भारत स्टोअर्स - ११.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.विजय जनरल स्टोअर्स यांचे एकूण आयटम (१३) व मे.न्यु भारत स्टोअर्स यांचे एकूण (१) आयटम यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.६८ :-**

मे.सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, भांडार विभागातर्फे सन १९९३-९४ या वर्षासाठी मागविण्यांत आलेला टाईपरायटर रिपेअर निविदा खरेदी समिती समोर ठेवण्यांत आल्या. खरेदी समितीने तुलनात्मकदृष्ट्या कमी दर असलेले रिपेअरींग दरास सर्वानुमते मान्यता दिली. तसेच मराठी, इंग्रजी, टंकलेखन यंत्राचे (इलेक्ट्रानिक मशीनसह) व डुप्लीकेंटींग मशीन हाताने चालविण्यांत येणारी १ इलेक्ट्रीक, चे कोणतेही भाग बदलावयाचे झाल्यास त्याचे अंदाजपत्रक प्रथम मान्य करुन घेण्यांत यावे. तद्नंतरच ते बदलण्यांत यावे असा निर्णय दिला.

तुलनात्मकदृष्ट्या कमी दर त्यांचे (निविदाधारक) नावासमोर दर्शविण्यांत आले आहेत.

१. मे.गजानन टाईपरायटर्स सर्व्हीसेस-मराठी/इंग्रजी टंकलेखन यंत्र दुरुस्ती व सर्व्हीसिंग प्रति मशिन प्रति माह रु.४.००

२. मे.श्री.टाईपरायटर मेकॅनिक :- इलेक्ट्रॉनिक मशीन दुरुस्ती व सर्व्हीसिंग प्रति मशिन प्रति महा रु.२५० व रु.१०० अनुक्रमे.

३. डुप्लीकेंटींग मशिन (इलेक्ट्रीक व हॅण्ड ऑपरेटींग) दुरुस्ती व सर्व्हीसिंग प्रति मशीन प्रती माह रु.१०/- मे.गजानन टाईपरायटर्स सर्व्हीसेस औरंगाबाद.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या कमी दर असलेल्या निविदाधारकांचे दरास व मराठी/इंग्रजी टंकलेखन यंत्राचे (इलेक्ट्रॉनिकसह) व डुप्लीकेंटींग मशीन शुल्क व हॅण्ड ऑपरेटींग चे भाग बदलण्यासाठी अंदाजपत्रक मान्य करुन ते बदलण्यांत यावेत. यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.६९ :-**

मे.सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, भांडार विभागाने सन १९९३-९४ या वर्षासाठी ड्रेनेज बांबु खरेदी निविदा मागविल्या. सदरील निविदा व सादर करण्यांत आलेले नमुने मा.खरेदी समोर ठेवण्यांत आल्या. खरेदी समितीने नमुन्याची तपासणी करुन तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी असलेल्या निविदाधारकांचे दर मान्य केले. खाली निविदाधारकासमोर त्यांचे मान्य दर दर्शविलेले आहे.

मे.आनेस्ट इंटरप्रायझेस - दर रु.३.५५ प्रति रनिंग फुट

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९३-९४ या वर्षासाठी ड्रेनेज बांबुचे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी असलेल्या मे.ऑनेस्ट इंटरप्रायझेस यांचे दर रु.३.५५ प्रति रनिंग फुट याप्रमाणे मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.७० :-**

मे.सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, भांडार विभागातर्फे सन १९९३-९४ या वर्षासाठी छपाई निविदा मागविण्यांत आल्या सदरील निविदा खरेदी समितीसमोर विचारार्थ ठेवण्यांत आल्या. खरेदी समितीने निविदाधारकांनी सादर केलेले कागदाचे नमुने, क्लॉथ बाईडींगचे तसेच लेदर बायडिंगचे नमुने तपासले व खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

आयटम क्र.१ ते २९ हे मे.गणेश मुद्रणालय व मे.श्रीकृष्ण प्रिटींग प्रेस यांचे दर तुलनात्मक दृष्ट्या जरी कमी असले तरी त्यांनी सादर केलेले बाइंडींगचे नमुने उत्कृष्ट नसल्याचे खरेदी समितीच्या निदर्शनास आले त्यामुळे त्यांचे तुलनात्मकदृष्ट्या कमी दर नाकारुन मे.लिबर्टी बुक बाईंडर्स ॲण्ड प्रिंटर्स यांनी सादर केलेले नमुने (क्लॉथ व लेअर बाईडींगचे) उत्कृष्ट दर्जाचे असल्याने खरेदी समितीने त्यांचे दर मान्य केले.

आयटम क्र.३० पुढील आयटम तुलनात्मकदृष्ट्या कमी दर असलेल्या निविदाधारकांचे त्यांचे कागदांचे नमुने चांगले असल्याने मंजूर केलेले आहेत. खाली निविदाधारकांसमोर त्यांचे मंजूर झालेले आयटम दर्शविलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.श्रीकृष्ण प्रिटींग प्रेस | - | ७८,७९,८०,८१,८२,८३,८५,९३,९८,१०१ व १०३. |
| २. | मे.सुरज प्रिंटर्स | - | ३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४१,४२,४३,४४,४९,५०,५१,५२,५५,५६,५७,५८,५९,६१,६३,६४,६५,६६,६७,६८,६९,७०,७१,७४,७५,७६,७७,१०६,१०७,१०८,१०९ व ११० |
| ३. | मे.गणेश मुद्रणालय | - | ३०,३१,३२,४५,४६,४७,४८,५३,५४,६२,६६,७२,७३,७९,८८,८९,९१,९२,९४,९६,९८,९९,१०२ व ११० |
| ४. | मे.एम.एस.एस.आय. डी.सी. | - | ६०,८४,८६,८७,९७,१०२ व १०५ |
| ५. | मे.लिबर्टी लॉ बुक बाईडर्स ॲण्ड प्रिंटर्स | - | १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,९०,९५,१०० व १०४. |

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.श्रीकृष्णा प्रिटींग प्रेस यांचे एकुण आयटम (११) मे.सुरज प्रिंटर्स यांचे एकूण (४०) मे.गणेश मुद्रणालय यांचे एकूण (२४), मे.एम.एम.एस.आय.डी.सी. यांचे एकूण (७) व मे.लिबर्टी लॉ बुक बाईडर्स ॲण्ड प्रिंटर्स यांचे एकूण (३३) आयटमच्या दरांना प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. तसेच सहाय्यक आयुक्त-२ यांनी नमुन्याप्रमाणे छपाई होईल याची दक्षता घ्यावी.वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-२८.०७.९३

**प्रस्ताव क्र.७१ :-**

कार्यालयीन आदेश क्र.९९/७४ दिनांक ०४.०१.७४ द्वारे श्री.जी.एस.हाशमी महानगरपालिका कर्मचारी यांना श्री.एम.पी.काथार व श्री.व्ही.एस.कुलकर्णी महानगरपालिका, कर्मचारी याची सेवा जेष्ठता डावलून लेखापाल या पदावर जी एकांगी पदोन्नती देण्यांत आली होती त्या बाबत श्री.काथार व श्री.कुलकर्णी यांनी त्यांच्यावर झालेल्या अन्याया बाबत वेळोवेळी निविदने दिलेली आहेत. त्या निवेदनचा विचार केल्यानंतर व त्या अनुषंगाने खालील शासकीय परिपत्रके पाहता सेवा जेष्ठता देण्यांस जो अन्याय व विलंब झाला तो दुर करण्याच्या दृष्टीने त्यांना दि.०४.०१.१९७४ पासून (श्री.जी.एम.हाशमी यांचे लेखापाल या पदावर पदोन्नतीच्या तारखेपासून) जेष्ठता बहाल करण्यास्तव

१. परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.एस.आर.व्ही.-१०६४, डी.दि.२५ फेब्रुवारी, १९६५.
२. परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग ज्ञापन क्र.एस.आर.व्ही.-१०८२, बी.आर., दि.१४ सप्टेंबर, १९८२.
३. नगरपालिका ठराव क्रमांक १९४ दिनांक ०३.०६.१९७८.
४. चीफ ऑफिसर नगरपालिका यांचे दिनांक २८.०९.१९७७ चे स्टेटमेंट.

दिनांक ०४.०१.१९७४ पासून सेवा जेष्ठता दिल्यामुळे त्यांना पुढील पदोन्नत्या श्री.हाशमी यांचे पदानुसार दिनांक ०४.०१.१९७४ पासून देण्यांस्तव व त्यानुसार वेतन निश्चिती करुन फरक देण्यांत यावा.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

उपरोक्त प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.एम.पी.काथार व श्री.विनायकराव कुलकर्णी यांना श्री.जी.एम.हाशमी यांचे लेखापाल या पदावर पदोन्नतीने तारखेपासून जेष्ठता देण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच दि.०४.०१.७४ पासून सेवा जेष्ठता दिल्यामुळे त्यांना पुढील पदोन्नाचा श्री.हाशमी यांचे पदानुसार दि.०४.०१.७४ पासून देण्यांस व त्या तारखेपासून वेतन निश्चिती करुन फरक अदा करण्यांस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२९.०७.९३

**प्रस्ताव क्र.७२ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विभाग क्रमांक २ मधील जलनिस्सा:रण वाहिनीचे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणेसाठी वारंवार दरसुची/ए-१ वर काम करुन घेण्याऐवजी एक वर्षासाठी एकच अंदाजपत्रक सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार रुपये ५,४५,०००/- चे करण्यांत आले आहे. सदरचा खर्च १९९३-९४ च्या देखभाल व दुरुस्ती अंतर्गत असलेल्या रुपये ३० लाखाच्या

तरतूदीतून भागावयाचा आहे. सदर अंदाजपत्रकास मा.प्रशासक यांनी दि.११.०६.९३ रोजी मान्यता दिली असून ठराव रुपाने सुध्दा मंजूरी (क्रमांक ६३/२२/७/९३) झालेली आहे.

त्यानुसार सदर कामासाठी निविदा सूचना क्रमांक १/९३-९४ दि.२९.०६.१९९३ जी की दैनिक नवा मराठा व दैनिक औरंगाबाद टाईम्स मध्ये प्रसिध्दीस देवून प्रगट निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारिख १३.०७.९३ पर्यंत १० कोऱ्या निविदा विक्री झाल्या व मोहरबंद निविदा स्विकृतीच्या नियोजित तारिख २०.०७.९३ रोजी फक्त दोन मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या असल्याचे दि.२०.०७.९३ रोजी निविदा पेटी उघडली असता दिसून आले. प्राप्त दोन मोहोरबंद निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उदय इंजि.कंपनी | - | अंदाजपत्रकापेक्षा १५% जास्त |
| २. | पी.डी.देशमुख | - | अंदाजपत्रकापेक्षा १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.पी.डी.देशमुख यांची अंदाजपत्रकापेक्षा १०% जास्त दराची होती. मात्र सदरचा दर जास्तीचा असल्यामुळे मा.प्रशासक यांच्या मंजूरी नुसार ठेकेदारास वाटाघाटीसाठी उपस्थित रहाणेसाठी पत्र क्र.मनपा/विका/२१०/९३, दि.२६.०७.९३ नुसार कळविण्यांत आले त्यानुसार ठेकेदार दर वाटाघाटीस उपस्थित राहिले व अंदाजपत्रकापेक्षा १०% अधिक ऐवजी अंदाजपत्रकापेक्षा ८% अधिक दराने काम करण्यांस तयार असल्याचे लेखी दिले आहे. ज्यास मा.प्रशासक यांनी मान्यता दिली आहे.

त्यानुसार मनपा हद्दीतील झोन क्र.२ मधील जलनि:सारण वाहिनींची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामासाठी श्री.पी.डी.देशमुख यांची दर वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे अंदाजपत्रकापेक्षा ८% जास्तीची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मनपा हद्दीतील झोन क्र.२ मधील जलनि:सारण वाहिनीची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामासाठी श्री.पी.डी.देशमुख यांची दर वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे व त्यांनी लेखी दिल्या प्रमाणे अंदाजपत्रकापेक्षा ८% जास्त दराची निविदा स्विकारण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-३०.०७.९३

**प्रस्ताव क्र.७३ :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या अस्थापनेवर एकूण १५ वर्ग-२ संवर्गातील पदे असून त्यांना रु.२००० ते ३५०० ही वेतनश्रेणी देण्यांत आलेली आहे. या पदापैकी सहाय्यक आयुक्त-१ व २, जकात अधिक्षक व मालमत्ता अधिकारी यांना पदांना जास्तीचे जबाबदारीचे व वाढते काम आहे. शिवाय या पदांना भविष्यांत पदोन्नतीची संधी नाही त्यामुळे प्रस्तावित पदांना वाढीव वेतनश्रेणी रु.२२०० ते ३७०० दिल्यास कामाच्या

दृष्टीकोनातून न्यायीक होईल. सेवा जेष्ठतेनुसार गोपनिय अहवाल शैक्षणिक अर्हता लक्षात घेऊन या पदांना वाढीव वेतनश्रेणी लागू करण्यांत येईल. त्यामुळे मनपाच्या तिजोरीवर कुठलाही आर्थिक बोजा पडणार नाही व १५ पदापैकी ४ पदांना वाढीव वेतनश्रेणी दिल्यामुळे सर्व पदांकरिता पदोन्नती उपलब्ध होईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

उपरोक्त प्रस्तावानुसार मनपाच्या अस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त-१ व २ जकात अधिक्षक, मालमत्ता अधिकारी या पदांना वाढीव वेतनश्रेणी रु.२२०० ते ३७०० देण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. शासनाच्या अंतिम मंजूरीनंतर प्रस्तावात नमूद केल्यानुसार ही वेतनश्रेणी लागू करण्यांत येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-०२.०८.९३

**प्रस्ताव क्र.७४ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र.१ मधील गटारीची दुरुस्ती व देखभाल करिता परिसर अभियांत्रिकी विभागाचे १९९२-९३ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रुपये २,००,०००/- चे तयार करण्यांत आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.१ मधील गटारीची दुरुस्ती व देखभाल करिता रुपये २,००,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दि.०२.०८.१९९३

**प्रस्ताव क्र.७५ :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, लेखा परिक्षण विभागाचे वाढते काम व व्याप लक्षात घेता, लेखा परिक्षणाकरिता एक स्वतंत्र वर्ग-२ लेखाधिकारी असणे आवश्यक आहे. करिता वेतनश्रेणी रु.२०००-६०-२३०० दक्षता रोध - ७५-३२००-१००-३५०० मध्ये एक पद निर्माण करणे आवश्यक आहे. सदरील पदाकरिता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता मनपा प्रारुप नियमानुसार राहील.

१. वाणिज्य शाखेचा स्नातक किंवा महाराष्ट्र अर्थ व लेखासेवा पास कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक पदोन्नती करिता.

२. मनपा वरीष्ठ श्रेणी लेखा परिक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि किमान ५ वर्षाची सेवा झालेल्या मुख्य लेखापाल/वरीष्ठ लेखा परिक्षकांच्या वर्गातून पदोन्नतीद्वारे नियुक्त.

प्रस्तावित शैक्षणिक पात्रता व वेतनश्रेणीमध्ये लेखाधिकारीचे पद निर्माण करण्यांस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

उपरोक्त प्रस्तावानुसार मनपाच्या अस्थापनेवर प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार वेतनश्रेणी व शैक्षणिक अर्हतानुसार लेखाधिकारीचे पद निर्माण करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०३.०८.९३

**प्रस्ताव क्र.७६ :-**

औरंगाबाद महानगरपालिका भुतपूर्व हद्दीसाठी मंजूर झालेल्या विकास योजनेत बिबिका मकबरा ते निपट निरंजन ८० फुट रुंद रस्त्याची आखणी केलेली आहे. या रस्त्यात न.भु.क्र.१९५५/३ पैकी क्षेत्र सुमारे ७२४.८७ चौ.मीटर बांधित होते. प्रस्तुत विकास योजना रस्त्याचा विकास करणे आवश्यक असल्याने न.भु.क्र.१९५५/३ चे मालक श्री.भालचंद्र रामलाल पांडे यांचेसह खाजगी तडजोड करुन भूसंपादन करण्याचे ठरल्याप्रमाणे व प्रस्तावित जागा खाजगी वाटाघाटीने संपादन करण्यांस त्यांनी संमती दिली असून या बाधित क्षेत्रासाठी महानगरपालिकेचे नगर रचना विभागाकडून मूल्यांकन करुन निश्चित केलेली किंमत रुपये १,४५,०००/- मान्य असल्याचे कबूल केले आहे. करिता वरील रस्त्यासाठी खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करुन योग्य त्या दस्तऐवजाने हस्तांतर करुन घेऊन मोबदल्याची रक्कम रुपये १,४५,०००/- जमीन मालकास देण्यासाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार ८० फुट रुंद बिबिका मकबरा ते निपट निरंजन या रस्त्याने बाधित मिळकत न.भु.क्र.१९५५/३ क्षेत्र ७२४.८७ चौरस मिटर जमिन मालक श्री.भालचंद्र रामलाल पांडे यांचे कडून खाजगी तडजोडीने संपादन करण्यांत व मोबदल्याची रक्कम रु.१,४५,०००/- जागा रितसर ताब्यात घेतल्यानंतर अदा करण्यांस मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०७.०८.९३

**प्रस्ताव क्र.७७ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलाकी, क्रांतीचौक ते टेलिफोन ऑफीस बहादूरपुरा पर्यंत ८० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकावयाचे आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम

रु.७९.५००/- एवढ्याचे तयार करण्यांत आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. सदर कामासाठी या कार्यालयाची निविदा सूचना क्र.५१/९२-९३ जी की, दैनिक लोकमत टाईम्स, सिटीजन्स या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २ (दोन) निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारल्याच्या नियोजित तारखेस व वेळेपर्यंत एकूण २ दोन सिलबंद निविदा सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा हया दि.०६.०३.९३ रोजी उघडण्यांत आल्या. त्यानुसार ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणेचे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पी.एच.पंजनानी | - | २७.८०% जास्त |
| २. | सी.एन.आर.सी.प्रसाद | - | २४.७९% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री.एन.आर.सी.प्रसाद यांचा आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा.प्रशासक यांच्या दालनात ठेकेदार श्री.एन.आर.सी.प्रसाद यांच्याशी दि.२३.०७.९३ रोजी दराबाबत वाटाघाटी करण्यांत आली असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त या दराने सदरचे काम करण्यांस ठेकेदाराने मान्य केले असून त्यास मा.प्रशासक यांनी मान्यता दिलेली आहे.

करिता श्री.एन.आर.सी.प्रसाद यांची वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजे २०% जास्त दराची निविदा स्विकृतीसह प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.एन.आर.सी.प्रसाद यांची वाटाघाटी अंतीच्या दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त दराची निविदा स्विकृतीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.७८ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, फिल्टर बेड हर्सुल येथे भांडार गृह बांधावयाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसुची सन १९९२-९३ नुसार रक्कम रु.३,५१,०००/- एवढ्याचे तयार करण्यांत आलेले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी-पुरवठा भांडवली कामासाठी करण्यांत आलेल्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. सदर कामासाठी या कार्यालयाची निविदा सूचना क्र.०२/९३/९४ जी की दैनिक लोकमत व मुकद्दस या वर्तमानपत्रास प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (सोळा) १६ कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस व वेळेपर्यंत एकूण तीन (३) सिलबंद निविद प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा हया दिनांक ०३.०७.९३ रोजी उघडण्यांत आल्या त्याप्रमाणे ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणेचे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.ए.पी.जाधव | - | ७.८६% कमी |
| २. | मे.विपुल कन्स्ट्रक्शन | - | ११.५०% कमी |
| ३. | श्री.पी.सी.देवकर | - | ७% कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा मे.विपुल कन्स्ट्रक्शन यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.५०% कमी असा दर दिलेल्या आहे. करिता मे.विपुल कन्स्ट्रक्शन यांची अंदाज पत्रकीय दरापेक्षा ११.५०% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव व अंदाजपत्रकास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.विपुल कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.५०% कमी दराच्या निविदेस व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.७९ :-**

उपआयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कामगार अधिकारी यांचे कामाचे स्वरुप, अधिकार व कर्तव्य खालीलप्रमाणे नमूद करण्यांत येत आहे.

१. कामगार अधिकारी हे पद खाते प्रमुख म्हणून संबोधण्यांत यावे.

२. कर्मचारी संघटना व व्यक्तीगत कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीवर संबंधित विभागाकडून माहिती मागविणे व शक्य झाल्यास तडजोड घडवून आणणे बाबत प्रशासनास शिफारस करणे.

३. कर्मचाऱ्यांनी सहाय्यक कामगार आयुक्त वा सरकारी कामगार अधिकारी यांचे कार्यालयात दाखल केलेल्या तक्रारीबाबत मनपातर्फे हजर होऊन बाजू मांडणे.

४. कामगार न्यायालय वा औद्योगिक न्यायालयात दाखल केलेल्या खटल्याबाबत संबंधित विभागाकडून मुद्देसुद माहिती व कागदपत्रे गोळा करणे व मनपातर्फे नेमण्यांत आलेल्या वकीलांना पुरविणे व सदरील प्रकरणांत वकीलासोबत न्यायालयात हजर राहून त्यांना मदत करणे व त्याचा अहवाल प्रशासनास देणे.

५. प्रशासनाकडून चौकशी अधिकारी म्हणून नेमण्यांत आलेल्या प्रकरणांत चौकशी अधिकाऱ्यास मदत करणे व सदरील प्रकरणांत चौकशी करुन चौकशी अहवाल प्रशासनास सादर करणे.

६. संपर्क अधिकारी किंवा समेट अधिकारी म्हणून कामगार व प्रशासन यामधील दुवा समजून काम करणे.

७. मनपाचे कोणत्याही विभागामध्ये कामगारांनी जर एखादा वाद किंवा तक्रार त्या संबंधित विभागाकडे दाखल केली असेल तर त्या विभागाला भेट देवून तक्रार बाबत सोडवणूक करणे, सदरच्या तक्रारी वा सामंजस्याने सोडवण्यांचा प्रयत्न करणे.

८. तक्रार निवारण कमिटीची गठण तक्रार निवारण कायद्याप्रमाणे करुन त्यांचे मार्फत तक्रार सोडवण्यांचा प्रयत्न करणे.

९. कामगाराविषयी जर नियमावली कायदे तयार करीत असेल तर त्यासंबंधी मत किंवा अभिप्राय देता येईल.

१०. कामगार व प्रशासन यांचेमध्ये सलोख्याचे संबंध निर्माण करुन कामगारांची कार्यक्षमता वाढवून प्रशासनाचा कार्यभार सुरळीत राखणे कामगारांचा कामाचा दर्जा वाढवणेच्या दृष्टीने वातावरण निर्मिती करणे.

११. कामगार व प्रशासनामध्ये वाद निर्मिती होणार नाही या दृष्टीने तडजोड करण्यांकरिता निर्णयाक बाबीची मदत घेऊन लक्ष देणे.

१२. मान्यता प्राप्त कामगार संघटनेकडून विविध तक्रारी सादर केल्या जातात त्या बाबत खाते प्रमुख व कामगार संघटनेचे पदाधिकारी यांचे समवेत चर्चा घडवून आणून व त्यांच्या मांगण्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन व तक्रारीची सोडवणूक करुन प्रशासनास शिफारस करणे.

१३. विविध विभागातील अधिकाऱ्यांची मिटींग आयोजित करुन कामगारांचे प्रश्नासंबंधी चर्चा करणे.

१४. मनपा प्रशासनांतर्गत विविध विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यांचे दृष्टीने, निष्ठेने व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पारितोषिक किंवा पुरस्कार देणे.

१५. मनपातील सेवकांना पेन्शन, ग्रॅज्युईटी प्रोव्हीडंड फंड, फायदे वेळेत मिळतात कि नाही याबाबत पाठपुरावा करणे सेवकांवर व कामगारांवर देखरेख ठेवणे.

१६. विभागीय कार्यालयात भेट देवून ज्या ठिकाणी कामगार काम करतात त्या ठिकाणी जाऊन त्यांचे हजेरीपट तपासणे व त्यांचे काही तक्रारी असतील त्या जागेवरच घेणे व तक्रारीचे निरसन करुन प्रशासनास अहवाल देणे.

१७. प्रशासनाचे ध्येय व धोरण या बाबतची समज कर्मचाऱ्यांना समजेल अशा भाषेत समजावून सांगून प्रशासनास मदत करणे.

१८. कायदेशीर संप काळात तटस्थपणे भुमिका ठेऊन व कामगार व प्रशासन यात शांततामय समन्वय घडवून आणणे.

१९. फॅक्टरी ॲक्ट १९४८ मधील तरतूद अन्वये प्रशासनाने कामगारांसाठी पार पाडावयाच्या कायदेशीर व इतर जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडाव्यात म्हणून प्रशासनास शिफारस करणे, तसेच त्यासाठी मदतही करणे, कामगारांच्या वैद्यकीय तपासणी बाबतचे रेकॉर्ड अद्यावत ठेवणे बाबत प्रशासनास शिफारस करुन योग्य ती मदत करणे. प्रत्यक्ष काम करीत असतांना अपघात घडू नयेत. म्हणून सुरक्षितेसाठी महानगरपालिकेमार्फत देण्यांत येणाऱ्या वस्तुची पाहणी व तपासणी करुन योग्य ती काळजी घेऊन अद्यावत सोयी मिळवून देऊन, प्रत्येक कर्मचाऱ्याला योग्य काम दिले जाते किंवा नाही याबाबत पाहणी करुन तसे वाटल्यास सदरची बाब प्रशासनाचे नजरेस आपून देवून संबंधितास योग्य ती कार्यवाही करणे बाबत मार्गदर्शन करणे वरील प्रमाणे कर्मचाऱ्यांना कामात सुरक्षितता मिळवून देणे.

२०. कर्मचाऱ्यांना अर्जित रजा, अर्धपगारी रजा, टी.बी.रजा, प्रसुती रजा तसेच कुटूंब नियोजन या खाली मिळणाऱ्या स्त्री व पुरुषांना मिळणाऱ्या रजा, असाधारण रजा इ.रजेबाबत कर्मचाऱ्यांना लाभ मिळवून देवून त्यांना मंजूरी शिवाय रजेवर न जाता मंजूरीनंतरच रजेवर जावे तसेच विशेष रजा कशा व कोणत्या नियमाखाली दिल्या जातात. या बाबत मार्गदर्शन करणे.

२१. कर्मचाऱ्यांना अनुकंपा कारणास्तव मदत करणे तसेच त्यांचेसाठी प्रशासनाकडून जेवढा जास्त लाभ देता येईल. तेवढा देण्यांचा प्रयत्न करणे.

२२. जीवन विमा, भविष्य निर्वाह निधी, गट विमा, निवृत्ती वेतन, कर्मचारी कल्याण निधी, पोस्टाची बचत इ.बाबींचे माहिती व महत्व कर्मचाऱ्यांना समजाऊन देवून त्यांचे फायदे व होणारी मदत याबाबतची सविस्तर माहिती कर्मचाऱ्यांस सोप्या भाषेत समजाऊन देवून सदरच्या योजनेचा शक्य तो प्रत्येक कर्मचाऱ्यांला फायदा कसा लवकरात लवकर देता येईल. या बाबत प्रशासनास शिफारस करणे.

२३. कर्मचाऱ्यांना निवास, आरोग्य सेवा, सांस्कृतिक सवलती खेळाच्या वस्तु, मुलाचे शिक्षण ग्रंथालये तसेच कर्मचाऱ्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी कुटूंब कल्याण

कर्मचाऱ्यांचे कामातील कुशलता वाढविणेसाठी प्रशिक्षण तसेच नैपुण्य पारितोषिक योजना इ.या सवलती मिळवून देणेसाठी प्रशासनास शिफारस करणे.

२४. कर्मचाऱ्यांना आपले हक्क व कर्तव्य यांची योग्य ती जाणीव देऊन शिस्त व सुरक्षितता याबाबत मार्गदर्शन करणे.

२५. कर्मचाऱ्यांना देण्यांत येणारे लाभ व शिक्षा उदा.सेवा जेष्ठता, पदोन्नती चौकशी दंड इ. बाबत प्रत्यक्ष लक्ष घालुन तसा प्रशासनाशी योग्य तो सल्ला मसलत/समन्वय साधून त्यांना योग्य तो न्याय मिळवून देणे.

२६. कर्मचाऱ्यांच्या अनिष्ट प्रवृत्तींना प्रतिबंध करणे.

२७. महिला कर्मचाऱ्यांना काम करणेस योग्य त्या सोयी व सुरक्षितता मिळवून देणे.

२८. कामगार व प्रशासन यात कलह निर्माण झाल्यास यशस्वी रित्या समन्वय घडवून आणणे व कलह शक्यतो होणार नाही, यासाठी प्रयत्न करणे.

२९. सेवकांच्या वारसांना प्राधान्याने नौकरी मिळणे बाबत कार्यवाही करणे व प्रशासनास शिफारस करणे.

३०. कर्मचाऱ्यांना घर बांधणी कर्ज तसेच व्हेकल लोन, वाहन भत्ता, सायकल भत्ता मिळवून देण्यांची कार्यवाही करुन प्रशासनास शिफारस करणे.

३१. स्त्री कामगार व पुरुष कामगार यांना वर्षातून ड्रेस, चप्पल, रेनकोट, शुज, छत्री, स्वेटर ब्लेकेट मिळवून देण्यांचा प्रयत्न करणे.

३२. कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सवलती, मिळवून देण्यांची कार्यवाही करुन प्रशासनास शिफारस करणे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कामगार अधिकारी यांचे कामांचे स्वरुप, अधिकारी व कर्तव्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-१२.०८.९३

**प्रस्ताव क्र.८० :-**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव केला आहे की, आरोग्य केंद्र आरोग्य विभागासाठी औषधी व शल्य साहित्य खरेदी करणे जरुरी आहे. त्यानुसार दि.१२.०७.९३ रोजी स्थानिक दैनिक लोकमत टाईम्स व दैनिक सिटीजन्स मध्ये जाहिरात देऊन सन १९९३-९४ साठी दर पत्रके निविदा मागविण्यांत आल्या) त्यानुसार

१) मे.सर्जेको मेडिकल, २) मे.किन्करे बदर्स, ३) अश्वनिफार्मा, ४) एम.एस.एस.आय.डी.सी., ५) विंगस मेडीकल यांचे निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी खालील दरपत्रके तुलनात्मक तक्त्यानुसार कमी दराचे आहे.

१. मे.किकरे ब्रदर्स, मुंबई :- कमी दराच्या अनु.क्र.१ ते १०,१२ ते १८,२० ते २५,२७,२९ ते ३२,३४ ते ३८,४० ते ५५,५७ ते ६१,६९ ते ७५,७७,७९,८०,८३ ते ८६,८८ ते

९०,९२,९३,९६ ते १०३,१०५ ते ११०,११२,११३,११४,११६ ते १२७,१२९,१३१ ते १३६,१३९,१४०,१४५,१४८, १५०,१५६,१६०,१६२ अ, १६७,१७० ते १७७,१७८ अ, १८१,१८२,१८३,१८५,१८६,१८७,१८८ ते १९९, २०४,२०५,२०६ आणि २०७ एकूण कमी दर १५० (ॲटम)

२. अश्विनी फार्मा औरंगाबाद यांचे कमी दराचे अनु. ६२ ते ६८,७८,८३,९१,९४,९५,१११,११५,१२८,१४१ ते १४४,१४६,१४७,१५१ ते १५५,१५७, १५८,१५९, १६२, ब १६३,१६५,१६६,१६८,१६९,१७८अ, १७९,१८०,१८३, १८४,१८४, १८७,२००,२०१,२०२, २०३,२०४ आणि २०६ एकूण कमी दर ४८ (आयटम)

३. एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांचे कमी दर अनु क्र.नं.१०४ एकूण (ॲटम) १

४. मे.विग्स मेडीकल, औरंगाबाद यांचे कमी दराचे अनु क्र.नं.१९,२६,२८,३९,७६,८१,८२, १३७,१३८ आणि २०८ एकूण कमी दर १० (ॲटम)

वरीलप्रमाणे कमी दराचे दर पत्रके मंजूर करुन अंदाजपत्रकातील रक्कम रुपये १२.५० लाखा पर्यंत चा खर्चास मंजूरी देवून सन १९९३-९४ साठी दरपत्रके मंजूर करणेसाठी सादर.

**ठराव :-**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्तावित केल्याप्रमाणे कमी दराचे दर पत्रके सन १९९३-९४ साठी

१. मे.किकरे ब्रदर्स, मुंबई :- कमी दराच्या अनु.क्र.१ ते १०,१२ ते १८,२० ते २५,२७,२९ ते ३२,३४ ते ३८,४० ते ५५,५७ ते ६१,६९ ते ७५,७७,७९,८०,८३ ते ८६,८८ ते ९०,९२,९३,९६ ते १०३,१०५ ते ११०,११२,११३,११४,११६ ते १२७,१२९,१३१ ते १३६,१३९,१४०,१४५,१४८, १५०,१५६,१६०,१६२ अ, १६७,१७० ते १७७,१७८ अ, १८१,१८२,१८३,१८५,१८६,१८७,१८८ ते १९९, २०४,२०५,२०६ आणि २०७ एकूण कमी दर १५० (ॲटम)

२. अश्विनी फार्मा औरंगाबाद यांचे कमी दराचे अनु. ६२ ते ६८,७८,८३,९१,९४,९५,१११,१०५,१२८,१४१ ते १४४,१४६,१४७,१४९,१५१ ते १५५,१५७, १५८,१५९, १६२, ब १६३,१६५,१६६,१६८,१६९,१७८ब, १७९,१८०,१८३, १८४,१८७,२००,२०१,२०२, २०३,२०४ आणि २०६ एकूण कमी दर ४८ (आयटम)

३. एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांचे कमी दर अनु क्र.नं.१०४ एकूण (ॲटम) १

४. मे.विग्स मेडीकल, औरंगाबाद यांचे कमी दराचे अनु क्र.नं.१९,२६,२८,३९,७६,८१,८२,१३७,१३८ आणि २०८ एकूण कमी दर १० (ॲटम)

वरील प्रमाणे कमी दरांचे अनुक्रमांकानुसार मंजूर करुन अंदाजपत्रकातील रक्कम रुपये १२.५० लाखापर्यंतच्या खरेदीस मंजूरी देण्यांत येते. नियमानुसार त्यांच्या बरोबर करार करण्यासाठी मान्यता देण्यांत येते.

प्रशासकीय व वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-१३.०८.९३

**प्रस्ताव क्र.८१ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र.३ (स्लम) मधील जलनि:सारण वाहिनीचे दुरुस्ती व देखभाल करण्याच्या कामाकरिता कार्यालयीन आदेश क्र.अ ४२२/३३, दि.२९.०६.९३ अन्वये निविदा सूचना क्र.१/९३-९४ दैनिक नवा मराठा, दैनिक औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण १० निविदा विकण्यांत आल्या त्यापैकी केवळ ३ तीन निविदा प्राप्त झाल्या या निविदा विकण्यांत आल्या. त्यापैकी केवळ ३ तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी केवळ ३ तीन निविदा प्राप्त झाल्या. या निविदा उपलब्ध गुत्तेदारा समोर उघडल्या असता तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.८०% जास्तीने या दराची निविदा श्री.शेख शरीफ यांची आहे.

सदर दर जास्त वाटत असल्यामुळे श्री.शेख शरीफ यांना पत्रक क्र.युजीडी/९७६/९३, दि.३१.०७.९३ देवून मा.आयुक्त यांचे दालनात प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलाविले असता संबंधिताने सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्तीने करुन देण्यांस संमती दिली आहे.तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.शेख शरीफ गुत्तेदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्तीने (वाटाघाटीनुसार) या दराने सदर काम करुन घेण्यांस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.८२ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र.३ मधील जलनि:सारण कामाच्या दुरुस्ती व देखभाल करिता कार्यालयीन आदेश क्र.का.अ./४२२/९३, दि.२९.०६.९३ अन्वये निविदा सूचना क्र.१/९३-९४ दैनिक नवा मराठा, दैनिक औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण १३ निविदा विकण्यांत आल्या. त्यापैकी केवळ ३ निविदा प्राप्त झाल्या. या निविदा उपलब्ध गुत्तेदारासमक्ष उघडल्या असता तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९०% जास्तीने या दराची निविदा श्री.एम.एम.बेग यांची आहे.

सदर दर जास्त वाटत असल्यामुळे श्री.एम.एम.बेग यांना पत्रक क्र.जुडी/९७८/९३, दि.३१.०७.९३ देवून मा.आयुक्त यांचे दालनात प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलाविले असता संबंधितांने सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्तीच्या दराने करुन देण्यांस संमती दिली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.एम.एम.बेग गुत्तेदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्तीने (वाटाघाटीनुसार) या दराने सदर काम करुन घेण्यांस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.८३ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र.१ मधील जलनि:सारण कामाची दुरुस्ती व देखभाल करणेच्या कामाकरिता कार्यालयीन आदेश क्र.का.अ.-४२२/९३, दैनिक नवामराठा, दैनिक औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण १३ निविदा विकण्यांत आल्या त्यापैकी केवळ २ निविदा प्राप्त झाल्या. या निविदा उपलब्ध गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची मे.राणा कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांची निविदा आहे.

सदर दर जास्त वाटत असल्यामुळे मे.राणा कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांना पत्र क्र.जी.जी.डी./९७७/९३, दि.३१.०७.९३ देवून मा.आयुक्त यांचे दालनात प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलाविले असता संबंधिताने सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्तीने करुन देण्यांस संमती दिली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.राणा कंन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्तीने (वाटाघाटीनुसार) या दराने सदर काम करुन घेण्यांस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-१६.०८.९३

**प्रस्ताव क्र.८४ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.घाटी रोडवर ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.अर्धगोलाकार गटार बसविणे सदरील कामासाठी अंदाजपत्रक रुपये २,४५,६३०/- चे तयार करण्यांत आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.घाटी रोडवर ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.अर्धगोलाकार गटार बनविणे या कामाकरिता रुपये २,४५,६३०/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.८५ :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पशुधन विभागाचा वाढता व्याप लक्षात घेता प्राणी संग्रहालयाकरिता स्वतंत्र अधिकाऱ्यांचे पद निर्माण करणे आवश्यक आहे. त्यानुसार वर्ग-२ संवर्गात वेतनश्रेणी रु.२०००-६०-२३०० दरी-३२००-१००-३५०० मध्ये सदरील पद निर्माण करावी लागेल. या पदाकरिता मनपा प्रारुप नियमाप्रमाणे शैक्षणिक पात्रता पशुधन विकास अधिकारी पदा प्रमाणेच ठेवावे लागेल.

१. पशुवैद्यशास्त्र आणि पशुसंवर्धन या विषयातील पदवी.
२. औरंगाबाद महापालिकेत अधिपासून सेवेत असल्यास ते खेरीज करुन ३० वर्षाहून अधिक वय नसावे.

**<u>पदोन्नतीने</u>**

१. पशुवैद्यक शास्त्र आणि पशुसंवर्धन विषयातील पदवी आणि पांच वर्षाचा अनुभव असणाऱ्या सहा.पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या संवर्गातून पदोन्नतीद्वारे, नियुक्ती

प्राणी संग्रहालय अधिकारी हे प्राणी संग्रहालयाचे प्रमुख असतील व प्राणी संग्रहालयाची संपूर्ण देखभाल, दुरुस्ती, जनावरांना व प्राण्यांना लागणारे खाद्यपदार्थ नवीन प्राणी खरेदी इ.सर्व कामे प्राणी संग्रहालय अधिकारी करतील.

करिता महानगरपालिकेच्या अस्थापनेवर प्राणी संग्रहालय अधिकारी हे पद निर्माण करण्यांस्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

उपरोक्त प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार व वेतनश्रेणीनुसार महानगरपालिकेच्या अस्थापनेवर प्राणी संग्रहालय अधिकारी हे पद निर्माण करण्यांस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-१९.०८.९३

**प्रस्ताव क्र.८६ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेतर्फे जोडण्यांत येणाऱ्या जलनिःसारण वाहिनी जोडणीचे सध्याचे प्रचलित दर खर्चाचे दृष्टीने अत्यंत कमी असल्यामुळे महानगरपालिकेच्या खर्च समतोल राहण्यासाठी खालील दर्शविल्याप्रमाणे जलनिःसारण वाहिनीचे जोडणीचे प्रस्तावित दर लागू करण्यांत यावेत.

| | **प्रचलित दर** | **प्रस्तावित दर** |
|---|---|---|
| १) बोरिंग चार्जेस<br>अ-घरगुती वापरासाठी<br>ब-व्यावसायिक दर | <br>रु.५०.००<br>रु.१५०.०० | <br>रु.३००.००<br>रु.६००.०० |
| २) तपासणी फी | रु.५०.०० | रु.१००.०० |

वरील प्रस्तावित दर बरोबरच खालील सुधारित दराने रस्ता दुरुस्तीचे दर आकारण्यांत यावेत.

| | | **प्रचलित दर** | **प्रस्तावित दर** |
|---|---|---|---|
| १) | कच्चे रस्ते दुरुस्ती | १२ चौ.मी. | रु.२४.०० चौ.मी. |
| २) | खडी रस्ते दुरुस्ती | ६० चौ.मी. | रु.६७.०० चौ.मी. |
| ३) | डांबरी रस्ते दुरुस्ती | ७० चौ.मी. | रु.१६९.०० चौ.मी. |
| ४) | कॉंक्रीट, खांडकी व इतर रस्ते दुरुस्ती | ८० चौ.मी. | रु.१६९.०० चौ.मी. |

वरील प्रस्तावित दर दिनांक १ सप्टेंबर, १९९३ पासून अंमलात येतील विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या खर्चाच्या प्रचलित दर कमी असल्याने खर्च समतोल राहण्यासाठी दिनांक १ सप्टेंबर, १९९३ पासून जलनिःसारण वाहिनीचे खालील दर्शविलेले दराने जलनिःसारण वाहिनी जोडणीचे दर आकारणी करण्यांस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | **प्रस्तावित दर** |
|---|---|
| १) बोरिंग चार्जेस<br>अ-घरगुती वापरासाठी<br>ब-व्यावसायिक दर | <br>रु.३००.००<br>रु.६००.०० |
| २) तपासणी फी | रु.१००.०० |

या प्रस्तावित दरा बरोबरच खालील सुधारित दराने रस्ता दुरुस्तीचे दर आकारण्यांस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | | **प्रस्तावित दर** |
|---|---|---|
| १) | कच्चे रस्ते दुरुस्ती | रु.२४.०० चौ.मी. |
| २) | खाडी रस्ते दुरुस्ती | रु.६७.०० चौ.मी. |
| ३) | डांबरी रस्ते दुरुस्ती | रु.१६९.०० चौ.मी. |
| ४) | कॉंक्रीट, खांडकी व इतर रस्ते दुरुस्ती | रु.१६९.०० चौ.मी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-२०.०८.९३

**प्रस्ताव क्र.८७ :-**

कार्यकारी अभियंता, (जलनिःसारण व पाणीपुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, राज्य परिवहन कार्यशाळा जवळील गरमपाणी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी निविदा सूचना क्र.१/मनपा/युजीडी/४२२/९३, दि.२९.०६.९३ अनुसार स्थानिक वर्तमान पत्रातून जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यांत आल्या असतांना ४ निविदा विकल्या होत्या. त्यापैकी (२) दोन निविदा उपलब्ध

गुत्तेदारासमक्ष समोर उघडण्यांत आल्या. त्यापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराची निविदा श्री.यासेर सईद यांची आहे. करिता सदर काम श्री.यासेर सईद यांचे कडून घेण्यांस प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार मो.गरमपाणी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी मंजूर अंदाजपत्रकानुसार आलेली श्री.यासेर सईद यांची निविदा असल्याने त्यांचे कडून काम करुन घेण्यांस ठरावास प्रशासकीय मंजूरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२१.०८.९३

**प्रस्ताव क्र.८८ :-**

कामगार अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका औरंगाबाद कर्मचारी (वर्ग-४) कामावर असतांना अपघाती मृत्यू झाल्यास त्यांचेवर अवलंबित असणाऱ्या अवघ्या नातेवाईकांनी आर्थिक मदत, मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या अंत्यविधीसाठी तात्काळ देणे आवश्यक आहे.

ज्या कर्मचाऱ्यांचा सेवेत असतांना अपघाती मृत्यू झाल्यास त्याचे जवळच्या त्यांचेवर प्रत्यक्ष अवलंबून असलेल्या नातेवाईकास तात्काळ रोख सहाय्याची रक्कम रु.१०००/- (एक हजार) मदत म्हणून देणे योग्य वाटते.

मृत पावलेल्या माजी कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसास कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या तारखेपासून ६ (सहा) महिन्याच्या आत तात्काळ रोख सहाय्या करिता अर्ज करता येईल. अशी अट असणे आवश्यक आहे. तसेच दिनांक १ सप्टेंबर, १९९३ पासून प्रभाव देण्यांस हरकत नसावी.

तरी उपरोक्त मदत योजना लागू करण्यासाठी व कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता सहानभूतीपूर्वक सदर प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

मनपा कर्मचारी (वर्ग-४) कामावर असतांना (ON DUTY) अपघाती मृत्यू झाल्यास त्याचेवर अवलंबित असणाऱ्या नातेवाईकाला रु.१०००/- (एक हजार) आर्थिक मदत देता येईल व दिनांक १ सप्टेंबर, १९९३ पासून प्रभाव देण्यांत येतो. तसेच प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.८९ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, १९९३-९४ या सालाकरिता दुसऱ्या तिमाहीसाठी विविध विभागातील मागणीच्या आधारे आदेशाप्रमाणे सिमेंटची निविदा सूचना क्र. मनपा/-२अ /१५४/९३, दि.१६.०४.९३ द्वारे दैनिक मराठा व औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रात खुल्या बाजारातून सिमेंट खरेदीसाठी निविदा प्रसिध्द केली असता दि.१५.०५.९३ रोजी फक्त ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्या खालील प्रमाणे दर व अटी दर्शविलेल्या आहे.

१) सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया :- ९९.५० + (जकात) २.९८=१०२.४८ प्र.गोणी अटीसह सदरील दर हे मनपाच्या गोडाऊन पर्यंत असून प्राप्त जकात कर मनपास सोसावा लागेल.

१. १००% अग्रीम देणे यावे असे लिहले आहे.
२. संबंधित दराची मुदत ३१.०५.९३ पर्यंतच राहील.
३. शासनाच्या करात वाढ झाल्यास ती मनपास सोसावी लागेल.
४. वाहतुकीच्या दरात व इतर दरात वाढ झाल्यास ती मनपास सोसावी लागेल.

२) अजय ट्रेडींग कंपनी प्रती गोणी रु.१०३.००
अटी :-

१. महानगरपालिकेच्या गोडावून मध्ये सर्व करांसह थप्पी लावणे.
२. १००% अग्रीम धन द्यावे लागेल.
३. सदरील दर हा २० दिवसांकरिता बंधनकारक राहील.
४. जर केंद्रीय दरात वाढ झाल्यास ती वेगळी द्यावी लागेल.
५. चाचणी अहवाल सी.सी.आय.चा अदिलाबाद फॅक्टरीने प्रमाणित केलेला सादर केला जाईल.

३) व्ही.ए.ट्रेडिंग कंपनी - १०२.०० प्रति गोणी

१. महानगरपालिकेच्या गोडावून मध्ये सर्व करासह थप्पी लावणे.
२. प्रति २०० मे.टन सिमेंटच्या बिलाची रक्कम अदा करणे.
३. चाचणी अहवाल सी.सी.आय.लि.अदिलाबाद फॅक्टरीचे प्रमाणित केलेले सादर करण्यांत येईल.
४. सदरील दर हा ३० दिवसांकरिता बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या व अटी पाहता व्ही.ए.ट्रेडिंग कंपनी यांचे दरपत्रक कमी असून प्रती गोणी रु.१०२/- आहे.

तरी याबाबतीत मा.प्रशासक साहेब यांचा आदेश दि.१२.०६.९३ प्रमाणे व्ही.ए.ट्रेडिंगकंपनी यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/शअ/भांडार/२६८/९३, दि.२३.०७.९३ द्वारे दि.२७.०७.९३ रोजी मा.प्रशासक साहेब यांच्या दालनात सिमेंटच्या दराबाबत वाटाघाटी करिता बोलावण्यांत आले असता त्यांनी दि.२७.०७.९३ रोजी पत्र देऊन कळविले की, मी प्रति टन रु.५/- दर कमी करण्यास तयार आहे. म्हणजे प्रति गोणी १०१.७५ (प्रति टन २०३५/- असा आहे) विविध विभागाची माहे सप्टेंबर १९९३ पर्यंत ४००० गोणी सिमेंटची मागणी आहे.

**ठराव :-**

तरी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सध्या दुसऱ्या तिमाही करिता १८००० गोणी सिमेंट प्रति गोणी १०१.७५ (एकशे एक रुपया पंच्चाहत्तर पैसे) म्हणजे प्रति टन २०३५/- (दोन

हजार पस्तीस रु.) या दराने ९०० मे.टन सिमेंट व्ही.ए.ट्रेडींग कंपनीकडून खरेदी करण्याची व त्याची रक्कम रु.१८,३१,५००/- (अठरा लाख एकत्तीस हजार पाचशे) व्ही.ए.ट्रेडींग कंपनी यांना अदा करण्याची प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०३.०९.९३

**प्रस्ताव क्र.९० :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जकात अधिक्षक यांनी दिनांक ०१.०९.९३ रोजी दिलेल्या अहवालावरुन श्री.एम.ए.साजेद व श्री.व्ही.एस.नारकर या लिपिक कर्मचाऱ्यांनी नाकास चेकर, म्हणून काम करीत असतांना १ महिन्यांत ९० लक्ष रुपयाचा विना जकात माल पकडून त्यावर २ लक्ष रुपये वसुली केली. सदरील उत्पन्न मनपास अतिरिक्त मिळाल्यामुळे पुढेही असे जास्तीचे उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. करिता श्री.एम.ए.साजेद व श्री.व्ही.एस.नारकर या लिपीक कर्मचाऱ्यांना लिपिका ऐवजी "नाका चेकर" म्हणून हे पदनाम २ वर्षाच्या बदली पिरिएड साठी देण्यास हरकत नसावी. सदरील पदनामामुळे त्यांच्या वेतनश्रेणीत कोणताही बदल होणार नाही किंवा त्यांना अतिरिक्त आर्थिक लाभही मिळणार नाही. या पदनामामुळे त्यांच्या सेवा जेष्ठतेवर परिणाम होणार नाही. पुढील पदोन्नती त्यांना त्याच्या सेवा जेष्ठतेनुसारच मिळेल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

उपरोक्त प्रस्तावात नमूद केल्यानुसार जकात उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून श्री.एम.ए.साजेद व श्री.व्ही.एस.नारकर या लिपिक कर्मचाऱ्यांना २ वर्षाच्या बदली पिरियडसाठी "नाका चेकर" हे पदनाम देण्यांस मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.९१ :-**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.व्ही.एस.रोजभोज, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनिःसारण) महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीची २ या वर्षाचा कालावधी दिनांक १७.०५.९३ ला संपला असून, मनपातील त्यांचा वरील सेवाकाळ हा कामाच्या दृष्टीने चांगला असून मनपातील पाणी पुरवठा व जलनिःसारण कामातील अनेक अडचणी व समस्या त्यांनी कार्यकाळात सोडविल्या आहेत. त्यांना कामाची माहिती झालेली आहे व कामाच्या पार्श्वभूमीवर शहराच्या पुढील विकास कार्यक्रमासाठी त्यांना मनपात आणखी एक वर्षाची मुदत वाढ दि.३०.०४.९४ पर्यंत प्रतिनियुक्ती चा कालावधी वाढविणे योग्य होईल.

या संदर्भात महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे सचिव यांना जा.क्र./मआ/स्वीस/९३, दि.०७.०४.९३ अन्वये दर्शविण्यांत आलेले आहे. त्या संदर्भाने महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे सचिव यांना जा.क्र./मनपा/स्विस/९३,

दि.०७.०४.९३ अन्वये दर्शविण्यांत आलेले आहे. त्या संदर्भाने महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई यांचे जा.क्र./मनपा/एलईओ/१०८९/३१०/आ-१, दि.२३ एप्रिल, १९९३ अन्वये प्रतिनियुक्तीचे कालावधीस दि.३०.०४.९४ पर्यंत मुदत वाढीस मंजूरी दिलेली आहे.

करिता श्री.व्ही.एस.राजभोज कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षासाठी म्हणजेच दि.३०.०४.९४ पर्यंत वाढविणेच्या प्रस्तावास मंजूरी देणेस्तव सादर.

**ठराव :-**

श्री.व्ही.एस.राजभोज, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.१७.०५.९३ रोजी संपला असून त्यांचा मनपातील सेवाकाळ दि.३०.०४.९४ पर्यंत मुदत वाढीस मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>सचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>प्रशासक<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.९२ :-**

कार्यकारी अभियंता, (जलनि:सारण व पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, एम ॲण्ड आर झोनल टेंडर झोन क्र.६ कामासाठी, निविदा सूचना क्र.-१/मनपा/युजीडी/४२२/९३, दि.२९.०६.९३ द्वारे स्थानिक वर्तमानपत्रातून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असतांना १२ निविदा विकल्या गेल्या व तीन निविदा प्राप्त झाल्या आहे. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराच्या ४.९९% जास्त दराची निविदा श्री.एम.ए.सिद्दीकी गुत्तेदार यांची आहे. हा दर जास्त असल्याने त्यांना पत्र क्र.मनपा/युजीडी/-१/१००४/९३, दि.११.०८.९३ द्वारे दराच्या वाटाघाटीस बोलाविले असतांना श्री.एम.ए.सिद्दीकी यांनी अंदाजपत्रकीय दराच्या ४% जास्त दराने काम करुन देण्यास मान्य केले आहे. आता त्याच्या कडून सदर काम करुन घेण्यास प्रस्ताव विचारास्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार झोन क्र.६ मधील ड्रेनेजच्या दुरुस्ती व देखभाल सन १९९३-९४ या वर्षात करण्याचे कामासाठी (वाटाघाटीनुसार) अंदाजपत्रकीय दराच्या ४% जास्त दराने काम श्री.एम.ए.सिद्दीकी गुत्तेदार यांचे कडून करुन घेण्यास ठरावास प्रशासकीय मान्यता दिली जाते. पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>सचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>प्रशासक<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.९३ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, आमखास येथील उद्यानाचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९२-९३ च्या

दरसुचीनुसार रक्कम रुपये २,८०,०६१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरचा खर्च सन १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

सदर कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण नऊ निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पाच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. निविदापत्रके उघडण्यांत आली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.ओम शांती इलेक्ट्रीकल्स | - | १.२२ टक्के कमी |
| २. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | २.५० टक्के जास्त दराने |
| ३. | मे.सत्यम वायर्स | - | ५.२० टक्के जास्त दराने |
| ४. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | ५ टक्के जास्त दराने |
| ५. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | अंदाजपत्रकीय दराप्रमाणे |

वरील निविदापत्रकापैकी मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५५ टक्के कमी आहेत.

तरी सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २,८०,०६१/- व मे.ओम शांती इलेक्ट्रीकल्स यांचे १.२२ टक्के कमी दराचे निविदा पत्रक स्वीकारणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांच्या प्रस्तावानुसार आमखास येथील उद्यानाचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये २,८०,०६१/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम मे.ओम शांती इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरपेक्षा १.२२ टक्के कमी दराने करुन घेण्यास मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.९४ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कैलासनगर येथील स्मशानभुमीमध्ये विद्युत दाहिनी बसविण्याचे कामासाठी दरपत्रके मागविली असता एकूण दोन दरपत्रके प्राप्त झाली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दिलेले एकूण दर |
|---|---|---|
| १ | मे.क्लीक निक्सॉन लि.मुंबई | २१,५३,१६८.४० |
| २ | मे.सत्यम वायर्स, औरंगाबाद | २६,९५,०००.०० |

वरील दरपत्रकाप्रमाणे मे.क्लीक निक्सॉन लि.मुंबई यांनी खालील काम मनपाने करावीत असे नमूद केले आहे.

1. Brick work in Plue passage.
2. Fixing of Flue passage door.
3. Chimny construction
4. Internal colding work.

सत्यम वायर्स यांनी संपूर्ण कामासाठी रक्कम रुपये २६,९५,०००/- इतके दर दिलेले आहेत. यामध्ये १ ते ४ या कामाचा ही समावेश आहे.

मे.क्लीक निक्सॉन यांना पत्रक क्र.मनपा/शअ/१३७/९३, दि.०६.०४.९३ अन्वये १ ते ४ कामासाठी किती खर्च येईल. याबाबत विचारणा केली असता त्यांनी पत्र मु./केएनएएफडब्ल्यु/९३ जी.ई.एन.दिनांक २ एप्रिल, १९९३ अन्वये फक्त १ व ४ या कामासाठी लागणारा खर्च अनुक्रमे ६०,०००/- + ३० टक्के टॅक्स व रुपये ७५,०००/- + ३० टक्के टॅक्स असे दर कळविले आहेत. व उर्वरित २ व ३ ही कामे मनपाने दुसऱ्यांकडून करुन घ्यावीत असे कळविले आहे. कारण क्लिक नॉक्सन ही कामे करत नाही. त्यांनी दिलेले दर मिळून खालील किंमत येते.

| | | |
|---|---|---|
| पत्रकामध्ये दर्शविलेली किंमत | - | २१,५३,१६८/- |
| १ ते ४ कामासाठी लागणारा एकूण खर्च | - | ०६,११,५००/- |
| एकूण | - | २७,९४,६६८/- |

तरी मे.किल्क निक्सॉन यांची एकूण किंमत रक्कम रुपये २७,९४,६६८/- इतकी येते व मे.सत्यम वायर्स यांची एकूण किंमत २६,९५,५००/- इतकी येते. तरी मे.सत्यम वायर्स यांचे दर मे क्लिक निक्सॉन यांचे दरापेक्षा कमी आहेत.

तरी मे.सत्यम वायर्स यांचे रक्कम रुपये २६,९५,५००/- चे दरपत्रक मंजूरीस्तव सादर. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार कैलासनगर येथील स्मशान भुमीत विद्युत दाहिनी बसविण्याच्या कामाकरिता आलेल्या दरपत्रकापैकी मे.सत्यम वायर्स औरंगाबाद यांच्या रक्कम रु.२६,९५,०००/- च्या दरपत्रकास मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-०६.०९.९३

**प्रस्ताव क्र.९५ :-**

उपआयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेचे होणाऱ्या हंगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रभागवार मतदारांच्या याद्या मराठी व उर्दू मध्ये छपाई करिता निविदा सूचना क्र.जा.क्र./मनपा/निवडणूक/११६/९३, दि.६ ऑगस्ट १९९३ नुसार जी की, दैनिक लोकमत, दैनिक सकाळ, औरंगाबाद टाईम्स व दैनिक मराठवाडा मध्ये प्रसिध्दीस देवून प्रगट निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा स्विकृतीच्या नियोजित तारिख १८.०८.९३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत एकूण ४३ निविदा पत्रके प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक २०.०८.९३ रोजी उघडण्यांत आल्या असून त्यात पुण्याच्या ८ अहमनगरच्या ३, जालना ३, बीड येथील १ असे औरंगाबादच्या बाहेरील १५ (पंधरा) निविदाधारक असून औरंगाबादमध्ये २८ निविदाधारक आहेत.

एकूण आलेल्या ३७ (सदतीस) (मराठीतील) सर्व निविदांचे छाननी व तुलना केल्यास त्यांत निविदा वरील क्रमांक ४३/२७, अनंत प्रिंटींग प्रेस यांचा दर सर्वात कमी म्हणजे पूर्ण पृष्ठ क्र.४५.९० ३/४ पृष्ठ रु.४०/- १/२ पृष्ठ रुपये ३२ व १/४ पृष्ठ रु.२३/- (१२० प्रतिसाठी कागदासह) असून सर्वात जास्त दराची निविदा वरील क्रमांक ४३/११ मसर्स स्पीड प्रिंटर्स औरंगाबाद यांची, कॉम्पोटरणे केल्यास पहिली बाजू रु.१८६/- दुसरी बाजू रु.१९८ आणि इलेक्ट्रॉनिक कॅपोझींग ने केल्यास पहिली बाजू रु.१५६ व दुसरी बाजू रु.१६८ (सर्वांसाठी प्रति १२०/-) असा असून त्यांनी सर्वास १,३/४, १/२ व १/४ साठी) सदर दर दिले आहेत. सर्वात कमी दर रु.४५.९० लक्षात घेतल्यास यावरुन असे स्पष्ट होते की, जर एखाद्या मुद्रित पृष्ठांची १२० झेरॉक्स प्रती बाजारातून सवलतीच्या दराने काढून घेतल्यास त्यास कमीत कमी रु.६०/- खर्च येतील आणि सदर यादी छपाई करुन घेण्याची असल्याने त्यास रु.६०/- पेक्षा जास्त खर्च अपेक्षित आहे. शिवाय सदर निविदाधारक बाहेर गांवचा असल्यामुळे प्रत्यक्ष छपाईच्या वेळी प्रुफ रिडींग, वेळोवेळी तपासणी करणे, भेट देऊन काम क्वॅलिटीसह आहे. की नाही हे पाहणे, मुद्रित पृष्ठ आहे की, झेरॉक्स प्रत आहे. याची खात्री करणे. अडचणीचे ठरणार आहे. शिवाय कामांचे स्वरुप, व्याप व कालावधी लक्षात घेता सदर छपाई चे काम बाहेरगांवी छपाई करणे योग्य वाटत नाही. कारण बाहेरील कामासाठी अधिकारी/कर्मचारी नियुक्त वर्ग नियुक्त करावा लागेल व त्यांचा जाणे-येणे तसेच राहणेच्या खर्च व इतर भत्ते महानगरपालिकेस सोसावी लागेल व त्यामुळे आर्थिक बोजा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करिता वरील बाबींचा गांभीर्याने विचार करता स्थानिक प्रेसधारकांकडूनच छपाईचे काम करुन घेणे संयुक्तीक ठरले.

वरील बाबींस मा.प्रशासक यांनी दिनांक ०६.०९.९३ ला मंजूरी दिल्यानुसार फक्त स्थानिक प्रेसधारकांकडून एकूण २२ (बावीस) (मराठीसाठी) निविदा प्राप्त झालेल्यापैकी १९ निविदाधारकांच्या निविदा खालील कारणांमुळे रद्दबातल ठरविण्यांत आल्या आहेत. त्यातील काहींना अनामत रक्कमेची पावती जोडलेली नाही. कागदाचा नमूना दिला नाही. निविदाप्रमाणे पृष्ठनिहाय दर दिलेला नाही. अर्थात निविदातील शर्ती व अटींची पूर्तता केलेली नाही.

शिल्लक राहिलेल्या तीन निविदांचा दर खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदावरील क्रमांक व धारकांचे नाव | छपाईचा दर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाहिले पान (पृष्ठ) | | | | दुसरे पृष्ठ | | | |
| | | १ | ३/४ | १/२ | १/४ | १ | ३/४ | १/२ | १/४ |
| १. | ४३/३८ सरदार प्रिंटर्स | ९०/- | ९०/- | ९०/- | ९०/- | ९०/- | ९०/- | ९०/- | ९०/- |
| २. | ४३/१८ शालीमार प्रिंटर्स (१) पेपर साधे | १०१/- | ९५/- | ८५/- | ८०/- | १०५/- | १०३/- | ९०/- | ८५/- |
| ३. | ४३/११ मे स्पीड प्रिंटर्स | १०५/- | १००/- | ९०/- | ८५/- | ११०/- | १०८/- | ८५/- | ९०/- |
| | अ) कॉम्प्युटर द्वारा | पेपर-१ | १९२/- | | | २०४/- | हाच दर इतर पृष्ठास | | |
| | | पेपर-२ | १८६/- | | | १६८/- | हाच दर इतर पृष्ठास | | |
| | ब) इलेक्ट्रॉनिक्स | पेपर-१ | १९२/- | | | १७४/- | हाच दर इतर पृष्ठास | | |
| | | पेपर-२ | १८६/- | | | १६८/- | हाच दर इतर पृष्ठास | | |

वर नमूद केल्याप्रमाणे मे.स्पीड प्रिंटर्सचा दर सर्वात जास्त आहेच शिवाय त्यांनी काम वेळेवर न झाल्यास त्याची जबाबदारी न घेता विविध अटी निविदात नमूद केल्या आहेत. सबब जास्त दर व अटी असल्याने त्यांना छपाईचे काम देणे आर्थिकदृष्ट्या

परवडणारे नाहीच व सर्वात कमी दर सरदार प्रिंटर्स यांचा असला तरी त्यांनी सर्व पृष्ठंसाठी एकच दर दिला असून त्याची संपूर्ण काम करण्याची क्षमता आढळून येत नाही व त्यांनी जोडलेला कागदही शालीमार प्रिंटर्स पेक्षा हलका (कमी दर्जाचा) आहे. करिता सदर छपाईचे कामाचे महत्व, व्यापक्ता, कालमर्यादा गुणवत्तासह काम करुन घ्यावयाचे असेल तर शालीमार प्रिंटर्स यांना मॅपलियो पेपरवर छपाई चे काम त्यांनी दिलेल्या दराने करुन घेणे उचित ठरेल. शिवाय सदर दर याच प्रकारच्या कागदा शिवाय (फक्त छपाईसाठी) नाशिक महानगरपालिकेने १९९१ मध्ये पहिल्या पृष्ठास रुपये १२५/- व दोन्ही पृष्ठास रुपये २५० दिलेला आहे. याचा हिशोबात वरील कागदासह दर आर्थिकदृष्ट्या कमी आहे.

करिता औरंगाबाद महानगरपालिकेच्या होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रभाग निहाय मतदार याद्या छपाई करिता शालीमार प्रिंटर्स औरंगाबाद यांची मॅपनिधी पेपरवरील छपाईच्या दराची निविदा स्विकारण्याच्या प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीस्तव सादर. तसेच कामासाठी रुपये ५,२५,०००/- (पाच लाख पंचवीस हजार) अपेक्षित खर्चाच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभाग निहाय मतदार याद्या छपाईसाठी शालीमार प्रिंटर्स औरंगाबाद यांची मॅपलिपी पेपरवरील छपाईच्या दराची निविदा स्विकारण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. व या कामासाठी होणाऱ्या अपेक्षित खर्च रुपये ५,२५,०००/- (पाच लक्ष पंचवीस हजार) मान्यता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही करण्यांत यावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.९६ :-**

सन १९९३-९४ या आर्थिक वर्षासाठी डिझेल, पेट्रोल व इतर ऑईल व लुब्रीकेटसचा पुरवठा वर्षभर करण्याच्या कामासाठी दैनिक लोकमत, लोकविजय, वर्तमानपत्रातून निविदा सूचना प्रसिध्द करण्यांत आली असता एकूण दोन निविदा विकल्या गेल्या. १ टेंडर स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी दोन्ही निविदा प्राप्त झाल्या.

१. मे.चुन्नीलाल आसाराम ॲण्ड औरंगाबाद यांच्याकडे इंडियन ऑईल कार्पोरेशन कंपनीचे डिझेल, पेट्रोल पंप आहेत.
२. मे.कैलास एजन्सीस प्रा.लि.औरंगाबाद यांच्याकडे भारत पेट्रोलियम कंपनीचा डिझेल पेट्रोल पंप आहेत.

डिझेल व पेट्रोल दर दोन्ही एजन्सीचे सारखे आहेत. पंरतू ऑईल व लुब्रीकंटसचे दर थोडे फार कमी जास्त आहेत. दोन्ही एजन्सीचे आलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| ॲटम क्र. | ॲटमचे नांव | दर कमी असलेल्या एजन्सीचे नांव व एजन्सी क्रमांक | आलेले कमी दर |
|---|---|---|---|
| १ | डिझेल | १) कैलास एजन्सीज प्रा.लि., औरंगाबाद.<br>२) चुन्नीलाल | ७.००<br>७.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आसाराम ॲण्ड कं.औरंगाबाद. | |
| २ | पेट्रोल | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | १७.९६<br>१७.९६ |
| ३ | इंजिन ऑईल २०/४० बॅरल २१० लिटर भारत (क्युमा मल्टीग्रेड) | एजन्सी क्रमांक १ | ८७४०.०० |
| ४ | इंजिन ऑईल सुपर मल्टीग्रेड २०x४० २१० लिटर | एजन्सी क्रमांक २ | ८७५०.०० |
| ५ | इंजिन ऑईल २०x४० भारत ॲक्टयुमा मल्टीग्रेड ५ लिटर टीन | एजन्सी क्रमांक १ | २२३.२५ |
| ६ | इंजिन ऑईल २०x४० भारत ॲक्टयुमा मल्टीग्रेड १ लिटर टीन डब्बा | एजन्सी क्रमांक १ | ४६.७३ |
| ७ | इंजिन ऑईल २०x४० भारत ॲक्टयुमा मल्टीग्रेड १/२ लिटर टीन | एजन्सी क्रमांक १ | २४.१७ |
| ८ | इंजिन ऑईल सर्वो सुपर २०x४० मल्टीग्रेड ५ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक २ | २२३.७५ |
| ९ | इंजिन ऑईल सर्वो सुपर २०x४० मल्टीग्रेड १ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक २ | ४६.७७ |
| १० | इंजिन ऑईल सर्वो सुपर २०x४० मल्टीग्रेड १/२ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक २ | २४.९८ |
| ११ | इंजिन ऑईल कस्ट्रोल २० डब्ल्यु/४० सी.आर.बी. | एजन्सी क्रमांक २ | ११,११०.५० |
| १२ | इंजिन ऑईल कस्ट्रोल २० डब्ल्यु/४० सी.आर.बी.५ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ३११.००<br>३११.०० |
| १३ | इंजिन ऑईल कस्ट्रोल २० डब्ल्यु/४० सी.आर.बी.१ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ६५.७५<br>६५.७५ |
| १४ | इंजिन ऑईल कस्ट्रोल २० डब्ल्यु/४० सी.आर.बी.-१ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ३५.००<br>३५.०० |
| १५ | कॅस्ट्रोल जी.टी.एक्स २० डब्ल्यु/५० ५ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १ | ३०५.०० |
| १६ | कॅस्ट्रोल जी.टी.आईल २० डब्ल्यु/५० १ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ८०.००<br>८०.०० |
| १७ | कॅस्ट्रोल जी.टी.ऑईल डब्ल्यु/५० १/२ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ४२.००<br>४२.०० |
| १८ | गेअर ऑईल स्पेअरल ९०,१४० नं. बॅरल २१० लिटर | एजन्सी क्रमांक १ | ७,४२९.०० |
| १९ | गेअर ऑईल स्पेअरल ९०,१४० नं. बॅरल २१० लिटर | एजन्सी क्रमांक १ | १७८.०० |
| २० | गेअर ऑईल स्पेअरल ९०,१४० नं. ५ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १ | ३६.६७ |
| २१ | गेअर ऑईल बॅरल ९०,१४० नं.२१० लिटर | एजन्सी क्रमांक १ | ७४७५.०० |
| २२ | सर्वो गेअर ऑईल ९०,१४० नं.५ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक २ | १७९.४२ |
| २३ | सर्वो गेअर ऑईल १ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक २ | ३६.७१ |
| २४ | कॅस्ट्रोल ऑईल टी.क्यु गेअर ऑईल ५ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ३८०.७५<br>३८०.७५ |
| २५ | कॅस्ट्रोल ऑईल टी क्यु गेअर ऑईल १ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक | ७९.७५ |
| २६ | कॅस्ट्रोल हाय.पी.बी.५ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ३२५.७५<br>३२५.७५ |
| २७ | कॅस्ट्रोल हाय.पी.बी.१ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ६८.७५<br>६८.७५ |
| २८ | हायड्रॉलिक ऑईल लुज पर लिटर | एजन्सी क्रमांक १ | ३६.०० |
| २९ | ब्रेक ऑईल कॅस्ट्रोल रेड ग्रीलिंग १ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १ | १४७.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एजन्सी क्रमांक २ | १४७.५० |
| ३० | ब्रेक ऑईल कॅस्ट्रोल रेड ग्रीलिंग १/२ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ७९.००<br>७९.०० |
| ३१ | ब्रेक ऑईल कॅस्ट्रोल रेड ग्रीलिंग १/४ लिटर | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ४३.००<br>४३.०० |
| ३२ | ब्रेक ऑईल हेबी ड्युटी ग्रीलिंग १ लिटर | एजन्सी क्रमांक १ | ८०.०० |
| ३३ | ब्रेक ऑईल हेवी ड्युटी रेड ग्रीलिंग १/२ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १ | ४०.०० |
| ३४ | ब्रेक ऑईल हेवी ड्युटी १ लिटर रिम | एजन्सी क्रमांक १ | १४२.७६ |
| ३५ | ब्रेक ऑईल व्हाईट १ लिटर | एजन्सी क्रमांक १ | ८०.१४ |
| ३६ | ब्रेक ऑईल व्हाईट १/२ लिटर | एजन्सी क्रमांक १ | ४०.२० |
| ३७ | ब्रेक ऑईल व्हाईट १/४ लिटर | एजन्सी क्रमांक १ | २०.३० |
| ३८ | चॅसीज ग्रीस बॅरल १८२ किलो भारत ॲक्टयुमा | एजन्सी क्रमांक १ | ७२२७.०० |
| ३९ | चॅसीज ग्रीस बेरॅल १८२ किलो सर्वो सुपर | एजन्सी क्रमांक २ | ७४५०.०० |
| ४० | चॅसीस ग्रीस डॉक्टयुमा २ किलो | एजन्सी क्रमांक १ | ९०.८६ |
| ४१ | चॅसीस ग्रीस ॲक्टयुमा १ किलो | एजन्सी क्रमांक १ | ४८.८१ |
| ४२ | सर्वो सुपर चॅसीज ग्रीस २ किलो | एजन्सी क्रमांक २ | ९०.७८ |
| ४३ | सर्वो सुपर चैसीज ग्रीस १ किलो | एजन्सी क्रमांक २ | ४८.७० |
| ४४ | कॅस्ट्रोल व्हील बेअरींग ग्रीस २ किलो | एजन्सी क्रमांक २ | १३७.७५ |
| ४५ | कॅस्ट्रोल व्ही बेअरिंग ग्रीस १ किलो | एजन्सी क्रमांक २ | ७१.२५ |
| ४६ | कॅस्ट्रोल व्ही बेअरींग ग्रीस १/२ किलो | एजन्सी क्रमांक २ | ३८.२५ |
| ४७ | कॅस्ट्रोल बॉल बेअरिंग ग्रील एपी-३, एपी-२, १ किलो | एजन्सी क्रमांक १ | १३७.७५ |
| ४८ | कॅस्ट्रोल बॉल बेअरींग ए ग्रीस-एपी-३, एपी-२, १ किलो | एजन्सी क्रमांक १ | ६८.८८ |
| ४९ | डीस्टील्ड वॉटर बॉटल ६५० एम.एल. | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ४.००<br>४.०० |
| ५० | ॲसीड बॉटल ६५०० एम.एल. | एजन्सी क्रमांक १<br>एजन्सी क्रमांक २ | ५.००<br>५.०० |
| ५१ | पॉलिस क्लॉथ लहान | एजन्सी क्रमांक १ | ५.५० |
| ५२ | पॉलिस क्लॉथ मोठा | एजन्सी क्रमांक २ | ५.०० |
| ५३ | कॉटन वेस्ट १८० ग्रॅम पॅकेट | एजन्सी क्रमांक २ | ४.०० |
| ५४ | कॉटन वेस्ट १ किलो पॅकेट | एजन्सी क्रमांक १ | १५.०० |
| ५५ | इंजिन ऑईल कॅस्ट्रोल सी.आर.बी. ३० बॉटेल २१० लिटर | एजन्सी क्रमांक २ | ११,१७८.७५ |
| ५६ | इंजिन ऑईल कॅस्ट्रोल सी.आर.बी.३० बॅरल ५ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक २ | ३१२.५० |
| ५७ | इंजिन ऑईल कॅस्ट्रोल सी.आर.बी.-३० बॅरल १ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक १ | ६५.७३ |
| ५८ | इंजिन ऑईल गल्फ डब्ल्युxएच.डी.मल्टी ग्रेड बॅरल २१० लिटर | एजन्सी क्रमांक २ | १०,५६५.०० |
| ५९ | इंजिन ऑईल गल्फ ट्युबxएच.डी.मल्टीग्रेड बॅरेल पालिस्टर डब्बा | एजन्सी क्रमांक २ | २९८.०० |
| ६० | इंजिन ऑईल गल्फ ट्युबxएच.डी.मल्टीग्रेड बॅरल १ लिटर डब्बा | एजन्सी क्रमांक २ | ६३.०० |
| ६१ | हायड्रॉलिक ऑईल लुज हायड्रेल ४६ ० आर.-६८/हॅस्पीन व्ही-४४६६८ पर लिटर | एजन्सी क्रमांक २ | ३७.०० |
| ६२ | हायड्रॉलिक ऑईल लुज हायड्रेल ४६/६८/हॅस्पीन व्ही ४४६/६८, २०० लिटर बॅरल | एजन्सी क्रमांक १ | ७,५६०.०० |
| ६३ | हायड्रालिक ऑईल लुज हायड्रेल ४६०/६८ हॅस्पीन व्ही.४४६/६८, ५ लिटर टीन | एजन्सी क्रमांक १ | १८०.०० |

वर दर्शविल्याप्रमाणे ज्या ज्या एजन्सीचे कमी आलेले दर मंजूर करण्यांत हरकत नाही. तसेच जे दर दोन्ही एजन्सीजचे सारखे आलेले आहे ते ॲटम दोन्ही एजन्सीज कडून खरेदी करण्यास मंजूरी मिळावी.

**ठराव :-**

अ) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.कैलास एजन्सीस प्रा.लि.औरंगाबाद (एजन्सी क्रमांक १) यांचे ॲटम क्रमांक १,२,३,५,७,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२४,२६,२८,२९, ३०,३१,३२, ३३,३४,३५,३६,३७,३८,४०,४१,४७,४८,४९,५०,५४,५७,६२,६३ चे दर कमी असल्यामुळे त्यांना मंजूरी देण्यांत येते.

ब) चुन्नीलाल आसाराम ॲण्ड कं.औरंगाबाद एजन्सी क्रमांक यांचे ॲटम क्र.१,२,४,८,९,१०,११,१२,१३,१४,१६,१७,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२९,३०,३१,३९,४२ ,४३,४४,४५,४६,४९,५०,५२,५३,५५,५६,५८,५९,६०,६१ चे दर कमी असल्यामुळे त्यांना मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.९७ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९३-९४ या आर्थिक वर्षासाठी ॲम्बेसेडर कारचे जॉब वर्क करुन घेण्यासाठी वार्षिक करार करण्याकरिता दैनिक लोकमत, लोकविजय या वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्दीस देण्यांत आली व कार रिपअर करणाचा अनुभवी गॅरमवाल्याकडून निविदा मागविण्यांत आल्या. एकूण तीन निविदापत्रके विकल्या गेली. व निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी तीनही निविदा प्राप्त झाल्या व आलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.फेमस गॅरेज, औरंगाबाद जॉब वर्क लिस्ट रेट | - | ३५ टक्के (कमी) |
| २. | मे.लेटेस्ट गॅरेज, औरंगाबाद जॉब वर्क लिस्ट रेट | - | ३५ टक्के (कमी) |
| ३. | मे.कैलास एजन्सीज प्रा.लि.औरंगाबाद जॉबवर्क लिस्ट रेट | - | २० टक्के (कमी) |

तुलनात्मकदृष्ट्या ते फेमस गॅरेज, औरंगाबाद व मे.लेटेस्ट गॅरेज, औरंगाबाद यांचे दोघाचेही दर कमी दराचे असून समान दर आलेले आहेत. म्हणते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५ टक्के कमी दराचे आहेत.

एकाच वेळी एका गॅरेजला जास्तीचे कारचे काम दिल्यास काम होण्यास विलंब होती. त्यादृष्टीने दोन्ही एजन्सीचे दर सारखेच व कमी दराचे असल्यामुळे दोन्ही एजन्सीचे दर मंजूर करणे योग्य राहील. दोन्ही एजन्सीना काम देखील वेळोवेळी विभागून देवून लवकर करता येईल.

तरी दोन्ही एजन्सीचे कमी दर मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.फेमस गॅरेज औरंगाबाद व मे.लेटेस्ट मोटार गॅरेज औरंगाबाद या दोघांचे दर कमी दराचे म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५ टक्के कमी दराचे असून दोघांचेही दर सन १९९३-९४ च्या वार्षिक करार करण्याकरिता मंजूर करण्यांत येतात.

अतिरिक्त शहर अभियंता यांनी दोन्ही एजन्सीना वेळोवेळी कामे विभागून देण्यांत मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.९८ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, खाम तलाव येथील उद्यानाचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सा.बा.खात्याच्या सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये २,४४,००३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरचा खर्च सन १९९०-९१ वर्षाच्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

सदर कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ निविदापत्रक विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | ५.०० टक्के जास्त दराने |
| २. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | ०.५० टक्के कमी दराने |
| ३. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | ९.५० टक्के जास्त दराने |

वरील निविदापैकी पत्रकापैकी मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी आहे.

तरी रक्कम रुपये २,४४,००३/- चे अंदाजपत्रक तसेच मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराचे निविदापत्रक मंजूरीस्तव सादर. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांच्या प्रस्तावानुसार खाम तलाव येथील उद्यानाचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये २,४४,००३/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. व सदर काम मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून करुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराने करुन घेण्यास मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.९९ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, सन १९९३-९४ या वित्तीय वर्षाकरिता विद्युत साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरिता सन १९९३-९४ च्या सा.बा.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.७,७५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले

आहे. सदरचा खर्च हा सन १९९३-९४ च्या विद्युत साहित्य खरेदी या शिर्षकामधून करण्यांत येईल.

सदर विद्युत साहित्य खरेदी करण्याकरिता बजाज, फिलीप्स, क्रॉम्प्टन आणि सिमा मेक यांच्या अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागविली असता एकूण ५ दरपत्रके विकल्या गेली व अंतिम तारखेपर्यंत फक्त ४ दरपत्रके वसुल झाली. वसुल झालेली दरपत्रके दि.०४.०८.९३ रोजी उघडण्यांत आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **ॲटम क्र.** | **विद्युत साहित्याचे नांव** | **मे.मेघदुत इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स, मुंबई** | **मे.पगारिया इंटरप्रायजेस, औरंगाबाद.** | **मे.प्रविण इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद** | **मे.सत्य इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद.** |
|---|---|---|---|---|---|
| १. | फ्लोरोसंट ट्युब ४० वॅट | ४४.०० | ४१.०० | ४१.२८ | ३९.९५ |
| २. | ४० वॅट ट्युब स्टार्टर २५० व्हेलर | ८.२५ | ७.५० | ७.५८ | ७.४० |
| ३. | २५० व्होल्ट ४० वॅट चोक | ११५.०० | १०५.०० | १०६.२५ | १०४.९० |

वरील दरपत्रकापैकी ॲटम क्र. १ ते ३ साठी मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे दर दर्शविल्याप्रमाणे आहेत. परंतू सदर दर जास्त वाटत असल्याने मा.प्रशासक यांचे आदेशानुसार सत्य इलेक्ट्रीकल्स यांना दराबाबत वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सत्य इलेक्ट्रीकल्स हे सदर साहित्य वर दर्शविल्या दराऐवजी खाली दिलेल्या दरानुसार दर्शविलेले नग (क्वॉलिटी) पुरविण्यांस तयार आहेत.

| **ॲटम क्र.** | **साहित्याचे नांव** | **वाटाघाटी अंती मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांनी दिलेले दर** | **पुरवठा करण्यांत येणारे नग** | **एकूण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १. | फ्लोरोसंट ट्युब ४० वॅट | रु.३९.०० प्रति नग | १०,००० नग | ३,९०,०००.०० |
| २. | ४० वॅट ट्युब स्टार्टर २५० व्हेलर | रु.७.०० प्रति नग | १०,००० नग | ७०,०००.०० |
| ३. | २५० व्होल्ट ४० वॅट चोक | रु.१०४.९० प्रति नग | ३,००० नग | ३,१४,७००.०० |
| | | **एकूण** | | **७,७४,७००.००** |

तरी उपरोक्त दराप्रमाणे मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून सदर साहित्य वाटाघाटी अंती ठरलेल्या दराप्रमाणे खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांच्या प्रस्तावानुसार सन १९९३-९४ या वित्तीय वर्षाकरिता विद्युत साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरिता सा.बा.खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,७५,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. तसेच सदर साहित्य ॲटम क्र.१,२ व ३ मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून वाटाघाटी अंती ठरलेल्या उपरोक्त दराप्रमाणे व दरापुढे दर्शविलेल्या नग (क्वॉलिटी) खरेदी करण्याची परवानगी दिली जाते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१०० :-**

कार्यकारी अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जय विश्वभारती कॉलनी येथील कंधारकर हॉस्पीटल जवळ २०० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनुदान सन १९९२-९३ मधून करावयाचा आहे. सदर कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९२-९३ नुसार रक्कम रु.८७,५००/- एवढ्याचे तयार करण्यांत येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे.

या कार्यालयाची निविदा सूचना क्र.०४/१९९३-९४ जी की दै.लोकविजय, रहेबर या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ (८) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण दोन (२) निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे प्रमाणेच्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.चिस्ती सय्यद माझीउद्दीन | - | ५.१३% कमी |
| २. | श्री.के.बी.काल्डा | - | २३% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री.चिस्ती सय्यद माझीउद्दीन यांचा आहे. म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.१३% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री.चिस्ती सय्यद माझीउद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.१३% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.चिस्ती सय्यद माझीउद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.१३% कमी दराची निविदा स्विकृतीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१०१ :-**

मा.कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र.४ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जलवाहिन्या, जलकुंभ, पंप हाऊस इत्यादीच्या देखभाल व दुरुस्तीचे वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रु.४,२७,८०८/- चे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९२-९३ नुसार तयार करण्यांत आलेले आहे.

करिता विभाग क्र.४ अंतर्गत देखभाल व दुरुस्ती अंदाजपत्रक रक्कम रु.४,२७,८०८/- चा प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

वरीलप्रमाणे विभाग क्र.४ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जलवाहिन्या जलकुंभ, पंप हाऊस इत्यादीच्या देखभाल व दुरुस्ती वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रु.४,२७,८०८/- ला प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१०२ :-**

मा.कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र.६ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जलवाहिन्या जलकुंभ, पंप हाऊस इत्यादीच्या देखभाल व दुरुस्तीचे वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,५९,५५५/- चे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९२-९३ नुसार तयार करण्यांत आलेले आहे.

करिता विभाग क्र.६ अंतर्गत देखभाल व दुरुस्तीचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,५९,५५५/- चा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

वरीलप्रमाणे विभाग क्र.६ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जलवाहिन्या, जलकुंभ, पंपहाऊस इत्यादींच्या देखभाल व दुरुस्तीचे वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रु.४,५९,५५५/- ला प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१०३ :-**

मा.कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र.३ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जलवाहिन्या जलकुंभ, पंपहाऊस इत्यादीच्या देखभाल व दुरुस्तीचे वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रु.४,३४,६४३/- चे परिसर अभियांत्रिकी विभागाची दुरसुची सन १९९२-९३ नुसार तयार करण्यांत आलेले आहे.

करिता विभाग क्र.३ अंतर्गत देखभाल व दुरुस्तीचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,३४,६४३/- चा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

वरील प्रमाणे विभाग क्र.३ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जलवाहिन्या, जलकुंभ, पंपहाऊस इत्यादीच्या देखभाल व दुरुस्तीचे वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रु.४,३४,६४३/- ला प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१०४ :-**

मा.कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र.२ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जलवाहिन्या, जलकुंभ, पंप हाऊस इत्यादी च्या देखभाल व दुरुस्तीचे वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रु.४,२९,१००/- चे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९२-९३ नुसार तयार करण्यांत आलेले आहे.

करिता विभाग क्र.२ अंतर्गत देखभाल व दुरुस्तीचे अंदाजपत्रक रक्कम रु.४,२९,१००/- चा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

वरील प्रमाणे विभाग क्र.२ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जलवाहिन्या, जलकुंभ, पंप हाऊस इत्यादीच्या देखभाल व दुरुस्तीचे वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,२९,१०० ला प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१०५ :-**

मा.कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र.१ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जलवाहिन्या, जलकुंभ, पंप हाऊस इत्यादीच्या देखभाल व दुरुस्तीचे वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रु.४,९२,०००/- चे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९२-९३ नुसार तयार करण्यांत आलेले आहे.

करिता विभाग क्र.१ अंतर्गत देखभाल व दुरुस्तीचे अंदाजपत्रक रक्कम रु.४,९२,०००/- चा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

वरीलप्रमाणे विभाग क्र.१ अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जलवाहिन्या, जलकुंभ, पंप हाऊस इत्यादींच्या देखभाल व दुरुस्तीचे वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रु.४,९२,०००/- ला प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०७.०९.९३

**प्रस्ताव क्र.१०६ :-**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महापालिकेकडे प्रतिनियुक्तीवर असलेले श्री.पी.एल.रोडे, उप अभियंता यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.३१ मार्च, १९९३ रोजी संपला असून त्यांचे कडील कामाची यादी व चालु कामे लक्षात घेता त्यांचा मनपातील प्रतिनियुक्तीचा कालावधी सप्टेंबर, १९९३ पर्यंत वाढविणे आवश्यक आहे. या संदर्भाने श्री.पी.एल.रोडे,उप अभियंता यांना सर्वसाधारण सभेने सप्टेंबर, १९९३ पर्यंत ठराव क्र.७९/९ दिनांक २०.१०.१९९२ अन्वये मुदतवाढीस मंजूरी दिली असल्याकारणाने या संदर्भाने महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ, मुंबई यांना कळविले असता

त्याचे पत्र क्र.एल.ई.ओ.-१०९०/४३६/आ-१, दि.२३ एप्रिल, १९९३ च्या आदेशान्वये श्री.रोडे पी.एल.रोडे, उपअभियंतांच्या प्रतिनियुक्तीवरील कालावधीस वर्तमान अटी व शर्तीप्रमाणे दिनांक ३०.०९.९३ पर्यंत मुदतवाढीस मंजूरी दिलेली आहे.

करिता श्री.पी.एल.रोडे, उप अभियंता यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढवून दिनांक ३०.०९.९३ पर्यंत मुदतवाढ देण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :-**

श्री.पी.एल.रोडे, उपअभियंता यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ३१ मार्च, १९९३ रोजी संपलेला असून, त्यांचेकडील कामाची यादी व चालू असलेली कामे विचारात घेता. तसेच या संदर्भाने महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनियुक्तीच्या कालावधीस मुदतवाढ दिल्याचे आदेशावरुन श्री.पी.एल.रोडे उप अभियंता यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीस दिनांक ३०.०९.१९९३ पर्यंत मुदतवाढ देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१०७ :-**

कामगार अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका कामगार कल्याण निधी योजना लागू करण्या बाबत मा.प्रशासक साहेबांनी दि.०१.०९.९३ रोजी मंजूरी दिली आहे.

महानगरपालिका सेवेतील प्रत्येक कायम स्वरुपी कर्मचारी (वर्ग-१ ते ४) हा कल्याण योजनेचा सदस्य राहील. इतर मनपा मध्ये हया योजनेत अनुदान/मदत म्हणून वर्षाला दिली जाते. तसेच सदर योजनेचा लाभ हा केवळ सेवानिवृत्त झाल्यावर व आकस्मीक मृत्यू झाल्यावर देण्यांत यावा. जर पुन्हा आवश्यक वाटल्यास कार्यकारी समितीला या मध्ये बदल करता येईल.

कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता मनपाने वर्षाला एक लाख रुपये अनुदान/मदत म्हणून देणे योग्य राहील. कारण कर्मचाऱ्यांची एकूण वर्गणी व मनपा अनुदान मदत या मधून ही कल्याण योजना उभारली जाईल.

उपरोक्त परिस्थतीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन प्रत्येक वर्षाला एक लाख रुपये अनुदान/मदत म्हणून देणे योग्य वाटते.

तरी उपरोक्त कामगार कल्याण निधी योजना लागू करण्यासाठी व कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता सहानुभूतीपूर्वक सदर प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता महानगरपालिका औरंगाबाद कामगार कल्याण निधी योजनेत स्थापन करण्यास मंजूरी देण्यांत येते. व यासाठी प्रत्येक वर्षी सदर निधीसाठी रुपये एक लाख मनपा फंडातून देण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१०८ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हॉटेल पंचवटी चौक ते खामनदी (रिसाळरोड) पर्यंत ३०० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामास निविदा सूचना क्र.१/मनपा/युजीडी/४२२/९३, दि.२९.०६.९३ अ नुसार स्थानिक वर्तमानपत्रातून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असतांना २० निविदा विकल्या गेल्या व त्यापैकी तीन निविदा प्राप्त झाल्या आहे. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराच्या ७% जास्त दराची निविदा श्री.शेख शरीफ यांची आहे. हा दर जास्त वाटत असल्याने पत्र क्र.मनपा/युजीडी-१/१०११/९३, दि.११.०८.९३ द्वारे श्री.शेख शरीफ यांना दराच्या वाटाघाटीस बोलविले असतांना ५% जास्त दराने काम करुन देण्यास संबंधिताने संमती दिली आहे. करिता सदर प्रस्ताव विचारास्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.शेख शरीफ गुत्तेदार यांचे कडून अंदाजपत्रकीय दराच्या ५% जास्त दराने काम करुन घेण्यास ठरावास प्रशासकीय मान्यता दिली जाते. पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१०९ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, इटखेडा येथे जलनिःसारण वाहिन्या टाकण्याचे व सेप्टीक टँक बांधण्याचे कामासाठी निविदा सूचना क्र.१/मनपा/युजीडी/१/४२२/९३, दि.२९.०६.९३ अनुसार स्थानिक वर्तमान पत्रातून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असतांना १८ निविदा विकल्या गेल्या व त्यापैकी ४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराच्या १५% कमी दराची निविदा श्री.एस.एम.मंडोरे यांची आहे. परंतू हा दर कमी वाटत असल्याने संबंधितास पत्र क्र.मनपा/युजीडी-१/९७४/९३, दि.३०.०७.९३ द्वारे (Rate Analysis) खुलासा मागविला असतांना त्यांना समाधान कारक खुलासा देवून अंदाजपत्रकीय दराच्या १५% कमी दराने काम करण्यांस संम्मती दिली आहे. करिता श्री.एस.एम.मंडोरे, गुत्तेदार यांच्याकडून सदर काम करुन प्रस्ताव विचारास्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सदर काम अंदाजपत्रकीय दराच्या १५% कमी दराने श्री.एस.एम.मंडोरे, गुत्तेदार यांच्याकडून करुन घेण्यांस ठरावास प्रशासकीय मान्यता दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.११० :-**

कार्यकारी अभियंता, जलनिःसारण व पाणीपुरवठा यांना प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र.४ मधील कार्यक्षेत्रातील जलनिःसारण वाहिन्याचे देखभाल व दुरुस्तीचे

कामासाठी निविदा सूचना क्र.१ मनपा/युजीडी-१/४२२/९३, दि.२९.०६.९३ नुसार स्थानिक वर्तमान पत्रातून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असतांना १८ निविदा विकल्या व त्यापैकी चार निविदा प्राप्त झाल्या आहे. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराची ०.०२% कमी दराची निविदा श्री.के.बी.पवार, गुत्तेदार यांची आहे. करिता सदर काम त्यांचे कडून करुन घेण्यास प्रस्ताव विचारास्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्री.के.बी.पवार यांची अंदाजपत्रकीय दराच्या ०.०२% कमी दराची निविदा असल्याने त्यानुसार त्यांचेकडून सदर काम करुन घेण्यास ठरावास प्रशासकीय मान्यता दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१११ :-**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण व पाणीपुरवठा) औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एस.बी.कॉलनी, उदय कॉलनी व टिळक नगर येथे ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी निविदा सूचना क्र.१ मनपा/युजीडी-१/४२२/९३, दि.२९.०६.९३ द्वारे स्थानिक वर्तमानपत्रातून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असतांना एकूण तीन निविदा विकल्या होत्या. त्या तिन्ही निविदा प्राप्त झाल्या असून तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराच्या ३% जास्त दराची निविदा श्री.यु.डी.कालेले यांची आहे. सदर दर जास्त वाटत असल्याने श्री.यु.डी.कालेले यांना पत्र कं.१०१७/९३, दि.१७.०८.९३ अनुसार दराच्या वाटाघाटीस मा.प्रशासक यांचे दालनात बोलविले असतांना संबंधितांने सदर काम अंदाजपत्रकीय दराने % करुन देण्यांस संमती दिली आहे. करिता सदर प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सदर काम श्री.यु.डी.कालेले यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेण्यास ठरावास प्रशासकीय मंजूरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.११२ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नक्षत्रवाडी येथे जलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे व सेप्टीक टँक बांधण्याचे कामासाठी निविदा सूचना क्र.१/मनपा/युजीडी-१/४२२/९३, दि.२९.०६.९३ अनुसार स्थानिक वर्तमान पत्रातून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असतांना १६ निविदा विकल्या गेल्या व त्यापैकी पांच निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराच्या

१५% कमी दराची निविदा श्री.एस.एम.मंडोरे गुत्तेदार यांची आहे. त्यांनी पत्र क्र.मनपा/युजीडी/१/१७३/९३, दि.३०.०७.९३ चे उत्तरी समाधानकारक खुलासा देऊन अंदाजपत्रकीय दराच्या १५% कमी दराने काम करुन देण्यांस संमती दिली आहे. करिता श्री.एस.एम.मंडारे गुत्तेदार यांचेकडून सदर काम करुन घेण्यास प्रस्ताव विचारास्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्यास श्री.एस.एम.मंडोरे गुत्तेदार यांची अंदाजपत्रकीय दराच्या १५% कमी दराने सदर काम करुन घेण्यास संमती दिल्याने त्यांचेकडून काम करुन घेण्यास ठरावास प्रशासकीय मान्यता दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.११३ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कांचनवाडी येथे १५० मी.मी.व्यासाची जलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे व सेप्टीक टँक बांधण्याचे कामासाठी स्थानिक वर्तमान पत्रातून निविदा सूचना क्र.१/मनपा/युजीडी-१/४२२/९३, दि.२९.०६.९३ अनुसार बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असतांना १८ निविदा विकल्या गेल्या व त्यापैकी ५ निविदा प्राप्त झाल्या आहे. त्यांच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराच्या १६% कमी दराची निविदा श्री.एस.एम.मंडोरे गुत्तेदार यांची आहे. हया कमी दरात काम करणे कसे शक्य आहे. याबाबत पत्र क्र.मनपा/युजीडी-१/९७२/९३, दि.३०.०७.९३ द्वारे खुलासा श्री.एस.एम.मंडोरे गुत्तेदार मागीतला असतांना त्याच्या खुलासा वरुन त्यांनी अंदाजपत्रकीय दराच्या १६% कमी दराने सदर काम करण्यास अनुमती दिली आहे. करिता सदर काम श्री.एस.एम.मंडोरे गुत्तेदार मागितला असतांना त्याच्या खुलासा वरुन त्यांनी अंदाजपत्रकीय दराच्या १६% कमी दराने सदर काम करण्या अनुमती दिली आहे. करिता सदर काम श्री.एस.एम.मंडोरे गुत्तेदार यांचेकडून करुन घेण्यास प्रस्ताव विचारास्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सदर काम अंदाजपत्रकीय दराच्या १६% कमी दराने श्री.एस.एम.मंडोरे गुत्तेदार यांचे कडून करुन घेण्यास ठरावास प्रशासकीय मान्यता दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.११४ :-**

औरंगाबाद मंजूर विकास योजने नुसार ८० फुट रुंद रस्ता पंचायत समिती कार्यालय ते सिडको एरिया (तलाव पर्यंत) या प्रस्तावाने न.भु.क्र.११३२४/१० ही मिळकत बांधीव असून बांधीव क्षेत्र ६५.०० चौरस मिटर आहे. त्याची नुकसान भरपाई भूखंड धारकांना रु.३१०/- प्रती चौ.मी.दराने देण्याबाबत मा.प्रशासक यांनी मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे

न.भु.क्र.११३२४/१० चे मिळकत धारक श्रीमती नुरुन्नीसा बेगम भ्र.एस.एम.कमरुद्दीन जी.पी.ए.श्री.सय्यद मोहम्मद सिराजउद्दीन पिता एस.एस.कमरुद्दीन यांना मोबदल्याची रक्कम रुपये २०,१५०.०० (रुपये वीस हजार एकशे पन्नास मात्र) देण्यास मान्यता व्हावी.

**ठराव :-**

मंजूर विकास योजनेनुसार ८० फुट रुंद रस्ता पंचायत समिती कार्यालय ते सिडको एरिया (तलाव पर्यंत) प्रस्तावित न.भु.क्र.११३२४/१० ही बांधीव असून बाधीव क्षेत्र ६५.०० चौ.मी. साठी मिळकत धारक श्रीमती नुरुन्नीसा बेगम भ्र.एस.एम.कमरुद्दीन जी.पी.ए.श्री.सय्यद मो.सिराजउद्दीन पिता एस.एम.कमरुद्दीन यांना मोबदल्याची रक्कम रुपये २०,१५०/- (रुपये बिस हजार एकशे पन्नास रुपये फक्त) देण्यांस मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०८.०९.९३

**प्रस्ताव क्र.११५ :-**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहाच्या भोवती संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.१७/१०, दि.११.०७.९१ अन्वये रक्कम रुपये ७,५३,४००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी मिळालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.२०३/३० दि.०२.११.९१ अन्वये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.६३% कमी दराची मे.एस.एच.असोसिएटस यांचे निविदा दरास सर्वानुमते मान्यता प्राप्त झालेली आहे. माजी मनपा सदस्य श्री.रशिद मामू यांनी मागणी केली होती की, सदरची संरक्षित भिंतींची पुर्वीची जागा बदलून नवीन मार्क आऊट देण्यासाठी आग्रह धरण्यांत आला होता. दि.३०.०६.९३ ला मा.स.संचालक नगर रचना विभाग (महाजन साहेब) व नगर रचना अधिकारी (राजपूत साहेब) मा.शहर अभियंता (पाटील साहेब) व स.मा.नगरसेवक रशिद मामू यांची संयुक्त पाहणी अन्वये वरील प्रमाणे संरक्षित भिंत बांधण्याचे ठरले. त्यामुळे सदर कामाचे वाढीव कामामुळे सुधारित अंदाजपत्रक तसयार करावे लागले. सदर कामासाठी सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये १४,३६,१३७/- सन १९९२-९३ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.-दराने तयार करण्यांत आले आहे. पैकी मे.एस.एच.असोशिएट्स यांची रक्कम रुपये ४,१२,५६३/- चे काम केलेले आहे व उर्वरित रक्कम १०,२३,५७४/- चे कामासाठी मे.एस.एच.असोशिएट्स गुत्तेदार यांना अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७.६३% कमी दराने म्हणजे पुर्वीच्याच दराने करण्यास तयार आहात काय? विचारणा केली असता गुत्तेदाराने १९९२-९३ चे डी.एस.आर.अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार आहे असे दि.२३.०२.९३ अन्वये लेखी कळविले म्हणून सदर कामासाठी फेरनिविदा कार्यालयीन सूचना क्रमांक मनपा/राअ/१६५/९३, दि.२३.०४.९३ अन्वये दैनिक सिटीजन्स, लोकविजय इ.वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा विक्री झाल्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (३) निविदा

विक्री झाल्या. निविदा तारखेपर्यंत एकूण (३) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक ०७.०५.९३ ला उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यांत आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पाटील कन्स्ट्रक्शन | - | ८% जास्त दराने |
| २. | कुलवंतसिंग | - | ११% जास्त दराने |
| ३. | मो.सलीम | - | १०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% (आठ) जास्त दराची मे.पाटील कन्स्ट्रक्शन याची निविदा दर आहे. मा.प्रशासक यांचेशी दि.१४.०५.९३ अन्वये झालेल्या दराचे वाटाघाटी अन्वये सदरचे काम ८% ऐवजी ४.५% जास्त दराने करण्यास मा.प्रशासकांची मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच गुत्तेदारानेही त्यास लेखी सम्मती दिलेली आहे.

सबब सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये १४,३६,१३७/- चे अंदाजपत्रकास व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५% जास्त दराची मे.पाटील कन्स्ट्रक्शन यांचे निविदा मंजूरी साठी प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर. सदरचा खर्च मेरी गो-राऊंडचे काम रद्द करुन सदरचे काम शासकीय अनुदानातून करावा.

**ठराव :-**

शहर अभियंता यांनी प्रस्तावित केल्या प्रमाणे सिध्दार्थ उद्यानाच्या सभोवती संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रुपये १४,३६,१३७/- चे सुधारित अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम मे.पाटील कन्स्ट्रक्शन गुत्तेदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५% जास्त दराने करुन घेण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. सदरचा खर्च शासकीय अनुदाना अंतर्गत मेरी गो राऊंड चे काम रद्द करुन संरक्षित भिंतीचे काम शासकीय अनुदानातून घेण्यांत यावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०९.०९.१९९३

**प्रस्ताव क्र.११६ :-**

शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.टिपीएस-३०८६/४५४/सी.आर.-५९/८८ नवि-१२, दि.१५.१०.९१ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या हया वाढीव हद्दीसाठीची विकास योजना मंजूर झाली असून दिनांक १९.११.९१ पासून अंमलात आलेली आहे. या मंजूर विकास योजनेत बीड वळण रस्त्यापासून दक्षिणेस ३६ मी रुंद रस्त्याची आखणी केली असून हा रस्ता पुढे सातार ग्रामपंचायतीच्या हद्दीतून नाथ व्हॅली पब्लीक स्कुल पासून पैठण रस्त्याला जोडला जातो. शहरातील आणि बीड वळण रस्त्यावरील रहदारी सुरळीत होणेसाठी या रस्त्याचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी महानगरपालिका हद्दीतील खालील स.न.गट क्र.मधून या रस्त्याची आखणी केलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शहानूरवाडी | - | सर्व्हे नं.२३ व २४ |
| २. | मुस्तफाबाद | - | सर्व्हे नं.४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | सातारा | - | गट नं.७३,७४,७५ |
| ४. | कांचनवाडी | - | गट नं.१०,११,१२,१३ |

वर प्रस्तावित केलेल्या जमिनीतून ३६ मी रुंद विकास योजना रस्त्यासाठी भूसंपादन करण्यासाठी प्रस्ताव मंजूरीसाठी सादर.

**ठराव :-**

औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीसाठी मंजूर झालेल्या विकास योजनेनुसार शहरातील रदहारी सुरळीत होण्याच्या दृष्टीने बीड वळण रस्त्याला पुन्हा पर्यायी रस्ता हा आणि मंजूर विकास योजनेनुसार ३६ मी रुंद रस्त्याची आखणी केलेली असल्याने बीड वळण रस्त्याच्या दक्षिणेपासून नाथ व्हॅली पब्लीक स्कुल ते पैठण रस्त्याला जोडणाऱ्या महापालिका हद्दीतील क्षेत्रासाठी शहानुरवाडी चे सन २३,२४ मुस्तफाबाद स.नं.४ सातार गट नं.७३,७४, व ५३ आणि कांचनवाडी गट नं.१०,११,१२,१३,१५ आणि १६ मधून ३६ मी रुंद रस्त्यासाठी विकास योजने प्रमाणे बांधीत होणाऱ्या जागेचे भूसंपादन करण्यास मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.११७ :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासन निर्णय क्र.एम.एसी/१६९२/४९८/ सी.आर./३८/९२ नवि-२४, दि.२६ ऑगस्ट, १९९३ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन अधिकारी या पदाची श्रेणीवाढ वेतनश्रेणी रु.२०००-६०-२३०० द.रो.३२००-१००-३५०० दि.१ सप्टेंबर १९८७ पासून करण्यांस मंजूरी दिलेली आहे. तथापि औरंगाबाद मनपामध्ये "अग्निशमन अधिकारी" पदनाम असून शासनाने "मुख्य अग्निशमन अधिकारी" पदनामास मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे मनपा आस्थापनेवरील पदनामात दुरुस्ती करुन "मुख्य अग्नीमशन अधिकारी" पदनाम ठेवावे लागेल. तसेच सध्या कार्यरत असलेले "अग्निमशन अधिकारी" श्री शिवाजी झनझन यांना या श्रेणीवाढीचा लाभ द्यावा लागेल करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

उपरोक्त प्रस्तावात नमूद केल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "अग्नीशमन अधिकारी" या पदनामाऐवजी "मुख्य अग्नीशमन अधिकारी" हे पदनाम करण्यास व सध्या कार्यरत असलेले अग्नीशमन अधिकारी श्री.शिवाजी झनझन यांना सदरील पदनाम देवून श्रेणीवाढ वेतनश्रेणी रु.२०६०-२३०० द.रो.७५-३२००-१००-३५०० दि.०१ सप्टेंबर, १९८७ पासून लागू करण्यांस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-१५.०९.९३

**प्रस्ताव क्र.११८ :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री/श्रीमती (१) ज्योती चंपालाल खिंवसरा, (२) शिला चंपालाल खिंवसरा, (३) उल्का चंपालाल खिंवसरा, (४) वर्षा चंपालाल खिंवसरा यांनी पत्र क्र.डीएलव्ही/२२/१९९३, दि.२६.०७.९३, श्री.रविंद्र चंपालाल खिंवसरा यांनी त्याचे पत्र क्रमांक डीएलव्ही/२०/१९९३, दिनांक २६.०७.९३ व श्री.चंपालाल कन्हैय्यालाल खिंवसरा यांनी पत्र क्रमांक डीएलव्ही/२१/१९९३, दि.२६.०७.९३ अन्वये श्री.दिनेश एल, वकील गंगापूरवाला या वकिला मार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खालील आरक्षणासंबंधी खरेदी सूचना दिली आहे.

| **अ.क्र.** | **आरक्षण क्रमांक** | | **आरक्षणाचा तपशिल** | **विकास योजना अहवालाप्रमाणे क्षेत्र ए . गु** |
|---|---|---|---|---|
| १. | १५२ | - | खुली जागा | १६.१९ |
| २. | १५३ | - | माध्यमिक शाळा व क्रीडांगण | ०३.२७ |
| ३. | १५४ | - | वाचनालय | ००.२७ |
| ४. | १५५ | - | आरोग्य केंद्र | ००.३३ |
| ५. | १५६ | - | दुकान केंद्र | ००.३३ |
| ६. | १५७ | - | खुली जागा | ०५.१२ |
| ७. | १५८ | - | प्राथमिक शाळा व क्रिडांगण | ०३.१० |

वरील आरक्षणापैकी अ.क्र.६ वरील आरक्षण क्रमांक १५७ "खुली जागा" साठी ठराव क्रमांक १५७/१ दिनांक ११.०४.९१ भूसंपादन करण्याचा ठराव झाल्याप्रमाणे भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यात येत असून अ.क्र.२ वरील आरक्षण क्र.१५३ "माध्यमिक शाळा व क्रिडांगण" साठी विकास योजना अहवालात भूसंपादन संस्था, जिल्हा परिषद, औरंगाबाद असल्याने त्यांनी खरेदी सूचना दिल्यापासून ६ महिन्याच्या आत भूसंपादन करावे. म्हणून कळविण्यांत येईल व उर्वरित आरक्षणांसाठी औरंगाबाद महानगरपालिका नियोजन प्राधिकरण व भूसंपादन संस्था असल्याने अ.क्र.१,३ ते ५ व ७ साठी भूसंपादन करणेसाठी प्रस्ताव मंजूरीसाठी सादर.

**ठराव :-**

औरंगाबाद शहराची विकास योजना १९७५ साली मंजूर झाली व यास १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने गारखेडा भागातील व प्रस्तावात दर्शविलेल्या आरक्षणाच्या संदर्भात श्रीमती वर्षा चंपालाल खिंवसरा व इतर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिली आहे. त्यामुळे खरेदी सूचना मिळालेपासून ६ महिन्यात भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. अन्यथा ही आरक्षणे व्यपगत होतील तसेच आरक्षण क्र.१५३ "माध्यमिक शाळा" साठी जिल्हा परिषद, औरंगाबाद ही भूसंपादन संस्था असल्याने या आरक्षणाचे भूसंपादन हे जिल्हा परिषद औरंगाबाद यांना करावे लागणार असल्याने आणि आरक्षण क्र.१५७ "खुली जागा" संपादन करण्यासाठी दिनांक ११.०४.९१ अन्वये ठराव संमत झालेला असल्याने व उर्वरित आरक्षणासाठी भूसंपादन

संस्था, महानगरपालिका असल्याने आता खालील आरक्षणाच्या संदर्भात भूसंपादन करण्यासाठी मंजूरी देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | | विकास योजना अहवालाप्रमाणे क्षेत्र लागू ए . गु | आरक्षणाचा उद्देश |
|---|---|---|---|---|
| १. | १५२ | - | १६.१९ | खुली जागा |
| २. | १५४ | - | ००.२७ | वाचनालय |
| ३. | १५५ | - | ००.३३ | आरोग्य केंद्र |
| ४. | १५६ | - | ००.३३ | दुकान केंद्र |
| ५. | १५८ | - | ०३.१० | प्राथमिक शाळा व क्रिडांगण |

भूसंपादनाचे वरील प्रस्ताव तातडीने जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावयाची कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-१६.०९.९३

**प्रस्ताव क्र.११९ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कोटला कॉलनी जलकुंभाची संरक्षित भिंतीची उंची वाढविणे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याची दरसुची सन १९९२-९३ नुसार रक्कम ५०,८८,६५०/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा-१ या विभागाच्या भांडवली कामासाठी करण्यांत आलेल्या तरतूदी मधून करण्यांत येईल.

या कार्यालयाची निविदा सूचना क्र.०४/१९९३-९४ जी की, दैनिक लोकविजय व रहेबर या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १६ कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्याचे दिनांक २७.०७.९३ रोजी निविदा पेटी उघडण्यांत आली असता निदर्शनास आले आहे. प्राप्त निविदांच्या तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणेचा आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बी.एम.काथार | - | ७.१२% जास्त. |
| २. | श्री.क्यु.के.दुरानी | - | ४.९९% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री.क्यु.के.दुरानी यांचा आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा.प्रशासक यांच्या दालनात दिनांक ०४.०९.९३ रोजी ठेकेदार श्री.क्यु.के.दुर्रानी यांच्या बरोबर दराबाबत वाटाघाटी करण्यांत आली असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त या दरास ठेकेदारांनी मान्यता देवून त्यास मा.प्रशासक यांनी मान्यता मान्य केले आहे.

करिता वाटाघाटी अंतीचा श्री.क्यु.के.दुर्रानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची श्री.क्यु.के.दुर्रानी यांची निविदा स्विकारण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-१७.०९.९३

**प्रस्ताव क्र.१२० :-**

उपआयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कामगार अधिकारी यांना ठराव क्रमांक ७९, दि.०७.०८.९३ अन्वये अधिकारी प्रदान करण्यांत आले आहे. परंतू काही अधिकारी व कर्तव्य कामगार अधिकारी यांना प्रदान करणे योग्य पुढीलप्रमाणे -

१. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी उपहार गृह विश्रांतीगृह पाळणाघर, पिण्याचे पाणी, बाथरुम व संडास, वाहनासाठी स्टॅण्ड इ.सवलती मिळवून देणेसाठी प्रशासनास मार्गदर्शन करणे व त्यासाठी साह्य करणे.

२. कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती व प्राथमिक शाळेतील मुलांना गणवेश पुस्तके व मुलांना दत्तक घेणे इत्यादी योजना लागू करणे.

३. कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी व उन्नतीसाठी कर्मचाऱ्यांच्या भाषेत समजावून सांगणे, कामाचा दर्जा उंचावणे कायद्याची माहिती देणे इ.बाबींसाठी कल्याणकारी कार्यकर्त्यांची (Welfare Workers) ची नेमणूक करणे.

४. कामगार अधिकारी हा कर्मचारी सेवा भरती व पदोन्नती निवड समितीचा एक प्रतिनिधी असतील.

५. कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणासाठी किंवा कर्मचाऱ्यांसाठी सहल, दौरा फिरती पर्यटन भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी काढणे.

६. कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी किंवा कर्मचाऱ्यांसाठी सहल, दौरा, फिरता पर्यटन भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी काढणे.श

७. दैनिक वेतनावर ज्या नेमणूका होतात त्यावर अंकुश ठेवणे. दैनिक वेतनावरील नेमणूकीच्या संचिकेच्या कायदेशिर मत देणे व प्रशासनास कायदेशिर मार्गदर्शन करणे.

८. कर्मचाऱ्यांसाठी आणि त्यांच्या कुटूंबासाठी व मुलाबाळांसाठी कल्याण केंद्राची (Welfare Centres) ची निर्मिती करणे व त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या कल्याण व उन्नतीसाठी योजना राबविणे व कल्याण केंद्रासाठी फर्निचर खरेदी करणे, त्याची दुरुस्ती करणे, स्टॉकची चौकशी करणे, कल्याण केंद्राच्या इमारतीची दुरुस्ती करणे, हयात असलेल्या वस्तुची नोंदवही ठेवणे, त्यामध्ये बालवाड्या, कला पथक, वाद्य समूह संगित इत्यादी चालविणे.

९. कर्मचाऱ्यांसाठी सामाजिक स्नेह, खेळ, क्रिडा, कौतूक करमणूक, मनोरंजन अंतर्गत खेळाच्या स्पर्धा, वादविवाद, विद्याविषयक स्पर्धा, साक्षरता अभियान इत्यादी बाबत कार्यक्रम राबविणे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कामगार अधिकारी यांना अधिकारी व कर्तव्य प्रदान करण्यांत येते. व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-१८.०९.१९९३

**प्रस्ताव क्र.१२१ :-**

अति.शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, सन १९९३-९४ या वर्षाकरिता विद्युत साहित्य खरेदी करण्याकरिता रक्कम रु.०३,०६,२५०.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरचा खर्च सन १९९३-९४ च्या विद्युत साहित्य खरेदी, या शिर्षकाखाली करण्यांत येईल.

सदर साहित्य खरेदी करण्याकरिता फिलीप्स, बजाज, क्रॉम्ट्रन, व सिमा मेकच्या अधिकृत पुरवठा धारकांकडून दरपत्रके मागविली असता एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | मे.पगारिया इंटरप्रायझेर | मे.सत्य इलेक्ट्रीकल्स | मे.मेघदुत इले. ॲण्ड इलेक्ट्रानिक्स |
|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ |
| १ | ४८४० वॅट स्ट्रीट लाईट फ्लोरोसेट ट्युब फिटीग्स | ६१६.०० प्रति नग | ६११.०० प्रति नग | ६२५.०० प्रति नग |

उपरोक्त दरपत्रकापैकी मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांच्या दरपत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे रक्कम रु.६११/- प्रति नग याप्रमाणे आहेत.

तरी रक्कम रु.३,०६,२५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच उपरोक्त विद्युत साहित्य मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून रक्कम रु.६११/- प्रति नग प्रमाणे खरेदी करण्यांस मान्यता मिळावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अति.शहर अभियंता यांच्या प्रस्तावानुसार सन १९९३-९४ या वर्षाकरिता उपरोक्त दर्शविलेले विद्युत साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,०६,२५०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच सदर साहित्य मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांच्या कडून रु.६११/- प्रति नग याप्रमाणे खरेदी करण्यांस मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**विषय क्र.१२२ :-**

अति.शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, सन १९९३-९४ या वर्षाकरिता विद्युत साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरिता रक्कम रु.५,२४,५२५.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरचा खर्च सन १९९३-९४ या वर्षाच्या "विद्युत साहित्य खरेदी" या शिर्षकाखाली करण्यांत येईल.

सदर साहित्य खरेदी करण्यांकरिता फिलीप्स, बजाज, कॉम्प्ट्रन व सिमा मेक या कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून दरपत्रके मागविली असता एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली त्याचा तपशिल पुढील प्रमाणे

| अ.क्र. | साहित्यांचे नांव | पगारिया एंटरप्रायजेस | मे.सत्य इलेक्ट्रीकल्स | मे.मेघदूत इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स |
|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ |
| | | प्रति नग | प्रति नग | प्रति नग |
| १. | १०० वॅट, २५०/२३० व्होल्ट बल्ब | १०.९० | ११.२५ | १०.५० |
| २. | ६० वॅट बल्ब | ९.०९ | ०९.०५ | ९.०० |
| ३. | ४० वॅट बल्ब | ९.०९ | ०९.०५ | ९.०० |
| ४. | हॅलोजन लॅम्प १०० वॅट व्होल्ट | ४४१.०० | ४३९.०० | ४५०.०० |
| ५. | १२५ वॅट मर्क्युरी बल्ब | १७५.०० | १७४.०० | १८९.०० |
| ६. | २५० वॅट मर्क्युरी बल्ब | ३५०.९० | ३५५.०० | ३५०.०० |
| ७. | १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | ९०१.०० | ९०५.०० | ९१५.०० |
| ८. | २५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | १०२७.०० | १०५१.०० | १०२५.०० |
| ९. | १२५ वॅट मर्क्यूरी लॅम्प चोक | ३३३.०० | ३३५.०० | ३१०.०० |
| १०. | २५० वॅट मर्क्युरी लॅम्प चोक | ४५४.०० | ४५१.०० | ४५०.०० |
| ११. | १५० वॅट सोडीयम व्हेपर चोक | ५०७.०० | ५०६.०० | ५०५.०० |
| १२. | २५० वॅट सोडीयम व्हेपर चोक | ७७७.०० | ७७६.०० | ७७०.०० |
| १३. | १५०/४०० वॅट सोडीयम व्हेपर इनेटर | ३७९.७९ | ३८४.०० | ३९९.०० |

वरील दरपत्रकापैकी ॲटम क्र.७ व १३ करिता मे.पगारिया इंटरप्रायझेस, ॲटम क्र.४ व ५ करिता मे.सत्य इलेक्ट्रीकल्स व ॲटम क्र.१,२,३,६,८,९,१०,११ व १२ करिता मे.मेघदूत इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व दर्शविल्याप्रमाणे आहेत.

तरी रक्कम रु.५,२४,५२५.०० चे अंदाजपत्रकास तसेच सदर साहित्य वर दर्शविल्याप्रमाणे वरील एजन्सीकडून त्यांनी दिलेल्या दराप्रमाणे खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अति.शहर अभियंता यांच्या प्रस्तावानुसार सन १९९३-९४ या वर्षाकरिता विद्युत साहित्य खरेदी करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,२४,५२५/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच ॲटम क्र.७ व १३ मे.पगारिया इंटरप्रायझेस ॲटम क्र. ४ व ५ मे.सत्य इलेक्ट्रीकल्स व ॲटम क्र.१,२,३,६,८,९,१०,११ व १२ मे.मेघदूत इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेट्रॉनिक्स यांच्याकडून वर दर्शविलेल्या दराप्रमाणे खरेदी करण्यांस मान्यता देण्यांत येते. ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.१२३ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मजनुहील येथील उद्यानाचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये २,४४,००३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरचा खर्च सन १९९०-९१ मधील शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

सदर कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण नऊ निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत या पैकी फक्त चार निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | ५.०० टक्के जास्त दराने |
| २. | मे.ओम शांती इलेक्ट्रीकल्स | - | १.३८ टक्के कमी दराने |
| ३. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | ३.०० टक्के जास्त दराने |

वरील निविदापैकी मे.ओम शांती इलेक्ट्रीकल्स यांचा निविदापत्रकाचे दर तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३८ टक्के कमी आहेत.

तरी रक्कम रुपये २,४४,००३/- अंदाजपत्रक तसेच मे.ओम शांती इलेक्ट्रीकल्स यांची सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३८ टक्के कमी दराची निविदा स्विकारणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांच्या प्रस्तावानुसार मजनूहील येथील उद्यानाचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये २,४४,००३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम मे.ओम शांती इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३८ टक्के कमी दराने करुन घेण्यांस मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.१२४ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महेशनगर ते बसैय्येनगर मार्ग विद्यानिकेतन यु.सी.आर.एस.गटार बांधणेच्या कामाकरिता कार्यालयीन आदेश यु.का.अ./४२२/९३, दि.२९.०६.९३ द्वारे दैनिक नवामराठा व दैनिक औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण १९ निविदा विकण्यांत आल्या. त्यापैकी केवळ २ निविदा प्राप्त झाल्या या निविदा उपलब्ध गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% जास्तीने मे.गॉडबीन कन्स्ट्रक्शन कं.मुंबई यांची निविदा आहे.

सदर दर जास्त वाटत असल्यामुळे मे.गॉडबिन कंन्स्ट्रक्शन कं.मुंबई यांना पत्र क्र.युजीडी/१०१४/९३, दि.१२.०८.९३ देऊन मा.आयुक्त यांचे दालनात प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलाविले असता संबंधिताने २०% जास्तीने मान्य करण्यांत आले आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.गॉडविन कंन्स्ट्रक्शन कं.मुंबई यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्तीने (वाटाघाटीनुसार) या दराने सदर काम करुन घेण्यांस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१२५ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.किलेअर्क (व्ही.आय.पी.रोड) येथे ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता कार्यालयीन आदेश क्र.का.अ./४२२/९३, दैनिक नवामराठा व दैनिक औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण २२ निविदा विकण्यांत आल्या व त्यापैकी फक्त १० निविदा प्राप्त झाल्या या निविदा उपलब्ध गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.१०% कमीने श्री.शेख सलीम अहेमद गुत्तेदार औरंगाबाद यांची निविदा आहे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.शेख सलीम अहेमद गुत्तेदार औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.१०% कमीने सदर काम करुन घेण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१२६ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.कैसर कॉलनी येथे गटार बांधणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९९२-९३ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये १,१८,०००/- चे तयार करण्यांत आले विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला कैसर कॉलनी येथे गटार बांधणेच्या कामाकरिता रक्कम रुपये १,१८,०००/- कामाकरिता रक्कम रुपये १,१८,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२०.०९.९३

**प्रस्ताव क्र.१२७ :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ मध्ये नमूद केले नुसार महानगरपालिका हद्दीत खालील व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना व त्या अनुषंगाने एखाद्या जागेचा विशिष्ट करणास्तव वापर करणे बाबत अधिनियमाच्या कलम ४५८ (२०) अन्वये उपविधी तयार करण्यांत आले असून सदरील उपविधी मंजूर करणेस्तव प्रस्ताव सादर करण्यांत येतो तसेच सदरील व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना महानगरपालिकेतर्फे परवाने देणे आवश्यक असल्याने महापालिकेतर्फे अशा व्यवसायांना परवाने देणेस मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर करण्यांत येतो.

१. जनावरांचे अवयव, रक्त, हाडे, चामडे इ.संबंधीचे व्यवसाय.
२. फटाके, बंदुकीची दारु व इतर उत्पादने.
३. चामडी, कातडी, कमावलेली कातडी अगर चामड्याचा माल यांचे उत्पादन.
४. रंगारी कामा संबंधी.
५. लोकर, केस धणे, सुकवणे.
६. तेल उकळणे, अथवा गाळणे.
७. पावरलुमसाठी वापरावयाची जागा.
८. विडी तयार करावयाचा जागा.
९. केशकर्तनालय, न्हाव्यांची दुकाने.
१०. धोबी घाटच्या वापरा बाबत.
११. मिठ, हळद मसाला, बनविण्यासाठी वापरावयाच्या जागा.
१२. भात उकडणेसाठी वापरात येणाऱ्या जागा.
१३. भात कांडपाच्या जागा.
१४. बर्फे, ऑईस कॅडी, आईस फ्रुट अगर आईसस्क्रीम तयार करणे.
१५. बेकींग अगर पाव, बिस्कीटे अगर पिठाचे बनविलेले अन्य पदार्थ.

**ठराव :-**

उपरोक्त प्रस्तावात दर्शविलेल्या व्यवसायांना परवाने तसेच त्या अनुषंगाने विशिष्ट वापरात असणाऱ्या जागा संबंधात तयार करण्यांत आलेले सोबत जोडले प्रमाणे उपविधीस तसेच अधिनियमाचे कलम ३८६ (२) अन्वये आवश्यक असलेल्या फीससह प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२१.०९.९३

**प्रस्ताव क्र.१२८ :-**

सिडको विभाग क्र.७ व चिकलठाणा व इतर भाग, विभाग क्र.५ यामधील जलवाहिनीची देखभाल व दुरुस्तीचे अंदाजपत्रक ५,४७,२५०/- सन १९९२-९३ चा जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले आहे. अंदाजपत्रक मंजूरीसाठी सादर.

**ठराव :-**

झोन क्र.७ व ५ मधील जलवाहिनीच्या दुरुस्ती व देखभालचे अंदाजपत्रक रु.५,४७,२५०/- मंजूरी देण्यांत येत आहे.नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करणे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२३.०९.९३

**प्रस्ताव क्र.१२९ :-**

कमी खर्चाचे जलधौत स्वच्छता योजने अंतर्गत कामावर लागणाऱ्या मेनहोलचे फ्रेम व कव्हरचे अंदाजपत्रक रु.९,६७,५००/- तयार करण्यांत आले. सदर अंदाजपत्रकाला मंजूरी देणे योग्य.

**ठराव :-**

कमी खर्चाचे जलधौत स्वच्छता योजने अंतर्गत कामावर लागणाऱ्या मेनहोलचे फ्रेम व कव्हरचे अंदाजपत्रक रु.९,६७,५००/- ला मंजूरी देण्यांत येते. सदर खर्च कमी खर्चाचे जलधौत स्वच्छता योजने अंतर्गत कामाच्या खर्चामधून करण्यांत यावा.

नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करणे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२४.०९.९३

**प्रस्ताव क्र.१३० :-**

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे पत्र क्र.टीपीएस-३०८५/१७८९/सी.आर.-१८२/नवि-६, दि.२५.०२.८८ नुसार औरंगाबाद विकास योजनेतील सी.स.नं.२९६३. चा वापर "स्टेडीयम" वापर बदलून तो "व्यापारी" उपयोगासाठी करण्याच्या प्रस्तावास शासनाने तत्वतः मान्य केले आहे. व याच पत्रामध्ये शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेस वरीलप्रमाणे बदलाचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेर बदलाचा प्रस्ताव करण्याचा आदेश दिलेला आहे व जागेवरील परिस्थितीनुसार वरीलप्रमाणे बदल आवश्यक वाटतो.

वरील प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयास मंजूरी मिळावी.

**ठराव :-**

औरंगाबाद शहराच्या जुन्या विकास योजनेतील सी.स.नं.२९३३ चा वापर "स्टेडियम" वापर बदलून तो "व्यापारी" उपयोगासाठी करणे आवश्यक आहे. असे शासनाचे पत्र क्र.टी.पी.एम.-३०८५१७८९/सी.आर.-१८२/नवि-६, दि.२५.०२.८८ अन्वये निर्देश दिलेले आहेत. सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ खाली किरकोळ फेरबदल जो सोबतचे नकाशात हिरव्या रंगाने दाखविलेला आहे. त्याप्रमाणे करावयास मान्यता देण्यांत येत आहे. पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१३१ :-**

मा.शहर अभियंता हयांनी प्रस्ताव दिला आहे की, मो.संजय नगर मुकूंदवाडी भागात खडी रस्ता तयार करणे करिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन १९९१-९२ चे दरसुची अनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,८०,०००/- चे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी दि.१२.०५.९२ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्यानुसार निविदाद्वारे स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून फेर निविदा मागविण्यांत आल्या असता कोरे निविदा विकण्याचे तारखेपर्यंत एकूण (१६) सोळा निविदा विकण्यांत आल्यात व मोहोरबंद निविदा स्विकारण्याचे तारखेस फक्त (४) चार निविदा प्राप्त झाल्यात ठेकेदारांचे प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदाराने दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.ए.पी.जाधव | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त |
| २. | एस.एच.असोशिएटस | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त |
| ३. | श्री.एस.एम.मंडोरे | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.०५% कमी |
| ४. | श्री.सी.एस.शहा | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.एस.एम.मंडोरे यांचे टेंडर कमी दराचे असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.०५% कमी आहे. करिता श्री.एस.एस.मंडोरे हयांचे अंदाजपत्रकचे दरापेक्षा कमी असते. टेंडर मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.संजयनगर मुकूंदवाडी भागात खडी रस्ता तयार करण्याचे कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.०५% कमी दराचे गुत्तेदार श्री.एस.एम.मंडोरे यांचे निविदापत्रकास मंजूरी व मान्यता देण्यांत येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१३२ :-**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मोहल्ला चिकलठाणा येथे खडीरस्ता व ह्युमपाईप कल्व्हर्टचे बांधण्याचे कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन १९९१-९२ चे दरसुची अनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,०८,०००.०० चे तयार करण्यांत आले

असून मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी दि.२९.०४.९२ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्यानुसार निविदाद्वारे स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून फेर निविदा मागविण्यांत आल्या असता कोरे निविदा विकण्याचे तारखेपर्यंत एकूण १२ निविदा विकण्यांत आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याच्या तारखेस फक्त (५) पांच निविदा प्राप्त झाल्यास ठेकेदारांचे प्राप्त झालेल्या निविदा उघडल्यानंतर ठेकेदारांने दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आर.ए.शेख | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.८६% कमी |
| २. | जी.एस.पवार | | |
| ३. | सय्यद सिराजउद्दीन | - | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २४.११% कमी |
| ४. | एस.एम.मंडोरे | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.७% कमी |
| ५. | सुखबिर सिंग | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५ % कमी |

तुलनात्मकदृष्ट्या श्री.सुखबिरसिंग हयांचे टेन्डर कमी दराचे असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५% कमी दराचे आहे. संबंधित गुत्तेदाराकडून दर पृथ्थकरण मागविले असता हयांनी स्वत:चे ट्रक रोड रोलर आणि कायमस्वरुपी मंजूर असल्याने इतके कमी दर परवडतील तसेच संबंधित ठेकेदाराने १०% रुपयाच्या मुद्रकांवर कामाचा दर्जा चांगला राहील. असे हमी पत्र लिहून दिले आहे करिता श्री.सुखबिर सिंग हयाचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५.५% कमी दराची निविदा मंजूर व विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.चिकलठाणा येथे खडीरस्ता व ह्युम पाईप कल्वर्टचे बांधण्याचे कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या व संबंधित ठेकेदाराने १०/- रुपयाच्या मुद्रकांवर दिलेल्या हमीनुसार कामाचा दर्जा चांगला राहील. या अटीवर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५% कमी दराचे श्री.सुखबिर सिंग यांचे निविदा मंजूरी व मान्यता देण्यांत येते. मात्र मा.प्रशासक साहेबांनी २.५० (लाखापर्यंत काम करण्याची अनुपस्थिती दिली आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२७.०९.९३

**प्रस्ताव क्र.१३३ :-**

आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या संदर्भात शासनाने प्रभाग रचनेस ८ जुलै, १९९३ रोजी अंतिम मंजूरी दिली असून प्रभाग निहाय मतदार याद्या अंतिम दिल्या तयार करण्यासाठी ०१.०९.९३ रोजी अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करुन सहाय्यक जिल्हाधिकारी औरंगाबाद यांची पदानिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. तसेच प्रभाग रचनेस श्री.शालीग्राम बसैये व इतर आणि तकी हसन खॉंन यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जे आव्हान दिले होते ती संचिका ही मा.उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. आता महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक घेण्यांची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची असून काही वैधानिक अडचणी न झाल्यास अगर शासनाकडून वा न्यायालयाकडून मनाई हुकूम न मिळाल्यास ती येत्या ४ ते ६ महिन्यांत पार पाडणे आवश्यक असलेले साहित्य, स्टेशनरी, छपाई काम, कपाट लोखंडी पेटी, इत्यादी

संकलन करुन घेणे. खरेदी करुन घेणे, कामाची कालमर्यादा लक्षात घेता तातडीने करुन घेणे आवश्यक आहे. निवडणूक कामासाठी जे साहित्य आवश्यक आहे. त्यापैकी बहुतेक साहित्याचे दर मनपाने निश्चित केलेले आहे. त्याच दराने खरेदी करण्याबाबत आणि ज्यांचे दर निश्चित केलेले नाहीत. त्याबाबत निवडणूकीच्या कामाचे महत्व व कालमर्यादा लक्षात घेता त्यांच्या बाबतीत कमीत कमी तीन सिलबंद दरपत्रके (कोटेशन) मागवून कमी दराच्या दरपत्रकाच्या आधारे निवडणूकीच्या कामासाठी लागणारे साहित्य, छपाई, काम करुन घेण्यांचे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करीत आहे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका आगामी सार्वत्रिक निवडणूकीच्या कामाकरिता लागणारे साहित्य व छपाईचे काम महानगरपालिकेने ठरविलेल्या मंजूर दरानुसार खरेदी करणे व छपाईचे काम करुन घेण्याचे मंजूरी देण्यांत येते. तसेच ज्या साहित्याचे व छपाईचे दर मंजूर नाहीत त्या बाबत तीन मोहोरबंद दरपत्रके (कोटेशन) मागवून कमी दराच्या दरपत्रक धारकांकडून खरेदी/छपाईचे काम करुन घेण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१३४ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर भागात १५० मी.मी.व ३०० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता सुचना क्र.३/९३-९४ जा.क्र./मनपा/का.अ./११३६/९३, दि.२०.०८.९३ (दुसरी वेळ) द्वारे दैनिक नवा मराठा व दैनिक औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण १६ निविदा विकण्यांत आल्या व त्यापैकी केवळ २ निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमीने श्री.स.रफिकउद्दीन यांचे दर आहे.

तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमीने श्री.रफिकउद्दीन गुत्तेदार औरंगाबाद यांच्याकडून सदर काम करुन घेण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२८.०९.९३

**प्रस्ताव क्र.१३५ :-**

मोहल्ला आंबेडकरनगर भागातील उर्वरित भागात नवीन जलवाहिनी टाकणे बाबतचे अंदाजपत्रक २,८८,६४५/- रुपयाचे तयार करण्यांत आले सदर अंदाजपत्रकास मंजूरी देणे योग्य.

**ठराव :-**

मोहल्ला आंबेडकरनगर भागातील उर्वरित भागात नवीन जलवाहिनी टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रु.२,८८,६४५/- ला मंजूरी देण्यांत येते.

सदरचा खर्च कमकुवत घटक कल्याण निधी मधून करण्यांत यावा.

नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करणे.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.१३६ :-**

मा.शहर अभियंता हयांनी प्रस्ताव दिला आहे की, मो.प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथै खांडकी पेव्हींग करणे बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन १९९१-९२ चे दर सुची अनुसार अंदाजपत्रक दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.३,४०,५५५/- चे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद हयांनी दिनांक २९.०४.९२ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्यानुसार निविदाद्वारे स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून फेर निविदा मागविल्या असता कोरे निविदा विकण्यांचे तारखेपर्यंत एकूण (३) तीन कोऱ्या निविदा विकण्यांत आल्या व मोहोरबंद निविदा स्विकारण्याच्या तारखेस फक्त तीनच (३) निविदा प्राप्त झाल्यात ठेकेदाराचे प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

१. श्री.शेख उमर - अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी
२. श्री.कैसर खान - अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.८% जास्त
३. श्री.सलीम अहमद - अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.०% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या श्री.शेख उमर यांचे टेंडर कमी दराचे असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी आहे. करिता संबंधित गुत्तेदारा शेख उमर यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा कमी असलेले टेंडर मंजूरी साठी विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथे खांडकी पेव्हींग करणे बाबतचे कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रक दरापेक्षा ००.०१% कमी दराचे गुत्तेदार श्री.शेख उमर यांचे निविदा पत्रकास मंजूरी व मान्यता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-३०.०९.९३

**प्रस्ताव क्र.१३७ :-**

पशुधन विकास अधिकारी महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा प्राणी संग्रहालय येथे सध्या चित्ते आणि काळविट यांची संख्या जास्त झाल्यामुळे खालील दर्शविलेल्या प्राणी संग्रहालयास रॉयल्टी (स्वामित्व शुल्क) आधारे देण्यांत यावे.

| अ.क्र. | प्राणी संग्रहालयाचे नांव | प्राणी संख्या | रॉयल्टी (स्वामीत्व शुल्क) |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ग्वाल्हेर प्राणी संग्रहालय (मध्यप्रदेश) | चित्ते (नर) १<br>(मादी - २<br>काळविट (नर) १<br>मादी-१ | ५०००.०० (प्रत्येकी)<br>५०००.०० (प्रत्येकी)<br>२०००.०० (प्रत्येकी)<br>२०००.०० (प्रत्येकी) |

तरी वरील प्रमाणे रॉयल्टी घेऊन वरील प्राणी उपनिर्दिष्ट प्राणी संग्रहालयास देण्यांत यावे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उपरोक्त प्राणी रॉयल्टी घेऊन ग्वाल्हेर प्राणी संग्रहालयास देण्यांस मान्यता देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.१३८ :-**

कार्यकारी अभियंता महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करतात की, जालना रोड ते बनेवाडी मुख्य जलनिःसारण वाहिनी क्र.भाग १ मधील उर्वरित काम (खिंवसरा पार्क, गारखेडा) पूर्ण करणे च्या कामासाठी सन १९९२-९३ च्या दरपत्रकानुसार रु.८,६७,१७०.०० चे तयार करण्यांत आले. सदरचा खर्च सन १९८९-९० च्या शासकीय अनुदानातून मागविण्यांत येणार आहे. या अंदाजपत्रकीय मा.प्रशासक यांनी दि.०३.०६.९३ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार रुपये ८,२५,८७७.०० च्या कामासाठी निविदा सूचना क्र.५/९३९४, दि.११.०६.९३ जे की, दै.सकाळमध्ये प्रसिध्दस देवून, प्रकट निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारिख ०९.०७.९३ पर्यंत १२ कोऱ्या निविदा विक्री झाल्या, तर निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस तीन नोव्हेंबर निविदा प्राप्त झाल्या असल्याचे दि.२०.०७.९३ रोजी पेटी उघडली असता दिसून आले. प्राप्त मोहरबंद उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे होते.

१. श्री.एस.एम.हक्क - अंदाजपत्रकापेक्षा २५% जास्त
२. श्री.एस.ए.नवाब - अंदाजपत्रकापेक्षा २०% जास्त
३. श्री.उदय इं.कंपनी - अंदाजपत्रकापेक्षा १५% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकापेक्षा १५% जास्त दराची निविदा उदय इंजि.कंपनी यांची होती. यावर मा.प्रशासक यांचे दि.२८.०७.९३ च्या तजवीज नुसार ठेकेदारांस दर वाटाघाटीस उपस्थित राहण्यासाठी कळविण्यांत आले. यानुसार ठेकेदार दर वाटाघाटीस उपस्थित राहिले व १५% अधिक ऐवजी १०% अधिकने काम करण्यास तक्रार असल्याचे लेखी दिले ज्यास की मा.प्रशासक यांनी ३१.०७.९३ रोजी मान्यता दिली आहे.

त्यानुसार जालनारोड ते बनेवाडी मुख्य जलनिःसारण वाहिनी फ भाग १ मधील उर्वरित कामासाठी मा.प्रशासक यांच्याशी दर वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे उदय इंजिनिअरिंग कंपनी यांची अंदाजपत्रकपेक्षा १०% अधिक दराची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालनारोड ते बनेवाडी मुख्य जलनिःसारण वाहिनी क्र.भाग १ मधील उर्वरित काम पूर्ण करणेसाठी वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे व ठेकेदाराने लेखी दिल्या प्रमाणे उदय इंजि.कंपनी यांची अंदाजपत्रकापेक्षा १०% अधिक दराची निविदा स्विकारण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१३९ :-**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सु.रा.भोसले, मुख्य लेखा परिक्षक (प्रतिनियुक्तीने) मनपा, औरंगाबाद यांचा प्रतिनियुक्तीचा दोन वर्षाचा कालावधी दि.१५.०९.९३ ला संपत आहे. श्री.सु.रा.भोसले मुख्य लेखा परिक्षक यांचा मनपातील प्रतिनियुक्तीचा कालावधी समाधानकारक असून मनपाचे लेखा परिक्षणाचे बरेचशे काम अजूनही प्रलंबित असल्याकारणाने श्री.सु.रा.भोसले मुख्य लेखा परिक्षक यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पुढील २ वर्षाकरिता वाढविणे योग्य राहील.

करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

श्री.सु.रा.भोसले मुख्य लेखा परिक्षक यांचा प्रतिनियुकतीचा कालावधी दि.१५.०९.९३ रोजी संपत असून त्यांचा प्रतिनियुकतीचा काळ समाधानकारक असल्याने त्यांना पुढील २ वर्षाकरिता प्रतिनियुक्तीच्या कालावधीस मुदत वाढ देण्यांस मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१४० :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५५ (२) अन्वये शासनाने प्राप्त अधिकाराचा वापर करुन शासन निर्णय क्र.एएमसी/१६८९/१३३०/सी.आर.-१०४/८९ नवि-२४, दि.१४.०३.९१ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४ नियम ५ मध्ये दुरुस्ती करुन जकात माफीच्या यादित क्र.१७ चा समावेश करुन वाणिज्य बी-बीयाने व किटक नाशके यावर दि.१६.०४.९१ पासून जकात माफ करण्यांस आली होती.

कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, सदरील वस्तुवर जकात माफी देऊन शेतकरी व शेती उद्योगास कोणताही फायदा किंवा फरक पडलेला नाही. दरम्यानच्या काळात एप्रिल-१९९१ ते ऑगस्ट १९९३ सदरील वस्तुवर जकात माफी दिल्यामुळे रु.४०,५२,२८४/- ची वसुली होऊ शकली नाही. पर्यायाने ज्यांच्या फायद्यासाठी जकात माफी शासनाने मंजूर केली होती. त्याचा उपयोग शेतकऱ्यांना झाला नाही व मनपा चे सुध्दा आर्थिक नुकसान झाले. करिता पुन्हा औरंगाबाद महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, शासनाने महानगरपालिकेच्या नियमास दि.१४.०३.९१ च्या निर्णयाप्रमाणे, जकात नियम

५ च्या जकात माफीच्या यादीतील क्र.१७ (वाणिज्य व बी-बीयाने व किटक नाशके) समावेश करुन जकात माफी दिली होती ती आता या प्रस्तावाव्दारे रद्द करण्यांत येऊन पूर्वव्रत जकात नियमावली नुसार जकात वसूली करण्यांस मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

उपरोक्त प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाने दिनांक १४.०४.९१ पासून उपरोक्त दर्शविलेल्या निर्णयानुसार जकात माफीच्या यादीतील क्र.१७ (वाणिज्य बी-बीयाने व किटक नाशके) ला जी जकात माफी दिलेली होती ती रद्द करण्यांत येत असून सदरील मालावर पूर्वव्रत जकात वसुल करण्यांत यावी. ठराव मंजूर वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-०४.१०.९३

**प्रस्ताव क्र.१४१ :-**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील बरेचसे मालमत्ताधारक अनधिकृतरित्या नळ जोडणी करुन घेतात आणि पर्यायाने महापालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान सोसावे लागणार आहे. अशा प्रकारे महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने अनधिकृत नळ जोडणी धारकांकडून नळाची फि वसुल व्हावी. यादृष्टीने दिनांक १७.०९.९३ रोजी सर्व संबंधित वरीष्ठ अधिकारी यांचे संयुक्त बैठकीत अनधिकृत नळ जोडणी नियमित करण्याकरिता विशेष मोहिम हाती घेऊन अनधिकृत नळ जोडणी नियमित करण्याकरिता खालीलप्रमाणे फी आकारण्याचा निर्णय घेण्यांत आला.

**<u>घोषित झोपडपट्टी वगळता इतर क्षेत्रासाठी</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | आगाऊ पाणीपट्टी | रु.४००/- |
| २. | नळ नियमित करण्याची फी | रु.६००/- |
| ३. | कम्पोडींग चार्जेस | रु.५००/- |
| ४. | बोरिंग व रस्ता दुरुस्ती चार्जेस | रु.५०/- |
| ५. | विहीत नमुना अर्ज | रु.१०/- |
| ६. | कोर्ट फीस स्टॅम्प | रु.१०/- |
| ७. | अद्यावत कर भरणा केल्याची पावती | |
| ८. | पी.आर.कार्ड व रजिस्टीची प्रत | |

**<u>घोषित झोपडपट्टीतील क्षेत्रासाठी</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | आगाऊ पाणीपट्टी | रु.४००/- |
| २. | नळ नियमित करण्याची फी | रु.६००/- |
| ३. | कम्पौंडींग चार्जेस | रु.२५०/- |
| ४. | बोरींग चार्जेस व रस्ता दुरुस्ती | रु.५०/- |
| ५. | विहीत नमुन्यातील अर्ज | रु.१०/- |
| ६. | कोर्ट फी स्टॅम्प | रु.१०/- |
| ७. | अद्यावत कर भरणा केल्याची पावती | |

या शिवाय अनधिकृत नळ जोडणी विशेष मोहीमेचे कार्य प्रभावी होण्याच्या दृष्टीने १०,००० पॉम्लेट प्रिंट करुन घेण्यांत त्यांचे विभागीय अधिकाऱ्यांमार्फत शहरात वाटप करण्यांत यावे. तसेच वृत्तपत्रात जाहिर निवेदन प्रसिध्द करण्यांत यावी. अशा प्रकारे विशेष मोहीम हाती घेण्यांसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोठ्या प्रमाणात होत असलेल्या अनधिकृत नळ जोडणीमुळे महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व अनधिकृत नळ जोडणी नियमित करणे सोईचे व्हावे यादृष्टीने दिनांक १७.०९.९३ रोजी वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठकीतील नियमानुसार विशेष मोहीमेद्वारे नळ जोडणी नियमित करण्यासाठी खालीलप्रमाणे फी आकारणी करण्यांस मान्यता देण्यांत येते.

**<u>घोषित झोपडपट्टी वगळता इतर क्षेत्रासाठी</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | आगाऊ पाणीपट्टी | रु.४००/- |
| २. | नळ नियमित करण्याची फी | रु.६००/- |
| ३. | कम्पौडींग चार्जेस | रु.५००/- |
| ४. | बोरिंग व रस्ता दुरुस्ती चार्जेस | रु.५०/- |
| ५. | विहीत नमुना अर्ज | रु.१०/- |
| ६. | कोर्ट फीस स्टॅम्प | रु.१०/- |
| ७. | अद्यावत कर भरणा केल्याची पावती | |
| ८. | पी.आर.कार्ड व रजिस्टीची प्रत | |

**<u>घोषित झोपडपट्टीतील क्षेत्रासाठी</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | आगाऊ पाणीपट्टी | रु.४००/- |
| २. | नळ नियमित करण्याची फी | रु.६००/- |
| ३. | कम्पौंडींग चार्जेस | रु.२५०/- |
| ४. | बोरींग चार्जेस व रस्ता दुरुस्ती | रु.५०/- |
| ५. | विहीत नमुन्यातील अर्ज | रु.१०/- |
| ६. | कोर्ट फी स्टॅम्प | रु.१०/- |
| ७. | अद्यावत कर भरणा केल्याची पावती | |

याशिवाय अनिधकृत नळ जोडणी नियमित करण्यासाठी हाती घ्यावयाच्या विशेष मोहीम यशस्वी करण्यासाठी १०,०००/- पॉम्लेट व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देण्यांत यावी.

ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.१४२ :-**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण व पाणीपुरवठा) औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रमानगर (स्लम) येथे १५० मी.मी., २५० मी.मी., ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम

रु.६,३८,५६५/- च्या तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. आता सन १९९३-९४ च्या कॅपीटल अकाऊंट स्लम या हेड मधील रक्कम रु.६०.०० लाखातून सदर कामासाठी अंदाजपत्रका नुसार खर्च करण्यांस मंजूरीस्तव प्रस्ताव विचारास्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रमानगर (स्लम) येथील जलनिःसारण वाहिन्या टाकण्यांचे कामासाठी मंजूर अंदाजपत्रकानुसार रक्कम रु.६,३८,५३५/- सन १९९३-९४ च्या मुळ भांडवली स्लम रु.६०.०० लाखातून खर्च करण्यास ठरावास प्रशासकीय मान्यता दिली जाते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-०५.१०.९३

**प्रस्ताव क्र.१४३ :-**

कामागार अधिकारी हयांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेता प्रत्येक दिवशी आपणांकडे अस्थापना-१ व २ तसेच कामगार विभागात कर्मचाऱ्यांतर्फे व कर्मचाऱ्यांच्या संघटनेतर्फे तक्रारी निवेदन दाखल होतात काही कर्मचाऱ्यांकडून व्यक्तीगत तक्रारी दाखल होतात. आणि त्या तक्रारीवर निर्णय होतांना किंवा कर्मचाऱ्यांचे समाधान करतांना विलंब होतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो व कार्यालयीन कामाची गती मंदावते.

कर्मचाऱ्यांकडून व कामगार संघटनेकडून आलेल्या तक्रारीचा त्वरीत निवाडा लागण्यासाठी तक्रारी निवारण कमिटीचे गढवा करणे फार आवश्यक वाटते. त्या तक्रार निवारण कमिटीमुळे तक्रार सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. सदर कमेटीमध्ये कामगार संघटनेच्या प्रतिनिधी असतील. परंतू तक्रार जर कामगार संघटनेच्या वतीने दाखल झाली असेल तरच कामगार संघटनेच्या प्रतिनिधींना बोलवणे योग्य राहील अन्यथा नाही. तसेच एका कर्मचाऱ्यांनी तक्रार दाखल केल्यानंतर लगेच त्याची तक्रार सोडविणे शक्य होणार नाही. कारण तक्रारीच्या संख्येचा विचार करुनच कमीटीची बैठक बोलविता येईल व तक्रार दाखल करणाऱ्या कर्मचाऱ्यांला किंवा कामगार संघटनेच्या वतीने तक्रार दाखल झाली असेल तर त्याच्या प्रतिनिधीला पत्र देवून बोलविता येईल.

महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण समिती गण संख्या पुढीलप्रमाणे समितीवरील कामगार प्रतिनिधीची नियुक्तीकाच्या प्रतिनिधींच्या संख्येपेक्षा कमी असणार नाही. कामगार प्रतिनिधी किंवा कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी हे अस्थापनेत कामाला असलेल्या कामगारांमधून कर्मचाऱ्यांमधून आणि भारतीय व्यवसाय संघ अधिनियम (१९२६ (चा क्रमांक १६) ) या खाली नोंदविलेला असा त्यांचा कोणत्याही व्यवसाय संघ असल्यास त्यांच्या विचार विनिमय करुन निवडण्यांत येतील. जेथे मान्यता प्राप्त संघटना असेल त्यामधून मान्यता प्राप्त संघटना असेल त्यामधून मान्यता प्राप्त संघटनेने कामगाराचे प्रतिनिधीत्व करणाऱ्याना यावे. तक्रार निवारण दूर करण्याचे कार्ये तक्रार निवारण समितीने करावे आणि त्यांच्यातील संबंध चांगले व सलोख्याचे राखण्याकडे व तसे

विकसीत करण्यांचे कार्ये करावे. प्रशासनाशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबतीत प्रशासन कर्मचारी/कामगार यांच्यातील मतभेद आणि दुरावा संपवून त्याच्यातील संबंध स्निग्ध सौहार्द्र आणि सलोख्याचे करणे.

प्रशासन कर्मचारी / कामगार यांचे तक्रार निवारण समितीवरील प्रतिनिधी समान संख्येने असले पाहिजे अशी लोकशाही तत्वाधिष्ठत यंत्रणेची तरतूद आहे. अस्थापनेत नेमलेल्या कर्मचाऱ्यांनी/कामगारांनी त्याच्यामधून विहीत पध्दतीने त्यांचे प्रतिनिधी निवडावेत अशी तक्रार करणे योग्य आहे.

**<u>तक्रार निवारण कमिटीचे कार्ये</u>**

अ. प्रशासन कर्मचारी/कामगार यांच्यातील सहकार्ये आणि सलोख्या राखणे.

ब. कर्मचारी/कामगार त्यांच्या गऱ्हाण्याची दाद लावून घेण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहन करणे.

क. नोकरीच्या शर्ती-अटीत कोणताही बदल करण्यापुर्वी तक्रार निवारण समितीत चर्चा विचार विनिमय करण्याचा कटाक्ष ठेवणे. असे बंधन राहील.

नियुक्त आणि कामगार/कर्मचारी यांच्यामध्ये सौहार्द्र व चांगले संबंध प्रस्तावित करुन ते टिकविण्याच्या उपया योजनांना चालना देणे आणि ते साध्य करण्यांच्या दृष्टीने त्याच्या नजीक हिताच्या व संबंधाच्या बाबी बाबत टिका, टिप्पणी करुन व याबाबत कोणतेही महहान, मतभेद असल्यास ते मिटविण्यांसाठी प्रयत्नशील रहाणे हे समितीचे कार्ये राहील.

अस्थापना नेमलेल्या कामगाराचे/कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी आणि नियुक्तकांचे प्रतिनिधी यांच्या वरील समक्ष वाटाघाटीचा प्रकार म्हणजे तंट्याचा तपास समेट यांची पहिली पायरी म्हणजे तक्रार निवारण समितीची स्थापना होय. मालक नियुक्तक आणि नोकर कामगार कर्मचारी यांच्यातील घनिष्ठ संपर्क आणि सलोख्याचे संबंध तक्रार निवारण समिती मुळे प्रस्तावित होतात अशी सूचना "रॉयल कमिशन ऑन लेबर" यांनी केली आहे आणि म्हणून तक्रार निवारण समितीची स्थापना प्रत्येक अस्थापनात करण्यांत विनंती केली आहे. आणि अस्थापनाच्या दैनंदिन व्यवहारातील प्रशासन कर्मचारी कामगार वादविषय पुढील प्रमाणे -

ड. कर्मचाऱ्यांना/कामगारांना कामगार कायद्यातील तरतूदीचा वापर करण्यांचे तांत्रिक आणि व्यवहारिक ज्ञान देणे.

इ. तक्रार निवारण समितीचे कार्य निर्णय उभयपक्षी हितासह असणे इत्यादी बाबी.

**<u>तक्रार निवारण समिती सदस्य</u>**

तक्रार निवारण समितीचे सदस्य खालीलप्रमाणे प्रशासनातर्फे असतील.

१. मा.आयुक्त साहेब/प्रशासक साहेब,
२. मा.उपआयुक्त १ व २
३. ता.मुख्य लेखापरिक्षक,
४. मा.विधी सल्लागार,
५. कामगार अधिकारी
६. खाते प्रमुख किंवा शाखा प्रमुख

तसेच कर्मचाऱ्यांकडून निवडलेले प्रतिनिधी व मान्यता प्राप्त संघटनेकडून निवडलेले प्रतिनिधी असतील.

मा.आयुक्त/प्रशासक तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष असतील व कामगार अधिकारी ह्या समितीचे सचिव असतील. सर्व तक्रारीची मांडणी व माहिती सचिव हे अध्यक्षांना सादर करतील अध्यक्षाच्या परवानगीने सचिव सभेची बैठक बोलावेल व चर्चा घडवून आणतील.

करिता कर्मचाऱ्यांकडून/कामगारकडून व कामगार संघटनेकडून आलेल्या तक्रारीचा त्वरीत निवाडा लावण्यांसाठी तक्रार निवारण समितीचे गठण करणे कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने फार आवश्यक आहे. जेणेकरुन त्या तक्रार निवारण कमिटीमुळे तक्रार सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल व प्रशासन कर्मचारी यामध्ये सहकार्य व सलोखा राखल्या जाईल.

तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजूरी देण्यांत येते व कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता औरंगाबाद महानगरपालिका कर्मचारी/कामगारासाठी "तक्रार निवारण समिती" स्थापन करण्यास मंजूरी दिली जाते व वेळोवेळी बैठकीसाठी आलेल्या खर्चास मंजूरी देण्यांत येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१४४ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ज्युब्लीपार्क जलकुंभास संरक्षित भिंत बांधावयाची आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसुची सन १९९२-९३ नुसार रक्कम रु.६८,९००/- एवढ्याचे तयार करण्यांत येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणीपुरवठा भांडवली कामासाठी करण्यांत आलेल्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. या कार्योलयाची निविदा सूचना क्र.४/९३-९४ जी की दैनिक लोकविजय या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण १९ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्याचे दि.२७.०७.९३ रोजी निविदा पेटी उघडण्यांत आली असता निदर्शनास आले आहे. त्या खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.बसरा कन्स्ट्रक्शन | - | ८% जास्त |
| २. | श्री.बी.एम काथार | - | १२.५०% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमीदर हा मे.बसरा कंन्स्ट्रक्शन हयांचा आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्योलयास जास्त वाटत असल्यामुळे मा.प्रशासक यांच्या दालनात मे.बसरा कन्स्ट्रक्शन हयांचे सोबत दराबाबत दिनांक २८.०९.९३ रोजी वाटाघाटी करण्यांत आली असता सदरचे काम हे अंदाजपत्रकीय दरानुसार करण्यास मा.प्रशासक यांनी मान्यता दिलेली असून त्याप्रमाणे ठेकेदारांने लेखी सम्मती दिलेली आहे. तरी वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसारची मे.बसरा कन्स्ट्रक्शन हयांची निविदा स्विकृतीस प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.बसरा कन्स्ट्रक्शन हयांची वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसारची निविदा स्विकृतीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१४५ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जिन्सी पंप हाऊस येथून जिन्सी जलकुंभ भरण्यासाठी बायपास व्यवस्था करावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन १९९१-९२ नुसार रक्कम रु.९५,१३२/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनुदान सन १९९२-९३ मधून करण्यांत येणार आहे. या कार्यालयाची निविदा सूचना क्र.५४/९२-९३ जी, की दैनिक नवा मराठा, औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण एक कोरी विक्री झाली. तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एक सिलबंद निविदा प्राप्त झाली ती खालील प्रमाणेची आहे.

१. श्री.सय्यद अथर अली - १३% जास्त

सदर निविदा धारकांनी दिलेला दर हा कार्योलयास जास्त वाटत असल्यामुळे मा.प्रशासक यांचे दालनात दि.२२.०९.९३ रोजी दराबाबत वाटाघाटी झाली असता ११% जास्त या दराने काम करण्यांस ठेकेदारांनी सम्मती दिली असून त्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली आहे.

तरी वाटाघाटी अंतीच्या म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% जास्त दराची श्री.सय्यद अली यांची निविदा स्विकृतीस प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.सय्यद अथर अली यांची वाटाघाटी अंतीचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.०० जास्त दराची निविदा स्विकृतीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१४६ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रोजाबाग पंपगृह ते रोजाबाग स्लम पर्यंत १५० मी.मी.व्यासाची रा.सी.जलवाहिनी टाकावयाची. सदर कामाचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसूची सन १९९२-९३ नुसार रक्कम रु.७१,२००/- एवढ्याचे तयार येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनुदान सन १९९२-९३ च्या अनुदानातून करण्यांत येणार आहे. हया कार्यालयाची निविदा सूचना क्र.०४/९३-९४ जी की, दैनिक लोकविजय, रहेबर या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण आठ निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

१. श्री.पी.एच.पंजनानी - ९.९९% जास्त
२. श्री.एस.बी.सादवानी - ४.९% जास्त

वरील प्रमाणेच्या तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री.एस.बी.सादवानी यांचा आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्यालयात जास्त वाटत असल्यामुळे ठेकेदार श्री.एस.बी.सादवानी यांचे बरोबर मा.प्रशासक यांनी मान्यता दिलेले आहे.

तरी एस.बी.सादवानी हयांची वाटाघाटी अंतीचा दर अंदाजपत्रकीय दरानुसारच्या निविदेस मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविलेल्याप्रमाणे श्री.एस.बी.सादवानी हयांची वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसारची निविदा स्विकारण्यांस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१४७ :-**

उपआयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या होणाऱ्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रभागवार मतदारांच्या याद्या मराठी व उर्दूमध्ये छपाईकरिता निविदा सूचना जा.क्र./मनपा/निवडणूक/११६/९३, दि.०६ ऑगस्ट १९९३ नुसार जी, की दैनिक लोकमत, दैनिक सकाळ, औरंगाबाद टाईम्स व दैनिक मराठवाडा मध्ये प्रसिध्दीस देऊन प्रगट निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा स्विकृतीची नियोजित तारिख १८.०८.९३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत एकूण ४३ निविदापत्रके प्राप्त झाली पैकी मराठी मतदार याद्या छपाईचा निर्णय प्रस्ताव ठराव क्र.९५, दि.०६.०९.९३ नुसार झालेला आहे.

सदर ४३ निविदापैकी सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यानुसार स्थानिक प्रेसकडून उर्दू मतदार याद्या छपाईसाठी व औरंगाबाद बाहेरील दोन असे एकूण ११ निविदा मनपास प्राप्त झाल्या आहेत. सबब त्यापैकी २ जे बाहेरील आहेत. त्याबाबत कार्यालयाने धोरणात्मक निर्णय घेवून त्यांना काम देण्यांत येऊ नये. असा निर्णय प्रशासनाच्या दृष्टीने घेतलेला आहे. ज्या निविदा स्थानिक आहेत. त्यापैकी कमी दर १) नुराई ऑफसेट, औरंगाबाद यांचा पहिल्या पृष्ठाचा छपाईचा दर (२५ प्रतिसाठी) रु.५८.०० असा आहे. २) पारस ऑफसेट प्रेस यांनी त्यांच्या निविदेस दोन्ही पृष्ठासाठी (प्रतिपान) छपाईचा दर रु.८५/- दिलेला आहे. त्यामुळे हिशोब केल्यास प्रत्येक पृष्ठास (दोन्ही बाजू छापल्यानंतर) रु.४२.५० असा येतो. जो सर्वात कमी दर आहे. ही बाब आणखी स्पष्ट व्हावी म्हणून संबंधितास कार्यालयात बोलावून त्याबाबत खुलासा करण्याबाबत सूचना केली असता त्यांनी याबाबत लेखी खुलासा छपाईचा नमुना देऊन केलेला आहे. त्यात त्यानी दोन्ही बाजूने छपाई केलेल्या एका पानास (दोन पृष्ठ) दर रु.८५.०० आहे आणि निविदेतही तसा उल्लेख केलेला आहे. परंतू १/४ त्या अगोदर लिहिल्यामुळे वरील खुलासा घेणे आवश्यक वाटल्याने तो घेण्यांत आला आहे. त्यांनी १/४ बाबत कागदाचा आकार असल्याचा उल्लेख केला आहे.

३) क्रमांकावर एकूण ५ निविदा धारकांचा पहिल्या पृष्ठ साठीचा दर रु.७५/- असा आहे.

वरील सर्व बाबींचा अत्यंत गंभीरपणे विचार केल्यास आणि त्यातला त्यात मनपाच्या आर्थिक बाबींचा आणि कायद्याचा विचार केल्यास पार ऑफसेट प्रिंटींग प्रेस औरंगाबाद यांना काम दिल्यास त्यामुळे नं.१ च्या तुलनेनुसार मनपास सुमारे रु.७०,०००/- चा फायदा होतो आणि क्र.३ शी तुलना केली तर १,५०,०००/- चा मनपाचा फायदा होतो.

वरील बाब लक्षात घेता, औरंगाबाद महानगरपालिकेच्या होणाऱ्या निवडणूकीसाठी प्रभाग निहाय उर्दू मतदार याद्या (प्रत्येकी २५ प्रती) छपाईकरिता पारस ऑफसेट प्रिंटींग प्रेस, औरंगाबाद यांची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीस्तव सादर. तसेच सदर कामासाठी अपेक्षित खर्च रक्कम रु.२,००,०००/- (दोन लक्ष रुपये) खर्चाच्या मंजूरीस्तव सादर. सदर खर्च आणि यापुर्वीचा ठराव क्र.९५ दि.०६.०९.९३ नुसार केलेल्या मराठी याद्या छपाईचा खर्च निवडणूक शिर्षका अंतर्गत करण्यांत येईल. मंजूरीस्तव प्रस्ताव सादर करीत आहे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या निवडणूकीस प्रभाग निहाय मतदार याद्या (उर्दू भाषेत) प्रत्येकी २५ प्रति छपाईसाठी पारस ऑफसेट प्रिंटींग प्रेस औरंगाबाद यांची निविदा स्विकारण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. व या कामासाठी होणाऱ्या अपेक्षित खर्च रु.२,००,०००/- (दोन लक्ष रुपये) यास पण मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. आणि सदर खर्च प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे निवडणूक शिर्षकाअंतर्गत करण्यांची मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१४८ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र.१ मधील गटारीची दुरुस्ती व देखभाल करणेच्या कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.३/९३-९४ जा.क्र./मनपा/का.अ./११३६/९३, दि.२०.०८.९३ द्वारे नवा मराठा व दैनिक औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यांत आल्या. असता एकूण २२ निविदा विकण्यांत आल्या व त्यापैकी ३ निविदा प्राप्त झाल्या. त्यात तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्तीने श्री.रऊफ यांचे दरपत्रक आहे. सदर दर जास्तीचे वाटत असल्यामुळे श्री.म.रऊफ यांचे दरपत्रक आहे. सदर दर जास्तीचे वाटत असल्यामुळे श्री.म.रऊफ ठेकेदार औरंगाबाद यांना वाटाघाटीस पत्र देवून बोलाविले असता त्यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्तीने (वाटघाटीनुसार) मान्य करण्यांत आले आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.म.रऊफ गुत्तेदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्तीने (वाटाघाटीनुसार) सदर काम करुन घेण्यांस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१४९ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दैनंदिन पाणीपुरवठा व्यवस्थेच्या देखभाल व दुरुस्तीची कामासाठी लागणारे साहित्य खरेदी करावयाचे आहे. त्यासाठी झालानी टुल्स कंपनीच्या अधिकृत विक्रेत्या तर्फे किंमत पत्रक मागविण्यांत येवून त्यानुसार

रक्कम रुपये २८,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. या कार्यालयाची निविदा सूचना क्र.८/९३-९४ जी की, दैनिक लोकमत टाईम्स, रहेबर या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून "डी" कॉर्नवर निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण दोन (२) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाले. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणेचा आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.वर्षा मेटल वर्क्स | - | ८.६६% जास्त |
| २. | मे.इन्शा टेड्रींग कंपनी | - | ४.१२% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा मे.इन्शा ट्रेडींग कंपनी हयांचा आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा.प्रशासक त्यांचे दालनात दराबाबत वाटाघाटी दि.०६.१०.९३ रोजी मे.इंन्शा ट्रेडींग कंपनी हयांच्या सोबत आली असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त या दरास मान्यता देण्यांत आलेली आहे.

तरी वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची मे.इंन्शा ट्रेडींग कंपनी हयांची निविदा स्विकृतीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.इंन्शा ट्रेडींग कंपनी त्यांची वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची निविदा स्विकृतीस प्रशासकीय मान्यता येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-११.१०.९३

**प्रस्ताव क्र.१५० :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पाणी पुरवठा-१ हया भागातील जलवाहिन्या व स्लुस व्हॉल्स दुरुस्ती करण्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करावयाचे आहे. त्यासाठी बाजारातून लागणाऱ्या साहित्यांच्या किमती घेण्यांत येवून रक्कम रु.१,७२,५९५/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्र.८/९३-९४ काढण्यांत येवून दैनिक लोकमत, टाईम्स, रहेबर हया वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून नमुना डी फॉर्मवर निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन (२) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्याचे दि.२२.०९.९३ रोजी निविदा पेटी उघडण्यांत आली असता निदर्शनास आले आहे की, प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणेचा आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.वर्षा मेटल वर्क्स | - | ११.५५% जास्त |
| २. | मे.इन्शा ट्रेडींग कंपनी | - | ५.०३% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा मे.इन्शा ट्रेडींग कंपनी हयांचा आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा.प्रशासक त्यांच्या दालनात दिनांक ०६.१०.९३ रोजी दराबाबत मे.इन्शा ट्रेडींग कंपनी यांचे सोबत आलेल्या

दराबाबत वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त हया दरास मान्यता देण्यांत आलेली आहे.

तरी वाटाघाटी अंतीच्या दराची मे.इन्शा ट्रेडींग कंपनी हयांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची मे.इन्शा ट्रेडींग कंपनी हयांची निविदा स्विकृतीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१५१ :-**

कार्यकारी अभियंता हयांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९३-९४ हया वर्षात जलशुध्दी करणासाठी आवश्यक असलेली २० मे.टन तुरटी (ॲलम फेरीक) खरेदी करिता रक्कम रुपये ५२,१७२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. सदर तुरटी मे.धरमसी मोरारजी केमीकल कं.लि.यांचे उत्पादित असून "एक्झीक्युटीव डायरेक्टर, ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हरमेंट, मुंबई" हयांचे तर्फे खरेदी करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ व स्विकृतीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आवश्यक असलेले २० मे.टन तुरटी डी.राम.सी.उत्पादित "एक्झीक्युटीव डायरेक्टर ऑल इंडिया, इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हरमेंट, मुंबई" हयांचे कडून खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१५२ :-**

कार्यकारी अभियंता हयांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा विभागास सन १९९३-९४ हया वर्षात जलशुध्दीकरणासाठी लागणारी ग्रासीम उत्पादित ग्रेड-१ चे १० मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदी करावयाची आहे. महापालिकेने त्यापुर्वी मे.त्रिवेदी ॲण्ड कंपनी, दिल्ली हयांचे तर्फेच खरेदी केलेली आहे. परंतू हया कंपनीमध्ये काही तांत्रिक अडचण असल्यामुळे ती कंपनी सध्या बंद आहे.

महापालिकेस लागणारी ग्रासीम उत्पादित ग्रेड-१ चे १० मे.टन ब्लीचिंग पावडर मे.व्हेनस ट्रेडींग कं.औरंगाबाद हयांचे तर्फे २१,१३,५८०/- प्रती मे.टन हया दराने खरेदी करण्यांस रक्कम रुपये १,३५,८००/- एवढा खर्च येत आहे.

तरी मे.व्हेनस ट्रेडींग कंपनी त्यांचे तर्फे ग्रेड-१ चे १० मे.टन ब्लिचींग पावडर रु.१३,५००/- प्र.मे.टन हया दराने खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.व्हेनस ट्रेडिंग कंपनी त्यांचे तर्फे ग्रेड-१ चे १० मे.टन ब्लिचिंग पावडर रु.१३,५८०/- प्रती मे.टन हया दराने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-१३.१०.९३

**प्रस्ताव क्र.१५३ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.बोहरी कठडा येथे ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक रक्कम रु.५२,५००/- तयार करण्यांत आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बोहरी कठडा येथे ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता रक्कम रुपये ५२,५००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-१५.१०.९३

**प्रस्ताव क्र.१५४ :-**

औरंगाबाद महानगरपालिकेची दुसरी सार्वत्रिक निवडणूक लवकर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक अगर पोट निवडणूक पार पाडणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूचीचे प्रकरण-१ मधील नियमाने तरतूद असून याशिवाय औरंगाबाद महानगरपालिकेने निवडणूक नियमावली तयार करुन त्याची अधिसूचना८६१/रारामसग/इरालरान/सीआर-४६, शासन राजपत्रात ८ जानेवारी, १९८७ भाग-२ मध्ये प्रसिध्द करुन शासनाची मंजूरी घेतलेली आहे. सदर निवडणूक नियमावलीतील इतर बाबींसह निवडणूक आयोगाच्या मान्यता प्राप्त राजकीय पक्षासह मूळ चिन्हाबाबतची तरतूद नियम ९ (अ) टेबल-। व टेबल-॥ मध्ये दर्शविलेली आहे.

आता सचिव निवडणूक आयोग भारत सरकारच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने ११ फेब्रुवारी १९९३ च्या राजपत्रात असाधारण भाग प.क्र.नुसार मान्यता प्राप्त चिन्हांमध्ये फेरबदल झालेला आहे. तथापि आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मान्यता प्राप्त विविध राजकीय पक्ष भाग घेण्याची शक्यता लक्षात घेता व निवडणूक आयोगाने विविध राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाने प्रदान केलेली चिन्हेच प्रदान करणे महानगरपालिकेस बंधनकारक राहील. त्यादृष्टीने येत्या सार्वत्रिक निवडणूकीत कोणत्याही प्रकारची वैधानिक अडचण निर्माण होवू नये म्हणून महानगरपालिकेच्या मंजूर निवडणूक नियमावलीतील नियम क्र.९ (अ) टेबल-I व टेबल-II २२२ करुन निवडणूक आयोगाने वरील राजपत्रात नमूद केल्याप्रमाणे मान्यता प्राप्त राजकीय पक्षाचे चिन्ह राखीव ठेवणे आवश्यक असल्याने नियम

क्र.९ (अ) मधील निवडणूक विभाग अधिकाऱ्यांनी प्रस्तावित केलेले टेबल-I व टेबल-II समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

By the Administrator, The Aurangabad Municipal Corporation, Aurangabad.

No./AMC/EEN/

In exercise of the power conferred upon it by section 454 read with sub-section (i) of section 457 and section 468 of the Bombay provincial Municipal Corporation Act, 1949 (Bom. LIX of 1949) and of all other powers inabling it in that behalf the Admininstrator of the Municipal Corporation of the Aurangabad, Municipal Corporation, Aurangabad with the previous sanction of the Govt. of Maharashtra and having previously published by the said corporation as required by sub section (i) of sec. 455 of the said Act, here by make the following rules further to amend the election rules contained in chapter-I of the schedule to the said Act and are finally published as required by sub$section (2) of the said section 455. as follows namely :-

1. These rules my be caused the Bombay provincial Municipal Corporation (Election rules in chapter-I of the schedule) of Aurangabad.
2. In the schedule to the Bombay Municipal Corporation Act 1949 in chapter-I under the heading "Election Rules"
3. In rule of A Allotment of symbols :- Table I and Table II in notification No.861 AMC/ELN/CR-46 published in Govt. of Maharashtra Gazettee part-II on dated 8th, Jan.1987 deleted. and new Table I and II shall be subsituted as under :-

TABLE-I

**List of symboles resered for political parties**

| | **Political Party** | | **Symbol** |
|---|---|---|---|
| 1. | Bhartiya Janta Party | ... | Lotus |
| 2. | Communist Party of India | ... | Ears of com. and Hammersickle sicki and sidr |
| 3. | Communist Party of India (Marxist) | ... | |
| 4. | Indian National | ... | Hand |
| 5. | Janta Party | ... | Hold nar within wheel (Chakra Wheel) |
| 6. | Janta Dal | ... | Chakara Wheel |
| 7. | Shivsena | ... | Row an Arrow |

TABLE - II

**Free Symboles**

| Sr. No. | Free Symboles |
|---|---|
| 1. | Aeroplane |
| 2. | Autorisha |
| 3. | A pair of pigcons |
| 4. | Bicycle |
| 5. | Boat |
| 6. | Brass Ball |
| 7. | Camble |
| 8. | Coke |
| 9. | Cobra |
| 10. | Crowing Child |
| 11. | Chariot with Horse |
| 12. | Culfivator winnowing grain |
| 13. | Coconut tree |
| 14. | Chowgnada |
| 15. | Camera |
| 16. | Cashnair |
| 17. | Deer |
| 18. | Duck |
| 19. | Danture |
| 20. | Dog |
| 21. | Double Deeker Bus |
| 22. | Electric Lamp |
| 23. | Eagle about to Fly |
| 24. | Elephant |
| 25. | Fish |
| 26. | Flaming Torch |
| 27. | Flag |
| 28. | Flower pot with flowers |
| 29. | Grinder |
| 30. | Hores |
| 31. | Hurricane Camp |
| 32. | Horse Rider |
| 33. | Harmonicane |
| 34. | Hand Crat |
| 35. | Hand Lamp |
| 36. | Iron |
| 37. | Kite |
| 38. | Lion |
| 39. | Loud Speaker |
| 40. | Ladder |

| | |
|---|---|
| 41. | Motor (car) |
| 42. | Monkey |
| 43. | Moter Cycle |
| 44. | Man |
| 45. | Match Box |
| 46. | Moon Crescent |
| 47. | Mot |
| 48. | Opened Umbrella |
| 49. | Oil Lamp (Samayee) |
| 50. | Opened Book |
| 51. | Pocket Watch |
| 52. | Pot |
| 53. | Plough |
| 54. | Peacock |
| 55. | Pickare noe |
| 56. | Pressure cooker |
| 57. | Railway Engine |
| 58. | Rishing Sun |
| 59. | Rose |
| 60. | Revover |
| 61. | Rifle |
| 62. | Rabbit |
| 63. | Radio |
| 64. | Sparrow |
| 65. | Scooter |
| 66. | Swatikwitnina |
| 67. | Circle |
| 68. | Sword |
| 69. | Steam ship |
| 70. | scalee |
| 71. | stove |
| 72. | scout |
| 73. | spacle |
| 74. | Sewing Machine |
| 75. | Spectaeles |
| 76. | Steet Safe (cabined) |
| 77. | Tiger |
| 78. | Truck |
| 79. | Tractor |
| 80. | Tricycle |
| 81. | Tempo |
| 82. | Two Soras anclasnield |
| 83. | Tongee |

| | |
|---|---|
| 84. | Trishvll |
| 85. | Type writer |
| 86. | Tulsi Vradawan |
| 87. | Taj Mahal |
| 88. | Telephone |
| 89. | Table Fan |
| 90. | Torch with light |
| 91. | Violin |
| 92. | Woma |
| 93. | Wind mill |
| 94. | Water Tap. |

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजूर निवडणूक नियमावलीतील नियम-९ (अ) टेबल क्र.-I व टेबल -II प्रमाणे प्रस्तावित केलेल्या राजकीय पक्षाचे चिन्ह व मुक्त चिन्हाच्या फेरबदलास प्रशासकीय मंजूरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-१८.१०.९३

**प्रस्ताव क्र.१५५ :-**

मा.शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका वाचनालयासाठी सन १९९३-९४ हया वर्षी पुस्तके/मासिके इ.बांधणीकरिता दरपत्रके मागविण्यांत आली आहे. तुलनात्मक तक्त्यानुसार बाईडींगचे सर्वात कमी दर खालीलप्रमाणे आहेत.

| | **टाफ क्लॉथ बाईडींग** | **फुल क्लॉथ बाईडींग** | **टाफ रेक्झीन बाईडींग** | **फुल रेक्झीन बाईडींग** | **फक्त शिलाई** | **लेदर फुल रेक्झीन बाईडींग** |
|---|---|---|---|---|---|---|
| पुस्तके | ०७.०० | ०८.०० | ०७.०० | १७.०० | ०१.०० | --- |
| मासिके (३/४ महिन्याचे) | १२.९० | १५.०० | -- | -- | -- | -- |
| साधे रजिस्टर | १५.०० | १८.०० | -- | -- | -- | -- |
| मासिक कव्हर | १२.०० | १२.०० | -- | -- | -- | -- |
| बाल विभाग (३/४ पुस्तके) | १२.०० | १७.०० | १५.०० | २०.०० | -- | -- |
| रजिस्टर मोठे | -- | -- | -- | -- | -- | १४०.०० |

उपरोक्त दर मंजूर करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका वाचनालयासाठी सन १९९३-९४ या वर्षी पुस्तके / मासिके इ.प्रस्तावातील उपरोक्त दराने बाईडींग करुन घेण्यांस मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२०.१०.९३

**प्रस्ताव क्र.१५६ :-**

दशमेशनगर विकास संस्था, औरंगाबाद यांनी दशमेश नगर या रेखांकनातील खुली जागांपैकी १४२.७ चौ.मी.जागा सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी अर्ज केला आहे. नगर भूमापन क्रमांक १६,२९३ क्षेत्र १४२७.८ चौ.मी.ही मिळकत दशमेश नगर विकास संस्था रेखांकनातील खुली जागा आहे. सदर खुल्या जागेच्या मालकी हक्कात "मंजूर रेखांकनातील मोकळी जागा" अशी नोंद झालेली आहे. बांधकाम विकास नियंत्रण नियमावली च्या नियम क्र.१३.०३.९३ नुसार रेखांकनाच्या खुल्या जागेत खुल्या जागेच्या १०% जास्तीत जास्त २००.०० चौ.मी. जागा व नियम क्र.१३.०३.९३ II नुसार जिमनाशिया, पॅव्हेलियन तत्सम प्रकारच्या बांधकामास फक्त तळ मजल्यासाठी अनुज्ञेय होतो.

दशमेशनगर विकास संस्था ही एक नोंदणीकृत संस्था असून त्यांचा नोंदणीकृत क्र.२९५/९१ असा आहे व त्यांनी सांस्कृतिक सभागृहासाठी हया रेखांकनाच्या खुल्या जागेपैकी १४२.७ चौ.मी.जागेवर मागणी केली आहे. मागणी केलेली जागा ज्या दशमेश नगर विकास संस्था रेखांकनातील खुली जागा आहे. रेखांकनातील खुल्या जागेत वर दर्शविल्याप्रमाणे सांस्कृतिक सभागृहाचा वापर अनुज्ञेय होतो. सदर रेखांकनातील १४२.७ चौ.मी.खुली जागा क्र.४८५०/- वार्षिक भाडेतत्वावर ९९ वर्षासाठी भाडेपट्ट्याने खालील अटीवर वर्ष १९८८-८९ पासून देण्यांसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

१. प्रस्तावित सांस्कृतिक सभागृह जागेवर दशमेश नगर विकास संस्थेची मालकी राहणार नाही. किंवा भाडेकरु म्हणून देखील नोंद राहणार नाही.
२. रेखांकनातील खुली जागा व त्यातील प्रस्तावित सांस्कृतिक सभागृहात प्रवेश व वापर सार्वजनिक स्वरुपाचा राहील. तसेच बांधण्यांत येणारे सांस्कृतिक सभागृह सर्व जाती/जमाती/सर्व धर्माच्या व्यक्तीसाठी खुली ठेवली जाईल.
३. सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम महानगरपालिकेकडून नियमाप्रमाणे बांधकाम परवानगी घेवूनच बांधकाम करावे.
४. महानगरपालिका या जागेचा ताबा विकास संस्थेला हस्तांतर करणार नाही. फक्त सांस्कृतिक सभागृहासाठी वापर करण्यांस अनुमती देण्यांत येईल.
५. प्रस्तावित सांस्कृतिक सभागृह खालील जागेचे धर्मादाय आयुक्त किंवा त्यांचे खात्याकडे विकास संस्था स्थावर मालमत्ता म्हणून नोंद करता येणार नाही.
६. या जागेत फक्त सांस्कृतिक सभागृह व त्यास पूरक असलेला वापरच अनुज्ञेय होईल.

७. संपूर्ण जागेवर महानगरपालिकेचे नियंत्रण राहील.

८. सदरील जागा वर्ष १९८८ पासून देण्यांत येते. परंतू त्यावर ईमारत १९९२-९३ मध्ये झालेली आहे. या दोन्ही बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे भाडे आकरणी करण्यांत यावी.

| १. | वर्ष | |
|---|---|---|
| | १९८८-८९ | |
| | १९८९-९० | साठी ५०% दराने |
| | १९९०-९१ | |
| | १९९१-९२ | |
| २. | १९९२-९३ | साठी ५०% दराने |
| | १९९३-९४ | |

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दशमेशनगर विकास संस्था, या नांवे नगर भूमापन क्र.१६२९३ क्षेत्र १४२७.८ चौ.मी.मोकळी जागा अशी नोंद आहे. या रेखांकनातील खुल्या जागेत दर्शविल्याप्रमाणे सांस्कृतिक सभागृहासाठी वापर अनुज्ञेय होतो. हया रेखांकनातील १४२.७ चौ.मी. खुली जागा २१.४८५०/- वार्षिक भाडे तत्वावर ९९ वर्षासाठी भाडेपट्ट्याने प्रस्तावित दर्शविल्या अनु क्र.१ ते ८ ह्या अटींच्या अधिन राहून लागणारे दस्त ऐवजाचा संपूर्ण खर्च तथा भाडेपट्ट्याच्या वेळी नमूद करावे लागणारे आवश्यक त्या अटींसह संबंधित विकास संस्थेला "सांस्कृतिक सभागृहाकरिता" ९९ वर्षासाठी भाडेपट्ट्याने जागा देण्यांस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२१.१०.९३

**प्रस्ताव क्र.१५७ :-**

औरंगाबाद शहराचे हद्दीसाठी नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.टीपीएस./ ३०८८/४५४/सीआर-५९/युडी-१२, दि.१४.१०.१९९१ अन्वये विकास कार्य नियंत्रण नियमावली मंजूर झालेली आहे. त्यांत काही फेरबदल करावेत. हया बाबत बिल्डर्स असोशिअेशन व इंडियन इन्स्टिट्युट ऑफ आर्किटेक्चर औरंगाबाद सेंटर हयांनी मा.प्रशासक महानगरपालिका औरंगाबाद यांच्याकडे लेखी विनंती केलेली आहे. त्यांनी सुचविलेले सर्व फेरबदल सार्वजनिक हिताच्या दृष्टीने मान्य करुन त्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम नियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास कार्य नियंत्रक नियमावलीस किरकोळ फेरबदल करावे असे वाटते. ते प्रस्तावित फेर बदल खाली नमूद केल्याप्रमाणे आहे.

1. Following Sentence be added at theend of rule 15.1.2
   6. for the purpose of rearside margin, it shall be provided along the side having more depth other sides shall be treated as side.

2. Following note may be added at sr.No.6 below table -II.
Greater built-up area than that mentioned in col No.7 will be prenitled subject to the following conditions :-
i) Such buit up area shall not exceed 50% of the plot area.
ii) Required Marginal open spaces as shown in col No.4,5 and 6 are left and.
iii) F.S.I. shall not exceed one
3. Following be addect in Rule 15.1.3 replacing table No.5 note 1 to 3 below table 5 shall not be deleted.
i) Extra side and rear marginal space to be provided for buildings above 10 m+ height.
ii) Extra side and of 0.3 m. for each 1.00 m height or part there of additional height above 10 m+ shall be provided.
iii) Stepped development may be permitted.
iv) Buildings plans for the consumption of the full F.S.I. permissible shall be submitted.
4. Following may be added at the end of rule 15.4.1.C provided that distance from edge of balcony and of plot shall be 2.25 m. minimum.
5. The word "16 mt." "20 mt" may be replaced by the word" 24 mt" in rule 15.5.C.
6. In rule 5.83 A add "to below beam sofit" after the words from ground level"
7. Rule 17.12.1.2 regarding provision of basement be deleted.
8. Rule 21.4.1 may be replaced by following.
"Minimum area of shop shall be 6 sq. m with a minimum with of 2.00 m"
9. Following shall be added at the end of rule 21.5.5.;-
"21.5.6 watchman/security cabin near the entrance gate shall be permitted is the marginal space. However the size should be restricted to 3m x 2.5 m maximum and shall be counted in FSL"

हया व्यतिरिक्त संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी बिबिका मकबरा चे मागील भागास रहिवाशी विभागासाठी नियम सुचविले असून त्यासाठी कलम ३७ ची कारवाई सुचविलेले आहे. (त्याचे पत्र डी.पी./औ.बाद/रासडी.सी.आर/टी.पी.व्ही./VII ६०७३, दि.२८.०९.९३.)

Following Rule shall be added after rule N-3 in Appendix-N7
N4

Building Byelaws for the buildings in vicinity of "Bibika Makbara" (Area specifically shown in sanctioned D.P.)

1. The buildings shall be of ground floor only.
2. The total built-up area of the building shall be restricted to area after living the necessary marginal distances as per Table-No.II
3. The height of the building shall not be more than 5.00 m. including plinth.
4. The still shall not be allowed fully or partly however basement shall be allowed.
5. The public semi-public and commercial usar as per R-2 zone shall be allowed.
6. No permissible service industry in R-2 zone of any sort shall be allowed in any case.
7. The height of the room shall not be more than 2.75 mtrs.
8. The parapet wall shall be allowed subject to condition nut its height shall not be more than 1.00 mtr. and the total height of the building shall not exceed 5.00 mtr.
9. The ventilation shall be as per the rule No.17.14

तरी वरील किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ खाली करावयास मान्यता मिळावी.

**ठराव :-**

प्रस्तावात सुचविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचे मंजूर विकास कार्य नियंत्रण नियमावलीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करावयास मान्यता देण्यांत येत आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२२.१०.९३

**प्रस्ताव क्र.१५८ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रमानगर येथील स्मशानभुमी मध्ये बर्मिंग रोड रेस्टींग रोड बनविणे बेंचेस बसविणें, सपाटीकरण भरती करणे ई.काम करणे बाबतच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,१२,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. मा.प्रशासक यांच्या मंजूरी अन्वये सदर कामाचे बी-१ नमून्यात निविदा सूचना पत्र जा.क्र./३५१-९३, दि.२२.०९.९३ द्वारे निविदा मागविण्याकरिता शहरातील दै.लोकमत टाईम्स, दै.सिटीजन्स इत्यादी वर्तमानपत्रात

प्रसिध्द करण्यांत आले त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण १९ फॉर्म विकण्यांत आले व स्विकारण्याच्या तारखेस सिलबंद पाकीटात एकूण ३ (तीन) निविदा दर भरुन प्राप्त झाले.

सदरील निविदा दि.१३.१०.९३ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले. त्यात दर्शविलेले दर खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **एजन्सीचे नांव** | | **दिलेले दर** |
|---|---|---|---|
| १. | सलीम पटेल | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९२% जास्त दराचे |
| २. | अब्दुल सलाम | - | ५% जास्त दराचे |
| ३. | शेख सलीम अहेमद | - | ८% जास्त दराचे |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्ट्या श्री.सलीम पटेल, गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९२% जास्त दराचे दर आहे. सदरील प्रकरण मा.प्रशासक साहेब यांच्याकडे मंजूरीस्तव सादर करण्यांत आले होते. त्यावर मा.प्रशासक साहेब यांनी दराच्या वाटाघाटीस गुत्तेदार यांस बोलवावे. तजवीज केली त्या अनुषंगाने गुत्तेदारास वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले. मा.प्रशासक साहेब यांच्या समक्ष वाटाघाटी अंतिम चर्चा अन्वये १९२% जास्त दराचे दर मान्य केले आहे. त्यास गुत्तेदार यांनी मान्यता दिली आहे.

सदरील खर्च शासकीय अनुदान सन १९९२-९३ च्या तरतूदीमधून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रमानगर येथील स्मशान भुमीमध्ये बर्निंग रोड, रेस्टींग रोड बनविणे, सपाटीकरण, भरती करणे, इ.कामासाठी रक्कम रु.४,१२,१००/- च्या अंदाजपत्रकीय रक्कमेस व संबंधित गुत्तेदार यांनी दिलेल्या दरास दि.१९.१०.९३ च्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १.९२% जास्त दरास मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रस्ताव क्र.१५९ :-**

कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनि:सारण महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विभाग क्र.२ मधील गटारीतील गाळ काढणे व गटार दुरुस्ती करणेसाठी एकत्रित अंदाजपत्रक तयार केले आहे.

अंदाजपत्रक सन १९९२-९३ च्या दरसुची नुसार तयार केले आहे. त्याची किंमत रु.४,९०,०००/- इतकी आहे. सदरचा खर्च शासकीय अनुदान १९९२-९३ मधील झोन क्र.१ ते ३ साठी असलेल्या रु.५०.०० लाखाच्या तरतूदीतून भागवायचा आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा.प्रशासक महोदयांनी दि.२४.०९.९३ अन्वये मंजूरी दिली आहे.

तरी सदरचे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांच्या प्रशासकीय विचारार्थ सादर.

**ठराव :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील विभाग क्र.२ मधील गटारीतील गाळ काढणे व गटार दुरुस्ती करणेसाठी सन १९९२-९३ चे दरसुची नुसार तयार केलेले अंदाजपत्रक रु.४,९०,०००/- ला प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. सदरील खर्च सन १९९२-९३ मधील झोन क्र.१ ते ३ साठी असलेल्या रु.५०.०० लाखाच्या तरतूदीतून मागविण्यांत येईल.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१६० :-**

कार्यकारी अभियंता पा.पु. व जलनिःसारण, महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करतात की, मो.समर्थनगर मधील प्रमादे प्रोव्हीजन ते मुक्ती सोपान पर्यंत जलनिःसारण वाहिन्या टाकण्यासाठी सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार रु.४,१४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. ज्यास मा.प्रशासक यांनी दि.२०.०७.९३ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या शासकीय विशेष विकास अनुदानातून न मागविण्यांत येणार आहे.

त्यानुसार रु.३,९४,२०७.०० च्या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.१०/९३-९४ ही प्रसिध्दीस देण्यासाठी जनसंपर्क अधिकारी यांचे कडे पत्र क्र.मनपा/विका/२३८-९३, दि.१२.०८.९३ नुसार पाठविण्यांत आली असता दै.लोकविजय व दै.रहेबर मध्ये प्रसिध्दीस देण्यांत आली.

त्याप्रमाणे निविदा विक्रीची अंतिम तारीख २०.०८.९३ पर्यंत एकूण १७ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या नियोजित तारिख ३०.०८.९३ रोजी फक्त तीन मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या असल्याचे दि.०१.०९.९३ रोजी निविदापेटी उघडली असता दिसून आले. प्राप्त तीन मोहोरबंद निविदा उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे होत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | राणा कंन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.१०% जास्त |
| २. | बसरा कंन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त |
| ३. | एम.एम.बेग | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.५०% जास्त |

तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा बसरा कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकापेक्षा १०% जास्त दराची होती. मात्र मा.प्रशासक यांचे दि.१०.०८.९३ च्या मान्यतेनुसार ठेकेदारास दर वाटाघाटी साठी बोलविण्यांत आले असता ठेकेदारांनी अंदाजपत्रकीय दराचे काम करण्यास तयार असल्याचे लेखी दिले आहे. ज्यांस मा.प्रशासक यांनी दि.२८.०९.९३ रोजी मान्यता दिली आहे.

त्यानुसार मो.समर्थनगर मधील प्रमोद प्रोव्हीजन ते मुक्तीसोपान पर्यंत जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामासाठी बसरा कंन्स्ट्रक्शन यांची मा.प्रशासकांशी केलेल्या दर वाटाघाटीप्रमाणे मान्य करण्यांत आलेली अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर मधील प्रमोद प्रोव्हीजन ते मुक्ती सोपान पर्यंत जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी बसरा कंन्स्ट्रक्शन यांची दर वाटाघाटी प्रमाणे मान्य करण्यांत आलेली अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारण्यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१६१ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९३-९४ च्या आर्थिक वर्षासाठी इलेक्ट्रीक्स मोटार रिवायडींगच्या कामासाठी तसेच वायडिंग झाल्यानंतर साईटवर मोटार बसवून टेस्ट ट्रायल देण्याच्या कामासाठी वार्षिक करार करण्याकरिता वर्तमानपत्रात निविदा सूचना देण्यांत आली व निविदा मागविण्यांत आल्या. निविदापत्रके स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दिनांक १७.०३.९३ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या.

कोर्टाची स्थगिती उठविल्यानंतर दिनांक ०८.०७.९३ रोजी टेंडर्स उघडण्यांत आले असता सर्वात कमी दर मे.संदीप सेल्स कॉर्पोरेशन औरंगाबाद यांचे होते. जे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०% कमी दराचे होते. परंतू एजंन्सीस पत्र लिहून मोठ्या वाटर सप्लाय मोटार रिवायडींग करण्याचा पुर्वीचा अनुभव आहे काय म्हणून पत्र दिले असता त्यांना अनुभव नाही व त्यांचे स्वत:चे वर्कशॉप देखील नाही असे कळविले त्यामुळे त्यापेक्षा जास्ती निविदा दिलेली एजंन्सी मे.लुना इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराचे आहेत व या एजन्सीस कामाचा अनुभव पण आहे. तरी सेकंड लोयेस्ट एजन्सींशी वर्षभराचा सन १९९३-९४ चा करार करण्याच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे.लुना इलेक्ट्रीक औरंगाबाद यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दरास मंजूरी देण्यांत येते. सन १९९३-९४ च्या आर्थिक वर्षातील कामासाठी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचेशी वार्षिक करार करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१६२ :-**

उपआयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यावरुन तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ व ४५८ (३६) अन्वये सार्वजनिक रस्ते ठिकाणे आणि मोकळ्या जागा भाड्याने देणे बाबत तयार करण्यांत आलेले उपविधी जे सोबत जोडण्यांत आलेले आहेत. त्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत यावी. करिता सदरील सोबत जोडण्यांत आलेले उपविधीस मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

<u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ व ४५८ (३६) अन्वये</u>

सार्वजनिक रस्ते, ठिकाणे आणि मोकळ्या जागा भाड्याने देणे बाबतचे प्रारुप उपविधी संक्षिप्त नाव आणि व्याख्या :-

या उपविधींना औरंगाबाद महानगरपालिका (सार्वजनिक रस्ते, ठिकाणे, आणि मोकळ्या जागा व त्यांची क्षेपणे यांचा तात्पुरता भोगवटा करणे) उपविधी असे १९८६ असे म्हणता येईल.

**व्याख्या :-**

अ)  अधिनियम म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९

ब) महानगरपालिका म्हणजे औरंगाबाद महानगरपालिका

१. आयुक्त म्हणजे महानगरपालिका आयुक्त किंवा अधिनियमाच्या कलम ६९ (१) अन्वये आयुक्तांचे अधिकार प्रदान केलेला कोणीही अधिकारी

क) लायसन्स देणारे प्राधिकरण म्हणजे कलम २२७ खाली येणाऱ्या प्रेक्षपणाच्या आणि तत्सम गोष्टी नियमित करण्यासाठी नेमलेला अधिकारी किंवा महानगरपालिका उपआयुक्त.

ड) कलम :- अधिनियमाचे कलम

सार्वजनिक रस्त्याच्या तात्पुरत्या भोगवट्यास परवानगी :-

लायसन्स देणाऱ्या प्राधिकरणास कलम २२७ च्या उपविधीस अधिन राहून सार्वजनिक रस्त्याच्या तात्पुरत्या भोगवट्यासाठी व्यक्तींना पुढील शर्तीवर लेखी परवानगी जीचा यापुढे जिचा "परवानगी" असा निर्देश करण्यांत आला आहे. ते देता येतील.

१. वाहतुकीसाठी दिलेल्या परवानगीमध्ये विनिर्दिष्ट करण्यांत येईल अशा रुंदीची मोकळी जागा रस्त्यावर सोडण्यांत येईल.

२. व्यापलेला स्थळी उक्त परवानगी ठेवलेली असेल आणि महानगरपालिकेने प्राधिकृत केलेल्या महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांस किंवा कोणत्याही कर्मचाऱ्यांला निरिक्षणासाठी आवश्यक असेल तेव्हा ती सादर केली जाईल.

३. जिला परवानगी दिलेली असेल अशी कोणतीही व्यक्ती, कलम २२७ मध्ये नमूद केलेले सुरक्षिततेचे उपाय योजिले.

४. अशा परवानगीमुळे परिणाम होणाऱ्या शेजारच्या जागा (मालकांच्या किंवा भोगवटाधारांच्या ) संमतीने असेल त्या बेरीज अर्जदाराला त्यांच्या मालकीच्या किंवा त्यांनी व्यापलेला जागेला अगदी लागून असलेल्या भागा पलीकडे असणारा रस्त्याचा कोणताही भाग व्यापण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.

५. सार्वजनिक रस्त्यावर जागेवर तात्पुरती बांधकामे उभारण्यासाठी (उपविधी-३ मध्ये) नमूद केलेल्या शर्तींना अनुसरुन आणि विवाह किंवा इतर समारंभ हयासाठी मंडप सारख्या विशिष्ट प्रयोजनसाठी उपयोगात आणावयाच्या सर्व बांधकामाच्या बाबतीत पुढील जादा शर्तींना अधिन राहू कोणत्याही व्यक्तीस परवानगी देता येईल.

   १) बांधकामाची उंची कोणत्याही ३.५ मीटरपेक्षा कमी नसेल.
   २) बांधकामाच्या बाजुला दोन मीटर व पन्नास से.मी.रुंदीचा द्वारमार्ग ठेवला जाईल.
   ३) उपविधी ४ (१) व (२) मधील उंची, लांबी, रुंदी रस्त्याची रदहारी लक्षात घेऊन कमी करण्याचा अधिकार प्राधिकरणास राहील.
   ४) द्वारमार्ग-आच्छादित करणेसाठी पडदे लावता येतील. परंतू सुलभपणे जा ये करण्यांस प्रतिबंध होईल अशा स्वरुपाचे काहीही करण्यात येणार नाही.
   ५) अशा बांधकामास दिवे, हंड्या, झुंबरे, किंवा तत्सम वस्तु दोरीच्या सहाय्याने न टांगता लोखंडी गजाच्या आधारे टांगता येईल.
   ६) विज पुरवठा उपलब्ध नसेल तेव्हाच फक्त अशाच
   ७) असे लोखंडी गज छतापासून १ मीटर आणि वीस से.मी.कमी लांबीचे असणार नाहीत त्यांना कापड गुंडाळण्यास येणार नाही.
   ८) सर्व दिवे किंवा झुंबरे ही अशा बांधकामाच्या बाजूपासून (से.मी.पेक्षा कमी नसेल इतक्या दूर)

**ठराव :-**

उपरोक्त प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ व ४५८ (३६) अन्वये तयार करण्यांत आलेले सार्वजनिक रस्ते ठिकाणे व मोकळ्या जागा भाड्याने देणे बाबतचे उपविधीस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१६२ :-**

उपआयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यावरुन तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम व ४५८ (३६) अन्वये सार्वजनिक रस्ते ठिकाणे आणि मोकळ्या जागा भाड्याने देणे बाबत तयार करण्यांत आलेले उपविधी जे सोबत जोडण्यांत आलेले आहेत त्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत यावी. करिता सदरील सोबत जोडण्यांत आलेले उपविधीस मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

उपरोक्त प्रस्तावास दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ व ४५८ (३६) अन्वये तयार करण्यांत आलेले सार्वजनिक रस्ते, ठिकाणे व मोकळ्या जागा भाड्याने देणे बाबतचे उपविधीस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२८.१०.९३

**प्रस्ताव क्र.१६५ :-**

मा.संचालक नगर रचना विकास योजना, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र./वियोऔ(सु.) मुदतवाढ/कलम-२६/ऊसंनरऔ/३८४, दि.१६.०९.९३ अन्वये, औरंगाबाद शहराची मुळ हद्दीसाठी मंजूर आलेली विकास योजना सुधारित करण्याच्या कामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करण्यासाठी दि.०५.१०.९३ ते ०४.१०.९४ पर्यंत एक वर्षाची मुदतवाढ शासन नगर विकास विभाग कडून होणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. औरंगाबाद शहराची विकास योजना (जुन्या हद्दीसाठी) सुधारित करण्याचा इरादा ०५.१०.८९ रोजी प्रसिध्द केला आहे. तेव्हा पासून दोन वर्षात म्हणजेच ०४.१०.९१ पर्यंत वरील अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे कलम २६ (१) प्रमाणे कलम २६ (१) प्रमाणे प्रसिध्द करणे आवश्यक होते. तथापि पुढे ०४.०४.९३ पर्यंत ६-६ महिन्याच्या अंतराने ही मुदतवाढ सहाय्यक संचालक नगर रचना महाराष्ट्र राज्य पुणे यांनी मंजूर केली असून ०४.१०.९३ पर्यंत मुदतवाढ मिळण्याचा प्रस्ताव देखील दिनांक २८.०६.९३ रोजी पाठविलेला आहे. आता सुधारित विकास योजनेचे बरेच कामे होणेवर आहे. शहरातील

विद्यमान शैक्षणिक व वैद्यकीय सुविधाची माहिती संकलन करणे, मंजूर विकास योजनेच्या प्रस्तावांची प्रत्यक्ष जागेवर पाहणी करणे व त्याप्रमाणे प्रस्तावित लोकसंख्येसाठी प्रत्यक्ष जागा पाहणी करुन प्रस्ताव तयार करणे इ. कामासाठी पुढील एक वर्षासाठी म्हणजेच दिनांक ०५.१०.९३ ते ०४.१०.९४ पर्यंत वरील अधिनियमांच्या कलम २६ (१) प्रमाणे सुधारित विकास योजना प्रसिध्द करणेसाठी शासन नगर विकास विभागाकडून मुदतवाढ होणे आवश्यक असल्याने वरीलप्रमाणे मुदत वाढीचा प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

औरंगाबाद शहराची जुन्या हद्दीसाठी विकास योजना सुधारित करणेचे काम चालू असून वर प्रस्तावात दर्शविलेल्या प्रमाणे अद्याप बरीच कामे होणेवर असल्यने आणि दि.०४.१०.९४ पर्यंत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये विकास योजना प्रसिध्द करणे शक्य झालेल्या नसल्याने प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करुन नंतर वरील अधिनियमाच्या कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करण्यासाठी शासन नगर विकास विभागातून पुढील एक वर्षासाठी म्हणजेच दिनांक ०५.१०.९३ ते ०४.१०.९३ पर्यंत मुदतवाढ घेण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मान्यता देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२९.१०.९३

**प्रस्ताव क्र.१६६ :-**

मे.सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९३-९४ हया वर्षासाठी महानगरपालिका तृतीय व चतुर्थश्रेणी स्त्री कर्मचारी यांना साडी व शर्ट सलवार खरेदी बाबत वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यांत आल्या अंतीम तारखेपर्यंत पुरुष कर्मचारी गणवेश कापड खरेदी बाबत चार निविदा व स्त्री कर्मचारी साडी खरेदी बाबत एकूण चार निविदा कार्यालयास प्राप्त झाल्या त्याच बरोबर शासनाचे अंगीकृत व्यवसायीकांकडून देखील दरपत्रके मागविण्यांत आले होते. सदरील व्यावसायिकांकडून दोन्ही मिळून तीन दरपत्रके कार्यालयास प्राप्त झाली.

वरील प्रमाणे प्राप्त निविदा व दरपत्रके खरेदी समितीपुढे ठेवण्यांत आले. दिनांक २३.१०.९३ रोजी संपन्न झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीस प्राप्त निविदा धारकांच निविदातील दर व प्राप्त नमुने यांची तुलनाकरुन व झालेल्या सविस्तर चर्चेनुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

१. पुरुष कर्मचारी गणवेश कापड तृतीय श्रेणी - महाराष्ट्र स्टेट पावरलूम, मुंबई यांचे टेरीकॉट कापडाचे (खाकी व पांढरा दोन्ही मिळून) दर रु.८०-८० प्रति मिटर मान्य करण्यांत आले.

२. पुरुष कर्मचारी गणवेश कापड चतुर्थश्रेणी मे.रमेश बिन्नीज टेक्सटाईल्स औरंगाबाद यांचे "रॉयलटच" कापड वसंत करण्यांत येवून त्यांचे दर रु.९२.५० प्रति मिटर खाकी निळा व पांढरा कापड्याचे मान्य करण्यांत आले.

३. रंगीत व पांढरी साडी (९ वार व ६ वार) खरेदी मे.अरमान, औरंगाबाद यांची "पुष्पारीण" साडी रंगीत व पांढरी ९ वार व ६ वार चे दर रु.३०३.७५ व रु.१९०.०० प्रत्येकी मान्य करण्यांत आले.
४. ब्लाऊज पिस - मे.अरमान औरंगाबाद यांचे रंगित व पांढरे ब्लाऊज पीसचे दर प्रति नग रु.२९/- मान्य करण्यांत आले.
५. शर्ट-सलवार मे.रमेश संतोष जैन औरंगाबाद यांचे दर प्रति नग रु.३४८/- चे मान्य करण्यांत आले.
६. ओढणी-मे.रमेश संतोष जैन, औरंगाबाद यांचे दर प्रति नग रु.६७/- चे मान्य करण्यांत आले.
प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खाली दिलेल्या गणवेश कापड व साडी तसेच शर्ट सलवार खरेदी दरास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

१. तृतीय श्रेणी गणवेश कापड खरेदी-महाराष्ट्र स्टेट पावरलूम, मुंबई यांचे दर रु.८०-८० खाकी व पांढरा टेरीकॉट कापड प्रति मिटर प्रमाणे.
२. चतुर्थश्रेणी कर्मचारी गणवेश कापड खरेदी मे.रमेश बिन्नीज टेक्सटाईल्स, औरंगाबाद यांचे दर रु.९२.५० चे "रॉयल-टच" खाकी निळा व पांढरा कापड प्रती मिटर प्रमाणे.
३. रंगीत व पांढरी साडी (९ वार व ६ वार) मे.अरमान, औरंगाबाद यांचे "पुष्पारीण" हया साडीचे दर रु.३०३.७५ ९ वार साडी व रु.१९०.००/६ वार साडी प्रति नग प्रमाणे.
४. ब्लाऊज पिस - मे.अरमान औरंगाबाद यांचे रंगित व पांढरे ब्लाऊज पीस साडीचे दर प्रती नग रु.२९/- प्रमाणे.
५. शर्ट-सलवार मे.रमेश संतोष जैन औरंगाबाद यांचे दर प्रति नग रु.३४८/- प्रमाणे.
६. ओढणी-मे.रमेश संतोष जैन, औरंगाबाद यांचे दर प्रति नग रु.६७/- प्रमाणे मान्यता देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-३०.१०.९३

**प्रस्ताव क्र.१६७ :-**

महानगरपालिकेस नियमानुसार विविध प्रकारच्या स्थळ कार्यवाही दैनंदिन राबवाव्या लागतात. त्यात प्रामुख्याने अनाधिकृत बांधकाम/अतिक्रमण तोडण्याच्या कार्यवाहीचा तसेच शहर विकास योजनेतील बांधकामे तोडण्यांचा कार्यवाहीचा समावेश असतो. स्थळ कार्यवाही राबविते वेळी शांतता व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता असते. त्यावेळी विविध पोलिस स्टेशनची मदत घ्यावी लागत असते.

पोलिस खात्यावर सुध्दा नेहमी कामाचा ताण असतो त्यामुळे महानगरपालिकेने ठरविलेल्या कार्यवाहीचे दिवशी काही वेळा पोलिस मदत मिळत नाही. त्यामुळे ऐनवेळी

आयोजित केलेली कार्यवाही स्थगित करावी लागते. अशा स्थितीत कार्यवाहीचे बाबतीत जी गोपनियता बाळगायची गरज असते ती राहत नाही.

तरी एक पोलिस उप निरिक्षक व १० पोलिस कॉन्स्टैबल कर्मचाऱ्यांचे पथक महानगरपालिकेस प्रतिनियुक्तीवर दिल्यास महानगरपालिका त्यांचे वेतनाचा खर्च उचलावा लागेल. करिता सदरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात नमूद केल्यानुसार एक पोलिस उपनिरिक्षक व १० पोलिस कॉन्स्टेबल महानगरपालिकेस प्रतिनियुक्तीवर होण्याची मंजूरी दिली जाते. वेतन व भत्ते बाबत खर्च शासनाच्या नियमानुसार देण्याची मंजूरी दिली जाते. ठरावास प्रशासकीय मंजूरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१६८ :-**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लघु टंकलेखक एक पदास विधी विभागाकरिता शासन निर्णय क्र.एमसी/१६९२/४९४/सी.आर.-२६/नवि-२४, दि.०३.०८.९३ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५१ चे पोटकलम (४) अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन रु.१४००-४०-१८०० दक्षता रोध ५०-३०० या वेतनश्रेणीत मंजूरी दिलेली आहे.

श्री.सुनिल ढेकळे, लिपिक यांना मनपा/आदेश क्र./मनपा/अस्था-१/९३२६/९०, दि.१७.११.९० अन्वये लघुलेखक या पदावर पदोन्नती देण्यांत आली होती. सदर पदास शासनाची मान्यता देण्यांत आली होती. सदर पदास शासनाची मान्यता घेण्यांत आलेली नव्हती. केवळ सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन संबंधितास पदोन्नती देण्यांत आलेली होती.

मनपा अस्थापनेवर शासन निर्णय क्र.एमएमसी/१६९२/४९४/सी.आर.-२६/नवि-२४, दि.०३.०८.९३ नुसार लघुटंकलेखकाचे एक पदास मान्यता मिळालेली आहे. ते पद न भरता श्री.ढेकळे सुनिल यांना ज्या पदावर नियुक्ती दिली आहे. त्या पदामध्ये रुपांतरीत करणे योग्य होईल.करिता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव.

**ठराव :-**

मनपा आस्थापनेवर शासन निर्णय क्र.एएमसी/१६९३/४९४/सी.आर.-२६/नवि-२४, दि.०३.०८.९३ नुसार लघुटंकलेखकांचे पदास मान्यता मिळालेली असून सदर पद न भरता श्री.सुनिल ढेकळे यांना दिलेल्या लघुटंकलेखक या पदावरील नियुक्ती शासन मान्यता मिळालेल्या पदामध्ये रुपांतरीत करण्यांस मान्यता देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०१.११.९३

**प्रस्ताव क्र.१६९ :-**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, ईटखेडा येथे पुलाकरिता १२०० मी.मी.व्यासाचे आर.सी.सी.पाईप दगडी बांधकामात रिटेनिंग वॉल व गटार बांधणे आणि रस्त्याचे पुर्नखडीकरण करणे कामाकरिता सा.बा.विभागाचे सन १९९१-९२ चे दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,०५,३३७/- चे तयार करण्यांत आले असून मा.प्रशासक साहेब हयांनी दि.०६.०९.९३ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्यानुसार निविदाद्वारे वर्तमान पत्रात प्रसिध्दी देवून निविदा मागविल्या असता निविदा विकण्याच्या अंतिम तारखेपर्यंत वीस निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतीम तारखेला फक्त तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | रामेश्वर कन्स्ट्रक्शन कंपनी | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने |
| २. | श्री.सय्यद गय्यासुद्दीन | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त दराने |
| ३. | श्री.कुलवंतसिंग | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराने |

तुलनात्मक दृष्ट्या श्री.सय्यद गयासुद्दीन यांचे असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त आहे. परंतू सदरील दर चालू D.S.R. प्रमाणे ९.६७% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी येतात. तरी श्री.सय्यद गयासुद्दीन यांची निविदा मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ईटखेडा येथे पुलाकरिता १२०० मी.मी.व्यासाचे आर.सी.सी.पाईप दगडी बांधकामात रिटेनिंग वॉल व गटार बांधणे आणि रस्त्याचे पुर्नखडीकरण करणे कामाकरिता तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त दराची निविदा श्री.गयासुद्दीन यांची मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१७० :-**

मे.सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, मे.न्यु भारत स्टोअर्स, गुलमंडी यांचा काळ्या यादीत समावेश करण्यांत आल्याने तयंचे लिखान साहित्यातील मान्य आयटम दुसऱ्या क्रमांकाच्या कमी दराच्या निविदा धारकास त्यांचे Second lowest दराप्रमाणे सन १९९३-९४ खरेदीसाठी मा.प्रशासकांनी ही २६.१०.९३ रोजी मान्यता दिलेली आहे. करिता खाली दर्शविलेले Second lowest निविदाधारका आयटक खरेदी करणेस मान्यता व्हावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मुरली स्टशनर्स | - | ३५,६६,८२,९०,९८,१००,१०७,१२२,१६२ |
| २. | मे.जे.के.इंटरप्रायजेस | - | १,९,१८,२६,३४,४२,५०,८३,१०७,१२३,१४७,<br>१५८,१५९,१६२ |
| ३. | मे.विनय जनरल स्टोअर्स | - | ९,३५,१०४,१०७,१३८,१५४,१५९,१६१,१६२,(एकूण ९) |

**ठराव :-**

मा.प्रशासक यांनी मान्यता दि.२६.१०.९३ नुसार वरीलप्रमाणे मे.मुरली स्टेशनर्स यांच्या एकूण (९) मे.न्यु.जे.के.इंटरप्रायजेस यांच्या एकूण (१४) व मे.विजय जनरल स्टोअर्स यांच्या एकूण (९) आयटम्सना प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०२.११.९३

**प्रस्ताव क्र.१७१ :-**

अग्निशामक दलासाठी मुख्य अग्निशामक अधिकारी यांनी प्रस्ताव दिला आहे की, किर्लोस्कर केपीएफ १६०० क्षमतेचा पोर्टेबल पंप खरेदी करावयाचा आहे. या अगोदर गेल्या वर्षी किर्लोस्कर केपीराज १६०० चा एक पंप खरेदी केलेला आहे. २६ एप्रिल, १९९३ च्या विमान अपघात व इतर अग्निशामकच्या मेजर कॉल वर अशा पंपाची आवश्यकता असते. सदरील पंप शासकीय अनुदान १९९२-९३ च्या अग्निशामक दलाच्या वाहन व साहित्य खरेदी हेड मधून (३० लाख) मधून करावयाचा आहे. किर्लोस्कर केपीराज १६०० साठी एकूण खर्च रु.६,२२,७२०/- येणार आहे. यामध्ये सर्व कराचा समावेश आहे. जुने डिझेल पंप लिलावात काढण्यासंबंधी कार्यवाही चालू आहे.

करिता एक किर्लोस्कर केपीराज-१६०० खरेदी करण्यांच्या प्रस्ताव मान्यतेस्तव व कार्यवाहीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशामक दलाकडे मोठ्या आगीवर नियंत्रण आणण्यासाठी आवश्यक असलेला एक किर्लोस्कर केपीएफ १६००/- पंप खरेदी करण्यासाठी रक्कम रु.६,२२,६२०/- च्या (सूंपर्ण टॅक्ससह) खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०३.११.९३

**प्रस्ताव क्र.१७२ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जुनाबाजार येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत कार्यलयीन निविदा क्र.३/९३-९४ जा.क्र./मनपा/कार्य-अ/११३६/९३-९४, दि.२०.०८.९३ द्वारा दैनिक नवा मराठवा व दैनिक औरंगाबाद टाईम्स हया वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण १० निविदा विकण्यांत आल्या व त्यापैकी केवळ २ निविदा प्राप्त झाल्या, असून त्यात तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे दरपत्रक अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.९% जास्तीनेश्री.सै.फैजुल हक्क यांचे आहे.

सदर दर जास्तीचे वाटत असल्यामुळे श्री.सै.फैजुल हक यांना दराबाबत वाटाघाटी करण्यास बोलाविले असता अंदाजपत्रकीय दरावर मान्यता मिळालेली आहे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.सै.फैजुल हक्क ठेकेदार औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरावर (वाटाघाटीनुसार) काम करुन घेण्यांस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१७३ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.घाटी रोडवर ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी./अर्धगोलाकार गटार बनविणे बाबत कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.३/९३-९४/जा.क्र./मनपा/का.अ./११३६/९३-९४, दि.२०.०८.९३ द्वारे दैनिक नवा मराठा व दैनिक औरंगाबाद टाईम्स हया वर्तमान पत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा विकण्यांत आल्या व त्यापैकी केवळ ३ निविदा प्राप्त झाल्या त्यात तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे दरपत्रक अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्तीने श्री.शेख शरीफ यांचे आहे.सदर दर जास्तीचे वाटत असल्यामुळे श्री.शेख शरीफ यांना वाटाघाटीस बोलाविले असता अंदाजपत्रकीय दरावर काम करणे मान्य झाले आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.शेख शरीफ ठेकेदार औरंगाबाद यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दराने (वाटाघाटीनुसार) काम करुन घेण्यांस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक ०४.११.९३

**प्रस्ताव क्र.१७४ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालना रोड वरील बोहरी कब्रस्तानला संरक्षित भिंत बांधणे कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये ४,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. सदरील अंदाजपत्रकीय रक्कमेस मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा क्र.१० पत्र जा.क्र./मनपा/श.अ./३७४/९३, दि.१३.१०.९३ द्वारे निविदा मागविण्याकरिता दै.मुजमशीर/दै.स्वरगंगा/इ.वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत आले.

विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा फॉर्म एकूण (३) तीन विकण्यांत आले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत सीलबंद पाकीटात दर भरुन एकूण (३) तीन निविदा प्राप्त झाली. सदरील निविदा दि.२६.१०.९३ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले. त्यात दर्शविलेले दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | | दिलेले दर |
|---|---|---|---|
| १. | अब्बास अली | - | २.८६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| २. | डी.अजितसिंग | - | ३.५५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| ३. | एम.रा.सिद्दीकी | - | ४.९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्ट्या श्री.अब्बास अली गुत्तेदार यांचे २.८६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दर सदर कामाचा खर्च स्मशानभूमी सन १९९३-९४ या तरतूदीमधून करण्यांत येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोड वरील संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी रक्कम रुपये ४,००,०००/- च्या अंदाजपत्रकीय रकमेस श्री.अब्रार अली गुत्तेदार यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.८६% जास्त दरास मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१७५ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र.३ च्या विविध ठिकाणी असलेल्या सरफेस गटारीची दुरुस्ती व देखभाल करण्याकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,००,०००/- चे तयार करण्यांत आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.३ मधील विविध ठिकाणी असलेल्या सरफेस गटारीची दुरुस्ती व देखभाल करिता रुपये ३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१७६ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पंच कुंआ स्मशानभूमी येथे संरक्षित भिंत बांधणे, रेस्टींग रोड, चौकीदार निवास स्थान बांधणे, सपाटीकरण ई. कामे करणे बाबत कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. मा.प्रशासक कामाचे बी-१ नमुन्यात निविदा सूचना पत्र क्र.१२२/९३, दि.२०.०३.९३ द्वारे शहरातील दै.लोकमत टाईम्स, दै.सिटीजन्स ई.वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले. विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण तीन (३) विकण्यांत आले. व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर

भरुन सिलबंद पाकीटात एकूण दोन (२) प्राप्त झाले सदरील निविदा दि.१७.०४.९३ रोजी मा.मुख्य लेखा परिक्षक व उपस्थित गुत्तेदारासमक्ष शहर अभियंता यांच्या दालनात उघडण्यांत आले. त्यात दर्शविलेले दर खालीलप्रमाणे -

| **अ.क्र.** | **एजन्सीचे नांव** | | **दिलेले दर** |
|---|---|---|---|
| १. | कैसर खान | - | ९.९२% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| २. | एस.एच. असोशिएटस | - | १५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

सदरील निविदापत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्ट्या श्री.कैसर खान गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९२% जास्त दराचे दर आहे. सदर प्रकरण मा.प्रशासक साहेब त्यांचेकडे मंजूरीस्तव सादर करण्यांत आले. त्यावर मा.प्रशासक साहेब यांनी दराच्या वाटाघाटीस गुत्तेदार यांस बोलवून तजवीज केली आहे. या अनुषंगाने गुत्तेदारास वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले. वाटाघाटी अंतिम चर्चा अन्वये गुत्तेदार यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्याचे मान्य केले आहे.

सदरील खर्च शासकीय अनुदान सन १९९२-९३ च्या तरतूदीमधून करण्यांत येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचकुँआ स्मशानभूमी येथे संरक्षित भिंत बांधणे, रेस्टींग रोड, चौकीदार निवासस्थाने बांधणे सपाटीकरण इ.कामासाठी रक्कम रु.४,७८,०००/- च्या अंदाजपत्रकीय रक्कमेस व संबंधित गुत्तेदार यांनी दिलेल्या दरास वाटाघाटी नुसार अंदाजपत्रकीय दरात करण्याच्या दरास मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>सचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>प्रशासक<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०५.११.९३

**प्रस्ताव क्र.१७७ :-**

कामगार अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६६ उपक्रम १८ प्रमाणे महानगरपालिका मधील क्षेत्रात कामगार कल्याणाची व जनकल्याणाची सोय करणे हे महानगरपालिकेचे आवश्यक कर्तव्य ठरते. औरंगाबाद हद्दीत जे कामगार कल्याण केंद्र महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई चालवित आहे. ते महानगरपालिका औरंगाबादकडे हस्तांतरीत करण्यांत यावे.

कामगार कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी व औरंगाबाद हद्दीतील जनकल्याणार्थ कामगार, कल्याण केंद्र महागनरपालिकांकडे हस्तांतर करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी ठराव मंजूरीसाठी सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मंजूरी देण्यांत येते व कामगार कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी व औरंगाबाद हद्दीतील जनकल्याण व औरंगाबाद हद्दीत अस्तित्वात असलेले कामगार कल्याण केंद्र महानगरपालिकाकडे हस्तांतरीत करुन घेण्यांत यावे व त्यासंबंधी

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आयुक्त व महाराष्ट्र राज्याचे संबंधित खात्याचे सचिव यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यांत यावा.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१७८ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, १९९३-९४ साला करिता दुसऱ्या तिमाही करिता विविध विभागातील मागणी प्रमाणे ४०००० गोणी सिमेंटची आवश्यकता होती. त्या आधारे प्रस्ताव सादर केला असता तुर्त १०००० गोणी सिमेंट व्हि.अे.ट्रेडींग कंपनी कडून प्रति रु.२०३५ (व प्रति गोणी १०१.७५) हया दरास मा.प्रशासक साहेब यांची मंजूरी दि.१०.०८.९३ प्रमाणे हा ठराव क्र.८९ दि.२१.०८.९३ अन्वये १८००० गोणी सिमेंट खरेदी केले आहे.

तसेच बाकी २२००० सिमेंट गोणी खरेदी बाबत संचिका सादर केली असता मा.प्रशासक साहेब यांनी पुर्वीचाच पुरवठा धारकांकडून पुर्वीच्याच मंजूर दराप्रमाणे २२००० गोणी सिमेंट खरेदी करण्याची दि.२२.१०.९३ ला मंजूरी दिली आहे.

त्या आधारे कार्यालयीन पत्र क्र.२१३/भांडार/३९४/९३, दि.२५.१०.९३ अन्वये पुरवठाधारक यास सिमेंट पुरवठा बाबत संम्मती विचारली असता त्यांनी दि.२६.१०.९३ रोजी लेखी कळविले की, पुर्वीच्या मान्य दराने सिमेंटच्या पुरवठा करण्यांस तयार आहे. त्यास मा.प्रशासक यांनी दि.०२.११.९३ रोजी मान्यता दिली आहे.

**ठराव :-**

तरी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे २२००० गोणी सिमेंट प्रती गोणी १०१.७५ (अेकशे अेक रुपये पंच्याहत्तर पैसे) प्रती टन २०३५ (दोन हजार पस्तीस रुपये) ११०० मे.टन सिमेंट व्हि.अे.ट्रेडींग कंपनी कडून खरेदी करण्यांस व त्यांची रक्कम रुपये २२,३८,५००/- (बावीस लाख अडतीस हजार पाचशे) व्ही.अे.ट्रेडींग कंपनी यांना अदा करण्याची प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०६.११.९३

**प्रस्ताव क्र.१७९ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.नुर कॉलनी ते औरंगपुरा येथील बांधकाम केलेल्या नाल्यातील गाळ काढणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रुपये ८०,१००/- चे तयार करण्यांत आले आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नुर कॉलनी ते औरंगपुरा येथील बांधकाम केलेल्या नाल्यातील गाळ काढणेच्या कामाकरिता रुपये ८०,१००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-०८.११.९३

**प्रस्ताव क्र.१८० :-**

मे.सहाय्यक आयुक्त-२ हयांनी प्रस्ताव सादर केला आहे की, भांडार विभाग महानगरपालिके तर्फे मनपा कार्यालयातील विविध विभागातील पुस्तकांचे/फॉर्मचे "बायडिंग" करणे आहे. करिता सदरील कामासाठी दरपत्रके मागवून मा.प्रशासक यांचे दिनांक २८.१०.९३ नुसार मान्यता घेण्यांत आलेली आहे. तुलनात्मक तक्त्यानुसार खालील प्रमाणे बायडर्सचे त्यांचे नांवासमोर दर्शविण्यांत आलेले आयटम कमी दराचे असलेले त्यास मान्यता व्हावी.

१. मे.लिबर्टी बुक बायडर्स ॲण्ड प्रिंटर्स,
आयटम क्र. २ (अ), ३(अ), ३ (ब), ४ (अ), ५ (अ) व ५ (क) (एकूण ६)

२. मे.शालीमार बुक बायडींग वर्क्स -
आयटम क्र.१ (अ), १ (ब), २ (ब), ४ (ब), ४ (क) व ५ (ब) (एकूण ६)

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.लिबर्टी बुक बायडर्स ॲण्ड प्रिंटर्स यांचे आयटम क्र. २ (अ), ३(अ), ३ (ब), ४ (अ), ५ (अ) व ५ (क) (एकूण ६) तसेच मे.शालीमार बुक बायडींग वर्क्स यांचे आयटम क्र. १ (अ), १ (ब), २ (ब), ४ (ब), ४ (क) व ५ (ब) (एकूण ६) यास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
सचिव प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक :-१०.११.९३

**प्रस्ताव क्र.१८१ :-**

अर्जदार श्री.सुरेश दयाराम पाटील, सुभाष भागचंद पाटणी आणि डॉ.चेणकरण गणेशलाल संचेती यांनी अर्ज देवून विनंती केली आहे की, त्यांची मौजे शहानूरवाडी येथील स.न.९/२ ची जमीन क्षेत्र ६.०० एकर विकास योजनेच्या आरक्षण क्र.१५० "खुली जागा" व आरक्षण क्र.१५१ "प्राथमिक शाळा व क्रिडांगण मध्ये संपूर्ण बाधित होते." हया बाधीत जागेपैकी त्यांनी त्यांचे जागेतील आरक्षणे वगळण्यांस विनंती करुन ही आरक्षणे वगळण्यास ३०% जागा विनामोबदला महानगरपालिकेस देण्याची तयारी दर्शविली आहे.

विकास योजना अहवालाप्रमाणे आरक्षण क्रमांक १५० खुली जागांचे क्षेत्र ३.१४ हे आहे. त्यापैकी शासनाने दिनांक १८.०६.९१ ला व ९९ हे जागा वगळण्यांस मंजूरी दिलेली आहे व आाता आरक्षणांत २.१५ हेक्टर एवढी जागा शिल्लक राहते. त्यापैकी अर्जदारांची सुमारे १.२१ हे जागा बाधित होते. ही १.२१ हे जागा वगळण्यास आरक्षणात ०.९४ हे एवढी जागा शिल्लक राहील. तसेच आरक्षण क्र.१५१ चे विकास योजना अहवालाप्रमाणे क्षेत्र ३

एकर ९ गुंठे, (१.३० हे.) आहे. अर्जदारांची या आरक्षणांस सुमारे १.१२ हे जागा बाधित होते व ९ आर जागा ४० फुट रुंद विकास योजना रस्त्याने बाधित होते. तरी अर्जदाराने ९.०० आर रस्त्यासाठी व (०.६४ हे.) आरक्षणांसाठी विनामोबदला देण्याच्या अटीवर आरक्षण क्र.१५० व १५१ मधील अर्जदारांची जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये वगळणेसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

वर प्रस्तावित केल्याप्रमाणे अर्जदार आरक्षण क्र.१५० व १५१ खुली जागा व प्राथमिक शाळा व क्रिडांगण अनुक्रमे मध्ये त्यांच्या बाधित होणाऱ्या ६ एकर, (२.४२ हे.) जागेपैकी (०.६४ हे.) जागा आरक्षणासाठी व ९ आर जागा ४० फूट रुंद रस्त्यासाठी विनामोबदला देण्याच्या अटीवर वर प्रस्तावित केल्याप्रमाणे आरक्षण क्र.१५० खुली जागा पैकी अर्जदारांची १.२१ हेक्टर जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये वगळण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच आरक्षण क्रमांक १५१ साठी अर्जदार यांची नकाशांत दाखविल्याप्रमाणे ०.६४ हेक्टर जमीन (बी अर्जदार विनामूल्य महानगरपालिकेस हस्तांतरीत करतील) इतर जमीनीसह राखून ठेवून अर्जदारांची उर्वरित जमीन प्राथमिक शाळेचे आरक्षणांतून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये वगळण्यांस मान्यता देण्यांत येते. नव्याने तयार झालेल्या आरक्षण क्रमांक १५१ प्राथमिक शाळाचे क्षेत्र (निळ्या किनाराने दाखविला) ०.८५ हेक्टर इतके राहील.वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-१२.११.९३

**प्रस्ताव क्र.१८२ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जलनिःसारण कामासाठी आवश्यक असलेले एस.एफ.आर.सी.गोलरिंग व ढापे पुरविण्याच्या कामाकरिता निविदा सुचना क्र.४/मनपा/युजीडी-१/२२६८/९३, दि.२८.०९.९३ अन्वये फॉर्म-डी नमुन्यात निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण (२) निविदा विकल्या गेल्या. दोन्ही निविदा प्राप्त झालेले निविदा पैकी मे.के.के.मेनहोल ग्रिटीग्ज के.नाशिक यांचे प्रती नग रुपये ७२८.०० या दराचे दर पत्रक तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे आहे.

मे.के.के.मेनहोलस ग्रिटींग्ज कं.नाशिक हयांचे निविदाचे दर अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा जास्त वाटत असल्यामुळे कार्यालयीन पत्रक क्र.ज.नि.-१/३०४/९३, दि.०१.११.९३ अन्वये संबंधित गुत्तेदारांशी दि.०३.११.९३ रोजी झालेल्या वाटाघाटी नुसार के.के.मेनहोल ग्रिटींग्ज कं.नाशिक यांनी रुपये ७२८.०० ऐवजी रुपये ६९५.०० प्रति नग हया दराने एस.एफ.आर.सी.रिंग व ढापे पुरविणे बाबत दि.०३.११.९३ च्या लेखी पत्रकाद्वारे संमती दिली आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनिःसारणाच्या कामासाठी आवश्यक असलेले एस.एफ.आर.सी.गोलरिंग व ढापे पुरवठा करणे बाबत मे.के.के.मेनहोल ग्रिटींग्ज कंपनी नाशिक यांनी दि.०३.११.९३ रोजी दिलेल्या लेखी संमती नुसार प्रति नग रुपये ६९५.०० या

दराने ढापे व रिंग खरेदी करण्यांस मंजूरी देण्यांत येते.ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-१९.११.९३

**प्रस्ताव क्र.१८३ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मुकूंदवाडी येथे १५० एम.एम.व्यासाची २४० एम.एम.व्यासाची आणि ३०० एम.एम.व्यासाची (एन.पी.-२) आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता निविदा सूचना क्र.३/मनपा/ज.नि.-१/२०७/९३, दि.०७.१०.९३ अन्वये पुन्हा निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण (१४) निविदापत्रके विकण्यांत आली. त्यापैकी दर भरलेली एकूण (सात) दरपत्रके निर्धारित प्रत्येक तारखेस प्राप्त झाली. त्यापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १६.७५% कमी दराची श्री.बी.ए.काल्डा यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकूंदवाडी येथे १५० एम.एम.व्यासाची, २५० एम.एम.व्यासाची आणि ३०० एम.एम.व्यासाची (एन.पी.-२) आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता या कामासाठी लागणारे आर.सी.सी.पाईप आय.एस.आय.मार्कचे पुरविण्यांत येतील या अटीवर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १६.७५% कमी दराच्या श्री.बी.ए.काल्डा यांचे दरपत्रक मंजूरी देण्यांत येते. ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-१९.११.९३

**प्रस्ताव क्र.१८४ :-**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी सादर केला आहे की, महानगरपालिकेचे खडकेश्वर येथील ग्रंथालयात ७३००० पेक्षा अधिक पुस्तके असून मुख्य वाचनालय एक व शाखा ९ असे एकुण वाचनालयाची संख्या १० आहे. वाचनालयातील कर्मचाऱ्यांची संख्या २८ आहे. सध्या मनपा अस्थापनेवर वाचनालयासाठी एक सहाय्यक ग्रंथपालाचे पद अस्तित्वात असून सहाय्यक ग्रंथपालाचे पद अस्तित्वात असून वाचनालयाच्या कामाचा व्याप व त्यांची संख्या लक्षात घेता औरंगाबाद मनपा अस्थापनेवर सहा.ग्रंथपाल पद नामाऐवजी ग्रंथपाल असे पदनाम करण्यांत यावे तसेच ग्रंथपालाच्या रु.५००.९०० सुधारित (१६४० ते २९००) वेतन श्रेणीस मान्यता देण्यांत यावी.करिता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव.

**ठराव :-**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे मनपा अस्थापनेवरील सहा.ग्रंथपाल पदनामाऐवजी ग्रंथपाल पदनामास तसेच ग्रंथपालाच्या रु.५००.९०० सुधारित (१६४० ते २९००) वेतनश्रेणीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही करण्यांत यावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२२.११.९३

**प्रस्ताव क्र.१८५ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.बंजारा कॉलनी येथे २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता कार्यालयीन निविदा सूचना क्र.१/९३-९४ जा.क्र./मनपा/का.अ./४२२/९३, दि.२९.०६.१९९३ द्वारे दैनिक नवा मराठा, दैनिक औरंगाबाद टाईम्स हया वर्तमान पत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यांत निविदा मागविल्या असता एकूण २५ निविदा विकण्यांत आल्या व त्यापैकी केवळ ६ निविदा प्राप्त झाल्या असून त्यात सर्वात कमी दराचे दरपत्रक श्री.दुरानी क्यु.के.ठेकेदार औरंगाबाद यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.७५% कमी दराने असे आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सदर काम श्री.दुरानी क्यु.ठेकेदार औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.७५% कमीने करुन घेण्यांस प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१८६ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, हर्सुल येथील म्हाडा वसाहतीत विद्युतीकरणाचे काम करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये १,३८,६८४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरचा खर्च कमकुवत घटक कल्याण निधीतून करण्यांत येईल. सदर कामाकरिता निविदा सूचना क्र./मनपा/अशअ/३६२/९३, दि.१२.१०.९३ अन्वये निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदर तीनही निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक ०४.११.९३ रोजी उघडण्यांत आली. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.दानिश सेल्स कार्पोरेशन | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे.ग्लोब इंजिनियरिंग | - | २ टक्के जास्त दराने |
| ३. | मे.रास ॲण्ड राय इंजिनियरिंग | - | ३ टक्के जास्त दराने |

वरील निविदापत्रकापैकी मे.दानिश सेल्स कार्पोरेशन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराएवढे आहे.

तरी रक्कम रुपये १,३८,६८४/- चे अंदाजपत्रक तसेच मे.दानिश सेल्स कार्पोरेशन यांचे अंदाजपत्रकीय दराचे निविदापत्रक मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांच्या प्रस्तावानुसार हर्सुल येथील म्हाडा वसाहतीत विद्युतीकरणाचे काम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये १,३८,६८४/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. सदर काम मे.दानिश सेल्स कार्पोरेशन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१८७ :-**

उपआयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या कक्षेत ७४ प्राथमिक शाळा असून ७०२ प्राथमिक शिक्षक कार्यरत आहेत. शिक्षीकांच्या कामावर देखरेख करणे, त्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करणे, शाळेची तपासणी करणे, इ.साठी मनपामध्ये पर्यवेक्षकांची पदे निर्माण करणे आवश्यक असून, शिक्षणाधिकारी यांचा प्रशासकीय कामाचा व्याप लक्षात घेता शाळेवर नियंत्रण ठेवणे. शैक्षणिक मार्गदर्शन करणे इ. कामे शिक्षणाधिकारी यांचेकडून योग्य प्रकारे पार पाडणे शक्य होत नाही. परिणामी शैक्षणिक दर्जा वाढण्यांस्तव शिस्त राखण्यास अडथळे निर्माण होतात.

सर्वसाधारणपणे २० शाळेस एक याप्रमाणे पर्यवेक्षकांची पदे निर्माण करणे आवश्यक मनपातील चार माध्यमिक शाळा व बालवाड्या वगळता प्राथमिक शाळासाठी तीन पर्यवेक्षकांच्या पदास मान्यता देवून ठराव शासनाकडे पाठविणे योग्य होईल.

करिता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव.

**ठराव :-**

औरंगाबाद महानगरपालिकेतील शाळेची संख्या प्राथमिक शिक्षकांची संख्या व शिक्षणाधिकारी यांचा प्रशासकीय कामाचा व्याप लक्षात घेता शिक्षकांच्या कामावर देखरेख करणे, त्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करणे, शाळांची तपासणी तसेच शैक्षणिक दर्जा वाढविण्याचे दृष्टीने व शिस्त राखण्याच्या दृष्टीकोनातून मनपा आस्थापनेवर तीन पर्यवेक्षकांची पदे भरण्यांस मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१८८ :-**

सन १९९३-९४ हया आर्थिक वर्षात महिंन्द्रा जीपच्या स्पेअर पार्टस खरेदी करण्यासाठी वार्षिक करार करण्याकरिता वर्तमानपत्रात निविदा सूचना देवून महिन्द्रा जीपच्या स्पेअर पार्टस विक्रेत्यांकडून निविदा पत्रके बोलावण्यांत आली. असता एकच निविदा

पत्रक विकल्या गेले व वसुल झाले. मे.रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांचे जे महिंन्द्रा ॲण्ड महिंन्द्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. यांचे दरपत्रक वसूल झाले आहे.

मे.रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांनी कंपनीची प्राईज लिस्ट +२२% असे दर दिले होते. मा.प्रशाकांच्या आदेशाप्रमाणे सदरील एजन्सीज दर कमी करण्यासाठी वाटाघाटीस बोलावले असता त्यांनी प्राईज लिस्ट +१९% या दराने स्पेअर पार्टस पुरवठा करण्यासाठी दिनांक ०३.०९.९३ रोजी लेखी पत्र दिले आहे. वाटाघाटी नंतर आलेल्या दरात सन १९९३-९४ करिता मे.रत्नप्रभा मोटार्स औरंगाबाद यांच्याशी वार्षिक करार करण्याच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.रत्नप्रभा मोटर्स औरंगाबाद महिंन्द्रा ॲण्ड महिन्द्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते यांना वाटाघाटी नंतर दिलेल्या दरात म्हणजे प्राईज लिस्ट + १९% हया प्रमाणे सन १९९३-९४ हया आर्थिक वर्षासाठी वार्षिक करार करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते. पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१८९ :-**

सन १९९३-९४ हया आर्थिक वर्षात टाटा वहानांसाठी लागणारे स्पेअर पार्टस खरेदी करण्यासाठी वार्षिक करार करण्याकरिता वर्तमानपत्रात निविदा सूचना देवून टाटा कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून निविदापत्रके बोलावण्यांत आली असता एकच निविदा पत्रक विकल्या गेले व वसुल झाले. मे.सतीश मोटर्स प्रा.लि.औरंगाबाद जे टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. यांचे दरपत्रक वसुल झाले आहे.

मे.सतीश मोटार्स, औरंगाबाद यांनी कंपनीची प्राईज लिस्ट अधिक + २१% असे दर दिले होते. मा.प्रशासकांच्या आदेशाप्रमाणे सदरील एजन्सीज दर दर कमी करण्यासाठी वाटाघाटीस बोलावले असता त्यांनी प्राईज लिस्ट + १९% या दराने स्पेअर पार्टस पुरवठा करण्यासाठी दिनांक ०३.०९.९३ रोजी लेखी पत्र दिले आहे. वाटाघाटी नंतर आलेल्या दरात सन १९९३-९४ करिता मे.सतिश मोटार्स प्रा.लि.औरंगाबाद यांच्याशी वार्षिक करार करण्याच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.सतीश मोटर्स प्रा.लि.औरंगाबाद टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते यांनी वाटाघाटी नंतर दिलेल्या दरात म्हणजे प्राईज लिस्ट + १९% याप्रमाणे सन १९९३-९४ हया आर्थिक वर्षासाठी वार्षिक करार करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१९० :-**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये दिनांक १४.०१.९४ पासून दि.१९.०१.९४ पर्यंत महाएझ्युबीशन १९९४ भरत आहे. औरंगाबाद शहर ऐतिहासिक असून हया प्रदर्शनात भाग घेण्यासाठी सर्व राज्यातून प्रदर्शन स्टॉल (दालन) येणार आहे. अशा प्रकारचे व एवढ्या मोठ्या प्रमाणात हे प्रदर्शन भरत असल्यामुळे प्रदर्शनासाठी जे साहित्य येणार आहे. त्यात उद्योगिक उत्पादने शेती साहित्य लहान मोठ्या उद्योगधंद्यांना चालना देणारे साहित्य येत आहे. त्यामुळे त्या प्रदर्शनात येणारे साहित्यावर स्टाल (दालन) साहित्यावर जकात कर घेण्यांत येवू नये. असे ठरले असले तरीही महानगरपालिकेच्या उत्पन्नात काही तरतूद ठेवण्यांत यावी. हया दृष्टीने प्रत्येक स्टॉल (दालना) मागे महानगरपालिका जकात कराबाबत एक हजार रुपये (१००.००) प्रति दालन प्रदर्शनी स्थळात वसुल करण्यांत यावी. प्रत्येक दालन लावल्यानंतर वसुल करण्यांत येईल. यासाठी महानगरपालिका स्वतंत्र काऊंटर प्रदर्शन स्थळी देईल व कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही व प्रदर्शन चांगल्या प्रकारे होईल याचे सहकार्य करील. करिता तशी प्रशासकीय कार्यवाहीस्तव प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

औरंगाबाद शहरात भरत असलेल्या प्रदर्शनासाठी महानगरपालिका प्रति स्टॉल जकात (१०००.००) एक हजार रुपये प्रदर्शन स्थळी दालन लावल्यानंतर वसुलीची कार्यवाही करील. करिता प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येवून ठराव पारित करण्यांत येत आहे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१९१ :-**

केंद्र शासनाच्या भंगीमुक्ती योजने अंतर्गत व कमी खर्चाच्या स्वच्छता योजना अंतर्गत औरंगाबाद शहरातील विविध भागात अल्प उत्पन्न गटातील (एल.आय.जी.) नागरिकांसाठी संडास बनविण्याच्या कामाच्या रक्कम रु.३१,६२,५००/- (रु.एकवीस लक्ष बासष्ट हजार पाचशे फक्त) च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळालेली असून हुडको कडून कर्जही मंजूर झालेले आहे. या योजने अंतर्गत एकूण ११०० (अकराशे) लाभार्थीचे काम करण्यांत येणार आहे. तसेच या योजनेत काही पैशाची बचत झाली तर आणखी काही लाभार्थींचा फायदा त्यांना संडास बनवून करुन देता येईल.

या योजने अंतर्गत लाभार्थीचा हिस्सा (वर्गणी) १५% रु.४,७२,५००/- शासनाकडून अनुदान २५% रु.७,८७,५००/- हुडकोकडून कर्ज ६०% २१,१८,९०,०००/- असे एकूण योजनेतील रक्कमेचे वर्गीकरण राहणार आहे.

सबब ह्या कामासाठी वर्तमानपत्रात (दै.सकाळ, दै.लोकमत इ.) जाहिर निविदा मागविण्यांत आल्या असता सर्वात कमी दराची निविदा सुमय्या कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांची प्राप्त झाली. त्यांनी अंदाजपत्रकीय दराच्या २०% जास्त दर भरले होते. या प्रकरणी संबंधितांना दर कमी करणे बाबत वाटाघाटी करणेस्तव पत्र देवून वाटाघाटीस पाचारण केले असता चर्चेत सुमय्या कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराच्या १५% जास्त दराने करण्यांस संमती दिली व त्यास मा.प्रशासक मा.मुख्य लेखापरिक्षक मा.कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिली.

तरी रु.३१,६२,५००/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे हे काम सुमय्या कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने करण्यांस मंजूरी देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

वरीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यांत येते. तसेच अंदाजपत्रकीय रु.३१,६२,५००/- चे एकूण ११०० संडासचे काम सुमय्या कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने करुन घेण्यास मंजूरी देण्यांत येते. त्याच प्रमाणे प्रत्यक्ष काम करतांना जर ११०० संडासचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर योजनेच्या खर्चात बचत झाली तर त्या बचतीतून आणखी काही लाभार्थींना संडास बनवून देण्यांस ही संमती देण्यांत येते.,

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२४.११.९३

**प्रस्ताव क्र.१९२ :-**

जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जकात नियमांतील तरतूदी अन्वये शासकीय मालावर जी जकात सुट देण्यांत येते त्यात "एन फॉर्म" देतांना तफावत आढळून येते. शासनाचे अखत्यारितील जो माल शासनाकडून येतो. उदा.मध्यवर्ती कार्यालयाने स्वतः खरेदी केलेला माल उप विभागीय कार्यालयास पाठविला तर त्या मालावर जकात सुट देण्यांत येते. परंतू असे न होता. जो माल निविदाद्वारे खाजगी निविदाधारक, खाजगी कंपन्या, अंगीकृत व्यवसाय करणाऱ्या संस्था, यांचेकडून खरेदी करतात ज्यावर मध्यवर्ती शासनाचा अबकारी व महाराष्ट्र शासनाचा विक्रीकर व इतर कर देयकातूनच वसुल केले जातात. परंतू त्यात जकात कर वसुली केल्याचे दर्शविण्यांत येत नाही. वास्तविक सदरील माल खरेदी करतांना जकात कर वेगळा आकारण्यांत येईल अशी अट टाकून तो खरेदी केला पाहिजे. म्हणजे जकातीचा त्यात समावेश झालेला असेल. त्यामुळे जकात कर वसुली करणे महानगरपालिकेला सोयीचे होईल व पर्यायाने त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही. यापुढे फक्त सुट देण्यांत येईल व जो माल निविदाद्वारे खाजगी ठेकेदार, खाजगी उद्योग समूह, कंपन्या यांचेकडून खरेदी करण्यांत येतो किंवा घेण्यांत येईल त्यावर यापुढे जकात वसुली, करण्यांत येईल याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे फक्त शासनाचा स्वतःच्या मालकीचे मालावर जकात सुट देण्यांत यावी व जो माल खाजगी ठेकेदार, खाजगी उद्योग समूह, कंपन्या यांच्याकडून खरेदी करण्यांत येईल. अशा मालावर यापुढे जकात आकारणे साठी मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२६.११.९३

**प्रस्ताव क्र.१९३ :-**

कामगार अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेता, कर्मचाऱ्यांच्या हिताच्या व संरक्षणाच्या दृष्टीकोनातून त्यांना प्रशासनांमार्फत संरक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. जर कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळाले तर कर्मचाऱ्यांच्या मनोधैर्यात वाढ होईल, पर्यायाने त्यांची कामाची गती वाढले.

आपणांस बरेच वेळेस असे दिसून येते की, कर्मचारी काम करीत असतांना बरेचदा त्यांच्या हातुन संचिका हिसकावल्या जातात. त्याचप्रमाणे पाणीपुरवठा, ड्रेनेज लाईन विभागांत किंवा इतर विभागात त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना मारहाण केली जाते परंतू त्याची दखल त्वरीत घेतल्या जात नाही. ज्या कर्मचाऱ्यांच्या पाठीमागे कोणीही नाही, त्या कर्मचाऱ्यांस मार खावून गप्प रहावे लागते, ही बाब कर्मचाऱ्यांच्या हिताच्या व स्वरक्षणाच्या दृष्टीकोनातून बरोबर नाही विभागीय अधिकाऱ्यांमार्फत मालमत्ता कर वसुली करीत असतांना, बरीच घरे लिलावात काढीत असतो त्या वेळेस कर्मचाऱ्यांला संरक्षण मिळाले तर कर्मचारी स्वयंस्फुर्तीने पुढे येवून जोमाने काम करेल, पर्यायाने मालमत्ता कर वसुली सुध्दा वाढेल, असे वाटते तसेच बेकायदेशीर बांधकाम, अतिक्रमणे काढत असतांना बरेच वेळा इतर कर्मचाऱ्यांना धमक्या देणे, मारपीठ करणे हे प्रकार चालूच असतात. त्यांनाही या योजनेमुळे संरक्षण मिळेल. कर्मचारी दक्षता कमिटी स्थापन झाल्यास कर्मचाऱ्यांना एक दिलासा दिल्यासारखा वाटेल, आणि आपल्या पाठीमागे प्रशासन व कर्मचारी खंबीर उभे आहे, त्यामुळे घाबरण्याचे काहीच कारण नाही. पर्यायाने कर्मचारी निसंकोच पणे कर्तव्य बजावेल आणि कार्यक्षमता वाढेल.

सदरील कमिटीचे कार्य खालील प्रमाणे असेल.

१. एखाद्या कर्मचाऱ्याला, कामगाराला मारहाण झाल्यास मा.प्रशासक/आयुक्त यांची मंजूरी घेवून तक्रार त्वरीत घेऊन जवळच्या पोलिस स्टेशनला दाखल करणे.
२. कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या बाबत वर्तमान पत्रामध्ये (पेपरमध्ये) वाईट छापून आल्यास त्याची शहनिशा करुन त्वरीत फौजदारी दावा किंवा अब्रु नुकसान भरपाईचा दावा मा.प्रशासक/आयुक्त यांच्या मंजूरीने दाखल करणे.
३. कार्यालयात कुणी गोंधळ करीत असेल किंवा कार्यालयीन कामात अडथळा निर्माण करीत असेल, तर त्या ठिकाणी त्वरीत भेट घेवून मा.प्रशासक साहेब यांच्या नजरेस आणून पुढील कार्यवाही करणे.
४. दोन कर्मचाऱ्यांमधील भांडण यांत, मध्यस्थी करुन मिटविण्याचा प्रयत्न करणे.
५. प्रशासन कर्मचारी व लोकनियुक्त प्रतिनिधी व नागरिक यांच्यांत सलोखा व चांगला समन्वय घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे व त्या दृष्टीने कार्यक्रम आखणे.
६. ज्या विभागात तक्रार झाली असेल किंवा भांडण, मारपिट तंटा इत्यादी बाबी घडल्या असेल तर त्या विभागात एक तासांच्या आंत भेट देवून शांतता व सलोखा राखण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे त्या दृष्टीने प्रशासनाचे मन वळविणे.

सदरील दक्षता कमिटी कार्य करीत असतांना गैर कृत्ये करणाऱ्या विरुध्द दावा दाखल करावयाचा असेल, अब्रुनुकसानीचा दावा, किंवा पोलिस स्टेशनला गुन्हा नोंदविणे असेल. तर त्यासाठी काही खर्च येणार आहे. त्यादृष्टीने मनपा मार्फत काही आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. कोणत्याही योजना राबवित असतांना मदतीचा हात देणे

आवश्यक आहे. करिता ज्या ज्या वेळेस ही कमेटी कार्य करील त्या त्या वेळेस या कमिटीला आर्थिक मदत देणे योग्य वाटते.

तरी कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता "कर्मचारी दक्षता कमेटी" स्थापन करणे योग्य वाटते.

सदरील प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजूरी देण्यांत येते व कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता औरंगाबाद मनपा कर्मचाऱ्यांच्या संरक्षणासाठी "कर्मचारी दक्षता कमिटी" स्थापन करण्याची मंजूरी दिली जाते. सदरील कमिटीने वेळोवेळी सादर केलेल्या खर्चास मंजूरी देण्यांत येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-३०.११.९३

**प्रस्ताव क्र.१९४ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९३-९४ या वित्तीय वर्षात झोन क्र.३ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्या, पंपहाऊस जलकुंभ इत्यादीची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९२-९३ नुसार रक्कम रु.४,३४,६४३/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यास ठराव क्र.१०३, दि.०६.०९.९३ अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. या कार्यालयाची निविदा सूचना क्र.७/९३-९४ जी की, दै.लोकमत, सिटीजन्स, रहेबर, सकाळ या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण आठ (८) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस फक्त एकच (१) सिलबंद निविदा प्राप्त झाल्याचे दि.२६.१०.९३ रोजी निविदा पेटी उघडण्यांत आली असता निदर्शनास आले आहे ती खालील प्रमाणेची आहे.

१. श्री.सलिम पटेल - १४.९२% जास्त

वरील प्रमाणे श्री.सलिम पटेल हयांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९२% जास्त असा दर दिलेला आहे. त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा.प्रशासक हयांच्या दालनात दरा बाबत ठेकेदारांशी दि.१९.११.९३ रोजी वाटाघाटी करण्यांत आली असता मा.प्रशासक यांनी सदर कामास अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त या दरास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी वाटाघाटी अंतीच्या श्री.सलीम पटेल हयांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाटाघाटी अंतीच्या म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% दराची श्री.सलीम पटेल यांची निविदा स्विकृतीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१९५ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९३-९४ या वित्तीय वर्षात झोन क्र.४ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्या, पंपहाऊस, जलकुंभ इत्यादीची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९२-९३ नुसार रक्कम रु.४,२७,८०८/- एवढ्याचे तयार करण्यांत येवून त्यास ठराव क्रमांक १०१ दि.०६.०९.९३ अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. या कार्यालयाची निविदा सूचना क्र.७/९३-९४ जी की, दै.लोकमत, सिटीजन्स, रहेबर, सकाळ या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण सात (७) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस फक्त एकच (१) सिलबंद निविदा प्राप्त झाल्याचे दि.२६.१०.९३ रोजी निविदा पेटी उघडण्यांत आली असता निदर्शनास आले आहे ती खालीलप्रमाणेची आहे.

१. श्री.आर.एस.भाटीया - ९.७१% जास्त

वरील प्रमाणे श्री.आर.एल.भाटीया हयांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७१% जास्त असा दर दिलेला आहे. त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा.प्रशासक हयांच्या दालनात दराबाबत ठेकेदारांशी दि.१९.११.९३ रोजी वाटाघाटी करण्यांत आली असता मा.प्रशासक यांनी सदर कामास अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त या दरास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी वाटाघाटी अंतीच्या श्री.आर.एस.भाटीया हयांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाटाघाटी अंतीच्या म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची श्री.आर.एस.भाटीया यांची निविदा स्विकृतीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१९६ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गरमपाणी (स्लम) येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.व ६५ मी.मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दर सुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये ६९,३००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. या कार्यालयाची निविदा सूचना क्र.७/९३-९४ मी की, दै.लोकमत, सिटीजन्स, रहेबर, सकाळ हया वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात (७) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्याचे दि.२६.१०.९३ रोजी निविदा पेटी उघडण्यांत आली असता निदर्शनास आले आहे त्या खालील प्रमाणेच्या आहे.

१. श्री.सय्यद खुर्रम - ८% जास्त

२. श्री.सय्यद फैजूल हक्क - ५% जास्त

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री.सय्यद फैजूल हक्क हयांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त असा दर दिलेला आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा.प्रशासक हयांच्या दालनात

दराबाबत ठेकेदारांशी दि.१९.११.९३ रोजी. वाटाघाटी करण्यांत आली असता मा.प्रशासक यांनी सदर कामास अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त या दरास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी वाटाघाटी अंतीच्या श्री.सय्यद फैजूल हक्क हयांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाटाघाटी अंतीच्या म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची श्री.सय्यद फैजूल हक्क यांची निविदा स्विकृतीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१९७ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, १९९३-९४ या वित्तीय वर्षात झोन क्रमांक १ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्या, पंपहाऊस, जलकुंभ इत्यादीची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दर सुची सन १९९२-९३ नुसार रक्कम रु.४,९२,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यास ठराव क्र.१०५, दि.०६.०९.९३ अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. या कार्यालयाची निविदा सुचना क्र.७/९३-९४ जी की, दै.लोकमत, दै.सिटीजन्स, रहेबर, सकाळ या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा (६) निविदा विक्री झाल्या सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस फक्त एकच (१) सिलबंद निविदा प्राप्त झाल्याचे दि.२६.१०.९३ रोजी निविदा पेटी उघडण्यांत आली असता निदर्शनास आले. ती खालील प्रमाणेची आहे.

१. श्री.सैय्यद सिराजउद्दीन - २५% जास्त

वरीलप्रमाणे श्री.सय्यद सिराजउद्दीन हयांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% जास्त असा दर दिलेला आहे. त्यांनी दिलेला दर कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा.प्रशासक हयांच्या दालनात दराबाबत ठेकेदारांशी दि.१९.११.९३ रोजी वाटाघाटी करण्यांत आली असता मा.प्रशासक यांनी सदर कामास अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त या दरास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी वाटाघाटी अंतीच्या श्री.सय्यद सिराजउद्दीन हयांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाटाघाटी अंतीच्या म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची श्री.सय्यद सिराजउद्दीन यांची निविदा स्विकृतीस प्रशासकीय मान्यता देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-०१.१२.९३

**प्रस्ताव क्र.१९८ :-**

प्रस्ताव क्र.१२८ दि.२९.०९.९३ अन्वये सिडको विभाग झोन क्र.७ व चिकलठाणा व इतर भाग विभाग क्र.५ या मधील जलवाहिनीचे देखभाल व दुरुस्तीचे कामाचे अंदाजपत्रक रु.५,४७,२५०/- ला मंजूरी मिळालेली होती. त्याद्वारे सदर कामाची निविदा काढण्यांत आली. या सबंधाने एकूण ४ निविदा विकण्यांत आल्या. व शेवटच्या दिवशी भरलेल्या एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या तुलनात्मक तक्त्यानुसार तिन्ही निविदामध्ये श्री.सजीव खर्डीकर यांची निविदा कमी दराची होती. त्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ८% जास्त दराची होती.

निविदेत भरलेले दर जास्त असल्यामुळे त्यांना दि.२३.११.९३ रोजी दराच्या वाटाघाटीसाठी बोलावण्यांत आले होते. या संबंधाने त्यांनी पत्र देवून विनंती केली की, ते बाहरेगांवी जात असल्यामुळे दि.२३.११.९३ रोजी वाटाघाटीसाठी हजर होऊ शकत नाही व त्यांनी विनंती केली की, ८% जास्त दराऐवजी ३% दर कमी करुन ५% जास्त दराने काम करावयास तयार आहे. त्यांचा विनंती अर्ज मे.आयुक्त यांनी ३% दर कमी करुन ५% जास्त दराने मंजूर केली आहे. तरी सदर प्रस्तावाला मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-**

झोन क्र.५ व ७ मधील जलवाहिनीचे देखभाल व दुरुस्तीचे कामाची निविदा श्री.संजीव खर्डीकर यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ५% जास्त दराने मंजूर करण्यांत येते. नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**विषय क्र.१९९ :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीनगर भागात १५०/२५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी निविदा सूचना क्र.२ जा.क्र./नि-१/११४०/९३, दि.२१.०८.९३ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यांत आल्या असता विक्री झालेल्या चोवीस निविदा पैकी तीन निविदा प्राप्त झाल्या असून तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १६.९१% कमी दराची श्री.आर.एम.भाटीया यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीनगर भागात १५०/२५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईनच्या कामासाठी आय.एस.आय.मार्कचे पाईप उपयोगात आणले जाणार असल्याने तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १६.९१% कमी दराच्या श्री.आर.एस.भाटीया यांचे निविदापत्रकास मंजूरी देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.२०० :-**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बन्सीलालनगर भागातून जाणारे पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी चेतना सोसायटी ते आर.टी.ओ. ऑफिस पर्यंत मोठ्या दगडी गटारीच्या बांधकामासाठी रक्कम रु.३,९३,३००/- अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली असून दि.१३.०१.९३ च्या स्थायी समितीने वरील कामासाठी श्री.सिराजउद्दीन यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५% जास्त दराच्या निविदेस मंजूरी दिली आहे.

वरील कामाच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे हटविण्यांत आल्यामुळे कामात खालील दर्शविल्याप्रमाणे बदल करणे भाग पडले.

१. मुळ अंदाजपत्रकातील रक्कमेच्या आत होणाऱ्या विविध बाबींच्या क्वाटीटीचे कमी जास्त बदल.

२. मुळ अंदाजपत्रकात बाब-१) अन्वये दर्शविलेली क्वाटीटी पेक्षा २५% जास्त होणाऱ्या क्वॉटीटीस चालू डी.एस.आर.दराने दर देणे.

३. अतिक्रमण हटविल्यामुळे मलबा हटविणे व वाहतूक करणे पात्र मोठे झाल्यामुळे खांडकी बसविणे, रोड क्रॉसिंग करिता पाईप टाकणे, नालीवर स्लॅप टाकून जाळ्या बसविणे, मेनहोलची उंची वाढविणे इत्यादी कामाचा (Extra Items) रक्कम रु.२,५०,९०६/- केलेले आहे.

तरी मुळ अंदाजपत्रक रक्कम रु.३,९३,३००/- मध्ये रक्कम रु. (५३,७२५+१,८९,६९६) २,४३,४२१/- वाढ होऊन सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये ६,३६,७२०/- मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर भागातून जाणाऱ्या पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी चेतना सोसायटी ते आर.टी.ओ.ऑफीस पर्यंत मोठी दगडी गटारीचे मुळ कामात प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ प्रमाणे बदल वाढ झाल्यामुळे सदर कामाचे रक्कम रु.६,३६,७२०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## दिनांक :-२६.१०.९३

**प्रस्ताव क्र.१६३ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जालना रोड ते जळगांव रोड हयांना जोडणाऱ्या रस्त्याला डॉ.आबासाहेब गरवारे यांचे नाव देण्यांत यावे. सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम यांच्या अखत्यारित आहे. परंतू सदर रस्ता महानगरपालिकेच्या हद्दीस येतो. कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी पत्र देवून नंबर व नाव देणे हे महानगरपालिकेच्या अखत्यारित आहे असे कळविले आहे. मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी सुध्दा सदर रस्त्यास डॉ.आबासाहेब गरवारे यांचे नांव देणे बाबत विनंती केली आहे.

तरी सदर रस्त्यास डॉ.आबासाहेब गरवारे यांचे नांव देणे बाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

अतिरिक्त शहर यांच्या प्रस्तावानुसार जालना रोड व जळगांव रोड यांना जोडणाऱ्या रस्त्यास डॉ.आबासाहेब गरवारे यांचे नांव देण्यास मान्यता देण्यांत येते.

ठरावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**प्रस्ताव क्र.१६४ :-**

शासकीय अनुदानातून राबविण्यांत येत असलेल्या शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजने अंतर्गत झोपडपट्टी वासीयांच्या कल्याणसाठी शासनाच्या निर्देशानुसार खालील पदांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

१. झोपडपट्ट्यांमध्ये समाज कार्योसाठी महिला समूह संघटक वेतनश्रेणी रु.९५० ते १५०० नियुक्तीबद्दल शासनाचे आदेश आहेत. परंतू मनपाच्या अस्थापनेवर १९८३ पासून समूह संघटक कार्यरत असल्यामुळे व आस्थापनेवर जादा बोजा पडू नये म्हणून वरील वेतनश्रेणीत पदे निर्माण न करता २१.१२०० द.म.एकत्रित मानधनावर दोन पदे

२. वरील योजने अंतर्गत झोपडपट्ट्यातून अकरा बालवाड्या चालविण्यासाठी प्रत्येकी एक बालवाडी शिक्षीकेची पदे द.म.रु.३००/- एकत्रित मानधनावर.

३. बालवाडी शिक्षीकांना मदतनीस म्हणून रु.१५०/- एकत्रित मानधनावरील अकरा पदे व सकस आहार निर्मिती तज्ञास मदतनीस एक असे एकूण मदतनीसाची पदे.

४. आरोग्य विषयक कार्यक्रम राबविण्यासाठी रु.२४००/- द.म.एकत्रित मानधनावरील एक स्त्री वैद्यकीय अधिकारी (अंशकालीन) पद.

५. आरोग्य व समाज शिक्षणावर चित्रपट दाखविण्यासाठी प्रती शो-४ व मानधनावर प्रोजॅक्टर ऑपरेटरचे एक पद.

६. तीन वाचनालयासाठी रु.१५०/- एकत्रित मानधनावरील तीन वाचनालय सेवकांची पदे.

७. कमकुवत घटक कल्याण निधी अंतर्गत चालविल्या जाणाऱ्या दोन क्राफ्ट सेंटर साठी द.म.रु.५००/- एकत्रित मानधनावरील दोन पदे.

८. शिवणकला केंद्रावर रु.३००/- एकत्रित मानधनावरील सेविकेची चार पदे.

९. कमकुवत घटक कल्याण निधीतून चालविल्या जाणाऱ्या अध्याषिकेसाठी एक वाचनालय प्रमुख रु.७५०/- द.म.एकत्रित मानधन वरील एक पद व एक मदतनीस द.म.रु.१५०/- मानधनावरील अशी दोन पदे.

१०. न्युट्रीशन इन्स्ट्रक्टर द.म.रु.४००/- मानधनावरील पद अशी दोन पदे.

वरील पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

**ठराव :-**

प्रकल्प संचालकांनी प्रस्तावित केल्यानुसार शहरी गरीबांस नागरी मुलभूत सेवा योजने अंतर्गत व मनपाच्या कमकुवत घटक कल्याण निधीतून खालील पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यांत येते.

१. समूह संघटक द.म.रु.१२००/- मानधन पदे - दोन
२. बालवाडी शिक्षीका द.म.रु.३००/- मानधन पदे - अकरा
३. बालवाडी सेविका द.म.रु.१५०/- मानधन पदे - अकरा
४. सेविका (अंशकालीन) द.म.रु.१५०/- मानधन पदे - दोन
५. अंशकालीन स्त्री वैद्यकीय अधिकारी द.म.रु.२४००/- मानधन पदे - एक
६. प्रोजेक्टर ऑपरेटर दर शो रु.४०/- पदे - एक
७. वाचनालय सेवक द.म.रु.५००/- मानधन पदे - दोन
८. क्राफ्ट टिचर्स द.म.रु.५००/- मानधन पदे - दोन
९. शिवणकला मदतनीस द.म.रु.३००/- मानधन पदे - चार
१०. अभ्यासिका प्रमुख द.म.रु.७५०/- मानधन पदे - एक
११. न्युट्रीशन इन्स्ट्रक्टर द.म.रु.४००/- मानधन पदे - एक

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |